# झांशीची राणी

आणि

सालच्या बंडाचें

तिहासिक कार्य

१८४०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय — चरित्र
सं. नं. ५८२.



REFBK-0006003

विठ्ठल वामन हडप.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ८८८७
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळप्रत.
सं. चरित्र २४२
ता. २५।७।४०
ठाणे.

# झांशीची राणी

## आणि सत्तावन सालच्या बंडाचें ऐतिहासिक कार्य

कादंबरीकार हडप
यांचें आदर्श वाङ्मय

दुलारी
विभावरी
वैकुंठींचा राणा
जाळ्यांतील मासा
आभास
चिरंजीव
लक्ष्मलांछन
मोपासाँच्या गोष्टी
वादळ
प्रळय
झांशीची राणी
आणि सत्तावन सालच्या
बंडाचें ऐतिहासिक कार्य

[ आगामी ]

पारिजातक
मृगजळाचें सरोवर
ईश्वराची आत्महत्या
जगाचा इतिहास ( खंडशः )

कायमच्या वर्गणीदारांना मालेचीं पुस्तकें फारच सवलतीनें मिळतात. मालेची विस्तृत परिचयपत्रिका मागवा फुकट पाठवूं.

आदर्श वाङ्मय प्रकाशन
सातारा

आदर्श वाङ्मय प्रकाशन : पुष्प ११ वें

स्थळप्रत

# झांशीची राणी

## आणि सत्तावन सालच्या बंडाचें ऐतिहासिक कार्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६००३

विठ्ठल वामन हडप
'कादंबरीमय पेशवाई' कर्ता

REFBK-0006003
REFBK-0006003

आदर्श वाङ्मय प्रकाशन,
सातारा

प्रथमावृत्ति :
मार्च १९४०

सर्व हक्क
प्रकाशकाचे
स्वाधीन

प्रथमावृत्तीचे मुख्य विक्रेते
महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर

किंमत दोन रुपये

मुद्रक व प्रकाशक : वि. ना. हडप, 'आदर्श' मुद्रणालय,
१२६ रामाचा गोट, सातारा सिटी.

मराठी ग्रंथ सं...
क्रा. ........ नं. ........
ता. ........
ठाणे.

# प्रमुख आधारभूत ग्रंथ

★

HISTORY OF INDIAN MUTINY. BY MALLESON
" " " " . BY HOMES.
INDIAN MUTINY. BY BALL.
SEPOY WAR. BY KAYE.
THE OTHER SIDE OF THE MEDAL. BY THOMPSON.
EMPIRE OF ASIA BY TORRENCE.
THE INDIN EMPIRE. BY MARTIN.
RIGE OF THE CHRISTIAN POWER IN INDIA : MAJOR BASU.
THE EMPIRE OF THE NABOBS. BY HATCHINSON.
A HISTORY OF INDIA. BY DUMBAR.
THE BANKRUPTCY OF INDIA. BY HYNDMAN.
HISTORY OF THE BRITISH EMPIRE IN INDIA. BY THORNTON.
THE NABOBS IN ENGLAND. BY HOLZMAN.
INDUSTRIAL ORGANIZATION IN INDIA. BY LOKANATHAN.
GLIMPSES OF WORLD HISTORY. BY JAVAHARLAL NEHRU.

माझा प्रवास : चि. वि. वैद्यकृत.
'सन १८५७' : प्रो. बेहेरेकृत.
शिवकालीन पत्रव्यवहार.
झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांचें चरित्र : पारसनीसकृत.
शिवाय मार्क्स व एंगल्स यांचे ग्रंथ व हिंदुस्थानविषयक लेख, वगैरे.

★

# अनुक्रमणिका


प्र. पृ.

प्रस्तावना १

लेखकाची भूमिका ८

१. विषयप्रवेश ... १

२. मराठशाहीचा उदयास्त व राणीची कुळकथा ... ९

३. सरंजामशाहीचा थोडा इतिहास ... २८

४ झांशीच्या राज्याचा जन्म व कारभार ... ५२

५. राजे गंगाधरराव ... ७३

६. मनूताई 'राणी लक्ष्मी' झाली ... ९१

७. गंगाधररावांचा अंत व दत्तक प्रकरण ... १०१

८. झांशीच्या मालिकेंतील इतर दुर्दैवी हिंदी राज्यें ... ११२

९. दिल्ली-अयोध्या खंडण ... १२६

१०. इंग्रज हिंदुस्थानांत विजयी कां झाले ? ... १३७

११. शेतकरी हिंदुस्थानांत शेतकरी गुलाम ! ... १५३

१२. 'मेरी झाँसी नहीं दूँगी !' ... १६१

१३. सत्तावन सालच्या बंडाचा पूर्वरंग ... १७८

१४. बंडाचा वणवा पेटला ! ... १८९

१५. बंडाचा वणवा विझला ! ... १९७

१६. बंडाचें ऐतिहासिक कार्य ... २१५

मराठी ग्रंथ संग्रहालय

# प्रस्तावना

प्रस्तुत ग्रंथाचे लेखक रा. हडप हे कांहीं एखादे नवे होतकरू लेखक नव्हत कीं त्यांनीं आपल्या ग्रंथास प्रस्तावनेचें रूपुस्त जोडण्याची इच्छा करावी. रा. हडप यांनीं अनेक ग्रंथ लिहून महाराष्ट्रीय वाचकांची सेवा केलेली आहे आणि हा त्यांचा उद्योग मोठ्या द्रुतगतीनें कित्येक वर्षें चालू आहे. अर्थात् जेव्हां त्यांनीं प्रस्तुत ग्रंथास मीं प्रस्तावना लिहावी अशी इच्छा व्यक्त केली आणि मोकळ्या मनानें अनुकूल–प्रतिकूल जें युक्त दिसलें तें लिहिण्यास संकोच ठेवला नाहीं, इतकेंच नव्हे परंतु आज त्यांचा प्रस्तुत ग्रंथ छापून कित्येक महिने लोटले तरी माझी प्रस्तावना हातीं पडण्यासाठीं चिकाटी न सोडतां माझा पिच्छाच पुरविला तेव्हां त्यांचा हेतु कांहीं तरी निराळाच आणि विशेषच असला पाहिजे यांत संदेह नाहीं.

एखाद्या विषयासंबंधानें आपण कांहीं नवीन दृष्टिकोण मांडला म्हणजे दुसऱ्याला सहज त्याचें मत विचारावें ही इच्छा फार अनावर होते. असाच कांहींसा प्रकार रा. हडप यांचा झाला असला पाहिजे म्हणूनच त्यांनीं मला या उद्योगास लावलें असें मला वाटतें.

मला इतिहास हा विषय प्रिय आहे हें जरी खरें तरी इतिहास विषय किती अफाट आहे आणि माझें ज्ञान किती कोतें आहे याची मला जाणीव आहे. माझेंचसें काय, आपल्या भारतीय इतिहासासंबंधानें अद्यापि जगाचेंच ज्ञान फार अल्प आहे. यद्यपि या ज्ञानाचें आपलें क्षेत्र प्रत्यहीं वाढत आहे तरी त्यानें हेंच विश्वासपूर्वक ठरत आहे कीं ज्ञात गोष्टीपेक्षां अज्ञात गोष्टींचेंच क्षेत्र अद्यापि विस्तृत आहे. कदाचित् कोणी म्हणतील कीं, ‘ अशी तर गोष्ट सर्वच विषयांच्या ज्ञानासंबंधीं खरी आहे, या विषयासंबंधींच अशी स्थिति आहे असें नव्हे ! परंतु थोड्या तारतम्यानें पाहिलें तर साधारणपणें आपल्या भारतीय इतिहासाची विशाल व्याप्ति–प्रादेशिक व्याप्ति आणि कालव्याप्ति–दोहींचा विचार केला तर तत्संबंधीची ज्ञानाची जमा फारच अपुरी ठरेल.

येथें इतिहास म्हणजे काय याची निश्चित चर्चा केली पाहिजे. त्यानें माझें म्हणणें अधिक स्पष्ट होईल. पूर्वकाळीं एकंदरींत समाजाचें जीवन कसें होतें याचा साधार चित्रपट तयार करणें म्हणजेच त्याचा इतिहास लिहिणें होय. समाज–जीवनाचे किती तरी पैलू असणार. त्यांतले मुख्य मुख्य पैलू तरी आपणांस यथार्थपणें दिसूं लागले पाहिजेत तरच पूर्वकाळच्या समाज–जीवनाचा मनाजोगता चित्रपट विणून तयार करतां येईल! पण हे पैलू यथार्थपणें दिसणार किंवा कळणार कसे? मागची जाऊं द्या, आजचीच गोष्ट घेऊं. समजा महात्मा गांधींचें चरित्रचित्र काढावयाचें आहे. त्यांचें प्रत्यक्ष पिंड–चित्र हें त्याचें एक साधन होईल. पण या पिंडाच्या भावना, कामना, धारणा आणि कार्य यांचा यथार्थ चित्रपट विणावयाचा तर त्यांचीं भाषणें, लेख, चळवळी, दिनचर्या एवढेंच काय परंतु त्यांचेविषयीं इतर जवळचे व दूरचे यांचे अभिप्राय, या सर्वांचा विचार करावा लागेल. खुद्द गांधींनी आपलें आत्मचरित्र सांगितलें आहे तरी इतरांना त्याची परीक्षा करून कमीअधिक बोलण्याचा मान राहतोच. तेंच कृत्य पण निरनिराळ्या दृष्टिकोणांतून पाहणारे निरनिराळेपणें वर्णन करतील, गांधी त्याचा अर्थ एक सांगतील; तर जिना दुसराच सांगतील लिन्‌लिथगो तिसराच सांगतील आणि गंथर चौथा! शिवाय आज ज्या एक किंवा अनेक उपपत्ति त्यासंबंधीं पुढें येतील त्याच पन्नास वर्षांनंतर येतील असें थोडेंच आहे? त्यांत भरहि पडेल आणि कांहीं गळूनहि पडतील. आजचे सांगणारे सुद्धां उद्यां कदाचित् आपलें जुनें म्हणणें किंवा मत बदलून सांगतील. येथें यथार्थपण कसें ठरवावें आणि सत्य कोणचें समजावें? पुढील बोलण्यांतले पक्षकार कोण समजावे आणि न्यायाधीश कोण समजावा? याचें उत्तर एकच येईल काय? एकाचा पक्षकार तो दुसऱ्याच्या मतानें न्यायाधीशसा ठरेल. असा बहुविध मासला होईल. याचाच अर्थ, अनेक भिन्नभिन्न उपपत्ति व मतें कमीअधिक समजलीं जातील. अशा मतांची मोजणी करून बहुमत किंवा अल्पमत अशी वाटणी करून बहुमत हें सत्य समजावें काय? अखेरचा निर्णय जो जसा करील व मानील तेंच सत्य! स्वतःच त्याचा निश्चय त्याला करावा लागणार.

मग इतिहासाचा खटाटोप कशाला? सत्य समजण्याला त्याचा उपयोग काय? इतिहास मूर्तिमंत सत्य आपणांस दाखवूं शकणार नाहीं; तें आपलें

आपल्यासच पाहावें लागेल. पण, इतिहास आपला वाटाड्या होऊं शकेल. कोणचे मार्ग कोठें जातात व कसे जातात हें तो दाखवूं शकेल. 'येनेष्टं तेन गम्यताम्' ज्याचें त्यानें आपलें इष्ट ठरवावें, व त्या मार्गानें जावें.

इतिहास जेव्हां मत आणि अर्थ सांगत असतो तेव्हां विवादाला फारच मोठी जागा असते. परंतु हीं मतें आणि हा अर्थ ज्या घटनांचा होत असतो त्या घटना आपणाला बऱ्याच निश्चितीनें ठरवतां येतात. सूक्ष्म तर्कपद्धतीचा आणि प्रमाणपद्धतीचा अवलंब करून पूर्वकालीन घटितें आपणांस मूळ स्वरूपांत उभीं करतां येतात. येथेंही वाद किंवा मतभेद यांना वाव नसतो असें नाहीं. परंतु मतप्रकरणीं आणि अर्थप्रकरणीं मतभेदाला आणि विवादाला जेवढा वाव असतो तेवढा येथें असत नाहीं. मतप्रकरणींचा विवाद कांहीं मूलभूत तत्त्वांशीं जाऊन भिडतो आणि मग त्या तत्त्वांना अनुसरून घटितांचे भिन्न भिन्न अर्थ लावण्यांत येऊन निरनिराळे मतप्रवाह उत्पन्न होतात. व्यवहारांत इतिहासाचें चलन करण्यासाठीं हाच मार्ग अवलंबावा लागतो. समस्त मानवी जीवनाविषयीं जें विशिष्ट तत्त्वज्ञान अभ्यासकाचें बनलें असेल त्याच्याच मोजमापानें एखाद्या विशिष्ट काळाचें किंवा विशिष्ट समाजाचें किंवा विशिष्ट घटिताचें मापन ते ते अभ्यासक करतात. याबद्दल त्यांना दोष देतां येत नाहीं. आपलें विशिष्ट तत्त्वज्ञान जागतिक घटितांच्या आधारें पटवून देणें किंवा पटवून घेणें हा कार्यभाग अर्थातच त्या त्या अभ्यासकासच उरकावा लागतो. तात्पर्य, घटित—निश्चिती हा पाया आणि मतानिश्चिती ही इमारत असें समजावयास हरकत नाहीं. पायाच भक्कम नसेल तर, इमारत डळमळीतच राहणार. यास्तव पाया—भरणीसंबंधानें विशेष दक्षता राखली पाहिजे, हें उघड आहे.

महाराणी लक्ष्मीबाई यांचें नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत अजरामर झालें आहे. कोट्यवधि लोकांना आजही झांशीची राणी हे शब्द थरारून सोडतात. एका लहानशा अंकित संस्थानची मालकीण, त्यांतून विधवा तशांत वयही लहान आणि सत्ता मर्यादित; असें असतां ज्या स्त्रीनें हातीं तलवार घेऊन रणकुंडांत उडी घेतली आणि आपल्या शौर्यानें विजेप्रमाणें तळपून शत्रूनाही जिनें तोंडांत बोटें घालावयास लावलीं त्या स्त्रीला अद्वितिय आणि अलौकिक म्हणून सर्वांनीं कां समजूं नये? आणि तिचीं स्तुतिस्तोत्रें मुक्त-

कंठानें कां गाऊं नयेत? हिंदुस्थानच्या इतिहासांत प्रत्यक्ष रणांगणावर बलिष्ट शत्रूंशीं दोन हात करणारी लक्ष्मीबाईसारखी रणरागिणी दुसरी दाखवून देणें इतिहासास जड जाईल. तिच्या अद्‌भुत पराक्रमानेंच तिनें आपलें नांव इतिहासांत अजरामर केलें आहे. आणि हा अभिप्राय कोणचाही मतवादी असो, आनंदानें मान्य करील. अर्थात् अशा लोकविलक्षण वीर-स्त्रीचें चरित्र जाणण्याची इच्छा कोणाही मनुष्यास व्हावी हें स्वाभाविक आहे.

मराठी भाषेंत राणीसाहेबांचें एक चरित्र सुमारें ४० वर्षांपूर्वीं कै. रा. ब. पारसनीस यांनीं लिहून प्रसिद्ध केलें होतें. तेंच त्यांचें पहिलें चरित्र होय. इंग्रजी राज्यांत 'सत्तावनचा प्रश्न' वर्णन करून सांगणें कठीण काम होतें. इंग्रजी सत्ता उलथून पाडावी हा 'सत्तावन प्रसंगां'तील देशी कर्णधारांचा मुख्य मनोदय होता. त्याचें समर्थन करूं म्हटल्यास इंग्रजी राजसत्तेला सहन झालें नसतें. जसा काळ लोटत गेला तशी सत्तावन प्रकरणाकडे बघण्याची सर्वांची दृष्टि पालटत गेली. आणि आतां मोकळेपणीं या प्रसंगाची चर्चा करण्यांत पूर्वीचा धोका राहिलेला नाहीं. आणखी कांहीं काळानें याहीपेक्षां अधिक शांतपणें आपणांस मीमांसा करतां येईल. पारसनीस यांनीं आपल्या ग्रंथाची द्वितियावृत्ति काढली नाहीं, यालाही वर सुचविलेलें भयच कांहीं अंशीं कारण असलें पाहिजे. इंग्रज सरकारचा स्वभाव उतावळा नाहीं; विचारी आहे. त्यामुळें ऐतिहासिक पद्धतीनें केलेल्या विवेचनास त्यांनीं पूर्णतया प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला नाहीं. पारसनिसांच्या पुस्तकानंतर चिंतामणराव वैद्य यांच्या वरसई गांवचे विष्णुभटजी गोडसे यांनीं लिहिलेले 'सत्तावन प्रसंगांतील स्वानुभव' पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेले आहेत. अलीकडे प्रो. बेहेरे यांनींही 'सत्तावन प्रसंगा'चा इतिहास जुळवून लिहून प्रसिद्ध केला असून ठाण्याचे रा. आठवले, हे या प्रसंगाचा एक खंडात्मक इतिहास सांप्रत लिहीत आहेत. मराठी भाषेंत या विषयासंबंधानें एवढीच गणनीय सामग्री आहे. इंग्रजी भाषेंत सरकारी आणि बिन सरकारी असें पुष्कळ वृत्त आणि विवेचन या विषयावर प्रसिद्ध झालेलें सांपडतें. इंग्रजींतील साहित्याच्या मानानें मराठी साहित्य फारच तोकडें आहे. घटितांच्या दृष्टीनें विचार केल्यास देशी भाषांत 'सत्तावनी घटने'संबंधानें गोडशे भटजींच्या बखरीशिवाय नांव घेऊन सांगण्याजोगें साहित्य नाहीं.

वास्तविक 'सत्तावनी घटने'चें यथार्थ आकलन करावयाचें म्हटलें तर प्रथम देशी पक्षाकडील पुष्कळ सामग्री शोधून प्रसिद्ध केली पाहिजे. अशी सामग्री प्रायः नष्ट झाली आहे, असा प्रचलित समज आहे. परंतु सुमारें एक महिन्यापूर्वी राणीसाहेबांच्या झांशी नगरींत राहण्याचें सौभाग्य आम्हांस प्राप्त झालें असतां आम्हीं जें पाहिलें आणि ऐकलें त्यावरून आणि संशोधन प्रकरणीं आम्हांस व इतरांस जो सामान्य अनुभव आहे त्यावरून असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं कीं, सरकारी आणि बिन सरकारी अशा दोन्ही द्वारांनीं अद्यापि 'सत्तावन घटने'विषयीं पुष्कळ माहिती मिळवतां येण्यासारखी आहे. भांडें आतां बहुतेक निवत आलें आहे. तेव्हां पूर्वीं-प्रमाणें बिचकून जाण्याचें किंवा थबकण्याचें कारण नाहीं. 'सत्तावनी घटने'-ची संपूर्ण जिज्ञासा सुरू झाल्यापासून आतां कोणासही कसला धोका किंवा धक्का बसण्याचा संभव नाहीं. या घटनेला आतां ८० वर्षें उलटून गेलीं आहेत. युरोपांत सुमारें ३० वर्षांनंतर तत्पूर्वी घडलेल्या घटनासंबंधानें गौप्य-गोपन करण्याची तादृश आवश्यकता मानीत नाहींत. आणि इकडेही तोच दंडक लागू करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. 'Pre Mutiny Records' खुलीं करण्याला हिंदुस्थान सरकारही यापुढें फारसे आढेवेढे घेणार नाहीं असें आम्हांस वाटतें. दुसरी बाजू लोकांची. त्यांच्यांतही धीट-पणा वाढत आहे. यामुळें अद्यापही बचली आणि बचावली गेलेली सामग्री हळुहळू पुढें येऊं लागेल, अशी आशा करण्यास हरकत नाहीं. बुंदेलखंड, युक्तप्रांत, पंजाब वगैरे प्रांतांतील ज्या इंग्रजांकित संस्थानिकांचा या प्रकरणीं कमीअधिक संबंध आला त्यांच्याकडे दरबारी आणि इतर संग्रहांतून पुष्कळ साहित्य मिळण्याजोगें आहे. उदासीनता आणि अज्ञान किंवा आळस आणि भय यावर तोड काढणें मात्र कठीण आहे. एवंच 'सत्तावनी खंडां'तील घटित-निश्चिती अद्यापि झालेली नाहीं.—म्हणजे मुळींच झालेली नाहीं असें नव्हे; पुष्कळ झाली असली तरी अजून पुष्कळ व्हावयास पाहिजे आहे. त्याशिवाय 'सत्तावनी घटने'चा अर्थ लावणें तितकेंसें युक्त होणार नाहीं. सामान्यार्थ लावणें हें अंगीकृत तत्त्वज्ञानावर बरेंचसें अवलंबून राहील. परंतु विशिष्टार्थ लावणें याला आज आहे यापेक्षां पुष्कळ अधिक प्रकाशाची आवश्यकता आहे आणि तसा प्रकाश उपलब्ध होण्याचा संभव आहे.

रा. हडप यांनीं आपला ग्रंथ लिहितांना उपलब्ध ज्ञानाची मर्यादा गृहीत धरूनच आपलें काम केलें आहे. किंबहुना, त्यांच्या या सुमारें २०० पानी ग्रंथांत वृत्तापेक्षां विवेचनावरच भर दिला आहे. आणि म्हणूनच त्यांनीं आपल्या या ग्रंथाचें नांव 'झांशीची राणी आणि सत्तावन सालच्या बंडाचें ऐतिहासिक कार्य' असें ठेवलेलें आहे. वरील नांवांत 'आणि' या शब्दाऐवजीं 'किंवा' हा शब्द योजल्यानें रा. हडप यांचा हेतु अधिक स्पष्ट झाला असता. कारण, या ग्रंथांत झांशीच्या राणीविषयीं तसें म्हटलें तर फारच थोडें–अत्यल्प म्हटलें तरी चालेल--विवेचन आलेलें आहे. 'सत्तावनी घटने'चें ऐतिहासिक कार्य सांगण्यासच ते या ग्रंथांत स्व–मताप्रमाणें प्रवृत्त झालेले आहेत. या ग्रंथावरून रा. हडप यांनीं मानवी जीवनाचा ग्रंथ लावण्याची एक विशिष्ट तत्वज्ञानपद्धति अनुसरली आहे.

कोणत्याही तत्त्वप्रणालीचा अंगिकार ग्रंथकारानें केला असला तरी एकादी विशिष्ट घटना तदनुसार घडली असल्याचें त्यानें दाखवावयास पाहिजे. तसा यशस्वी प्रयत्न रा. हडप यांच्या ग्रंथांत आम्हांस आढळून येत नाहीं. कांहीं अशीं असें घडणें अपरिहार्य आहे. रा. हडप हे या ग्रंथावरून मार्क्स-स्थापित दर्शनाचे अनुयायी दिसतात. या दर्शनांतील तत्त्वांच्या चौकटींत बसवलेला जगाचा इतिहास अजून आपणासमोर आलेला नाहीं. युरोपीय देशाविषयीं मार्क्सदार्शनिकांनीं पुष्कळ सप्रमाण विवेचनें केलीं आहेत. हिंदुस्थानासंबंधानें मार्क्स आणि एंजल्स यांनीं केलेलीं कांहीं त्रुटित विवेचनें उपलब्ध आहेत. मार्क्सदर्शनानें जगाच्या इतिहासाकडे पाहण्याची एक अभिनव दृष्टि आपणांस उपलब्ध झाली आहे. आणि मानवी जीवनांत होणाऱ्या आर्थिक घडामोडी आणि त्यांचे परिणाम यावर मार्क्सदार्शनिकांनीं विचारसरणीय आणि विदारक असा प्रकाश पाडला आहे, एवढें बहुसंमत आहे. परंतु एवढ्यावरून जागतिक इतिहासाचा ग्रंथ पूर्णतया लागतो असें समाधान प्राप्त होत नाहीं. कांहीं मार्क्सदर्शनाचा प्रभाव निःशंकपणें मान्य करतां येतो. परंतु त्या मर्यादेपलीकडे जाण्यास मन व बुद्धीहि धजत नाहीं. अनुलोम प्रतिलोम दोन्ही पद्धतींनीं जगाचा ग्रंथ उलगडून दाखवितां आला पाहिजे. तोच सोपान होय कीं ज्यानें जसें चढतां येतें तसें उतरतांही आलें पाहिजे. अशा उलट सुलट परीक्षेनें मार्क्सदर्शन आमच्या मतें अपूर्ण आणि

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळप्रत
सं.......नं.......
ता.......



सदोष ठरतें. त्याविषयींचा वाद–प्रतिवाद करण्यास हें स्थळ उचित आहे असें वाटत नाहीं. आधीं मार्क्सवाद्यांनींही जागतिक इतिहासाला प्रमाण-पद्धतीनें तो इतिहास लिहून सिद्धस्वरूप आणलेलें नाहीं. आपली कैफियत पुरी करणें आणि आपला पुरावा हजर करणें हें ज्या त्या पक्षाचें काम आहे' अधुऱ्या स्थितींत प्रतिपक्ष संभवत नाहीं. रा. हडप यांनीं विधानें आणि विवेचनें पुष्कळ केलीं आहेत. परंतु प्रमाणें दिलेलीं नाहींत. तेथें प्रतिवाद काय करावा?

मोरोपंत तांब्यांच्या मनांत अमुक कल्पना डोकावली नसेल कशावरून? (पृ. ८७), रावबाजीच्या वाड्यांत तमुक वाटाघाटी चालत असतील; (पृ ८९) अशा 'असेल नसेल' विवेचनानें कोणचाही ग्रंथ लावून दाखवितां येईल. जें घडतें तें सर्व ऐतिहासिक क्रमानेंच घडतें आहे असें मानणें, आणि कालच सर्व करीत आहे हें दैववादी मानणें यांत नव्या प्रयत्नाला कोठें आणि कसा अवकाश राहतो तें लक्षांत येणें दुरापास्त आहे. रा. हडप यांच्या ग्रंथाचा विस्तारानें परामर्ष घ्यावयाचा म्हटलें म्हणजे मार्क्स-दर्शनाचा तसाच परामर्ष घेणें होय. पण तो कांहीं प्रस्तावनेचा विषय होऊं शकत नाहीं. मार्क्सदर्शनास अनुसरून केलेला 'सत्तावनी घटने'चा एक उलगडा आपणांस रा. हडप यांच्या प्रयत्नांनीं उपलब्ध झाला आहे. हिंदु-स्थानांतील आपणास मार्क्सवादी म्हणविणारांमधील झगडे पाहिल्यास रा. हडप यांचा हा प्रयत्न कितपत अधिकृत मानतां येईल तें सांगण्याचें काम मार्क्स-दार्शनिकांचें आहे.

माघ शु. २।६१ }
१०।२।४०. } दत्तो वामन पोतदार

# लेखकाची भूमिका

'झांशीची राणी आणि सत्तावन सालच्या बंडाचें ऐतिहासिक कार्य' हा ऐतिहासिक प्रबंध लिहिण्याचें मीं जाहीर केल्यापासून तो आज प्रसिद्ध होईतों मध्यें अनेक वर्षें लोटलीं. इतका काळ फावल्या वेळीं बंडाविषयींची उपलब्ध माहिती सांपडेल तेथून मिळवून, तिचें परिशीलन करून तिची संगति लावून ऐतिहासिक दृष्टीनें तिचा समन्वय करण्यांत खर्च झाला.

कोणताही इतिहासग्रंथ सर्वस्वी निःपक्षपातानें लिहिला गेला आहे असें कधींच होत नाहीं. समाज—जीवनांतील सत्यकथांचें स्पष्टीकरण, व त्यावरील भाष्य अशी त्यांची संगति लावणें म्हणजे इतिहास. निःपक्षपातीपणाचा आव कोणाही इतिहासकारानें आणला तरी तो आवच ठरणार. म्हणूनच मी एथें तसला आव आणूं इच्छीत नाहीं. समाजवादी दृष्टिकोणांतून इतिहासाकडे पाहणारा समाजवादाचा अभ्यासू व अनुयायी मी आहें. हिंदुस्थानचा इतिहास समाजवादी दृष्टीनें कथन केला, ऐतिहासिक सत्याची त्या दृष्टीनें संगति लावली, तर आजवर हिंदुस्थानचे इतिहास जे सनातनी सांप्रदायिक पद्धतीनें लिहिले गेले व जात आहेत, भारत—इतिहास—संशोधनही जें याच सनातनी संप्रदायाला अनुसरून भारतांत ठिकठिकाणीं चालू आहे, तो सर्वच ऐतिहासिक खटाटोप समाजजीवनाच्या दृष्टीनें अप्रातिनिधिक व एकांगी आहे. त्यावर उताऱ्यादाखल प्रस्तुत इतिहासग्रंथ आहे असें धरून चालावयाला हरकत नाहीं. सनातनी संप्रदायाच्या इतिहासाचा व इतिहाससंशोधनाचा पाया विभूतिपूजा व विभूतींचें यशोगान हा मुख्यतः असतो. सरंजामशाही, भांडवलशाही वगैरे बहुजनसमाजाची पिळणूक करणाऱ्या शासनपद्धति ग्राह्य धरून सनातनी इतिहासकार चालत आले व चालतात. समाजवादाला मान्य असलेली इतिहासाची व्याख्या 'जगांतील सर्व राष्ट्रांचा सर्व काळचा इतिहास म्हणजे वर्गकलहाचा इतिहास होय' अशी आहे. प्रस्तुतचा सत्तावन सालच्या बंडावरील प्रबंध या दृष्टीनें लिहिला आहे.

सदर ग्रंथाला विद्वान व सनातनी भारतीय इतिहासज्ञात्यांच्या अग्रश्रेणींत चमकणारे माझे मित्र प्रो० पोतदार यांना मीं प्रदीर्घ काळापूर्वींच प्रस्तावना

लिहिण्याची सूचना करून ठेवली होती, व ती त्यांनीं तेव्हां मान्यही केली होती. ऐतिहासिक सत्यांची संहिता लावण्याच्या माझ्या व प्रो० पोतदार यांच्या दृष्टींत मूलतः फरक आहे हें आम्ही दोघेही जाणतों व जाणत होतों. असें असतांही माझ्या ग्रंथविषयाच्या समाजवादी विवेचनाबरोबरच सनातनी अथवा पारंपारिक अशी त्याची सूत्ररूपानें दुसरी बाजूही वाचकांसमोर शक्य तितक्या अधिकृत रीत्या एकसमयावच्छेदेंकरून यावी अशी माझी इच्छा होती. ती प्रो० पोतदार यांनीं बहुतांशीं पूर्ण केली आहे. पूर्णांशानें मी म्हणत नाहीं याचें कारण समक्ष बोलतांना व पत्रोपत्रींही त्यांनीं जितका तीव्र मतभेद निश्चित स्वरूपांत पण मनमोकळेपणानें माझ्या समाजवादी विचारसरणीला दर्शविला, तितकी तीव्रता प्रत्यक्ष अधिकृत मतप्रदर्शनांत नाहीं. उदाहरणार्थ शिवाजीविषयींचें मीं प्रस्तुत ग्रंथांत केलेलें इतिहासविवेचन घेऊं. तेंही प्रो० पोतदारांना सुतराम् मान्य नव्हतें. तथापि इतिहासाकडे पाहण्याची एक नवी दृष्टि या ग्रंथाच्या निमित्तानें वाचकांना लाभणार आहे, त्यांतही अंतःकरणापासून आनंद मानणारे असे त्यांच्यासारखे जाणते व अधिकारी लोक विरळा.

या ग्रंथांत जागोजागीं जीं विवेचनें आणि विधानें केलीं आहेत, त्यांतील मोरोपंत तांबे, राणी लक्ष्मी, धाकटे बाजीराव वगैरे व्यक्तींच्या वय्यक्तिक स्वभावचित्रणांत सामान्य अनुमानें कांहीं ठिकाणीं करण्यांत आलीं आहेत. पण त्या अनुमानांतही 'जिथें धूर तिथें आग' इतका पडताळा त्या त्या व्यक्तींविषयींच्या ऐतिहासिक माहितीच्या समन्वयानें सहज पाहतां येईल. शिवाय विभूतिपूजन मूलतःच गौण समजून केलेल्या विवेचनांत असलीं वय्यक्तिक अनुमानें व विधानें असल्या गोष्टी 'अवांतर' होत. बाकीच्या विवेचनाविषयीं व विधानाविषयीं बोलावयाचें तर त्यांच्या सत्यतेचा भरभक्कम पुरावा दुसरीकडे दिलेल्या प्रमुख आधारभूत ग्रंथांतून इतस्ततः विखुरलेला आहे. उदाहरणार्थ, शिवाजीविषयक विवेचनाला पुरावा शिवकालीन पत्रव्यवहारांतही पुष्कळसा आहे. शेतकरी, नबाब, राजेरजवाडे यांचा कर्जबाजारीपणा, देशी व विलायती सावकारांचे सावकारी पाश, व्याजाचे जबर दर, सरंजामदार वर्गाची बेदरकार वृत्ति, त्यांचा भांडवलशाहीधार्जिणेपणा, शेतकरी-कारागीर लोकांची आबाळ, पुरोहित वर्गाचा संताप, वगैरे प्रत्येक

विवेचनाला व विधानाला सत्याचा भरभक्कम पुरावा आहे. आणि पं. जवाहरलाल नेहरूंचें 'Glimpses of World History' व एक प्रख्यात समाजवादी पुढारी हचिन्सन यांचें 'The Empire of the Nobobs' हे दोन इतिहासग्रंथ तर समाजवादी दृष्टिकोणानेंच लिहिलेले आहेत. हे सर्व उतारे मी प्रस्तुत ग्रंथांत देत बसलों असतों तर पुस्तक आणखी वाढलें असतें. शिवाय ज्याला अमूक मत मान्य नाहीं असें म्हणावयाचें असतें, त्यानें आधारभूत ग्रंथांचा निर्वाळा पडताळून पाहिल्याखेरीज विरोध करणें परिणामकारक व उद्बोधक ठरणार नाहीं. केवळ आनुमानिक विधानें समाजवादी इतिहासकथनालाही मान्य नाहींत.

हिंदुस्थानचा, किंबहुना जगाचाच इतिहास समाजवादी तत्त्वप्रणालीला अनुसरून अजून निरूपित व्हावयाचा आहे. समाजवादी अथवा मार्क्सवादी तत्त्वप्रणालीला अनुसरणारांतही कांहीं कांहीं बाबतींत मतभेद आहेत हेंही खोटें नाहीं. तथापि खरा समाजवादी अथवा मार्क्सवादी विचारवंत स्वमत प्रतिपादन करतांनाही कधींच दुसऱ्याच्या मताविषयीं तुच्छता दाखवीत नाहीं. प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध होणारीं सत्यें स्वीकारण्याला त्याची सदैव तयारी असते. आणि मीही त्याला अपवाद नाहीं.

प्रस्तुत ग्रंथांत एके ठिकाणीं इंग्रजांनीं कुशल विणकरांचे आंगठे तोडून त्या कलेला विरोध केल्याचा उल्लेख आहे. पण ते आंगठे इंग्रजांनीं तोडले नसून त्या विणकरांनीं छळाला कंटाळून स्वतःच आपले आंगठे तोडून टाकले असा साधार पर्याय त्या विधानाला आहे, असें माझे मित्र भाई नाथ घाणेकर यांनीं माझ्या निदर्शनाला आणून दिलें. त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

आदर्श वाङ्मय प्रकाशन,<br>सातारा, ता. १।३।४० } — वि. वा. हडप

स्थळप्रत
सं. ...
ता. ...
६००३

# झांशीची राणी
## आणि
# सत्तावन सालच्या बंडाचें ऐतिहासिक कार्य

### १ : विषयप्रवेश

झांशी आणि झांशीची राणी लक्ष्मी! ही नुसती आठवण झाली पुरे, कीं चित्तवृत्ति अशा थरारून येतात, अशा थरारून येतात, कीं त्याचें वर्णन करायला भाषेंतले शद्ब अपुरे पडतात! क्षणभर धरणीकंपाचे धक्के पुरवले; कोणीं विजेचे धक्के अंतःकरणाला दिले तर तेदेखील पुरवले! शेंकडों तोफांचे रसरसते आगगोळे अथवा बॉंबगोळे, हजारों तरवारींचे घाव, लाखों बंदुकींच्या जळत्या गोळ्या, लाखों सर्पविंचूंचे दंश, वडवानलाच्या ज्वाळा,–हिंदी राष्ट्राचा सुपुत्र खास म्हणेल कीं ह्या सर्व वेदना सहन होतील पण राणी लक्ष्मीच्या आठवणीनें अंतःकरणाला बसणारे धक्के, डसणारे दंश, झोंबणाऱ्या ज्वाळा अथवा प्रत्यक्ष भासणाऱ्या वेदना मात्र सहन होत नाहींत!

आणि असें हिंदुस्थानांतील हिंदूच म्हणेल असें नाहीं तर मुसलमानदेखील असेंच म्हणेल. इतर हरएक बाबींत हिंदुस्थानाला आपल्या राक्षसी स्वार्थैक दृष्टीमुळें पाण्यांत पाहणाऱ्या इंग्रज इतिहासकारांनींदेखील, राणी लक्ष्मीची प्रशंसा केल्यानें हिंदी लोकांना भलेपणा दिल्याचा अपवाद येतो हें माहीत असूनही तिचीं स्तुतिस्तोत्रें मुक्तकंठानें गाइलीं आहेत; तिथें एथल्या हिंदुमुसलमानांची काय कथा! ते तर भाऊ भाऊ! एकाच भूमींत जन्माला आलेले, एकाच मायभूमीचा पान्हा पिऊन लहानाचे मोठे झालेले, हिंदुस्थानच्या एकाच घरांत राहणारे, एकाच गंगा–यमुना–कृष्णा–गोदावरीचें जिवंत पाणी पिणारे, व एकाच शेतांत कष्ट करून धनधान्य पिकवून उदरनिर्वाह करणारे आहेत. त्यांच्यांतही भाऊबंदकीचा वणवा चेतविणारे चेतवोत;

पण कसे झाले तरी ते भाऊ भाऊच आहेत व अखेर भाऊ भाऊच राहणार! त्यांच्यांतले स्वार्थी व मतलबी भांडखोर भांडोत व भांडणें लावोत. तसला आगलावेपणा उभय पक्षांतही पूर्वीं सांपडला, सध्यां सांपडतो, आणि त्याचीं मूलभूत कारणें जोंवर समूळ नष्ट झालीं नाहींत तोंवर सांपडेलही. शेत वाढतें त्याबरोबर रानही वाढतें; त्या रानांत विषारी श्वापदांना वस्ती करावयाला व शेताची नासधूस करावयाला फावतें. तें रान तोडून, पाडून, उपटून, निपटून नाहींसें केल्याखेरीज त्यांतील श्वापदांचा रानदांडगेपणा थांबत नसतो. हिंदुस्थानांतही–पण हिंदुस्थानांतच कां म्हणून? साऱ्या पृथ्वीच्या पाठीवर कष्टाळू जनतेच्या निढळच्या घामावर पिकणाऱ्या शेताची पावलोपावलीं अशी नासधूस, वाताहात व लुटमार चालली आहे. एकटा हिंदुस्थानच पृथ्वीच्या पाठीवर वाघलांडग्यांचीं कोंकरें लाडकीं तसा संकटांचा लाडका देश आहे असें नव्हे; तर आजकालच्या भांडवलशाही जमान्यांत जावें तिकडे तेंच आहे. कोठें राजे रजवाडे म्हणून, कोठें सरदार इनामदार म्हणून, कोठें भांडवलदार कारखानदार म्हणून, अशा निरनिराळ्या श्वापदांनीं आज शतकानुशतकें श्रमजीवि जनतेनें निढळाच्या घामाचें शिंपणें करून पिकविलेलीं धनधान्याचीं शेतें 'बळी तो कान पिळी' या न्यायानें मस्तवालपणें ओरबडून खाण्याचा सपाटा चालविला आहे.

हा डाव बेमालूम कसा साधेल याविषयींच्या हिडीस कारवाया जगभर सदासर्वदा चालल्या व चालत आहेत. हिंदुस्थानांत आज काळजीपूर्वक जोपासली जाणारी तेढ हीही त्यांतलीच एक हिडीस कारवाई आहे. झांशीची राणी लक्ष्मी विजेसारखी जन्माला येऊन तळपून गेली तेव्हांही ह्या कारवाया अगदींच सुरू नव्हत्या असें नाहीं. पण त्यांच्या हिडीसपणाला पोलादी पाणी देण्याचा संघटित प्रयत्न आजच्या सारखा निकरानें तेव्हां चालला नव्हता; जगांतील भांडवलशाही तेव्हां आजच्याइतकी उघडेपणानें लाजलज्जा कोळून पिऊन माणुसकी तोंडीं लावीत नव्हती.

म्हणूनच हिंदुमुसलमानांतील तेढीचे इतर कोणतेही विषारी मतलबी मुद्दे कोणींही हुडकून काढले, व विष पाजलेल्या भाला–बरची–तरवारीच्या पात्यानें आपल्या प्रतिपक्षाला प्राणांतिक जखमा कराव्या त्याप्रमाणें त्या विषारी मुद्यांनीं जरी हिंदी बहुजनसमाजाचीं मनें कितीही घायाळ केलीं, तरी झांशीच्या राणी

लक्ष्मीची आठवण होतांच हिंदुमुसलमानांतील सर्व स्वार्थी आपमतलबी श्रमजीविजनशत्रूंची–देशकंटकांची जातीय तेढ वाढविणारी कलहवती वाचा उघडेल तर एकदम बंद पडेल. त्यांच्या जिव्हेला धनुर्वात होईल व त्यांची बोबडी वळेल. इतकी राणी लक्ष्मीच्या पराक्रमाची पुण्यायी व आठवण हिंदु-मुसलमानांना पूजनीय वाटण्याजोगी आहे.

याचें कारण उघड आहे. तें असें कीं ज्या काळांत राणी लक्ष्मी जन्माला आली व गेली, तो काळ हिंदुस्थानापुरतेंच बोलावयाचें झालें तरी हिंदुस्थानच्या आयुष्यांत अतिशय आणीबाणीचा होता. इंग्रजी भांडवलशाही सत्तेचा वणवा जो इंग्रजी भांडवलदार ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थानची आर्थिक शिकार साधण्यासाठीं हिंदुस्थानच्या चोहोंबाजूंनीं कुटिल भेदनीतीच्या चुडीनें व्यापारी व्यापाचें गवत पेटवून चेतविला, त्या वणव्यांतून बाहेर पडण्याचा कोणताच मार्ग हिंदी जनतेला सांपडेना. निर्दय शिकाऱ्याच्या जाळ्यांत अटकल्यामुळें अगदीं भांबावलेल्या व गोंधळून गेलेल्या सावजांसारखी हिंदवासीयांची अगदीं केविलवाणी अवस्था झाली होती. एका काळीं ज्याच्या पूर्वजांनीं आपल्या बऱ्यावाईट कर्मांनीं जवळ जवळ साऱ्या हिंदुस्थानावर बादशाही सत्ता गाजविली, त्यांचें नुसतें नांव सांगणारा व गमावलेल्या बादशाही सिंहासनावर कोणी चढवील का म्हणून दिल्लीचा बादशाही वंशज बहादूरशहा हा गमावलेल्या सिंहासनाकडे मोठ्या आशेनें केविलवाण्या दृष्टीनें पाहत होता. जवळ जवळ तीच गत दिल्लीच्या बादशहातीला बेहिंमत करून एका काळीं मराठ्यांच्या दराऱ्याचा नगारा आसेतुहिमाचल दुमदुमत ठेवणाऱ्या पेशव्यांचा दत्तक वंशज नानासाहेब पेशवा यांची झाली होती. अयोध्येचा नबाब, व इंग्रजी राजवटींत सर्वतोपरी अगदीं टेकीला आलेले आणखी बरेच हिंदी राजे-रजवाडे–सरंजामदार वगैरे सगळ्यांची तीच दशा ! आणि अशांपैकींच झांशीची राणी लक्ष्मी ही एक होती. कोणाला कदाचित् वाटेल कीं स्त्री असून आणि तशांत राणी असून जिचें नांव हिंदुस्थानच्याच काय पण जगच्या इतिहासांत वज्राच्या शाईनें लिहिल्यासारखें अजरामर राहावें, हा काय चमत्कार? हा चमत्कार तर खराच; पण तो घडून आला. राणी म्हटली कीं तिनें विलासविहारांत रंगून राहावें. हिंदुस्थानच्या इतिहासांत अशा विलासविहाराविषयीं प्रसिद्ध राण्या हिंदु काय अथवा मुसलमान काय, कितीतरी होऊन गेल्या,

आग्र्याच्या ताजमहालासारख्या त्रिभुवनसुंदर कबरी त्याची साक्ष देण्याला उभ्या आहेत. हतबल झाल्यामुळें ज्यांना आपल्या इच्छेविरुद्ध भलत्याच पुरुषाचें खेळणें राणी या नांवानें बनावें लागलें अशाही स्त्रिया हिंदी राजवंशांत होऊन गेल्या. आणि होऊन गेल्या नाहींत कोठें ? जगांतील कोठल्याही देशाच्या इतिहासांत असले दाखले सांपडतात. फारच पुढें गेलें तर संधी मिळतांच राज्य करणाऱ्या कांहीं राजकन्याही सांपडतात.

पण राणी लक्ष्मी अशा सामान्य राजस्त्रियांपैकीं नव्हती. इ. स. १८५७ सालच्या बंडाची ती एक प्रमुख पुढारी होती. तें बंड एकट्या हिंदूंचें नव्हतें, एकट्या मुसलमानांचें नव्हतें; त्या युद्धांत जे हिंदु मुसलमान लढले ते खांद्याला खांदा भिडवून इंग्रजांशीं लढले. त्या बंडाची एक आदर्श नायिका राणी लक्ष्मी होती.

इतिहास सांगतो कीं सत्तावन सालच्या बंडाला राणी लक्ष्मीच्या योग्यतेचा, धडाडीचा, धैर्याचा, शिस्तीचा व निश्चयी नेता दुसरा कोणी मिळाला नाहीं. आणि म्हणूनच इतिहासाला विचारावेंसें वाटतें कीं इतकी जगन्मान्य नेत्री अशी राणी लक्ष्मी बंडवाल्यांच्या बाजूनें निकरानें लढावयाला उभी असतांना तें हिंदी लोकांचें बंड यशस्वी कां झालें नाहीं ?

मात्र राणीचें जीवन अभ्यासितांना ती एक हिंदु अथवा हिंदी राणी, झांशीच्या राज्याची एका काळची स्वामिनी, एवढ्यापुरत्या कोत्या टापूंत आपली नजर खिळवून भागणार नाहीं. राणी ही एक अतिशय थोर, लोकोत्तर, व स्मरणीय व्यक्ति खरी; पण अशा ठळक व्यक्तीचें गुणदोषवर्णन म्हणजेच कांहीं खरा इतिहास नव्हे. असंख्य जलबिंदूंचा जलप्रवाह वाहत असतो खरा; व त्या दृष्टीनें प्रत्येक जलबिंदूला जलप्रवाहांत महत्त्व आहे. पण म्हणून कांहीं एकादा जलबिंदु अथवा जलबिंदूंचे कांहीं शिंतोडे म्हणजे प्रवाह नव्हे. तर त्या प्रवाहामुळें त्या जलबिंदूंना गति मिळते, व ते कार्यक्षम होतात. पर्जन्यवर्षावानें शेतें पिकतात व इतर नव्या वनस्पति उगवून वाढून पर्ण–पुष्प–फल–काष्ट–दंड–सुवासादि लाभ जगाला करून देतात; भडकलेले अग्नि जलवर्षावानें शांत होतात; महापुरानें मोठमोठे अनर्थ होतात; अशा अनेक बऱ्यावाईट गोष्टी जगांत घडतात व त्याचा परिणाम जगाच्या जीवनकलहावर होतो. पण तें कार्य एकट्या जलबिंदूचें नाहीं, व कोणा जलबिंदूला एकदयाला तशी एकल–

कोंडी प्रतिष्ठा मिरवतांही यावयाची नाहीं. उलट जलप्रवाहांत त्या जलबिंदूच्या स्वतंत्र अस्तित्त्वाला महत्त्वच उरलेलें नसतें. आणि म्हणूनच कोणी कवि असंख्य जलबिंदूंच्या एकीकरणानें वाहणाऱ्या जलप्रवाहाला एकेका जलबिंदूची थोरवी सांगून व या प्रत्येक जलबिंदूवर तुझें अस्तित्व अवलंबून आहे असें बजावून प्रवाहाला हिणवूं लागले व कविकल्पनांच्या वावड्या हवेंत उंच उडवूं लागले तर त्या शिळोप्याच्या गप्पा ठरतील.

थेट तीच अवस्था केवळ राजाराणींच्या व इतर थोर व्यक्तींच्या यशोगीतांनीं मंडित असलेल्या इतिहासाची असते. यास्तव अशा ठळक राजाराणींचें गुणगान करून इतिहास सजवूं लागल्यास त्याही शिळोप्याच्या गप्पा ठरतील. कारण स्वतःच्या अंगीं खरी कर्तबगारी, सद्‌गुण अथवा कामसू वृत्ति नसतां 'मी राजा आहें' 'मी राजपुत्र आहें' असें सांगून बहुमोल वस्त्रालंकारांनीं नखशिखान्त वरातीच्या घोड्याप्रमाणें नटणाऱ्या व त्या नटवेपणाखालीं स्वतःचा हीनपणा व नाकर्तेपणा झांकूं पाहणाऱ्या आयतोबांना आतां पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही स्थान उरलेलें नाहीं. खरा इतिहास असल्या मूठपसा राजाराणींच्या वर्णनांत आढळणारा नसतो. तो मानवीसमाजानें जीवनकलहांत सुखानें जगण्याच्या आशेनें केलेले कष्ट, त्या कष्टांतून उत्पन्न केलेली संपत्ति, त्या संपत्तीनें भागणाऱ्या लोकांच्या अन्नवस्त्राच्या व चैनीच्या गरजा, ती संपत्ति निर्माण करण्याचीं साधनें, आणि अशा मानवी समाजांचा एकमेकांच्या जीवनावर समाज अथवा राष्ट्र या नात्यानें घडलेला गतकालीन बरावाईट परिणाम, म्हणजेच कोणत्याही राष्ट्राचा अथवा समाजाचा खरा इतिहास होय. मनुष्यानें निसर्गाशीं झगडत झगडत आणि निसर्गाला कोठें जिंकीत तर कोठें वश करीत, त्याप्रमाणेंच रानावनांतून वन्य पशूंशीं व आपणांपैकींच कांहीं जे बळी बनून स्वतःच्या फायद्यासाठीं मानवाला पिळीत गांजीत फंसवीत मानवाच्या कष्टाचें फळ लुबाडून त्यावर स्वतःचा तालिराम गार करण्याला सोकावलेले असतात अशांशीं झगडत एथवरचा पल्ला कसा गांठला व असल्या संकटांतून वर डोकें काढण्यासाठीं कसकसे प्रयत्न केले याविषयींच्या वास्तवकथा म्हणजेच इतिहास होय. अर्थात् इतिहास म्हणजे मानवाचा जीवनकलह. मानवाच्या जीवनाला अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या घरांसारख्या जागा वगैरे वस्तु अवश्य असतात. ह्या वस्तूंवर ज्यांनीं ताबा मिळविलेला

असतो, ते त्यांच्यावर आपला मालकी हक्क मोठ्या दिमाखानें गर्जून सांगत असतात. राजाराणी आजवर इतिहासांत इतकीं महत्त्वाला चढलेलीं आपण पाहतों ही सारी मंडळी या गर्जून सांगणाऱ्या बळी मंडळींपैकीं, मानवाच्या जीवनाचीं साधनें ज्यांच्या मुठींत आहेत अशांपैकीं होत. या अमोघ सत्ते-मुळेंच त्यांना श्रमजीवि लोकांच्या श्रमांतून उत्पन्न होणारी संपत्ति कायद्याच्या दंडेलीनें म्हणजे दंडेलीसाठीं निर्माण केलेल्या कायद्यानें लुबाडून त्यांची उपास-मार करून आपल्या हुकमतीच्या दावणीला डांबून ठेवतां येतें. म्हणूनच मूठभर लोकांकडून प्रचंड लोकसमुहाची निर्दय पिळणूक होत आहे, बरेचसे लोक कांहीं कामधंदा न करतां पैसा मिळवीत आहेत, आणि बाकीचा प्रचंड लोकसमूह बिचारा मरेमरेतों रात्रंदिवस राबूनही निर्वाहापुरतें अन्नवस्त्रदेखील मिळविण्याला असमर्थ ठरत आहे, असले विस्मयपूर्ण व संतापजनक देखावे आपणाला जगांत जिकडे तिकडे दिसून येतात.

या आयतखाऊ वर्गांतील एक तत्कालीन प्रमुख व्यक्ति या दृष्टीनें राणीच्या चरित्राला तत्कालिन इतिहासांत विशेष महत्त्व नाहीं. राजाराणी काय, झांशी-च्या राणीप्रमाणें तिच्या कालींही हिंदुस्थानांत शेंकडों होतीं. पण तीं बहुतेक नांवें इतिहासानें अडगळ व केरकचरा म्हणून नामंजूर केलीं आहेत; व जनतेच्या स्मृतिगुंफेंत त्यांना मानाचें स्थान नाहीं. अर्थातच राणीचें नांव इतिहासानें कंठमणिसदृश मानलें आहे, तें अर्थात् ती हिंदुस्थानांतील मावळत्या राजसत्तेची अथवा मोडकळत्या सरंजामदारीची प्रतिनिधि होती म्हणून नाहीं. तसें पाहूं जातां नानासाहेब पेशवे, रावसाहेब पेशवे, महाराणा कुंवरसिंह, ही मंडळीही त्याच मालिकेंतील होती. बंड करणारांनीं खुशाल बंड करावें, झगडावें; यश मिळालें तर तें माझ्या ताटांत आणून वाढावें, व अपयश मिळालें तर तें अपयशाचें विष प्राशन करून बंड करणारांनीं खुशाल मरून जावें, अशा छातीबाजपणानें दिल्लीच्या किल्ल्यांत सुरक्षितपणें बसलेला बादशहा व त्याचे शहाजादे व पडद्याआडून सुरक्षितपणें बंडाला चिथावणी देणाऱ्या बेगमा ही मंडळीही त्याच वर्गांतली. वंशपरंपरेनें मिळावयाच्या राजवैभवा-वरचे हक्क इतर पात्रता-अपात्रता याचा लवमात्र विचार न करतां मान्य करावयाचे, तर राणीहून नानासाहेब व रावसाहेब पेशवे थोर; कारण ते पेशवाई बुडविणाऱ्या कां होईना पण पेशवाई वैभवाचे मालक म्हणविणाऱ्या

दुसऱ्या बाजीराव पेशव्याचे दत्तक वारस. पेशव्यांच्या पोटीं येऊन औरस वारस होणें शक्य झालें नाहीं तर नाहीं, पेशव्यांच्या मांडीवर दत्तक जाऊन पेशवाईचे वारस शोभणारे हे दोघे पुरुष मग राणीपेक्षां श्रेष्ठ म्हटले पाहिजेत ! कारण झांशीचें राज्य हें नानासाहेब व रावसाहेब यांच्या पूर्वज पेशव्यांनींच मूळ निर्माण केलें होतें. आणि पेशव्यांपेक्षांही दिल्लीचा नकर्ता बैठकशूर बादशहा बहादूरशहा श्रेष्ठ म्हटला पाहिजे ! कारण पेशव्यांचा उत्तर हिंदुस्थानांत प्रवेश होण्याला या बादशहाच्या पूर्वजांनीं दिलेल्या हक्कांच्या सनदाच कारण झाल्या होत्या ! मग असाही प्रश्न ओघानेंच उत्पन्न होतो कीं ईस्ट इंडिया कंपनीनेंदेखील दिल्लीच्या बादशहाकडून दिवाणीच्या सनदा मिळविल्या नव्हत्या काय? मग पेशवे तरी ईस्ट इंडिया कंपनीच्या सरकारचे अंकित कसे नव्हते ? आणि या युक्तिवादानें ईस्ट इंडिया कंपनी हिंदुस्थानची मालक ठरल्यावर झांशीची राणी, पेशवे तों तहद दिल्लीच्या बादशहा पावेतों सर्वांना आपल्याविरुद्ध बंड केल्याबद्दल निर्दयपणें भरडून काढण्याचा निष्ठुरपणा कंपनी सरकारनें दाखविला, यांत तरी काय चुकलें ?

पण इतिहासानें ही कार्यकारणपरंपरा मान्य केलेली नाहीं. सदासर्वदा दंडुकेशाहीचाच जय होतो, हें कांहीं इतिहासाचें अबाधित तत्त्व नाहीं, अथवा तें मानवतेपासून निर्माण झालेलें वास्तवतापूर्ण सत्यही नाहीं.

यांतून धडा एवढाच सप्रमाण घेतां येतो कीं झांशीच्या राणीला इतिहास ती झांशीची राणी म्हणून ओळखीत नाहीं; ती भारतवर्षाच्या स्वातंत्र्यासाठीं मरेतों तळहातावर शिर घेऊन झगडणारी स्वातंत्र्यमूर्ति म्हणून ओळखीत नाहीं; तर ती काळाच्या वेगवान प्रवाहांत उडी घालून प्रवाहाच्या विरुद्ध दिशेनें पैलतीराला पोहून जाण्यासाठीं निधड्या छातीनें धडपडणारी एक लोकोत्तर शूर रमणी म्हणून ओळखतो. आणि म्हणूनच राणीच्या धाडसाचें व निश्चयाचें कौतुक करतांना इतिहास हेंही कटाक्षानें सांगत असतो कीं राणीसारख्या अद्वितीय सेनापतीची जोड सत्तावन सालच्या बंडाला मिळूनदेखील तें बंड परिणामीं अयशस्वी झालें, यांत कांहीं नवल नाहीं.

केवळ कालखंडांच्या टप्प्या टप्प्यांनीं राणी लक्ष्मीच्या आयुष्याकडे पाहिलें तर राणी म्हणजे आकाशांत वीज कडाडली, चमकली, कोसळली व दिसेनाशी झाली ! सारें चरित्र काय तें बावीस वर्षांत सामावलेलें. आणि त्या बावीस

वर्षांच्या तुटपुंज्या काळानें तरी कशा प्रकारच्या किती कलाटण्या घ्याव्या! राणीचा जन्म पाहावा तर पोटाच्या पाठीं लागून महाराष्ट्र सोडून शेंकडों मैल दूरदेशीं गेलेल्या व पदभ्रष्ट पेशव्याच्या कृपेवर कालक्रमण करणाऱ्या सामान्य गृहस्थांच्या पोटीं. बालपणही तसल्याच निरुत्साही वातावरणांत गेलेलें. वयाच्या आठव्या वर्षीं एका वंशपरंपरेनें राजपदाला पावलेल्या वयस्क पुरुषाशीं लग्न. अर्थात् लग्नाबरोबर राणीपद अनायासें पदरीं पडलें. अठराव्या वर्षीं वैधव्य. लगेच राज्य हातीं अनायासें आलें तसें अनायासें गेलें. पुढें पांच वर्षें लोटतांच सत्तावन सालच्या बंडाचा वणवा पेटला व राणीनें त्या बंडांत प्रामुख्यानें भाग घेतला. बिचारी दोन वर्षें मरेमरेतों तळहातावर शीर घेऊन बंडखोर म्हणून लढली. आणि लढतां लढतां धारातीर्थीं पतन पावली! जशी वीज क्षणांत चमकावी व अदृश्य व्हावी, तशी राणीची जीवनयात्रा हां हां म्हणतां आटोपली! तिची थेट विजेच्या: चमकेसारखी अवस्था झाली. राणीचें जीवित अत्यंत तेजस्वी खरें; इतकें तेजस्वी कीं त्या तेजानें आजही तिकडे पाहणाराचे डोळे दिपून जातात. पण तें जीवन जितकें तेजस्वी तितकेंच अयशस्वी ठरलें तें कां? तेंच तर आपणाला पुढें पाहावयाचें आहे.

## २ : मराठशाहीचा उदयास्त व राणीची कुळकथा

राणी लक्ष्मीचा जन्म गरीब मध्यम वर्गांतील एका कऱ्हाडी ब्राह्मण कुळांत झाला. मात्र जन्म झाला तो राणी लक्ष्मी म्हणून नव्हे, तर आयतोबा लक्ष्मी-पुत्राच्या अन्नावर पोसलेल्या एका आश्रिताची मुलगी म्हणून. तांबे हें राणीचें मूळ माहेरचें उपनांव. ह्या तांबे घराण्याचें वास्तव्य प्रथम सातारा जिल्ह्यांत वांई एथें होतें. पेशवाईच्या अखेरी अखेरीला या तांबे घराण्यापैकीं कृष्णराव तांबे हे गृहस्थ पेशवाईंत मामलतीच्या हुद्यावर असत. अखेरच्या पेशव्यांच्या अर्थात् मोडकळत्या पेशवाईच्या काळांतील ती मामलत, ती ठळकपणें गाजून दिसण्याला तेव्हां काळ अनुकूल नव्हता. कारण निर्जीव व वठूं घातलेल्या वृक्षावर फुटलेल्या फांद्या, व फुलें फुललीं आणि पुष्कळ फळें वाढलीं तरी तीं निर्जीवच असावयाचीं. वळवाचा पाऊस कांहीं शेतीच्या भरंवशाचा नसतो; भिजलेली दारू पेट घेत नसते; पेंढा भरलेल्या मेलेल्या सापाला उंदीरदेखील कुरतडून खातो. तो साप दुरून पाहावा तोंवर त्याचा दरारा आणि भय! पण जवळ जाऊन जरा कुरतडून पाहिलें कीं आंत नुसता पेंढा! बुद्धिजीवि मध्यम वर्गाचें जीवन श्रमसंपदेच्या अभावीं मेलेल्या सापाच्या कोथळ्यांतील पेंढ्यासारखें असतें.

कृष्णराव तांब्यांना बळवंतराव या नांवाचे एक चिरंजीव होते. ते शेवटचे पेशवे बाजीराव ऊर्फ रावबाजी यांच्या मर्जीतले होते. आणि ह्या धन्यांच्या कृपेमुळेंच बळवंतरावांना हुजूरफौजेवरील सरदाराची जागा मिळाली होती, असा उल्लेख सापडतो. मात्र हुजूरफौजेचे सरदार या नात्यानें बळवंतरावांनीं कांहीं पराक्रम गाजविला, राजवट अथवा धन्याचें घराणें यांचा परचक्रापासून बचाव करण्यासाठीं कांहीं विशेष धडपड केली, हातपाय हलविले अथवा झीज सोसली, असें कोठें सांगितलेलें नाहीं. यावरून अर्थबोध इतकाच घेतां

येतो कीं बळवंतराव तांबे हे शेवटच्या पेशव्यांचे एक मामुली आश्रित होते; व तेही धन्याप्रमाणेंच दुबळे आश्रित होते.

समतोल व चाणाक्ष दृष्टीनें विचार केला तर गरीब मध्यम वर्ग हा दुबळयांचाच वर्ग होय. मानवाच्या निर्वाहाचीं साधनें मुठींत ठेवून त्या सत्तेच्या जोरावर मानवाच्या श्रमांतून उत्पन्न होणारीं संपत्तिरूपी फळें स्वतः चाखून श्रमजीवि मानवाला उपाशीं तापाशीं मरेमरेतों राबविणारा वर्ग, कांहीं कामधंदा न करतां खासगी मालमत्तेवर सुखानें जगणारा वर्ग, व जिवापाड कष्ट करून धनधान्यसंपत्ति निर्माण करणारा श्रमजीवि वर्ग, ह्या तीनही वर्गाहून वेगळा असा परान्नपुष्ट पण परावलंबी, दरिद्री पण श्रमविन्मुख, व म्हणूनच सर्वतोपरी दुबळा असा जो समाजांतील एक वर्ग आहे, तो गरीब मध्यम वर्ग होय असें म्हणावयाला हरकत नाहीं. ह्या वर्गाला आपलें स्वतंत्र अस्तित्व कधींच राखतां अथवा सिद्ध करतां येत नाहीं. झाडावरच्या बांडगुळासारखी त्याची अवस्था असते. प्रथम झाडाला अस्तित्व, म्हणून त्या बांडगुळाला अस्तित्व. अर्थात् झाड ज्या बाजूला कोलमडून पडावयाचें त्याच बाजूला झाडाबरोबर बांडगूळही कोसळून पडावयाचें. झाड वठल्यावर कांहीं काळ बांडगूळ जीव धरून राहिलेलें दिसतें खरें; पण ती त्याची अखेरची धुगधुगी असते. अर्थात् सरंजामशाही अथवा भांडवलशाही समाजव्यवस्थेंत ह्या खालच्या मध्यम वर्गाची अवस्था परान्नपुष्ट ऊर्फ बांडगुळी वृत्तीमुळें पिळल्या जाणाऱ्या श्रमजीवि वर्गापेक्षां वरवर दिलावयाला किंचित् बरी दिसली, तरी एकंदरींत विचार करतां त्याची स्थिति श्रमजीवि वर्गापेक्षांही कींव करण्यासारखी असते. विनाश्रम केवळ बुद्धिवैभवावर जगणाऱ्या मध्यम वर्गाचा गरीब मध्यम वर्ग हा जसा अगदीं खालचा थर, तसाच त्यापेक्षां सुस्थितींत कालक्रमणा करणारा अंमळ वरचा थरही असतो; तोही मध्यम वर्गच, व त्याचीही स्थिति अर्थातच बांडगुळासारखीच असते. पण एथें आपणाला तूर्त राणीच्या पूर्वजांविषयीं विचार करावयाचा आहे. यास्तव मध्यम वर्गातील त्याहून वरच्या थराचा विचार करण्याची गरज पुढें भासेल तेव्हां त्याचा विचार विशेष विस्तारानें केला जाईल.

रावबाजीसारख्या सर्वस्वी नालायक व नादान राज्यकर्त्यांच्या हातीं पेशवाई आली, याचाच अर्थ हा कीं पेशवाईला त्या कुपुत्राच्या मांडीवर मस्तक ठेवून

प्राण सोडावयाचा होता! केवळ भावनेवर भर देऊन बोलावयाचें तर आपणावर दिवसेंदिवस एकाहून एक दिवटे पेशवे अंमल गाजवून आपली सर्वतोपरी अप्रतिष्ठा करीत आहेत, असें खिन्न मनानें पाहण्याचे प्रसंग थोरला माधवराव पेशवा याच्या मृत्यूनंतर पेशवाई राजवटीवर क्रमाक्रमानें येऊं लागले होते. त्या प्रसंगांची भीषणताही भडकत्या आगीच्या डोंबाळीप्रमाणें अथवा सर्पविंचूंचा विषारी दंश होतांच अंगीं भिनत जाणाऱ्या विषाप्रमाणें दिवसेंदिवस वाढत होती. पण इतकें सर्व सहन करूनही पेशवाई कालांतील मराठी राजवट पेशव्यांच्या एकीहून एक भयंकर अशा चुकांच्या धुळीच्या दिव्यांनीं प्रकाशमान होणाऱ्या घरांत खितपत कण्हत कळवळत डोकें टेंकून होती! आनुवंशिकतेच्या व खासगी मालमत्तेच्या जमान्यांत पुष्कळशा आईबापांची उतारवयांत जशी परस्वाधीन व केविलवाणी अवस्था होते, तशी–अगदीं थेट तशी केविलवाणी अवस्था तेव्हां मरणाच्या दारीं कपाळ टेंकून बसलेल्या मावळत्या बुडत्या मरत्या मराठी राजवटीची झाली होती. आणि श्रमजीवि वर्गाच्या एकमुखी सत्तेच्या अभावीं दुसऱ्या कोणत्या राजवटीची स्थिति तरी कधीं पेशवाईपेक्षां चिरकाल निराळी होती?

शिवाजीनें स्वतःच्या हिंमतीनें, कष्ट सोसून व आपलें बुद्धिसर्वस्व आणि पराक्रमसर्वस्व वेंचून मराठशाहीची उभारणी केली; ती श्रमजीवि महाराष्ट्रसमाजासाठीं केली. त्या वेळीं महाराष्ट्रांत मोठमोठे कारखाने नव्हते ही गोष्ट खरी; पण कारखान्यांत राबणारा मजूर जसा श्रमजीवि, तसाच शेतांत राबून अन्न पिकविणारा शेतकरीही श्रमजीविच होय. शिवाजीकडे आशेनें पाहणारा श्रमजीवि वर्ग मुख्यतः शेतकऱ्यांचा होता. खरीखुरी बहुजनसमाजाच्या हिताची गोष्ट करून पुढें येणाऱ्या माणसाची पात्रता, लोकप्रियता व समाजजीवनांतील त्याचें बरेंवाईट ऐतिहासिक महत्त्व त्याच्या जीवितकार्याच्या ओघानें सिद्ध होत असतें. या दृष्टीनें विचार करतां शिवाजीनें केलेल्या स्वराज्यस्थापनेची रसाळ कथा हिंदुस्थानच्या इतिहासांत सुवर्णाच्या अथवा वज्राच्या रसानें लिहून ठेवण्यासारखी आहे. महाराष्ट्राचा स्वतःचा असा खरा अर्वाचीन इतिहास शिवशाहीपासून सुरू झाला असें मानलें, आणि तसें मानणें अनेक दृष्टींनीं उचितही आहे, तर शिवशाहीचा काल हा महाराष्ट्राच्या इतिहासाचा खरा फोंफावता जिवंतपणा, चैतन्याचा खजिना व बहुजनसमाजाच्या विश्वासरूपी

संपत्तीचा कुबेरी जामदारखाना ठरतो. बहुजनसमाज कोठेंही पाहिला तरी ते लोक राबणारे व आपल्या कष्टांच्या संततधारेनें धनधान्यसंपदेचीं नितान्तरम्य आणि जीवनोपयोगी वस्तूंचीं शेतें पिकविणारे शेतकरी असोत, कापडाचीं शेतें पिकविणारे गिरणबाबू असोत, वा कोळशाच्या खाणींत राबणारे मजूर असोत; कोठें झालें तरी त्यांनीं मरेमरेतों कष्ट करावयाचे तेव्हां धान्य, कापड, कोळसा अथवा इतर वस्तु पिकावयाच्या. हिंदुस्थान हा शेतकऱ्यांचा देश आहे, हा शेतकरी देश आहे. या देशांतील लोकांचें उपजीविकेचें मुख्य साधन शेतकी हें आहे. अर्थात् हें साधन शाबूत राखणारा व हिंदुस्थानांतील बहुसंख्य शेतकरी वर्गाला आवश्यक तें संरक्षण देऊन त्याचा शेतकीचा मोबदला निर्वेधपणें त्याला देणारा जो पुढारी येईल, तोच बहुसंख्य हिंदी जनतेचा खरा पुढारी. जी सत्ता शेतकऱ्यांचा कैवार घेते व शेतकरी हा आपला अन्नदाता मायाबप आहे हें ओळखून त्या अन्नदात्याशीं इमान पाळते, तिलाच त्या अन्नदात्याचा दुवा मिळतो. अशा नेत्यासाठीं व अशा शासनसंस्थेसाठीं शेतकरी आपलें बलच काय पण आपलें रक्त—आपले प्राणही वेंचावयाला तयार असतो. हिंदुस्थानचा इतिहासदेखील पावलोपावलीं प्रमाणें देऊन हेंच दाखवून देतो कीं हिंदी शेतकऱ्याचें साह्य ज्या ज्या शास्त्यांना मिळालें तेच राज्यें स्थापूं शकले व चालवूं शकले. शेतकऱ्यांचें कल्याण त्यांच्या हातून झालें अथवा निदान शेतकऱ्यांच्या अकल्याणाला ते कारण झाले नाहींत तोंपर्यंतच ती ती राजसत्ता सदाफुली-सारखी टवटवीत राहिली, व शेतकरी ज्या ज्या सत्तेविरुद्ध मनांतून तळमळूं तळतळूं लागला, त्या त्या सत्तेच्या पायाला धरणीकंपासारखे धक्के बसून अखेर शेतकऱ्याच्या संतापयुक्त रोषाच्या ज्वालांनीं भडकलेल्या क्षोभाग्नींत ती सत्ता जळून खाक झाली.

शिवाजी हा शेतकऱ्यांचा राजा होता. शेतकरी मावळ्यामराठ्यांची म्हणजे पर्यायानें आपली स्वतःची आणि सभोंवारच्या बांधवांची मोंगल बादशाहींत सर्वतोपरी गांजणूक होऊं लागलेली पाहून त्याचें अंतःकरण पिळवटून निघालें. ह्या आपल्या महाराष्ट्र मायभूमीची अशी सर्वस्वी वाताहत उडालेली पाहून त्याला वाटलें कीं "मायभूमीला असल्या लाजिरवाण्या दास्यांत कुजत ठेवून तिचे सुपुत्र जे मराठे त्यांना जिवंत तरी कसें राहतां येतें व राहवतें? पण शिवाजीला कळत होतें कीं मोंगल बादशाहीच्या व त्या बादशाहीचें सरंजाम-

शाही बेट जें सर्वत्र कांटेरी रानवेलीसारखें उगवलें आहे त्या लहाननमोठ्या सरदार सुभेदार इनामदारादि सरंजामदारांच्या जुलमी कारभाराच्या प्रचंड पर्वतप्राय ओझ्याखालीं महाराष्ट्राचा कष्टाळू शेतकरी अगदीं दुबळा–अगदीं अर्धमेला होऊन गेला आहे. परंतु म्हणून मुकाट्यानें डोळे मिटून मरून जावें अशा भ्याड वृत्तीचाही माझा शेतकरी नाहीं; व मुकाट्यानें जुलूम सहन करून स्वस्थ बसण्याइतका तो स्वभावतः नेभळाही नाहीं. आपणाला छळणारी व त्रासदायक होणारी सत्ता उलथून पाडावी असें त्या शेतकऱ्याला अवश्य वाटत आहे. पण हा सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून इतस्ततः विखुरलेले हे चिंवट परंतु विस्कळित धागे गोळा करून त्यांचा मजबूत दोर करून त्या दोराचा फांस ह्या शेतकरी समाजाची पिळणूक करणाऱ्या सत्तेच्या गळ्यासभोंवार आंवळणारा नेता माझ्या शेतकरी महाराष्ट्राला पाहिजे आहे.'' शिवाजीनें मराठा शेतकऱ्याचें हें वर्म ध्यानीं घेतलें, कोणाची कोणती नस दाबली कीं ती शेतकऱ्याला त्याच्या दुःखाचा विरंगुळा करूं शकेल हें ओळखलें, आणि महाराष्ट्रांतील मावळ्या मराठ्या शेतकऱ्यांना मोठ्या युक्तीनें मोंगल बादशाही-सत्तेविरुद्ध झगण्यासाठीं एकत्र एका निशाणाखालीं आणलें. शिवाजी अस्सल हिंदु होता खरा; पण त्यानें आपलें राजकारण हिंदु विरुद्ध मुसलमान या जातीय तेढीनें उभारलें नाहीं. "मोंगल बादशाहीच्या बेबंद कारभारामुळें हिंदु रयतेला 'दे माय धरणी ठाय' होऊन गेलें आहे; यास्तव आपण पुढें या, हिंदु-महासभा स्थापन करा, मुसलमानी सत्तेविरुद्ध झगडण्यासाठीं हिंदूंचा सेनासंभार एकत्र करा, व मोंगल सत्तेविरुद्ध धर्मयुद्धाची घोषणा करा'' अशी त्यानें कोणा हिंदुधर्मतारक जगद्गुरु शंकराचार्यांची आळवणी केली नाहीं. महाराष्ट्रांत स्वराज्यस्थापनेची मुहूर्तमेढ रोंवतांना त्यानें प्रथम मध्यम वर्गांत सामावलेल्या ब्राह्मणांच्या वरदानाची व कृपेचीही अपेक्षा केली नाहीं. स्वतः शिवाजी हा सरंजामदारच खरा. पण त्यानें स्वराज्यसंस्थापनेसाठीं प्रथम आपणासारख्या इतर तालेवार सरंजामदारांचे मदतीकरितां उंबरठे झिजविल्याचा दाखला इतिहासांत उपलब्ध नाहीं. मागाहून त्याला स्वराज्यस्थापनेच्या कामीं कांहीं मराठा सरंजामदारांचें व ब्राह्मणांचेंही साह्य मिळालें खरें. पण वाहत्या गंगेंत हात धुवून घेणारे असे चतुर, धूर्त व स्वहितदक्ष लोक प्रत्येक गंगाप्रवाहाला भेटतात. पण अगदीं प्रारंभीं शेंडी तुटो कीं पारंबी तुटो अशा निश्चयानें व

निष्ठेनें स्वराज्यस्थापनेसाठीं लढण्याचें सतीचें वाण पत्करून पुढें व्हा असें शिवाजीनें शेतकऱ्यांनाच सांगितलें, व कदाचित् त्यानें साऱ्या महाराष्ट्रीयांना तशी हांक मारली असली तरी त्या हांकेला शेतकरीच प्रथम धावून आला. आणि शिवाजीची एकंदर स्वराज्यविषयक चळवळ व त्या चळवळीची घडी बसविण्याची ढब पाहिली तरी तो नेहमीं शेतकऱ्याच्या म्हणजे दलित वर्गाच्या हिताला प्रथम जागरूक होता ही गोष्ट चंद्रसूर्याइतकी स्पष्ट आहे.

आणि हें सारें करणारा शिवाजी स्वतः खऱ्या कांटेतोल अर्थानें बोलावयाचें तर शेतकरी नव्हता; तो सरंजामदार होता. शेतकऱ्याला सुखी करतांना 'श्रम करील तो पोटभर जेवील' अथवा 'कसवील त्याची जमीन' असा रास्त कैवारही त्यानें श्रमजीवि वर्गाचा अथवा शेतकऱ्याचा कधीं घेतलेला नाहीं. परंतु समाजधारणा श्रमजीवि वर्गाच्या बऱ्यावाईट आर्थिक स्थितीवर अवलंबून आहे, सरंजामदारांचा निर्वाह व ऐषआरामही श्रमजीवि वर्गाच्या श्रमांवर चालणारा आहे, व यासाठीं श्रमजीवि कामकरी-शेतकरी जनता सुखी तर राष्ट्र सुखी, ही राष्ट्राच्या सुखाची व प्रगतीची गुरुकिल्ली त्यानें अचूक ओळखली होती. महाराष्ट्रांतील गोरगरीब कामकरी–शेतकरी वर्गानेंदेखील शिवाजीच्या हांकेला ओ दिली, ते हातांतला नांगर खालीं ठेवून व कमरेची आंकडी कोयती सोडून तरवार भाला बरची हातीं घेऊन कृषिक्षेत्राऐवजीं रणक्षेत्राकडे धावले ते लढाई हा पोटाचा धंदा म्हणून नव्हे, तर पोटाचा मुख्य धंदा जी शेतकी, ती हिंदु–मुसलमान राजेमहाराजे, सरंजामदार यांच्यांतील सत्ता–संपत्तीच्या अतिलोभामुळें चाललेल्या यादवींत ठार बुडत चालली व शेतकऱ्यांची उपासमार होऊं लागली म्हणून धावले. त्यांना प्रांतांमागून प्रांतांत अन्यायानें लूटमार करून रानटीपणानें पोट भरण्याचा धंदा करावयाचा नव्हता; प्रामाणिकपणें कष्ट करून सुखानें भाजीभाकरी मिळविण्याचा मार्ग मोकळा राखावयाचा होता. शिवाजीला स्वराज्यस्थापनेच्या कामीं साऱ्या महाराष्ट्रांतील शेतकरी मावळे-मराठे लोकांचा अंतःकरणपूर्वक पाठिंबा मिळाला याचें कारण शिवाजीच्या प्रयत्नांना यश येण्यानें त्यांना त्यांच्या कष्टांनीं मिळावयाच्या भाजीभाकरीचा प्रश्न निर्वेधपणें सुटणार होता. तो तेव्हां बहुतांशीं सुटलाही. शिवाजीचें राज्य म्हणजे जरी कामकरी–शेतकरी लोकांचें राज्य झालें नाहीं, तरी त्यांना परसत्तेपासून होणारा जाच बराच टळला.

पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं शिवाजीची बहुजनहितदक्षतेची परंपरा पुढें अखंड चालली नाहीं. एक शिवाजी त्या वर्गात निपजला खरा; पण भांगेंत तुळस उगवली तरी तें चुकून एखादेंच रोंप उगवावयाचें. ऐतिहासिक कालगतीला अनुसरून बोलावयाचें तर सरंजामशाहीची जगांतील आवश्यकता तेव्हां बहुतेक नाहींशी झाली होती; वठलेल्या वृक्षासारखी तिची अवस्था झाली होती. मरणप्राय वठलेल्या वृक्षालाही अधून मधून एखादा अंकुर फुटतो, म्हणून कांहीं त्याचा विशाल वृक्ष होतो असें नाहीं. विझतां विझतां दिवा मोठा होतो, म्हणून कांहीं त्या दिव्याला अकस्मात् तेज चढलें असें होत नाहीं. शिवाजीच्या पश्चात् त्याची बहुजनहितदक्षतेची परंपरा अबाधित राखली गेली नाहीं. शिवाजीच्या मागाहून जे छत्रपति झाले, ते अंगच्या पात्रतेनें व श्रमांनीं लोकांना हवे म्हणून छत्रपति झाले नसून ते शिवाजीचे वारस मुलगे–नातू–पणतू म्हणून छत्रपति झाले. जनहिताकडील त्यांची दृष्टि ढळून ती सत्ता–संपदा–ऐषआराम इकडे वळली. खासगी संपत्तींत व वारस हक्कांत समाजधारणेला जाचक असा मोठा दोष व अनैसर्गिकता आहे ती हीच. माणसाची माणुसकी नष्ट करणारीं, त्याला आळशी व बेपर्वा बनविणारीं व त्याला पशूपेक्षांही पशु बनवूं शकणारीं हीं दोन सामाजिक जालीम विषें आहेत. म्हणूनच छत्रपतींचे अंकित पेशवे अल्प काळांत आनुवंशिक छत्रपतींना गुळाचा गणपति बनवून स्वतः स्वराज्याचे सर्वाधिकारी झाले. यांत एवढेंच झालें; राजवट छत्रपतींची गेली व पेशव्यांची आली. पण भोंसले छत्रपति काय अथवा भट पेशवे काय; दोघेही सरंजामशाहीच्या वठलेल्या वृक्षाचे अंकुर. त्यांच्या वाढीला व विस्ताराला ऐतिहाहिक क्रमानुसार बदलत्या समाजजीवनांत थारा नव्हता. वरातीमागून कोतवाली घोडे कितीही नटवून सजवून आणले, तरी त्यांची कोणाला गरज व काय शोभा?

ऐतिहासिक क्रमानें सरंजामशाहीचें औचित्य सत्राव्या शतकाच्या प्रारंभींच कसें संपलें होतें, व शिवाजीसारखा एखादा सज्जन सरंजामदार जरी अपवादादाखल त्या वर्गात निर्माण झाला तरी त्यामुळें त्या सबंध वर्गाचें पुनरुजीवन होणें कसें शक्य नव्हतें, याचा याहून स्पष्ट विचार पुढें होईल. तोंपावेतों ऐतिहासिक वस्तुस्थितीला स्थूल कार्यकारणभावाची कसोटी लावून पाहतांही असें प्रत्यक्ष प्रमाणांनीं आढळून येतें कीं महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाच्या हिताविष-

यींची जागरूकता जी मराठी स्वराज्याचा संस्थापक शिवाजी याच्या अंतःकरणांत होती, तिचा शिवाजीनंतरच्या छत्रपतींत व पेशव्यांत क्रमाक्रमानें अभाव होऊं लागल्यानें पेशव्यांच्या सत्तेविषयीं महाराष्ट्र बहुजनसमाजांत आपुलकीची भावना उरली नाहीं. हा परकेपणा वाढतां वाढतां पेशवाईच्या अखेरीच्या वेळीं इतका वाढला कीं पेशवाई सफा बुडून पुण्यांतील पेशव्यांच्या राजधानी शनवार वाड्यावर इंग्रजांचें युनियन जॅक फडकलें तेव्हां महाराष्ट्रानें तें स्तब्धपणें पाहिलें. "जिथें माझा भगवा झेंडा डौलानें फडकावयाचा, त्या निशाणकाठीवर, कुठचे कोण परके इंग्रज, त्यांचें परकें निशाण फडकवून आमच्या ललाटीं परतंत्रतेचा-इंग्रजांच्या ताबेदारीचा-गुलामगिरीचा शिक्का ठोकणारा तूं कोण ? चल उतर खालीं !" असें म्हणण्याला एकही धीरवीर मराठा तेव्हां हिरीरीनें पुढें सरला नाहीं ! एकही सरदार इनामदार वतनदार नाहीं, एकही कामकरी शेतकरी नाहीं; कोणी म्हटल्या कोणीही 'मी जिवंत असेतों—माझ्या अंगांत रक्ताचा शेवटचा बिंदु असलेला रणभूमीवर सांडेतों ह्या माझ्या भगव्या झेंड्याला परक्या दुष्टाचा स्पर्शही होऊं द्यावयाचा नाहीं' अशा निग्रहानें त्या भगव्या झेंड्याचें रक्षण करण्याला पुढें सरसावला नाहीं !

याचें कारण काय ? काय महाराष्ट्राचें स्वातंत्र्यप्रेम त्यावेळीं इतकें अजिबात लोपून त्याला पारतंत्र्य गोड वाटूं लागलें होतें ? काय महाराष्ट्रांतला एकूण एक माणूस तेव्हां फितूरशिरोमणि बाळाजीपंत नातू बनला होता ? काय महाराष्ट्राच्या अंगीं शौर्य धैर्य वीर्य नव्हतेंच ? या तीनही प्रश्नांचीं उत्तरें कोणीही स्पष्टपणें नकारार्थींच देईल. मराठी साम्राज्याचा विस्तार साऱ्या हिंदुस्थानभर एका काळीं पसरला होता. हिंदूंना हिंदुत्वाविषयींचा जातीय व धार्मिक अभिमान होता असें बळेंच ग्रहित धरलें तरी मराठ्यांची—पेशव्यांची सत्ता म्हणजे हिंदूंचीच सत्ता; यास्तव हिंदुस्थानांतील बहुसंख्य हिंदूंच्या तेव्हांच्या विद्यमान पिढीला जातीय व धार्मिक अभिमान वाटत असता तर मराठ्याखेरीज सत्राव्या व अठराव्या शतकात दुसरी कोणतीही हिंदु राज्यसत्ता तेव्हा अशी ठळकपणें दिसत नव्हती कीं जिच्याकडे हिंदूंनीं साह्यासाठीं अथवा रक्षणासाठीं आशेनें विश्वासानें व अभिमानानें पाहावें. असें असतांही मराठे-पेशव्यांच्या हिंदु साम्राज्यविस्ताराला हिंदूंकडूनही कसून विरोध झाला. इतकेंच काय पण त्या अंतर्गत विरोधाचें ऊर्फ यादवीचें स्वरूप इतकें हिडीस, इतकें

ओंगळ, इतकें किळसवाणें होतें कीं क्षुद्र स्वार्थैकतत्परतेनें आपसांत भांडून आत्मनाश व दुर्लौकिक ऊर्फ नरकलोक जोडणाऱ्या कृष्णावतारकालीन यादवांनींदेखील सत्राव्या व अठराव्या शतकांतील हिंदूंच्या आपसांतील कलहाला यादवी म्हटल्यानें आपणा यादवांची बेअब्रू होते अशी तक्रार करावी! यावरून एक गोष्ट मात्र सिद्ध होते कीं 'हिंदुस्थान हिंदूंचा' ही एकदेशीय पण सकृद्दर्शनीं मोठी तडफेची वाटणारी जातीय व धार्मिक भावनाही पेशवाई बुडतांना हिंदूंच्या दुःखदग्ध अंतःकरणांत उसळत नव्हती.

'हिंदुस्थान हिंदूंचा' हें ब्रीदवाक्य तडफदारीचें म्हणावयाचें तर महाराष्ट्र मराठ्यांचा हें ब्रीद वाक्य महाराष्ट्रीयांच्या दृष्टीनें त्या तडफदारपणाचा अर्क-अष्ठमांश काढ्यापेक्षांही आटीव असा अर्क, अथवा त्या तडफदारीच्या बहुमोल प्रवाळ–हीरक-मौक्तिकाच्या त्याहूनही बहुमोल पाक–भस्म–रस–गुटिका होत असें म्हटलें पाहिजे. पण शिवाजीच्या वेळीं ज्यांनीं स्वराज्यस्थापनेसाठीं आपल्या जीवनसर्वस्वाचा तानाजी–बाजी-बाळाजी–चाफाजी केला, आपला जीव धन्याच्या व देशाच्या सेवेची सांगता करण्यासाठीं सहज लीलेनें कापसाच्या म्हातारीसारखा हवेंत फूऽऽ करून टाकला, असे जे मराठे त्यांनीं आपलें मराठी साम्राज्य बुडतांना तें पाहत जिवंत राहावेंच कां? महाराष्ट्र-साम्राज्यसुंदरी ही त्यांची मायमाउली ना? तिचे मरणकाळचे आंचके शाबूत कानांनीं त्यांनीं ऐकावेतच का? महाराष्ट्र-जनतारूपी गोमातेच्या पौष्टिक दुधाच्या धारेवर मराठी स्वराज्यरूपी तान्ह्या बाळाला बाळसें येऊन त्याचें हळू हळू बलाढ्य मराठी साम्राज्य बनलें, त्याच गोमातेच्या कासेंतून दुधाच्या धाराऐवजीं रक्ताच्या धारा निघाव्या, याचा अर्थ काय?

याचें अत्यंत कटू पण अत्यंत खरें उत्तर हेंच कीं ती महाराष्ट्रांतील व महाराष्ट्राबाहेरीलही श्रमजीवि जनरूपी गोमाता तिच्या दुधावर पोसलेल्या व त्यामुळें मस्त बनून आपसांत संपत्ति व सत्ता यासाठीं पुराणकालांतील सुंदोपसुंदांप्रमाणें झगडणाऱ्या स्वतःच्या सरंजामशाहीरूपी पोरांकडून होणाऱ्या गांजणुकीनें अगदीं त्रस्त झाली होती. असें संत्रस्त जीवन ही धोंडशी तिला वाटत असतांना तिच्या कासेंत दूध कोठून उत्पन्न होईल? दुधाचा पान्हा म्हणजे प्रेमाचा पान्हा, आणि मनाची प्रसन्नता हें अभिजात निर्व्याज प्रेमाचें जन्मस्थान होय. छत्रपति काय, पेशवे काय, शिंदे-होळकर-पवार-गायकवाड-

भोंसले-बुंदेले-मेहेंदळे-पटवर्धन-पंतसचीव-पंतप्रतिनिधि काय, सर्वांना खावया-प्यावयाला व ऐषआरामालाही विपुल धनधान्य ज्या शेतकऱ्यानें स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन पुरविलें; इतकेंच काय पण अपत्यवत्सलतेच्या अथवा पतिपत्नीप्रेमाच्या जिव्हाळ्याचे नाजुक पाशही तटातट तोडून रणांगणावर बळी देण्यासाठीं सैनिकही पुरवले, त्या वर्गाच्या हिताची काळजी त्या राजेरजवाड्यांनीं अथवा सरदार इनामदारांनीं मुळींच वाहिली नाहीं. आपसांत सत्ता व संपत्ति यांच्या हांवेनें भांडत बसण्यापुढें त्यांना लोकहिताच्या गोष्टी करण्याला वेळ होता कोठें? त्या आपसांतील भांडणाला व युद्धाला कारण बहुजनसमाजाचें हिताहित हें असतें तर गोष्ट निराळी होती. पण तें हित कोणाच्याच ध्यानीं मनीं नसल्यानें केवळ व्यक्तीची आसुरी लालसा तृप्त करण्यासाठीं शत्रुप्रदेश समजल्या जाणाऱ्या भागांतीलच नव्हे, तर 'स्वदेश' 'स्वप्रांत' असें ज्याला म्हणतां आलें असतें त्या स्वतःच्या घरांतही शेतकरी-कामगार वर्गाला राजाचा व त्याच्या हस्तकांचा सरंजामी सासुरवास नकोनकोसा होई. सैन्य पुरवावयचें झालें तरी तो भार बहुजनसमाजावर अर्थात् देशांतल्या शेतकऱ्यावरच पडावयाचा; व शेती हीच राज्याच्या उत्पन्नाची मुख्य बाब असल्यानें राजा जे काय दंगेधोपे करील, ज्या कुरापती काढून भांडत बसेल, त्याच्या सर्व खर्चाचा बोजाही शेतकऱ्यावरच पडावयाचा! लढाईसाठीं सैन्यें निघालीं कीं तेव्हां सध्यांसारखे रस्ते विपुल, विस्तृत व सोईचे थोडेच होते! उभ्या शेताची वाताहात करून व उभ्या गांवांतून रस्ता नेतांना आडवीं घरेंदारें येतील त्यांवरून आपल्या सत्तेचा नांगर फिरवून हे वीर आपल्या दळभारासह दिग्विजयाला निघावयाचे! अशा वेळीं लूटमार व्हावयाची, कधीं कधीं सक्तीची करवसुली व्हावयाची; हा सर्व भार बिचाऱ्या शेतकऱ्यावर पडावयाचा! राक्षसी महत्त्वाकांक्षेनें आपसांत भांडणाऱ्या व आयती सत्ता आणि संपदा ह्या श्रमजीवि बहुजनसमाजाच्या रक्ताची चटक लागलेल्या ह्या कलहप्रिय रणव्याघ्रांना ह्या लुटालुटीच्या व राज्यविस्ताराच्या जगड्व्याळ व्यापापुढें आपल्या पोशिंद्या शेतकरीवर्गाच्या हिताहिताकडे लक्ष देण्याला कोठली फुरसत!

शेती हा आपल्या राष्ट्राच्या निर्वाहाचा मुख्य धंदा, त्या अर्थीं पाटबंधाऱ्यांसारख्या शेतकीला आवश्यक त्या सोई राज्यकर्त्यांनें रयतेला करून द्यावयाला

हव्या. शेतीचें अवर्षणापासून, वन्य पशु व टोळधाडींसारखीं आकस्मिक महासंकटें यांपासून रक्षण कसें होईल अशी खबरदारी राज्यकर्त्यानें घ्यावयाला हवी. अवर्षण अथवा अतिवृष्टि यांत शेतकरी आपल्या गुरांढोरांसह, शेतवाडीसह व पोरांबाळांसह करपून अथवा बुडून कोरड्या अथवा ओल्या मरणानें मरणार नाहीं यासाठीं राज्यकर्त्यानें दक्षता बाळगावयाला हवी. शेलकें बींबियाणें मिळण्याची व्यवस्था करावयाला हवी. रोगराईला जपावयाला हवें. गुरांढोरांचें रक्षण व रोगनिवारण, शेतकऱ्यांच्या गरजेसाठीं आर्थिक मदत, अशा सर्व प्रकारें शेतकीला प्रोत्साहन देणें हें हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांचें मुख्य कर्तव्य होय. तें कांहींही आपल्या पोशिंद्या शेतकऱ्यांसाठीं न करतां राज्यकर्ते जर त्याला सर्वतोपरी आपल्या बेबंदशाहीच्या चरकांत पिळून त्याचें रक्तप्राशन करण्याला सोकावले, तर शेतकऱ्यानें तरी असल्या राज्यकर्त्यांचें हित कां चिंतावें? धर्मभोळेपणामुळें व देवभोळेपणामुळें बिचारा शेतकरी 'पावसानें भिजवलें व राजानें मारलें, तर फिर्याद कोणापाशीं न्यावयाची?' 'रयतेचा शासनकर्ता राजा आहे. पण राजाचा राजा कोण आहे?' 'राजा हा विष्णूचा अवतार आहे' अशा भ्रामक व मादक समजुतीमुळें राज्यसत्तेचा जुलूम निमूटपणें नशिबाला बोल देऊन सहन करीत असला, तरी तो मरणप्राय दुबळा झाल्यावर ती राजसत्ता दुबळी होऊन मरणाच्या पंथाला लागणारच.

शिवाजीला हें पक्कें माहीत होतें. म्हणूनच त्यानें स्वतःला गोब्राह्मणप्रति- पालक' म्हणवून घेण्यासारखी रयतेची सेवा करून ती पदवी सार्थ केली. गो म्हणजे गाई व ब्राह्मण म्हणजे ब्राह्मण जातीचे लोक असा आपल्या पदवीचा संकुचित अर्थ त्यानें कधींच ध्यानीं आणला नाहीं. ब्राह्मणांचा प्रतिपाळ म्हणजे न्यायनीतीनें व धर्मानें वागणाऱ्या जनतेचा प्रतिपाळ व गोमातेचा प्रतिपाळ म्हणजे शेतकीला व दूधदुभत्याला उपयुक्त अशा पशूंचा प्रतिपाळ असाच शिवाजीनें अभिमानानें धारण केलेल्या 'गोब्राह्मणप्रतिपालक' या पदवींतील 'गोब्राह्मण' शब्दाचा अर्थ होता. 'जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट तरी तो चोहों लोकीं श्रेष्ठ' अशा भावनेनें ते आपणाला मुळींच ब्राह्मण- प्रतिपालक म्हणवून घेत नसे. धर्मावर लोकांची अंधश्रद्धा असणें बरें कीं वाईट हा प्रश्न निराळा. पण तेव्हां बहुजनसमाज देवाधर्माच्या बाबतींत आजच्याहून अधिक अंधश्रद्ध होता हे कांहीं खोटें नाहीं. शिवाजी स्वतःही

अंधश्रद्ध नसला तरी धर्मश्रद्धा ही तात्कालिक राजकारणसार्थकतेला व देशोद्धाराला पोषक होणारी आहे असें त्यानें पाहिलें, व एकाकी धर्मश्रद्धेचे इतर दुष्परिणाम ध्यानीं न आणतां त्यानें बहुजनसमाजाच्या धर्मश्रद्धेला आपलें एक उपयुक्त शस्त्र बनवून त्याचा उपयोग स्वराज्यस्थापनेच्या कामीं करून घेतला. धर्मभावना ही विष पाजलेल्या दुधारी तरवारीसारखी असते. ज्या ज्या सावधानचित्त व धूर्त माणसांच्या हातीं ती दुधारी तरवार लागली त्यांनीं त्यांनीं तिचा उपयोग प्रतिपक्षाशीं अथवा प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून आपलें ध्येय गांठण्याच्या कामीं पुरेपूर करून घेतला. ज्यांना तितकेंही तारतम्यज्ञान नव्हतें, ती दुधारी तरवार ज्यांना ध्येयानिष्ठ समतोल वृत्तीनें पेलतां येत नव्हती, त्यांचा त्यामुळें विनाशकालही समीप आला. अकबर, शिवाजी हे अशा राज्यकर्त्यांपैकीं पहिल्या प्रकारचे सावधानचित्त व धूर्त असे सरंजामशाहींतील मुकुटमणि होत, तर अवरंगजेब बादशहा हा दुसऱ्या प्रकारचा पुरुष होय.

कोठेंही पाहा, अज्ञान, गरिबी आणि परावलंबीपणा जेथें वास करतो, तेथेंच दैववाद व धर्म यांचीं रोपें उफाड्यानें उगवतात. हिंदुस्थानांतील ब्राह्मण वगैरे पुढारलेल्या ऊर्फ मध्यम वर्गापेक्षां मागासलेला श्रमजीवि वर्ग हा देवाधर्मांवरच काय पण देवाधर्माच्या नांवावर भुतांखेतांवरही डोळे मिटून विश्वास ठेवणारा असा पूर्वीं होता. अलीकडे तो वर्ग कोठें जागा होत आहे. तथापि तो अजून पुरा जागा झालेला नाहीं. आणि शिवाजीला तर अशा बहुजनसमाजाला आपल्या स्वराज्याच्या कार्याला जुंपून तें कार्य यशस्वी करावयाचें होतें. शिवाजी हा धर्मावडंबर, शकून अपशकून, भुतेंखेतें वगैरे वैचारिक अडथळ्यांना श्रद्धापूर्वक जुमानणारा सनातनी होता, कीं मार्टिन लूथरसारखा शिष्ट सुधारक होता, हा वादग्रस्त प्रश्न सोडविण्याचें काम इतर समतोल विचारवंतावरच तूर्त सोंपविलेलें बरें. परंतु त्यानें स्वतःला ‘ गोब्राह्मणप्रतिपालक ’ म्हणवून घेतलें, व महाराष्ट्रांतच काय पण साऱ्या हिंदुस्थानांत धर्माच्या नांवावर अवरंगजेब बादशहानें मांडलेल्या अनर्थांचा प्रतिकार करून जनतेला सुखी करण्यासाठीं अवरंगजेबाविरुद्ध खवळलेल्या लोकांच्या संतापभावनांचा पुरेपूर उपयोग करून घेतला. त्यानें गोमातेचें रक्षण करून शेतकीच्या व्यवसायाला मोठाच आधार दिला; व ब्राह्मणप्रतिपालाची

शा. ... श ग्रं.

अर्थात् समाजांतील धर्मनिष्ठ, विचारी, व जे बिथरले तर चांगल्या कार्यांत देखील बखेडा करूं शकतील अशा मध्यम वर्गीयांच्या रक्षणाची जबाबदारी घेऊन महाराष्ट्रापुरतें तरी एकजुटीचें बीज बहुजनसमाजाच्या मनोभूमींत चांगलेंच पेरलें. त्याचें पीकही भरपूर शिवाजीच्या पदरीं पडलें. असा 'राजांचा राजा' या अर्थानें 'शेतकऱ्याचा शेतकरी' शिवाजी होता. स्वारी शिकारींत-देखील हा महाराष्ट्रांतला शेतकरी व हा महाराष्ट्राबाहेरचा शेतकरी असला संकुचित दुजाभाव मनांत न बाळगतां जेथें जेथें शेतकऱ्याचा हितसंबंध समोर आला तेथें तेथें तो शेतकऱ्याच्या जिवाची व जित्रापाची काळजी प्रथम घेत असे. म्हणूनच शिवाजीला शेतकऱ्यांच्या पाठबळावर अवरंगजेब बादशहाच्या जाचांतून देश सोडवून स्वतंत्र करतां आला; व 'गोब्राह्मणप्रतिपालन' करतां आलें.

परंतु शिवाजीच्या अंतःकरणांतील हा सद्भाव व ही कर्तव्यदक्षता त्याच्या-नंतर त्याच्या आयत्या गादीवर बसून छत्रपति म्हणवून घेणाऱ्या पुरुषांच्या ठायीं नव्हती. अर्थात् भोंसले छत्रपतींचें कार्य संपलें होतें. म्हणून त्यांना काळानें इतिहासाच्या कचरापेटींत लोटलें व भट पेशव्यांना पुढें आणलें. पेशव्यानीं—त्यांतल्या त्यात बाळाजी विश्वनाथ, थोरले बाजीराव, व बाळाजी बाजीराव ऊर्फ थोरला नानासाहेब पेशवा यांनीं खूप शर्तीनें व शहामतीनें पेशवाई कारभार केला, व पेशवाईचें राजकीय वैभव बाह्यतः शिखराला नेऊन भिडविलें. शिवशाहींतील मराठी स्वराज्याचें त्यांनीं आपल्या बुद्धिचातुर्याच्या व पराक्रमाच्या जोरावर मराठी साम्राज्य बनविलें, यांत संशय नाहीं. पण श्रमजीवि बहुजनसमाजाला शिवाजीचा विसर पडेल, शिवाजी हा लोक सोडून गेल्यामुळें त्या बहुजनसमाजाला होणाऱ्या दुःखाचा व भासणाऱ्या पोरकेपणाचा विरंगुळा होईल, अशी शिवाजीची राजकीय परंपरा पुढें अबाधित राखली गेली नाहीं; सांध्याला सांधा भिडला नाहीं; राज्यकर्ते व रयत यांचें अंतःकरणाला अंतःकरण मिळालें नाहीं. वरून साम्राज्याचा डोलारा मारे भव्य उभा राहिला खरा; पण त्या डोल्हाऱ्याखालीं गाडला गेलेला पाया कच्चा होता. त्या पायाला प्रथमपासून ब्राह्मण-ब्राह्मणेतर, ब्राह्मणांतही देशस्थ व चित्पावन, वगैरे दुज्या भावांच्या अनेक भेगा पडल्या. सरंजाम-दारी पद्धत जी आपद्धर्म म्हणून कां असेना पण बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनीं

राजवटीच्या आबादानीसाठीं जोमानें सुरू केली, तीं वड-पिंपळाचीं रोपें या पायाच्या भेगांतून आपल्या मुळया रोंवूं शकलीं. त्या मुळया खोल खोल जाऊन पेशवाई अंमलाचा पाया हळूहळू म्हणतां म्हणतां पुरतेपणीं पिचूं खचूं निखळूं कोसळूं लागला. त्यामुळें इमारत ढांसळून पडूं लागली. शेतकरी हा समाजाचा व राज्यकर्त्यांचा पोशिंदा. शेतकऱ्यानें आपलें तनुमनधन स्वराज्य-स्थापनेसाठीं औदार्यानें शिवाजीच्या चरणीं वाहिलें; म्हणून आज इतिहासाला ललामभूत होऊन राहिलेला शिवाजी व त्याची शिवशाही निर्माण झाली, हें मराठी साम्राज्याचें मूळ पेशवे विसरले. निदान त्यांनीं तिकडे दुर्लक्ष्य केलें. अथवा कोणत्याही कारणानें त्यांचें तिकडे दुर्लक्ष झालें असें पाहिजे तर म्हणावें. जो न्याय पेशव्यांना लागू, तोच अर्थात् शिंदे, होळकर, गायकवाड, पवार, भोंसले, पटवर्धन वगैरे पेशव्यांच्या मालिकेंत खालींवर आढळणाऱ्या सरंजाम-दारांनाही लागू. उडदामाजि काळें गोरें निवडणारानें काय निवडावें! त्यामुळें हां हां म्हणतां हिंदुस्थानांत दाही दिशा भरभराटलेली पेशवाई व तिच्यांत खरोखर किंवा नांवापुरता अंतर्भाव झालेले सरंजामदारही अवघ्या एका शतकांत कोलमडले; इतकी ती अल्पायुषी ठरली.

ह्या पेशवाइच्या अपकर्षाचे घडे भरतां भरतां शेवटचा घडा ज्या इतिहास-प्रसिद्ध कालपुरुषानें आपल्या हातांनीं भरला व एका काळीं साऱ्या हिंदु-स्थानांत जिचा यशोदुंदुभि अष्टौप्रहर गाजला, तीच मराठशाही लिलावांत अडगळीचें सामान विकावें तशी मोलानें ज्यानें फुंकून टाकली, त्या दिवट्या नगरभवान्या रावबाजीच्या पदरीं जे अनेक आश्रित होते, त्यांतच बळवंत-राव तांबे या नांवाचे एक सामान्य आश्रित होते. त्या बळवंतरावांचे एक चिरंजीव मोरोपंत तांबे या नांवाचे होते. रावबाजीनें फुकटची व विनाआयास मिळालेली पेशवाई दौलत इ. स. १८१८ सालीं बऱ्हाणपुरापाशीं बोरी मुक्कामीं ईस्ट इंडिया कंपनीचा प्रतिनिधि माल्कम याच्या हवालीं केली व तिची किंमत अथवा मोबदला म्हणून सालीना आठ लाख रुपये नक्त नेमणूक घेण्याचें कबूल केलें. शिवाजीनें महाराष्ट्रांतील मावळे-मराठे-शेतकरी--कामकरी--बहुजनसमाजाच्या जीवनसर्वस्वाचा योग्य तो व्यय करून जें स्वराज्य गो-ब्राह्मणप्रतिपालनासाठीं स्थापन केलें, त्या स्वराज्यमंदिरावर निखारे ठेवून त्याची चिता पेटविण्याचें हें अपूर्व साहस एका ब्राह्मणकुलोत्पन्न सरंजाम-

दारानेंच केलें! आणि त्यानें नुसती मराठी स्वराज्याची चिता पेटविली, किंवा त्यानें निरुपायानें आपली महाराष्ट्रमायभू तिच्या गळयाला दावें लावून इंग्रजांच्या हवालीं केली असेंच नाहीं; त्या सौद्याबद्दल सालीना आठ लाखांच्या नक्त नेमणुकीएवढी किंमतही स्वतःसाठीं मिळविली! गोब्राह्मणप्रतिपालाचें शिवाजीचें महाव्रत तसेंच पुढें चालविण्याला वंशपरंपरेनें बद्धपरिकर असलेला ब्राह्मण पेशवा हा; आणि यानें अशा कोटमाप गोब्राह्मणांचा प्रतिपाळ करणाऱ्या स्वदेशभूमातेला क्षुद्र स्वार्थापायीं इंग्रजांची बटिक बनवून सोडलें!

त्यानंतर हे रावबाजी उत्तरेकडे ब्रह्मावर्त एथें राहावयाला गेले! थोरल्या बाजिरावाला जसा चिमाजीअप्पा या नांवाचा भाऊ होता, तसाच या रावबाजीलाही त्याच नांवाचा भाऊ होता. तो प्रथम वसई एथें इंग्रजांनीं नेऊन ठेविला होता. पण पुढें त्यालाही काशीयात्रेला जावेंसें वाटलें; व रावबाजीच्या मागोमाग सहा महिन्यांतच चिमाजीअप्पाही उत्तरेकडे गेला. तो काशीक्षेत्रीं जाऊन राहिला.

पेशवे पदभ्रष्ट झाले तरी ते श्रीमंत. ते जेथें जातील तेथें लवाजमा त्यांच्या मागें असावयाचाच. मोरोपंत तांबे हे पेशव्यांचे–त्यांच्या बंधूंचे आश्रित. अर्थात् तेही धन्याबरोबर काशीयात्रेला सहकुटुंब गेले. पेशवे बंधु सर्व राजवैभवाला मुकले खरे; पण चरितार्थ व चैन यासाठीं त्यांना पैशाची उणीव नव्हती. आणि जिथें श्रीमंतांचें ताट तेथें अर्थातच आवडत्या आश्रिताची वाटी असा प्रकार असल्यानें मोरोपंतांनाही तेथें कोणत्याही प्रकारच्या असल्या सुखसोईची उणीव नव्हती.

पण मोरोपंत तांबे जे चिमाजीआप्पाबरोबर परागंदा झाले ते कां? पेशवे बंधु कांहीं उत्तरेंत एखाद्या मोहिमेवर गेले नव्हते, कीं तीर्थयात्रेला गेले ते तेथून थोड्याच दिवसांत माघारे येणार असें नव्हतें, कीं पदभ्रष्ट व टाकाऊ ठरलेल्या पेशव्यांना त्यांचें पेशवाई वैभव पुन्हा प्राप्त करून द्यावयाचें असल्या निःसीम स्वामिनिष्ठेनें प्रेरित होऊनही ते गेले नव्हते. खरोखर, जेथें माणूस जन्मला, जेथें लहानाचा मोठा झाला, जेथें त्याचा सारा इष्टमित्रपरिवार आहे, तेथून दूर दूर जणूं काय काळया पाण्यावर गेल्यासारखा दूर तो जो जातो तो आपल्या वीतभर पोटाची खळगी भरण्यासाठीं! श्रम न करतां पोट भरण्यासाठीं परागंदा होण्यारखी मानहानि मानवाला दुसरी कोणती असेल?

पेशव्यांची गोष्ट मात्र निराळी होती. त्यांच्यापुरता त्यांच्या जीविताचा प्रश्न चांगल्या प्रकारें सुटला होता. सुखानें बसून लाखांनीं वर्षासन मिळत होतें. कसली दगदग नाहीं कीं भगभग नाहीं. परमार्थही तीर्थक्षेत्रीं त्यांना- त्यांच्या कल्पनेप्रमाणें घडत होता. खाणेंपिणें, विलास विहार, नोकरचाकर, कशांत म्हणजे कशांतही त्यांना कांहीं कमी नव्हतें. कोणीं कांहीं म्हटलें तरी पैसा हेंच सर्व सुखाचें साधन, व सुखासाठींच जीवमात्राची सारखी धडपड चाललेली असते. पेशव्यांना भरपूर पैसा मिळाला, त्यांच्या दृष्टीनें स्वार्थ व परमार्थ दोन्ही त्यांना साधले. फार काय, 'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ जयानें केला तो नर भलारे भला' अशीही पेशव्यांनीं तेव्हां स्वतःची पाठ थोपटून घेतली असेल. कारण राज्यकारभाराची न झेंपणारी दगदग टाळून त्यांनीं प्रपंचसाधन चांगलेंच केलें ! आणि तीर्थक्षेत्रीं राहून धर्मकर्में केल्यानें परमार्थ साधतो अशीही भावना त्यांच्या तीर्थक्षेत्रासन्निध वास्तव्याच्या मुळाशीं असली तर याबद्दल त्यांना मुळींच दोष देण्याचें कारण नाहीं. तेव्हांची एकंदर परिस्थितीच तशी होती; सरंजामशाहीच्या हिडीस कारकीर्दींत दयाधर्म, ब्राह्मणभोजन, व्रतें वैकल्यें, तिर्थयात्रा यांचें हें खूळ श्रमजीविवर्गाला कोणत्या ना कोणत्या गुंगीच्या औषधानें गुंगवून ठेवून त्याला त्याच्या होणाऱ्या पिळणुकीचा विसर पाडण्याचें कार्य अव्याहत चालवींत होतें. पेशवे हे श्रमजीविवर्गाच्या मानेसभोंवार अधिकाधिक आंवळून बसलेल्या प्रचंड साखळींतील केवळ एक दुवा होत. कोणत्याही काळचीं वैचारिक आंदोलनें हे त्या काळच्या समाजजीवनरूपी महासागरावर उमटणारे तरंग होत. अर्थात् जें बीज जनतेच्या मनांत पेरलें जातें, त्या प्रकारचीं शेतें तेथें उगवावयाचीं. आजच्या जागरूक तरुण पिढीला हें प्रपंच-परमार्थाचें चऱ्हाट कंटाळवाणें व अचरटपणाचें आहे असें पटत असलें तरी पूर्वीच्या काळीं हीं चलनी नाणीं होतीं.

मराठशाही-पेशवाई बुडाली तरी महाराष्ट्रांतील शेतकरी घरच्या घरींच राहिला. तोही एकसारखा बुडतच होता, तरी ठार बुडाला असें मात्र नव्हे. स्वराज्यचालकाच्या हातून स्वराज्याचा जीवनाधार शेतकरी बुडाला तरी मेला नाहीं. साऱ्या समाजाचा, राजांचाही जीवनाधार तो, त्याला कोण मारणार? श्रमांखेरीज धनधान्यसंपदा नाहीं व धनधान्यसंपदेखेरीज जीवनसौख्य शक्य

नाहीं. म्हणूनच श्रमजीवि ऊर्फ शेतकरी–कामकरी वर्ग हा सर्वांचा जीवनाधार होय. आपल्या शेतकऱ्यानें स्वतःच्या घामाचें व रक्ताचें शिंपणें करून वाढविलेली शिवशाही बुडाली तरी तो शेतकरी जिवंत राहिला. शिवशाहीवर कलम झालेली पेशवाई बुडाली तेव्हांही शेतकरी जिवंत राहिला. शिवशाहीच्या पूर्वी मोंगलाई होती तेव्हांही शेतकरी जिवंत होता. किती राजसत्ता आल्या व गेल्या, किती परचक्रांच्या टोळधाडी आल्या व गेल्या, तरी श्रमजीवि वर्ग मात्र सतत हालअपेष्टा व पिळणूक गांजणूक सोशीत कां होईना पण टिकून राहिला. याचें कारण सत्ता कोणाच्याही हातीं असो, तो श्रमजीविवर्गाला कोणत्याही ढोंगासोंगांनीं लुबाडावयाचा, पण सर्वसंपन्न निसर्ग असल्या सत्तेला व सोंगाढोंगांना जुमानीत नाहीं. 'हे सर्व धनधान्यसंपदेनें समृद्ध अशा निसर्गा, मी तुझा सत्ताधारी आहें. तूं मुकाट्यानें मला मी मागेन तें दे!' असा हुकूम सत्ताधीशानें निसर्गाला करून पाहावा! निसर्गावर त्याचा कांहींच परिणाम होणार नाहीं. जो श्रम करील, जो निसर्गापाशीं राबेल, त्याला निसर्गसंपदेंत कांहीं उणें नाहीं. पण मी सत्ताधीश, म्हणून मला जें जें काय पाहिजे तें मिळालेंच पाहिजे, अशा घमेंडीचा तेथें कांहीं उपयोग नाहीं. त्याला निसर्गाचें असें ठणठणीत उत्तर आहे कीं मी राजाबिजा कोणी ओळखीत नाहीं. हा निसर्ग मानवानें निर्माण केलेला देव मानीत नाहीं, धर्म मानीत नाहीं, राजा मानीत नाहीं, मुत्सद्दी मानीत नाहीं, योद्धा मानीत नाहीं, कवि मानीत नाहीं तपस्वी मानीत नाहीं, धर्मवीर मानीत नाहीं, स्वातंत्र्यवीर मानीत नाहीं, महात्मा मानीत नाहीं, राष्ट्रसूत्रधार मानीत नाहीं; तो फक्त कष्ट करणाराला मानतो. कष्ट करील त्याच्यासाठीं गोड भाजीभाकरी निसर्गानें वाढून ठेवली आहे. ते कष्ट म्हणजे निसर्गापासून संपत्ति निर्माण करणें, पंचमहाभूतांत सांठविलेल्या धनंतर कच्च्या संपत्तीची पक्की संपत्ति करणें होय. ज्या श्रमांतून धनधान्यसंपदा निर्माण होते, तेच खरे श्रम होत. हे श्रम म्हणजे मुख्यतः शारीरिक व धनोत्पादक श्रम होत. असे श्रम न करतां जगांत प्रतिष्ठेनें वर छाती काढून मिरवणाऱ्या इतर सर्व बुद्धिजीवि व आयतखाऊंना निसर्गाच्या ह्या जगड्व्याळ पसाऱ्यांत श्रावण–भाद्रपदांतील चिखलांत जन्म पावणाऱ्या व आश्विन कार्तिकांतील उन्हाच्या तिरपेनें करपून मरणाऱ्या अल्पजीवि जंतूंपेक्षां अधिक महत्त्व नाहीं.

पेशव्यांचे आश्रित मोरोपंत तांबे हे असेच गरीब मध्यम वर्गांतील एक सामान्य गृहस्थ होते. ह्या वर्गाला धनोत्पादक श्रमजीवनाच्या अभावीं जगाच्या जीवनकलहांत आपलें स्वतंत्र अस्तित्व राखतां येणें शक्य नसल्यानें त्यांना केवळ पोटासाठीं धन्यामागोमाग देशोदेशीं वणवण करीत हिंडावें लागलें! प्रथम मोरोपंत हे रावबाजींचे बंधु चिमाजीअप्पा यांच्या पदरीं काशींत राहत असत. तेथेंच ता १९ नोव्हेंबर १८३५ रोजीं त्यांची पत्नी भागीरथीबाई यांच्या पोटीं एका मुलीचा जन्म झाला. बारशाच्या दिवशीं त्या मुलीचें नांव मनूबाई असें ठेवण्यांत आलें. हीच मनुबाई पुढें झांशीची राणी झाली.

यावरून हें उघड आहे कीं मनूबाई जन्माला आली तेव्हांचें सभोंवारचें वातावरण कांहीं उत्साहानें पल्लवित झालेलें अथवा अभिमान बाळगण्याजोगें मुळींच नव्हतें. गोठ्यातील दुभत्या व उपयुक्त गोमातेच्या मानेला दावें अडकवून तिला कसायाच्या हातीं विकणारा व ती गाय जातांना इकडे तिकडे पळूं नये म्हणून तिच्या गळयात जड लोढणें बांधणारा निर्दय धनी आणि मराठशाहीची वाताहात करणारा हा पेशवा यांत फरक तो काय? असला हा मोरोपंतांचा धनी! त्याच्या वाड्यांत रोज कितीही हौस मौज चालली, संपत्तीचा कितीही चुराडा झाला, तरी त्यांत भूषण काय? मेलेलें अन्न खाऊन जगणाऱ्या माणसाचें अस्तित्व व सुजेमुळें अंगावर वाढलेलें मांस दोन्ही सारखींच निरुपयोगी व किळसवाणीं! अशा धन्यांचे मोरोपंत तांबे हे आश्रित, व अशा मातापितरांच्या आर्थिक परावलंबीपणांत मनूबाईचा जन्म झाला. 'बऱ्यावाईट कुळांत जन्म येणें हें दैवाच्या हातचें आहे; पण पराक्रमानें पुढें येणें माझ्या हातीं आहे ' असें कर्णानें त्याला हीनजन्मा म्हणून हिणवणाऱ्या मंडळीला दिलेलें बाणेदारपणाचें उत्तर देण्याइतकी पात्रता मनूबाईच्या अंगीं तिच्या पुढील आयुष्यांत आली हें निराळें. पण आनुवंशिक कुलपरंपरा मनुष्याच्या जीवनांत जमेला धरून त्याच्या जीवनकार्यांचें पहिलें माप मोजण्याइतकी सनातनी वृत्ति ज्याची आहे, त्यांना खरोखर अभिमान बाळगण्याजोगी मनूबाईच्या जन्मकाळची परिस्थिति स्पृहणीय नव्हती. तिची जीवननौका बिन् शिडाच्या व बिन् सुकाणूच्या नावेप्रमाणें पदभ्रष्ट पेशव्याच्या मोडकळल्या जीवननौकेला अडकवलेल्या होडक्यासारखी परिस्थितीच्या अथांग महासागरातून फरफटत चालली होती. त्या होडीचें शीड व सुकाणूं कोणीं काढून

घेतलें होतें असें नाहीं. पाण्यांतून किनाऱ्यावर जाण्यायेण्यासाठीं मोठ्या नावेला अडकवलेल्या होडीला स्वतंत्र अस्तित्व नसतेंच. ती होडी अथाग पाण्यांतून चालते खरी पण मोठ्या नावेबरोबर फरफटत! म्हणूनच तिला शीड व सुकाणूं नसतें. ती होडी मोठ्या नौकेची आश्रित असते. तिला जलविहाराचें श्रेय मोठया नावेमुळें मिळतें. तिचा सारा डामडौल मोठया नावेच्या जिवावर चालतो. एखाद्या घरबशा आयतखाऊ लक्ष्मीपुत्राच्या वस्त्रालंकारांनीं नटविलेल्या निःशक्त व म्हणूनच निरुपयोगी ठरलेल्या अवयवासारखी त्या गरीब मध्यम वर्गरूपी होडीची अवस्था असते. जोंवर ती श्रीमंतांच्या जीवननौकेला आश्रितासारखी अडकवलेली आहे तोंपर्यंत तिलाही श्रीमंतीच्या उसन्या थाटानें मिरवावयाला मिळतें. श्रीमंतांच्या थोरपणाला साजेसा साजशृंगार अनायासें त्या होडीवर चढतो. पण मुख्य नौका बुडाली कीं तिच्याबरोबर ह्या आश्रित होडीलाही बुडून मरावें लागतें. वादळांत मुख्य नौकेशीं ताटातूट झाली कीं त्या होडीचा अवतार संपला!

गरीब मध्यम वर्ग हा धनवान व सत्ताधारी अशा सरंजामदारी—भांडवलदारी वर्गरूपी वैभवशाली नौकांना आंतील लक्ष्मीपुत्रांच्या सुखसोईसाठीं अडकवलेल्या होडीसारखा आहे. म्हणूनच मोरोपंत तांबे जरी मनूबाईच्या जन्माआधीं व नंतर पेशवे धन्यांच्या पदरीं आश्रित म्हणून वैभवात वागत होते, तरी तें सारें वैभव रया गेलेलें होतें! तसल्या वैभवाचा अभिमान बाळगण्याचा त्याना कांहीं अधिकार नव्हता; व मनूबाईचा जन्म असल्या रया गेलेल्या वैभवात झाला असें म्हणणें तिच्यासारख्या तेजस्वी स्त्रीरत्नाला तर मुळींच भूषणावह नाहीं. अंगीं अद्वितीय कार्यक्षमता असतांही अनुकूल परिस्थितीच्या अभावीं तिच्या आयुष्याचे तीन तेरा नऊ अठरा झाले, याला कारण परान्नपुष्ट अशा बांडगुळी वृत्तीच्या खालच्या मध्यम वर्गांतील एका गृहस्थाच्या कुटुंबांत तिचा जन्म झाला; तसल्या रोगट हवेंत ती लहानीची मोठी झाली. आणि तिच्या अल्प पण तेजस्वी आयुष्याचें पर्यवसानही फार वाईट झालें. तें आयुष्य कडाडून कोठेंतरी पडलेल्या विजेसारखें अथवा मोडकळलेल्या श्रीमंती नावेला बांधलेल्या होडीसारखें वायां गेलें!

तें कसें, याचें स्पष्ट व सप्रमाण उत्तर आपणाला राणीच्या पुढील जीवनकथनांत मिळणार आहे.

# ३ : सरंजामशाहीचा थोडा इतिहास

झांशीचें लहानसें राज्य हें मराठी साम्राज्याचा एक सुभा या रूपानें प्रथम जन्माला आलें; व मराठी साम्राज्य ऊर्फ पेशवाई बुडाल्यावरही कांहीं काळ तें टिकलें. पण पुढें जी गत पेशवाईची, तीच झांशीची व तीच गत सातारा, नागपूर वगैरे मराठी साम्राज्याच्या इतर लहानमोठ्या भागांची झाली.

असें कां व्हावें ? हिंदुस्थान हा शेतकीप्रधान देश असल्यानें शेतकऱ्यांची आबाळ तें राज्याच्या नाशाचें दुश्चिन्ह, हें मागें दाखवून देण्यांत आलें आहे; व शिवशाहीच्या यशाचें मर्मही शेतकऱ्याचें हितसंरक्षण हेंच होतें, हेंही आपण स्थूल रूपानें मागें पाहिलें आहे. ऐतिहासिक घटना पारखून घेण्याची ही कार्यकारणभावाची कसोटी हिंदुस्थानापुरती कांहींशी स्थानिक स्वरूपाची आहे खरी. पण अशा वेळीं ओघानेंच कोणी असा प्रश्न विचारूं शकेल कीं समजा, त्या त्या राजेरजवाड्यांनीं त्या त्या काळीं शेतकऱ्यांचें हितसंरक्षण केलें असतें, श्रमजीवि वर्गाच्या पोटापाण्याचे हाल होऊं दिले नसते, तर तीं तीं राज्यें टिकलीं व भरभराटलीं असतीं काय ? जुन्या हिंदी राजसत्तांचे अवशेष जे आज हिंदुस्थानांत शेंकडों लहान मोठ्या संस्थानांच्या रूपानें सरंजामशाही वर्ग म्हणून नांदत आहेत, तेथें प्रत्येक ठिकाणीं जनता आज अत्यंत त्रस्त झालेली दिसते खरी; व त्या जनक्षोभाच्या ज्वाला भडकत भडकत हिंदुस्थानांतील लहानमोठ्या राजामहाराजांच्या व सरदार-इनामदार-जहागीरदारांच्या सुखासनांपावेतों जाऊन पोहोंचत आहेत. राजमुकुट त्या ज्वाळांत वितळत आहेत व भरजरी रत्नखचित शिरस्त्राणें बिनतेलाच्या पोताच्या फडक्यांप्रमाणें पेटत आहेत. या सर्व सरंजामदारांनीं आज आपल्या सत्तेखालील प्रदेशांतील सर्व शेतकऱ्यांना सुखी करण्याचा जाहीरनामा काढला व कांहीं सवलती शेतकऱ्यांना दिल्या, तर सर्वत्र आबादीआबाद होऊन शेतकरी सरंजामशाहीला जनता धन्यवाद देऊं लागेल काय ? आणि संकट टळेल काय ?

ह्या प्रश्नाचें उत्तर देणें आणि समुद्राला आग लागली तर मासे काय करतील या प्रश्नाचें उत्तर देणें ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच हास्यास्पद आहेत. मात्र ह्या प्रश्नाला उत्तरच नाहीं असें नाहीं. त्याला उत्तर आहे. पण तें शोधून काढण्यासाठींही आपणाला जगाच्या ऐतिहासिक क्रमाकडे लक्ष दिलें पाहिजे; व त्याच्या साक्षीनें त्या प्रश्नाचा निर्णय घेतला पाहिजे.

हा ऐतिहासिक क्रम ध्यानीं घेतां सकृद्दर्शनींच एक गोष्ट आपणाला दिसून येते ती अशी कीं मानवी श्रमांतून होणारें संपत्तीचें उत्पादन, व्यय व देवघेव वगैरे समाजाची आर्थिक व्यवस्था ही गतिमान अथवा बदलणारी असते, व हा बदल ऐतिहासिक क्रमाला अनुसरूनच होत असतो. उत्पादनाचे नवे नवे मार्ग मानवाला हस्तगत झाले कीं समाज आपल्या उत्पादनाच्या पद्धतीही त्या ज्ञानाचा व साधनांचा फायदा घेऊन इष्ट त्याप्रमाणें बदलतो, व त्याला अनुरूप असा बदल समाजांतील आर्थिक संबंधांतही होणें अपरिहार्य होतें. कारण समाजाचे आर्थिक संबंध हे तेथील उत्पादनपद्धतीशीं सापेक्ष असतात. किंबहुना तें त्या उत्पादनपद्धतीचें प्रतिबिंबच असतें म्हणलें तरी चालेल. आग्र्याला जाऊन पाहा, यमुनेच्या कांठचा भव्य लाल किल्ला मोंगल साम्राज्याच्या वेळींही होता व आजही आहे. तेव्हांही जलपूर्ण यमुनापात्रांत त्याचें प्रतिबिंब उमटत असेल व आजही यमुना जलपूर्ण असली कीं तें त्यांत उमटलेलें दिसेल. पण तेव्हां तो किल्ला जितका वैभवशाली दिसत असे तितकें त्यांचें प्रतिबिंबही वैभवशाली दिसे; व आज तो किल्ला उदास व ओसाड दिसतो तसें त्यांचें प्रतिबिम्बही उदास व ओसाड दिसतें. तो आग्र्याचा किल्ला काय, अथवा महाराष्ट्रांतील सिंहगड, शिवनेरी, रायगड, शनवारवाडा हीं ऐतिहासिक स्थळें काय, तेव्हां हीं सभोंवारच्या देशाचीं रक्षणस्थानें होतीं. पण आज पुराणवस्तुसंशोधन खात्यांत पोटासाठीं सरकारची ताबेदारी पत्करून राहिलेल्या भाडोत्री रखवालदारांना त्या स्थानाचें रक्षण करावें लागतें! आणि थेट असेच हिंदुस्थानांतील राजेरजवाडे वगैरे सरंजामदार, ज्यांचे पूर्वज एका काळीं मारे रथी, अतिरथी महारथी म्हणून गाजले, ज्यांनीं मर्दुमकी केली, समशेर गाजवली, दिल्लीच्या बादशाही तख्ताचीं शकलें केलीं, अटकेपार झेंडे फडकविले; भव्य भव्य मशिदी उभारून इस्लामकी जय म्हटलें अथवा महाराष्ट्र धर्माला सर्वत्रविजयी करून जिकडे तिकडे आनंदवनभुवन उभारलें,

ज्यांच्यासमोर व्यापारी इंग्रजांना प्रारंभीं अगदीं नाक मुठींत घेऊन वागावें लागलें, त्यांचेच वंशज राजेरजवाडे आज त्याच इंग्रजांच्या पायांवर लोटांगणें घालून दयेसाठीं पदर पसरीत आहेत! पण इतकी ह्या सरंजामदार वर्गाची त्रेधातिरपिट कां उडाली आहे? इतकी यांची पांचावर धारण कां बसली आहे? इतकें अत्यंत नामुष्कीचें जिणें जगण्याची पाळी त्यांच्यावर कां आली आहे? तर एका काळीं ज्या हिंदी जनतेला ह्या अरेरावांनीं बेफिकीरपणानें वागविलें व पिळून काढलें व सध्यांही त्यांचा तोच क्रम सुरू आहे, तीच जनता आज विरोधप्रवण होऊन, आपल्या क्षोभानलानें हिंदी राजेरजवाड्यांच्या सिंहासनांना व उच्चासनांना आगी लावण्याला सज्ज व समर्थ झाली आहे म्हणून!

हें जें सामर्थ्य आज हिंदी जनतेच्या अंगीं उत्पन्न झालें आहे, तें अर्थातच पूर्वोक्त ऐतिहासिक क्रमाला धरून आहे; व त्याला समाजांतील आर्थिक संबंधच सर्वस्वी कारण आहेत. ह्या आर्थिक संबंधांतून हिंदुस्थानांतील व हिंदी संस्थानातील चळवळीचा क्रमप्राप्त उगम कसा झाला, हें पाहण्यापूर्वीं हिंदी सरंजामशाहीच्या उत्पत्ति-स्थिति-लयाची सप्रमाण फोड करतां येण्यासाठीं मूळ हा सरंजामदार वर्ग निर्माण कसा झाला व त्याला समाजाच्या आर्थिक संबंधांत बरेवाईट हेलकावे कसे बसले हें पाहिलें पाहिजे. त्यासाठीं आपणाला मानवाच्या उत्पत्तीपासूनचा इतिहास ओझरता तरी ध्यानीं आणला पाहिजे.

अगदीं पहिला मानवसमाज जो जन्माला आला, त्याची कल्पना आजच्या सुधारलेल्या मानवसमाजावरून करता यावयाची नाहीं. आज जगांत सर्वत्र विज्ञानयुगाचा प्रभाव दिसून येतो व अज्ञानाच्या आंधारांत चांचपटत भलभलत्या कल्पना उराशीं बाळगून जीवन कंठण्याचा प्रसंग आतां मानवजातीवर उरलेला नाहीं. पण अगदीं पहिल्या मानवसमाजाला विज्ञानाची लवमात्र जाणीव नव्हती, इतकेंच काय तर निर्वाहासाठीं अन्नवस्त्र निर्माण करण्याची कल्पनाही प्रथम त्याला सुचली नव्हती. मानवजात प्रथम शिकार करून मिळणाऱ्या प्राण्यांच्या रक्तामांसावर व रानातील कंदमुळांवर व फळांवर निर्वाह करीत असे. रानावनात भटकावयाचें, शिकार करावयाची, कंदमुळें व फळें मिळतील तीं खावयाचीं, आणि मनसोक्त इतस्ततः संचार करावयाचा. पुढें कुटुंबाची आवश्यकता उदरनिर्वाह सुलभ होण्यासाठीं मानवाला सुचली व

गटागटांनीं माणसें एका जागीं वस्ती करूं लागलीं. अर्थात् निर्वाहासाठीं वस्तीच्या जागीं शेती करून धान्य पिकविणेंही आवश्यक झालें. एकजुटीनें श्रमविभागानें शेती करण्यासाठीं कुटुंबांची गरज मानवाला भासली. अशीं अनेक कुटुंबे एकत्र राहूं लागलीं तेथें तें खेडें बनलें. शेतांतील पीकपाणी झालें तरी पाऊस व इतर अनुकूलता यांवर अवलंबून. अमूकच वेळीं पाऊस हवा तेव्हां थोडाच पडतो! त्यामुळें शेतांत अशा संकटाच्या वेळीं उपासमार होऊं नये म्हणून धान्याचा सांठा करून ठेवण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. त्याप्रमाणेंच थंडीवाऱ्यापासून शरिराचें रक्षण करण्यासाठीं मानव घरें बांधूं लागला, वस्त्रें तयार करूं लागला. प्रथम वल्कलांचीं वस्त्रें होतीं, नंतर लोंकर-कापूस-रेशीम यांचीं वस्त्रें मानवाला तयार करतां येऊं लागलीं. रानावनांत मानव कुटुंब घरदार करून राहिला व शेती करूं लागला तरी शेतीवाडीचें, व जीवनाचें रक्षण होईल अशी कांहीं व्यवस्था होणें भाग होतें. त्यासाठीं अशी व्यवस्था करणारे व धान्यादि जीवनोपयोगी वस्तूंचें मानवांसाठीं रक्षण करण्याकरितां त्यांच्यांतीलच कांहीं व्यवस्थापक निर्माण झाले. मानवी जीवनाला आवश्यक असलेल्या अन्नवस्त्राची व्यवस्था याप्रमाणें आपल्यांतीलच ज्या व्यवस्थापकांच्या हातीं समाजानें सोंपविली, ते 'ज्याच्या हातीं ससा तो पारधी' या न्यायानें श्रेष्ठ, सत्ताधारी, हुकूमशहा बनले या राजे लोकांच्या हातीं सत्ता आली याचें कारण जीवनपोषणासाठीं लोकांनीं श्रम करून उत्पन्न केलेल्या जीवनोपयोगी अशा विविध वस्तूंवर व्यवस्थापक या नात्यानें त्याच लोकांचा ताबा चालूं लागला. असल्या सत्तेचा दुरुपयोग झाला नाहीं असें कधीं झालें आहे? पुढें सत्ताधाऱ्यांना ह्या सत्तेचा उपयोग श्रमजीवि लोकांची उपासमार करून त्यांना आपल्या हुकमतींत ठेवण्याकडे करतां येऊं लागला. श्रमजीवि वर्गाच्या पिळणुकीला प्रारंभ झाला तो एथपासून. कोट्यवधि लोकांनीं रोज मरेमरेतों राबावें व जीवनोपयोगी विविध वस्तु निर्माण कराव्या, व ती संपदा मूठभर सत्ताधाऱ्यांनीं त्या कोट्यवधि श्रमजीवि वर्गापासून लुबाडून न्यावी, कांहींनीं कामधंदा कांहीं न करता चैनींत जगावें! मराठी साम्राज्य काय, जगातील इतर राजसत्ता काय, अथवा तदंतर्गत लहान मोठीं राज्यें काय, ह्या सरंजामदारीचा उगम हा असा विस्मयपूर्ण व रक्त शोषण करणाऱ्या जळवांसारखा आहे.

ज्यांच्यासमोर व्यापारी इंग्रजांना प्रारंभीं अगदीं नाक मुठींत घेऊन वागावें लागलें, त्यांचेच वंशज राजेरजवाडे आज त्याच इंग्रजांच्या पायांवर लोटांगणें घालून दयेसाठीं पदर पसरीत आहेत! पण इतकी ह्या सरंजामदार वर्गाची त्रेधातिरपिट कां उडाली आहे? इतकी यांची पांचावर धारण कां बसली आहे? इतकें अत्यंत नामुष्कीचें जिणें जगण्याची पाळी त्यांच्यावर कां आली आहे? तर एका काळीं ज्या हिंदी जनतेला ह्या अरेरावांनीं बेफिकीरपणानें वागविलें व पिळून काढलें व सध्यांही त्याचा तोच क्रम सुरू आहे, तीच जनता आज विरोधप्रवण होऊन, आपल्या क्षोभानलानें हिंदी राजेरजवाड्यांच्या सिंहासनांना व उच्चासनांना आगी लावण्याला सज्ज व समर्थ झाली आहे म्हणून!

हें जें सामर्थ्य आज हिंदी जनतेच्या अंगीं उत्पन्न झालें आहे, तें अर्थातच पूर्वोक्त ऐतिहासिक क्रमाला धरून आहे; व त्याला समाजांतील आर्थिक संबंधच सर्वस्वी कारण आहेत. ह्या आर्थिक संबंधांतून हिंदुस्थानांतील व हिंदी संस्थानातील चळवळीचा क्रमप्राप्त उगम कसा झाला, हें पाहण्यापूर्वी हिंदी सरंजामशाहीच्या उत्पत्ति–स्थिति–लयाची सप्रमाण फोड करतां येण्यासाठीं मूळ हा सरंजामदार वर्ग निर्माण कसा झाला व त्याला समाजाच्या आर्थिक संबंधांत बरेवाईट हेलकावे कसे बसले हें पाहिलें पाहिजे. त्यासाठीं आपणाला मानवाच्या उत्पत्तीपासूनचा इतिहास ओझरता तरी ध्यानीं आणला पाहिजे.

अगदीं पहिला मानवसमाज जो जन्माला आला, त्याची कल्पना आजच्या सुधारलेल्या मानवसमाजावरून करता यावयाची नाहीं. आज जगांत सर्वत्र विज्ञानयुगाचा प्रभाव दिसून येतो व अज्ञानाच्या आंधारांत चांचपटत भलभलत्या कल्पना उराशीं बाळगून जीवन कंठण्याचा प्रसंग आतां मानवजातीवर उरलेला नाहीं. पण अगदीं पहिल्या मानवसमाजाला विज्ञानाची लवमात्र जाणीव नव्हती, इतकेंच काय तर निर्वाहासाठीं अन्नवस्त्र निर्माण करण्याची कल्पनाही प्रथम त्याला सुचली नव्हती. मानवजात प्रथम शिकार करून मिळणाऱ्या प्राण्यांच्या रक्तामांसावर व रानातील कंदमुळांवर व फळांवर निर्वाह करीत असे. रानावनात भटकावयाचें, शिकार करावयाची, कंदमुळें व फळें मिळतील तीं खावयाचीं, आणि मनसोक्त इतस्ततः संचार करावयाचा. पुढें कुटुंबाची आवश्यकता उदरनिर्वाह सुलभ होण्यासाठीं मानवाला सुचली व

गटागटांनीं माणसें एका जागीं वस्ती करूं लागलीं. अर्थात् निर्वाहासाठीं वस्तीच्या जागीं शेती करून धान्य पिकविणेंही आवश्यक झालें. एकजुटीनें श्रमविभागानें शेती करण्यासाठीं कुटुंबांची गरज मानवाला भासली. अशीं अनेक कुटुंबे एकत्र राहूं लागलीं तेथें तें खेडें बनलें. शेतांतील पीकपाणी झालें तरी पाऊस व इतर अनुकूलता यांवर अवलंबून. अमूकच वेळीं पाऊस हवा तेव्हां थोडाच पडतो! त्यामुळें शेतांत अशा संकटाच्या वेळीं उपासमार होऊं नये म्हणून धान्याचा सांठा करून ठेवण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. त्याप्रमाणेंच थंडीवाऱ्यापासून शरिराचें रक्षण करण्यासाठीं मानव घरें बांधूं लागला, वस्त्रें तयार करूं लागला. प्रथम वल्कलांचीं वस्त्रें होतीं, नंतर लोंकर-कापूस-रेशीम यांचीं वस्त्रें मानवाला तयार करतां येऊं लागलीं. रानावनांत मानव कुटुंब घरदार करून राहिला व शेती करूं लागला तरी शेतीवाडीचें, व जीवनाचें रक्षण होईल अशी कांहीं व्यवस्था होणें भाग होतें. त्यासाठीं अशी व्यवस्था करणारे व धान्यादि जीवनोपयोगी वस्तूंचें मानवांसाठीं रक्षण करण्याकरितां त्यांच्यांतीलच कांहीं व्यवस्थापक निर्माण झाले. मानवी जीवनाला आवश्यक असलेल्या अन्नवस्त्राची व्यवस्था याप्रमाणें आपल्यांतीलच ज्या व्यवस्थापकांच्या हातीं समाजानें सोंपविली, ते 'ज्याच्या हातीं ससा तो पारधी' या न्यायानें श्रेष्ठ, सत्ताधारी, हुकूमशहा बनले या राजे लोकांच्या हातीं सत्ता आली याचें कारण जीवनपोषणासाठीं लोकांनीं श्रम करून उत्पन्न केलेल्या जीवनोपयोगी अशा विविध वस्तूंवर व्यवस्थापक या नात्यानें त्याच लोकांचा ताबा चालूं लागला. असल्या सत्तेचा दुरुपयोग झाला नाहीं असें कधीं झालें आहे? पुढें सत्ताधाऱ्यांना ह्या सत्तेचा उपयोग श्रमजीवि लोकांची उपासमार करून त्यांना आपल्या हुकमतींत ठेवण्याकडे करतां येऊं लागला. श्रमजीवि वर्गाच्या पिळणुकीला प्रारंभ झाला तो एथपासून. कोट्यवधि लोकांनीं रोज मरेमरेतों राबावें व जीवनोपयोगी विविध वस्तु निर्माण कराव्या, व ती संपदा मूठभर सत्ताधाऱ्यांनीं त्या कोट्यवधि श्रमजीवि वर्गापासून लुबाडून न्यावी, कांहींनीं कामधंदा कांहीं न करता चैनींत जगावें! मराठी साम्राज्य काय, जगातील इतर राजसत्ता काय, अथवा तदंतर्गत लहान मोठीं राज्यें काय, ह्या सरंजामदारीचा उगम हा असा विस्मयपूर्ण व रक्त शोषण करणाऱ्या जळवांसारखा आहे.

अशा जळवांचीही नासकें रक्त शरिरांतून काढून टाकण्यासाठीं व शरीर निरोगी करण्यासाठीं इतर आधुनिक उपायाचा शोध लागला नव्हता तेव्हा आवश्यकता होती; त्याप्रमाणेंच समाजाच्या आर्थिक संबंधांत ऐतिहासिक क्रमाला अनुसरून निर्माण झालेल्या सरंजामदार वर्गाची गरज होती. समाजधारणेला त्या वर्गाचा उपयोग होत होता, तोंवर तो वर्ग चांगला फोफावला, खासा बळी माजून राहिला. त्याची आवश्यकता समाजजीवनाच्या सुस्थितीला नाहींशी झाली तसा तो वर्ग मृत्युपंथाला लागला. समाजाचे आर्थिक संबंध समाजांत नेहमीं बदलत जाणाऱ्या उत्पादनपद्धतीनुसार व व्ययपद्धतीनुसार बदलणारे अर्थात् परिस्थितिसापेक्ष असतात असें कार्ल मार्क्स म्हणतो, त्याचेंच हें प्रत्यंतर होय.

अर्थात् यापुढें ओघानेंच कबूल करणें प्राप्त कीं मोंगल साम्राज्य काय, मराठी साम्राज्य काय, अथवा तदंतर्गत लहान मोठीं राज्यें काय, ऐतिहासिक क्रमानुसार टिकलीं त्यापेक्षां जास्त काळ टिकणें शक्यच नव्हतें. समाजजीवनांतील आर्थिक संबंधाच्या दृष्टीनें ज्या ज्या गोष्टी अनावश्यक ठरतात, त्याच्या त्यांच्या नाशाचीं बीजें त्याच्या त्याच्यांतच उगवतात. शिवशाहीनंतरची मराठी साम्राज्याची संथपणानें होणारी अवनति जी मागें वर्णन करण्यांत आली आहे, ती तरी हेंच सांगते. अर्थात् इतिहास म्हणजे तरी काय? सर्व देशाचा सर्व काळचा इतिहास हा तेथील वर्गकलहाचा इतिहास होय. पिळणारे व पिळले जाणारे यांच्यामधील विरोधाची व विग्रहाची ती खरीखुरी कहाणी होय. ही एक गोष्ट ध्यानीं ठेवून आपण गतेतिहास पाहूं लागलों कीं सर्व प्रश्नांचीं उत्तरें भराभर व सप्रमाण मिळत जातात. 'सरंजामदार वर्गानें आपल्या शेतकऱ्याला जर सवलती दिल्या असत्या, आपल्या रयतेच्या कल्याणाची मनापासून काळजी घेतली असती, तर तो जोमांत जगला असता काय? अथवा अजूनही तो वर्ग जागा होऊन जर प्रजाहितदक्ष झाला, तर त्याला आपली गेलेली पत व गेलेलें सामर्थ्य पुन्हा मिळवितां येईल काय?' ह्या प्रश्नाचें उत्तर हेंच. किंबहुना असा प्रश्न विचारणेंच अस्वाभाविक दिसतें. कारण ऐतिहासिक दृष्ट्या ज्या वर्गाची समाजजीवनांतील आवश्यकता संपुष्टांत आली तो वर्ग टिकणार कसा? मुळेंच मेल्यावर वृक्षाला टवटवी राहणार कोठली? मेलेल्या प्राण्याच्या शरिरांतील ऊब टिकवून टिकवून कितीशी टिकणार?

मरणाच्या पंथाला लागलेल्याला आपण मरत आहों हें सहसा कळत नाहीं. त्याला वाटत असतें कीं मीं अमकें केलें म्हणजे जगेन; मीं तमकें केलें म्हणजे जगेन; व अशी त्याची जगण्यासाठीं जिवापाड धडपड चाललेली असते. अठराव्या शतकाच्या प्रारंभींची हिंदुस्थांतील सरंजामदार वर्गाची धडपड अशाच प्रकारची होती. आपली आतां कोणाला गरज उरली नाहीं, आपल्या ठायींची उपयुक्तता सर्व लोपली आहे, आतां आपण बऱ्या बोलानें काळें करावें, हा कर्मीत कमी सौजन्याचा विचारही सरंजामदार वर्गाला तेव्हां व आतांही सुचूं नये, यापेक्षां त्याच्या लोचटपणाचा व स्वार्थसाधुपणाचा दुसरा कोणता पुरावा पाहिजे! 'आयतखाऊपणाच्या चैनी जीवनाला आतां समाज-जीवनांत थारा उरला नाहीं, इतिहासाचा ओघ व काळाचा प्रवाह आपण अडवूं शकत नाहीं, त्याअर्थी आपणच आपली ही समाजजीवनांतील अडगळ बाजूला सारून समाजजीवनाच्या विकासाचा मार्ग मोकळा करून देऊंया कसा!' असा सुविचार तेव्हां सरंजामदार वर्गाला सुचला नाहीं. पण यांतही अस्वाभाविक असें कांहींच झालें नाहीं! सरंजामदार वर्गाच्या नाशाचीं बीजें त्यांतच रुजत होतीं असें जें वर म्हटलें आहे, त्या विनाशकालाची पाऊल-वाट त्या वर्गाच्या पूर्वोक्त अजाणपणांतूनच रुळत होती. मृत्युपंथाला लागलेला रोगी अनेकदां स्वतःच्या मनावरील व इंद्रियावरील स्वामित्व विसरून परो-परीचें कुपथ्य करतो व स्वतःचें मरण जवळ आणीत असतो, तसाच थेट सरंजामदार वर्गाचा कारभार होता व आहे. असल्या अजाणपणामुळेंच हिंदु स्थानांतील सरंजामदार वर्ग आपल्या श्रमजीवि रयतेच्या हिताला जागला नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्यानें तेव्हां हिंदुस्थानांत उदय पावलेल्या नव्या वर्धिष्णु इंग्रजी भांडवलशाही सत्तेशींही आत्मघातकी टक्कर देऊन पाहण्याला कमी केलें नाहीं! इंग्रज हिंदुस्थानांत आले ते हिंदुस्थानांतील जनतेचें कोट-कल्याण करण्यासाठीं आले असा याचा अर्थ मुळींच नव्हे. सत्ता व संपदा यांच्या राक्षसी मोहामुळेंच असले दिग्विजय कोणताही बलवान वर्ग आरंभितो व त्या स्वार्थापायीं आपल्या मानवतेला काळें फांसावयाला बेदरकारपणें तयार होतो. इंग्रजांच्या वर्धिष्णु सत्तेशीं टक्कर देण्याचें धाडस तेव्हांच्या हिंदी सरं-जामदार वर्गानें केलें तें आत्मघातकीपणाचें होतें असें एथें म्हणण्याचें प्रयोजन एवढेंच कीं, हिंदुस्थानांतीलच काय पण साऱ्या जगांतील सरंजामदार वर्गाची

अवस्था तेव्हां मावळत्या निर्जीव सूर्यासारखी झाली होती, व भांडवलदार वर्ग उगवत्या सूर्यासारखा मावळत्या सरंजामदार वर्गाला पदभ्रष्ट करून स्वतःची अस्मानी सुलतानी जगावर गाजविण्याला नेटानें व दिमाखानें पुढें येऊं लागला होता. ह्या भांडवलदार वर्गाचें जागतिक पुढारीपण तेव्हां इंग्रज भांडवलदारांकडे होतें. समजा, तेव्हां इंग्रज भांडवलदार वर्गातील अधाशी गिधाडांचा तांडा हिंदुस्थानावर झडप घालावयाला धावून आला नसता; तर ती जागा दुसऱ्या भांडवलदाराकडून भरून निघाली असती. जखमी होऊन मृत्युपंथाला लागलेल्या सापाला मुंग्या डसावयाच्या हें निश्चित. मग त्या मुंग्या कोणत्या दिशेच्या वारुळांतील कां असेनात!

सरंजामदार वर्गाचा उदय जागतिक समाजजीवनाच्या रंगभूमीवर प्रथम कोणत्या सामाजिक गरजेसाठीं झाला हें निश्चितपणें पाहिल्यावर तो वर्ग समाजजीवनाला पोषक होईल तोंवर टिकणार व समाजजीवनाला त्याचा जाच होऊं लागला कीं तो कोलमडून पडणार, हें ओघानेंच सिद्ध झालें. हिंदी सरंजामदार वर्गाचें मुख्य कर्तव्य हिंदुस्थानांतील शेतकरी वर्गाच्या हितासाठीं झटणें हें होतें. पण तें कर्तव्य त्या वर्गानें नीट पार पाडलें नाहीं, व त्यामुळें स्वतःचा नाश स्वतःच्या हातानें ओढवून आणला. हिंदुस्थानच्या इतिहासांत अत्यंत वैभवांत व सुखासमाधानांत नांदून गेलेल्या ज्या ज्या राजसत्ता आहेत, त्यांच्या यशस्वितेला त्यांनीं हिंदी शेतकऱ्याच्या उत्कर्षासाठीं केलेले विविध प्रयत्न व त्यामुळें शेतकऱ्याला लाभलेलें सुखसंरक्षण कारण होतें. पण अशा अनेक राजसत्ता हिंदुस्थानांत नांदून मोडून गेल्या. त्या मोडून जाण्याचें कारण त्यांच्याकडून होणारी शेतकरी वर्गाची ऊर्फ उत्पादक वर्गाची आबाळ होय. शेतकरी वर्ग असेंच एथें श्रमजीवि वर्गाला उद्देशून प्रामुख्यानें म्हणण्याचें कारण, आज सर्वत्र प्रभावी दिसणारें यंत्रयुग तेव्हां प्रभावित्वानें सुरू झालेंच नव्हतें; व शेतकीशिवाय इतर उद्योगधंदे गौण अथवा शेतकीच्या धंद्याचे पूरक असे होते. खेड्यापाड्यांची जुनी रचना पाहिली व ग्रामपंचायतींचा इतिहास पाहिला तर अन्नाप्रमाणेंच वस्त्रें, आउतें व आयुधें आणि इतर रोजच्या जीवनांतील सोई या बाबतींत लोक गांवनिहाय बहुधा स्वयंपूर्ण असलेले दिसतात खरे. पण सर्वांसाठीं ह्या सुखसोई निर्माण करणाऱ्या कारागीर अथवा कामगारांचादेखील शेतकरीच अन्नदाता होता. सरंजामदार वर्गाच्या

पदरीं जीं मोठमोठीं सैन्यें असत, तींही शेतकऱ्यांचींच असत, व दरसालच्या शेतीचा हंगाम सांभाळून इतर वेळांत स्वाऱ्या-शिकारींचे सारे उद्योग चालत, हेंही एथें ध्यानीं घेतलें पाहिजे. कार्ल मार्क्सनें हिंदुस्थानांतीलच काय पण साऱ्या आशिया खंडांतील राजसत्तांच्या उलथापालथीचें शास्त्रीय निदान करतांना असें स्पष्ट सांगितलें आहे कीं 'एका राजसत्तेखालीं शेतकीची आबाळ झाली व दुसऱ्या राजसत्तेखालीं पुन्हा शेतकीचा धंदा उर्जितावस्थेला आला, असले प्रकार आशियांतील साम्राज्यसत्तांत घडून आलेले हरघडीं पाहण्याची आपणाला संवय आहे. शेतकीचे बरेंवाईट मोसम अथवा हंगामही, राजसत्तेच्या बरेंवाईटपणाशीं जुळतात."

हिंदुस्थान व आशिया खंडांतील पूर्वेकडील इतर देश यांचें वैशिष्ट्य शेतकींतच आहे. सर्व देशांतील शेतकीचीं बरीं वाईट पिकें पाण्याच्या सोईवर मुख्यतः अवलंबून असतात. ही व्यवस्था त्या देशांतील सरकारावर अवलंबून असते. ते सरकार दुबळें, शिथिल व कर्तव्यच्युत झालें कीं शेतकरी वर्गाच्या सोईगैरसोईकडे त्याचें दुर्लक्ष्य होतें. त्यामुळें शेतकींत बूड येऊन लोकांच्या पोटाला चिमटा बसूं लागतो व आर्थिक असंतोष सर्वत्र पसरूं लागतो. त्या असंतोषाचें वेळींच निराकरण झालें नाहीं, कीं राजकीय असंतोषाचें भयंकर स्वरूप तो धारण करतो. गांजलेला व खवळलेला शेतकरी वर्ग अशा बंडांत सामील होतो एवढेंच नाहीं, तर तो परसत्ता तरी आपल्या शेतकीच्या धंद्याला पोषक होईल या आशेनें परचक्राचा पाठीराखा बनतो! आपसांतील यादवीलाही अशामुळें ऊत येतो. प्रदेशांचे प्रदेश युद्धांपायीं उध्वस्त होतात. पाटबंधाऱ्यांची व शेतांची वाताहात होते. अन्नपाण्यालाही लोक महाग झाल्यामुळें दुष्काळ पडतात, व देश ओस पडतात. हिंदुस्थानांतच नव्हे, तर अरबस्थान, इराण वगैरे देशांतही एका काळीं जे शेंकडों मैलोंगणती प्रदेश अत्यंत सुपीक गणले जात असत, तेच आज ओसाड व निर्जन झालेले दिसतात; याचें कारण हेंच होय. हिंदुस्थानांत मुसलमानी सत्तेचा प्रवेश व विस्तार कसा झाला, याची ही कार्यकारणपरंपरा ध्यानीं घेण्यासारखी आहे. मुसलमानी धर्म हा हिंदुधर्मापेक्षां अमक्या बाबतींत श्रेष्ठ आहे असेंही महंमद कासीम कडून जिंकल्या जाणाऱ्या हिंदी देशांतील श्रमजीवि जनतेला कोणीं शिकविलें नव्हतें, अथवा असलें कोणतेंच प्रलोभन तेव्हां त्या लोकांसमोर

नव्हतें. कोणत्याही धर्माची शिकवण बरी कीं वाईट, हा गुंतागुंतीचा प्रश्न विषयांतराच्या भीतीनें एथें सोडविण्याचें टाळूनही आपणाला हें कबूल करणें भाग आहे कीं, धर्म व अधर्म असल्या कल्पनांच्या लहरी समाजरूपी महासागराच्या पृष्ठभागावर अर्थात् समाजांतील वरचा थर गणल्या गेलेल्या पुढारलेल्या शिष्ट मध्यम वर्गांतच उमटत असलेल्या दिसतात. महासागराच्या तळाशीं त्या लहरींचा मागमूसही नसतो. म्हणून वादळ झालें कीं महासागराच्या जलपृष्ठावरून तरंगत जाणाऱ्या नावा हादरतात, कोलमडतात, फुटतात; पण महासागराच्या तळाशीं असलेले पोंवळयांचे खडक किंवा मोत्यांचे शिंपले कांहीं उन्मळून वर येत नाहींत. मुसलमानांची हिंदुस्थानावर स्वारी होण्यापूर्वीही 'आमचा हिंदु धर्म श्रेष्ठ कां' या प्रश्नाचें पांडित्यपूर्ण व पारलौकिक सुखाच्या प्रलोभनांनीं मंडित असें उत्तर देण्याला अशिक्षित, कष्टाळू व पोटभरू हिंदी शेतकरी असमर्थ होता, व मुसलमानी धर्मांत हिंदुधर्माहून बरें अथवा वाईट काय आहे हेंही त्या बिचाऱ्याला मुळींच माहीत नव्हतें. त्या वर्गाला भुकेनें वखवखलेल्या, व अही खाऊं कीं मही खाऊं झालेल्या पोटांतील उपासमारीच्या तिडकेनें एवढें कळत होतें कीं 'कोणीही राजा येवो, कोणीही राज्य करो, कांहींही करो. त्यानें आम्हांला आमच्या शेतांत राबून कष्टाची मीठभाकरी मिळवून खाऊं दिली कीं पुष्कळ झालें. त्यानें आमच्या श्रमांवर खुशाल जगावें; पण आमचें व आमच्या शेतीच्या धंद्याचें संरक्षण करावें म्हणजे झालें.' हें संरक्षण तर तेव्हांच्या हिंदु राजांकडून हिंदी शेतकरी वर्गाला मिळत नव्हतेंच, उलट त्यांच्याकडून शेतकरी वर्गाची सर्वतोपरी आबाळ होत होती. अशा प्रसंगानें भांबावून गेलेल्या लोकांना कांहींही निमित्तानें जिवाचा विरंगुळा व्हावयाला व यातनांचा विसर पडावयाला हवा असतो. हिंदी शेतकरी वर्गाला तेव्हां स्वाभाविकपणेंच वाटलें कीं दुसऱ्या कोणींही यावें, देश जिंकावा व राज्य करावें; पण ह्या सध्यांच्या जुलमी राजांचें राज्य नको. आगीच्या डोंबाळीचा दाह सहन होईनासा झाला कीं आगींत सांपडलेला जीव तो दाह टाळण्यासाठीं वाट सांपडेल तेथून बाहेर उडी घेतो. असें करण्यानें आपण आगींतून निभावून मोकळया जागीं जाऊन पडत आहों कीं फुफाट्यांत पडत आहों, इतका विचार व दूरदर्शीपणा त्याला त्या प्राणसंकटाच्या वेळीं सुचत नसतो.

महंमद कासीमनें हिंदुस्थानावर स्वारी केली तेव्हां असेंच झालें. सिंध प्रांत जिंकून तो पंजाबांत घुसला तेव्हां तेथील मुलतानच्या हिंदु राजाला चिरडून पंजाब जिंकावयाला त्याला फार श्रम घ्यावे लागले नाहींत. इतिहास सांगतो कीं महंमद कासीमला तेथें सिंध प्रांतांतल्यासारखाच अनायासें जय मिळाला. मुलतानच्या आजूबाजूच्या प्रांतांतील जाट व मेड वगैरे शेतकऱ्यांनीं त्याला आपला प्रदेश सुखानें जिंकूं दिला इतकेंच नव्हे तर नजराणे देऊन त्याचा गौरव केला! हे जाट व मेड लोक हिंदु होते. पण ते आपल्यावर राज्य करणाऱ्या हिंदु राजाच्या जुलुमानें व देशांतील एकंदर बेबंदशाहीनें इतके गांजले होते कीं त्या राजाची सत्ता नष्ट करणारा कोणीही शेराला सवाशेर तेव्हां पुढें आला असता, तरी 'हा तरी आपणाला नीट वागवील' या आशेनें त्या लोकांनीं त्याचा असाच असाच आदरसत्कार केला असता.

महंमद कासीम हाही सरंजामदारवर्गाचा प्रतिनिधीच खरा; पण त्यानें हिंदुस्थानांतील जिंकलेल्या प्रांतांतील लोकांना पूर्वीच्या हिंदु राजवटीच्या मानानें बऱ्याच सुखसोई करून दिल्या. आपल्या नव्या राजवटीविषयीं हिंदी लोकांच्या मनांत आदर उत्पन्न व्हावा म्हणून कां त्यानें त्या सुखसोई केल्या असेनात! पण शेतकऱ्यांना त्यामुळें अंमल हायसें वाटलें. ही परिस्थिति महंमद कासीमच्या मृत्यूनंतर टिकली नाहीं; व खलिफा हरून अल् रशीदच्या कारकीर्दींत सिंध प्रांतांतील रजपुतांनीं पुन्हा मुसलमानी सत्तेचा नाश करून तेथें आपला अंमल प्रस्थापित केला, पण त्यामुळें त्यांनीं लोकांना सुराज्याचें सौख्य मिळवून दिलें असें मात्र नाहीं. सुराज्य कीं कुराज्य हा प्रश्न दोन बलिष्ट व प्रतिस्पर्धी सत्तांच्या झगड्यांत पुष्कळदां गौण ठरतो; व सत्ता आणि संपत्तीचें अपहरण हा एकच स्वार्थी हेतु त्या स्पर्धेंत असल्यानें असल्या स्पर्धेचे निकाल 'बळी तो कान पिळी' या तत्त्वावरच होतात. बिचाऱ्या गोरगरीब कष्टाळू रयतेची अवस्था सरंजामदारी सत्तेंत नेहमीं गाईबकऱ्यां-सारख्या असहाय मुक्या जीवांप्रमाणें असते. जनतेची उपासमार करण्याचें सामर्थ्य मागें सांगितल्याप्रमाणें सरंजामदार वर्गाला प्राप्त झाल्यामुळें जनतेच्या खुषी नाखुषीची पर्वा करण्याचें त्याला कारणच काय?

असें जरी होतें, तरी मुसलमानी धर्म स्थापन होण्याला व मुसलमानी सत्तेचीं पाळेंमुळें हिंदुस्थानांत व पृथ्वीच्या पाठीवर एका काळीं बरींच खोल रुजण्याला

तेव्हांची त्या त्या ठिकाणची विशिष्ट आर्थिक परिस्थितीच कारण झाली. मुसलमानी धर्म शेतकऱ्यांच्या आर्थिक असंतोषांतूनच निर्माण झाला आहे. पूर्वी एका काळीं अरबस्थान हा बराच भरभराटलेला देश होता, व सर्व अरबी राज्यांत येमेनचें राज्य तर तेव्हां वैभवशिखरावर आरूढ झालें होतें. तेथील शेती, व्यापार वगैरे हरएक बाबतींत तें राज्य अग्रेसर होतें. पण ही भरभराट म्हणजे अर्थातच तेथील राजे व व्यापारी यांची चंगळ होय. ते लोक कालांतरानें भलत्याच चमत्कारिक देवांची उपासना, विलासविहार व दुर्व्यसनें यांत रंगून जाऊं लागले. तेव्हां इथोपियाच्या राजानें तांबडा समुद्र ओलांडून येऊन दीर्घकालीन युद्धानंतर येमेन जिंकलें; आणि येमेनच्या राजानें पर्शियाच्या राजाचें साह्य मागितलें. पर्शीयनांनीं इथोपियाच्या लोकांना हांकलून लावण्याच्या निमित्तानें येमेनवर स्वारी केली. पण त्याचा परिणाम इसापनीतींतील 'मनुष्य आणि घोडा' या गोष्टीसारखा झाला. इथोपियनांचा पाडाव करण्यासाठीं चालून आलेले पर्शीयन स्वतःच तेथें दंडेलीखोर शिरजोर होऊन बसले! राज्यांत सर्वत्र बेबंदशाही माजली, समुद्रकिनाऱ्यावर चांचे लोकांचा सुळसुळाट होऊन व्यापाराचा सुरक्षितपणा नष्ट झाल्यामुळें हिंदी व चिनी व्यापारी तांबड्या समुद्रांतून जलमार्गानें व्यापार करण्याचें बंद करून खुष्कीच्या मार्गानें उंटांच्या तांड्यांवरून इराण ऊर्फ पर्शिया देशांतून व्यापार करूं लागले.

याप्रमाणें अरबी राजसत्तेच्या हाडांचा अगदीं खुळखुळा झाला. शासनसंस्था कमजोर झाल्यामुळें आपसांत यादवी माजली, त्यामुळें देश बेचिराख झाला, व्यापार बुडाला, शेतकीच्या सुखसोईचा विध्वंस झाला; व त्यांतच स्वाभाविकपणें दुष्काळांची भर आगींत तेल पडावें त्याप्रमाणें पडली. अशा प्रकारें त्रस्त व असंतुष्ट झालेल्या अरबी शेतकऱ्यांना महंमद पैगंबर हा खंबीर नेता लाभला. सर्व शेतकरी व इतर असंतुष्ट लोकांच्या टोळ्या यांनीं त्याचें अनुयायित्व पत्करलें. महंमद पैगंबरानें लोकांच्या दुःखाचें व्यवहारतः निरीक्षण करून प्रारंभापासूनच त्या दुःखाचा नायनाट करण्याची दक्षता बाळगली. त्यानें पाहिलें कीं शेतकीधंद्याची आबाळ होऊन सर्वांची अन्नान्न दशा झाली आहे व शेतकऱ्यांची स्थिति सुधारल्याखेरीज ती दैना टळणें शक्य नाहीं. तेव्हां तो आपल्या अनुयायांसह शेतकीला उपयुक्त असे नवे प्रदेश शोधून हस्तगत करण्याच्या उद्योगाला लागला. अरबांत एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा

अभाव असल्यानें आपसांतील दुही त्यांच्या नाशाला कारण होत आहे असें त्यानें पाहिलें व खासगी मालमत्ता मिळविणें आणि सांठविणें ही घातुक चाल ह्या दुहीच्या व नाशाच्या मुळाशीं आहे अशी त्याची खात्री झाली, म्हणूनच त्यानें आपल्या मुसलमानी धर्मांत वतनवाडीची खासगी संपत्ति सांठविणें इहलोकीं व परलोकींही निंद्य ठरविलें. त्यामुळें तेथील शेतकरी वर्ग व इतर रानटी टोळया त्याच्या झेंड्याखालीं जमा होऊं लागून ती जगाच्या इतिहासांत एक फार मोठी क्रांतिकारक शक्ति संघटित झाली. अरबस्थानांतील वाळवंटी प्रदेशांत धनधान्यसमृद्धीचा संभव कमी असें पाहून महंमद पैगंबराला आशिया खंडांतील इतर प्रदेशांवर आक्रमण करणें अवश्य वाटलें, व तें कार्य त्यानें आपल्या क्रांतिप्रवण अनुयायांच्या जोरावर यशस्वितेनें पार पाडलें.

मुसलमानांची दृष्टि हिंदुस्थानाकडे अर्थात् प्रथम सिंध प्रांताकडे व लगेच पंजाबकडे वळली, व हिंदुस्थानांत मुसलमानांना भराभर विजय मिळत गेला, त्याला सिंध व पंजाब एथील कोणती परिस्थिति कारण झाली हें मागें आपण पाहिलेंच आहे. जगांत हिंदुस्थान देशाच्या रंगभूमीवर मुसलमानी राजसत्तेनें व सरंजामशाहीनें कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत जवळ जवळ एक हजार वर्षें तांडवनृत्य केलें खरें; पण त्या नृत्यांत कधीं अकबरासारख्या सावधानचित्त बादशहाच्या कारकीर्दींत तें नृत्य रम्य व कलात्मक असें आढळलें, तर कधीं तें अवरंगजेब बादशहाच्या कारकीर्दीसारखें भीषण थैमानसें आढळलें. ह्या एक हजार वर्षांत मुसलमानांतीलच निरनिराळ्या सत्तांच्या कितीतरी रोमांचकारी उलथापालथी झाल्या. आज एकानें यावें, रक्तपात करून राज्य जिंकावें व राज्य वाढवावें, संपत्ति मिळवावी, सत्ता गाजवावी; उद्यां त्याची सत्ता कोलमडून पडून तेथें नवी सत्ता उदय पावावी, ती कांहीं काळ वाढावी, टिकावी व पुन्हा ती कोलमडून पडून तिची जागा निराळ्याच सत्तेनें भरून काढावी, असले उत्पात इसवी सनाच्या आठव्या शतकाच्या आरंभापासून तों सोळाव्या शतकाच्या आरंभापावेतों कितीतरी झाले. आणि यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं रक्तपात, विश्वासघात, क्रूरपणा वगैरे पाशवी साधनांचा अवलंब जो निरनिराळ्या मुसलमानी सत्तांनीं केला, तो केवळ हिंदु प्रतिस्पर्ध्यांविरुद्धच केला असें नाहीं, तर मुसलमानांनीं आपसांतील एकमेकांवरही सत्ता व संपत्ति यांच्या लोभानें असले अत्याचार

केले! प्रथम अरब मुसलमानांची टोळधाड हिंदुस्थानावर आली. अरबांनंतर तुर्क आले, तुर्कांनंतर अफगाण, गुलाम, खिलजी, तघलक, सय्यद, लोदी; व त्याच्यानंतर मोंगल अशा निरनिराळ्या मुसलमानी सत्ता हिंदुस्थानांत रुजल्या, वाढल्या व विनाश पावल्या. ह्या सर्व सत्तांना हिंदुस्थानांतील रजपूत राजांच्या सत्तेशीं टक्कर द्यावी लागली हें खरें. पण ह्या एवढ्या प्रदीर्घ कालांत हिंदुस्थानांतील हिंदु राजांनीं एकमेकांविरुद्ध गुप्तपणें अथवा उघडपणें मुसलमानांना साह्य केल्याचे प्रसंगही अनेक आहेत.

बहुतांशीं एकजिनसी असा मुसलमानी अंमल हिंदुस्थानावर चालला तो मोंगलांचा. सोळाव्या शतकाच्या प्रथम चरणांत इ. स. १५२६ सालीं पानिपतच्या रणभूमीवर झहिरुद्दिन महंमद बाबर हा कांहीं मुसलमान व कांहीं रजपूत यांच्या साह्यानें तेव्हांचा दिल्लीचा बादशहा इब्राहिमखान लोदी याचा व अनेक धीरवीरगंभीर अशा रजपुतांचाही पराजय करून स्वतः दिल्लीचा बादशहा झाला. पण जरा खोलवर वस्तुस्थितीचा विचार केला तर ह्या मोंगल साम्राज्याचें शेत हिंदुस्थानांत रुजण्याला व शेत पिकण्याला आवश्यक अशी जनतेच्या मनोभूमिकेची मशागत त्यापूर्वीं बरींच वर्षें एकसारखी होत होती. महंमद घोरीनें बाराव्या शतकाच्या अखेरीला हिंदुस्थानांतील रजपुतांचा पुरा मोड करून दिल्लीला जी मुसलमानी सत्ता स्थापन केली, व जवळ जवळ साऱ्या उत्तर हिंदुस्थानावर एकतंत्री अंमल गाजविण्याइतकी जी सत्ता फोफावली, त्या सत्तेचा वृक्ष चवदाव्या शतकाच्या प्रारंभापावेतों हळूहळू वठत होता. दिल्लीच्या बादशाही सिंहासनावर एकाहून एक नालायक सुलतान बसूं लागले त्यामुळें ती मध्यवर्ती सत्ता दुबळी होत गेली, व ठिकठिकाणचे बादशाही सुभेदार सवते सुभे स्थापून स्वतःच सुलतान व बादशहा म्हणून मिरवूं लागले. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाहींसा झाला. ह्या बेबंदशाहींत तळीं विहिरी पाटबंधाऱ्यांसारखीं जलसाधनें नादुरुस्त झालीं व देशाचा अन्नदाता शेतकरी वर्ग अतिशय गांजला गेला. देशांत अन्नपाण्याचा तुटवडा पडल्यावर अनर्थ होण्याला आणखी काय पाहिजे! राजसत्तेच्या, अर्थात् सत्ता व संपत्ति यांच्या मोहानें लालचावलेला प्रत्येकजण समाजाच्या व्रणविदारणांत निपुण असतोच. तेराव्या शतकाच्या प्रारंभापासूनच मंगोलियांतील रानटी व भटके मंगोल ऊर्फ मोंगल लोक चेंगीजखान नांवाच्या

स०-भाल – १५०७७६

धडाडीच्या वीराच्या नेतृत्वाखालीं एकत्र होऊं लागले. मध्य आशियांत त्यांची दृढतर सत्ता स्थापन झाली. साम्राज्यसत्तेची भूक ही अशी राक्षसी आहे कीं ती जितका जितका प्रदेश खाईल तितकी तितकी अधिकाधिक हावरी बनत जाते. मंगोल ऊर्फ मोंगल लोकांनीं मुसलमानी धर्म स्वीकारला होता, मुसलमानी धर्माच्या विश्वबंधुत्वाच्या शिकवणुकीनुसार दिल्लीचे साम्राज्य-सत्ताधारी मुसलमान आणि मध्य आशियांतील साम्राज्यसत्ताधारी मोंगल हे दोघेही मुसलमान अतएव बांधवच असूनही धर्माज्ञा गुंडाळून ठेवून ते दोघेही एकमेकांशीं भाऊबंदकीनें भांडूं लागले. पण दिल्लीची साम्राज्यसत्ता योग्य शासनक्षमतेच्या अभावीं तिच्या कक्षेंतील इतर सरंजामदारांनीं ठायीं ठायीं सवते सुभे बळजबरीनें स्थापन केल्यामुळें अगदीं जीर्ण शीर्ण झाली होती. मुसलमानी धर्म ज्या राष्ट्रीय ऐक्यासाठीं स्थापन झाला, त्या एकीचा हिंदुस्थानांतील मुसलमानांत मागमूसही उरला नव्हता. अशी वेळ नेमकी साधून तैमुरलंगानें इ. स. १३९८ मध्यें हिंदुस्थानावर स्वारी करून थेट दिल्लीवर झडप घातली. तो जातां येतां असंख्य मनुष्यसंहार, लूट व जाळपोळ करूनच थांबला नाहीं; त्यानें खुद्द दिल्लीचीही अत्यंत क्रूरपणें तशीच वाताहात करून सोडली. एका तत्कालीन इतिहासकाराच्या शद्बांत दिल्लीच्या वाताहतीचें वर्णन करावयाचें म्हणजे 'पुरे दोन महिनेपावेतों एखादा पक्षीही दिल्लीच्या आवारांत उडाला नाहीं.' तैमुरलंगाच्या रानटी तार्तर सैनिकांनीं दिल्लींतील जनतेची अत्यंत अमानुषपणें सर्रास कत्तल केली; व तैमुरलंगानें ती एका मशिदींत बसून आनंदानें पाहिली! शहरांतील अगणित संपत्ति अगदीं लहानशा किंमती वस्तूसह लुटली गेली. तैमुरलंगाच्या ह्या स्वारींत हिंदुंस्थांनांतील असंख्य शेतकरी जनतेला मूर्ख गुराख्याच्या अभावीं लांडग्यांच्या भक्ष्यस्थानीं पडणाऱ्या बिचाऱ्या मेंढरांकोंकरांप्रमाणें तैमुरलंगी मानवी लांडग्यांच्या राक्षसी भुकेला बळी पडावें लागलें!

अशी हिंदुस्थानची सर्वतोपरी आर्थिक पिळणूक होऊन तो त्राणहीन झाला व तेथें एकोप्याचा अभाव होऊन दुबळेपणा, हीन स्वार्थसाधुपणा व परान्नपुष्टता यांना तेजी आली. त्यामुळें बाबरला एथें विजय मिळविणें सोपें गेलें. त्यानें हां हां म्हणतां सारा उत्तर हिंदुस्थान जिंकून घेतला. बाबर हा हिंदुस्थानच्या विनाशकर्त्या तैमुरलंगाच्या वंशांतील व तैमुरलंगापासूनचा पांचवा

पुरुष होय. तैमुरलंगानें दिल्लीच्या बादशाही तख्तालाही सहज जातां जातां आपल्या पायांखालीं दडपलें. पण देशांत एवढा अनर्थ ठायीं ठायीं त्यानें केला असतांही त्याला प्रतिकार अथवा त्याचें पारिपत्य कोणी करूं शकला नाहीं. यामुळें जनतेची ठाम समजूत स्वाभाविकपणेंच झाली कीं मोंगलांचा अंमल जबरदस्त म्हणूनच तो देशाला संरक्षण देणारा व टिकाऊ असा ठरूं शकेल. म्हणूनच लोकांची सहानुभूति मोंगलांच्या बाजूला होती. तिचा फायदा बाबरला तो स्वतः मोंगल नसतांही पुरेपूर घेतां आला. पण खरें पाहतां तैमुरलंग व बाबर हे बरलस तुर्क वंशातील होते.

बाबरनें आपल्या कारकीर्दींत बादशहा या नात्यानें हिंदुस्थानांत उत्तरेकडे बराच दरारा बसविला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा हुमायुन हा दुबळा बादशहा झाला व त्यामुळें त्याचा मोंगलाई दरारा बराच कलंकित झाला. हुमायुनाच्या पश्चात् अकबर हा थोरांतला थोर मोंगल बादशहा होऊन गेला व त्याच्या कारकीर्दींत मोंगल बादशाही सत्तेला बरेंच स्थैर्य व लोकप्रियताही लाभली.

अकबर दिल्लीच्या बादशाही सिंहासनावर आरुढ झाला, तेव्हां खरें पाहतां हिंदुस्थानांत एकमुखी व एकतंत्री अशा मध्यवर्ती सत्तेचा अभावच होता; व मेलेल्या प्राण्याच्या सडक्या मांसावर पोसणाऱ्या किड्यांसारखा हिंदुस्थानभर सरंजामदार वर्गाचा बुजबुजाट माजला होता. कोटमाप हिंदी जनसमूहरूपी अफाट जलाशयांत मच्छीमारीसाठीं बादशाही सत्तेचें अफाट जाळें फेंकण्यांत आलें होतें खरें; पण तें जाळें जागोजागीं विरलेलें व फाटलेलें होतें. उत्तर हिंदुस्थानावर अकबराची बादशाही सत्ता कागदोपत्रीं व लोकांच्या तोंडीं गाजत होती, तरी तेथेंही खरोखर अशीच बजबजपुरी माजलेली होती. दक्षिणेंत तेव्हां अनेक मुसलमान सुलतान दिल्लीच्या बादशहाला 'कुठच्या झाडाचा पाला' मानून स्वैरपणें राज्य करीत होते. मध्य हिंदुस्थानांत पुष्कळ रजपुतांची सत्ता जरी विस्कळित होती तरी बादशाही सत्तेला हार न जातां तेथें रजपुतांची सत्ताच चालत होती. उत्तर हिंदुस्थानांत बादशाही सत्ता नाममात्र नांदत होती खरी; पण तेथील प्रांतोप्रांतींचे सुभेदार व मोंगल सरदार मृताच्या पिंडाला चोंच मारण्यासाठीं टपून बसलेल्या कावळ्यांसारखे आपल्या प्रांतांतील बादशाही सत्ता बुडते केव्हां व आपण स्वतंत्रपणें राज्य

करूं लागतों केव्हां याची वाट पाहत होते. अर्थात् मोंगल बादशहाच्या सार्वभौम सत्तेविषयींचा सद्भाव कोठेंही नव्हता.

ज्या सत्तेला आपणाविषयीं सद्भावना मनांत नसलेल्या लोकांवर अंमल गाजवावयाचा असतो, तिला धाकदपटशा, बळजबरी व दडपशाही यां-खेरीज दुसरा उपायच नसतो. दिल्लीची बादशाही सत्तादेखील वरच्यासारख्या चमत्कारिक स्थितींत आपला अंमल केवळ आपल्या लष्करी बळाच्या जोरावर टिकवून होती. हें लष्कर हाताशीं ठेवण्याची पद्धत सरंजामदारी-सारखीच होती. बादशहानें आपल्या अधिकाऱ्यांना जहागिरी तोडून द्यावया-च्या अथवा विशिष्ट भागांतील करवसुलीचे अधिकार द्यावयाचे, व त्याच्या मोबदल्यांत त्या अधिकाऱ्यांनीं बादशहाच्या सेवेसाठीं सैन्य ठेवावयाचें. अर्थात् मध्यवर्ती सत्तेचें भवितव्य ह्या अधिकाऱ्यांच्या हातीं! त्यांनीं कसाही बेबंदशाहीचा कारभार केला तरी त्यांना विचारता अथवा शासनकर्ता कोणी नाहीं. अर्थात् लोकांना आपल्या गाऱ्हाण्यांची दाद मागण्याला कोठेंच जागा नाहींशी झाल्यामुळें त्यांचे हाल कुत्राही खाईनासा झाला होता.

धर्माच्या नांवावर जनतेला पिळून काढण्याचा आणखी एक राक्षसी उपाय मुसलमानी सत्ताधाऱ्यांनीं शोधून काढून त्याची जारीनें अंमलबजावणी चालविली होती. जे मुसलमान नाहींत त्यांच्यावर मुसलमानी अंमलांत 'जिझिया' अथवा डोईपट्टी नांवाचा कर बसविला गेला होता. त्यामुळेंच हिंदी सरदार-सरंजामदारवर्ग चिडून बादशाही सत्तेचें अनिष्ट मनापासून चिंतीत होता. दुबळ्या श्रमजीवि हिंदी बहुजनसमाजाच्या दुःखांना तर वाचाच नव्हती. कोठें न्यायनिवाडा नाहीं, अन्यायाची दाद नाहीं, जीवित व मालमत्ता यांना सुरक्षितता नाहीं, सत्ताधाऱ्याच्या लहरीपेक्षां निराळा कायदा उरला नाहीं; जिकडे तिकडे अंदाधुंदी! गोंधळ! हाहाःकार! हिंदुस्थान-सारख्या शेतकीप्रधान देशांत शेतकरी वर्ग हा सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या कोंबडीसारखा खरा. पण ह्या सरंजामदारांनीं व राजामहाराजांनीं त्या कोंबडीची निगा राखून तिच्यापासून सोन्याचीं अंडीं मिळविण्याचें सोडून तिचीच आबाळ व उपासमार चालविली. असल्या बेबंदशाहींत तळीं, विहिरी, पाटबंधारे, रस्ते वगैरे सार्वजनिक हिताच्या साधनांची सर्व देशभर वाताहात झाली, व समाजजीवन कष्टाचें होऊन बसलें. मध्यवर्ति सत्तेच्या

दुबळेपणामुळें बादशहाचे अधिकारी व सरंजामदार अधिक बळावत चालले. दुबळ्या बादशाही सत्तेचें किडलेलें जूं मानेवर सांवरण्यापेक्षां तें फेंकून देऊन स्वतंत्र व्हावें असें त्यांतल्या प्रत्येकाला वाटूं लागलें. अशा दारुण परिस्थितीमध्येंच अकबर हा इ० स० १५५६ या वर्षीं दिल्लीचा बादशहा झाला.

अकबर शहाणा व दूरदर्शी होता. त्यानें आपल्या साम्राज्याची आमूलाग्र सुधारणा करण्याचें कार्य तांतडीनें हातीं घेतलें. त्यानें प्रथम आपल्या लष्करांत सुधारणा केली. अधिकाऱ्यांना जहागिरी अथवा करवसुलीचे अधिकार देऊन मक्तेदारीनें सैन्य मिळविण्याची पद्धत त्यानें बंद केली; व सैनिकांना परस्पर बादशाही तिजोरींतून पगार वांटण्याची व्यवस्था केली. पूर्वींच्या जहागीरदारांच्या कारभारावर त्यानें कडी नजर ठेवली, व लष्कर चांगलेंच कार्यक्षम केलें. त्यानें आपल्या राज्याचे निरनिराळे पंधरा भाग अथवा सुभे पाडून त्यांवर एकेक सुभेदार नेमला. त्याप्रमाणेंच सुभ्यांचा कारभार व मध्यवर्ती सत्तेचा कारभार यांत सुसूत्रपणा आणला. या सर्वांपेक्षां अकबरानें आपल्या साम्राज्याला बळकटी आणण्याला जर कोणती आत्यंतिक महत्त्वाची गोष्ट केली असेल तर त्यानें देशांतील शेतकीच्या धंद्याच्या ऊर्जितावस्थेकडे घातलेलें मनापासून लक्ष हीच होय. दुष्काळासारखी आपत्ति आकाशांतून कोसळली व पृथ्वीवर येऊन आदळली असें कधीं होत नाहीं. अशक्त शरिरांत रोगबीजांना घर करावयाला व तें शरीर पोंखरून खावयाला सांपडतें. अकबरानें आपल्या वयाच्या लहानपणीं इ. स. १५५५ सालीं हिंदुस्थानांत पडलेला भयंकर दुष्काळ प्रत्यक्ष पाहिला होता. माणसांनीं माणसांना खावें, आयांनीं आपलीं मुलें कोंबड्याकुत्र्यापेक्षांही कमी मोलानें विकून पोटांतील आग विझविण्याचा प्रयत्न करावा, असली भीषण परिस्थिति लोकांवर ओढवली याला कारण राजसत्तेनें सार्वजनिक सुखसोईकडे व शेतकीकडे अनेक वर्षें केलेलें दुर्लक्ष होय; व दिल्लीच्या आपल्या वंशाच्या मोंगल बादशाहीचा नाश अशा बेजबाबदारपणामुळेंच ओढवत आहे, हा दाखला अकबराला त्याच्या लहानपणींच पटला. मागच्याला ठेंच पुढचा शहाणा या न्यायानें त्यानें आपल्या अमदानींत तशी गत होऊं दिली नाहीं. पूर्वीं सरकारी अधिकाऱ्यांकडून शेतकरी वर्ग सर्वतोपरी लुबाडला जात असे. त्या घातुक पद्धतीला आळा घालून शेतकऱ्याला व त्या निमित्तानें देशाला सुखी

करण्यासाठीं त्यानें जमीनमहसुलाची घडी नीट बसविली. शेतकऱ्याच्या शेतांत जें धनधान्य पिकेल त्याचा फक्त तिसरा हिस्सा त्यानें सरकारांत जमिनीवरील कर म्हणून द्यावयाचा, व शेतजमिनीच्या पिकांची पाहणी करून जमिनीच्या सरस निरस मगदुराप्रमाणें जमीनमहसुलाची रक्कम कमी जास्त करावयाची, अशी निश्चित योजना त्यानें आपल्या अधिकाऱ्यांना आंखून दिली. या पद्धतीनें शेतकरी व सरकार या दोघांचाही फायदा झाला. जमीन अधिक कसदार झाली व अधिक उत्पन्न येऊं लागलें तर त्याचा तिसरा हिस्सा सरकारांत द्यावयाला शेतकऱ्याला दुःख नाहीं, व जमिनीचा पिकाऊपणा कमी झाला अगर दुष्काळ पडला तर त्याला सरकारांतून सूटही ठरवून मिळत असे. आणि हा जमिनीच्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा करही हकनाहक घेतला जात नसे. शेतकऱ्यांच्या सर्व सुखसोईकडे त्या कराच्या मोबदल्यांत अवश्य तें लक्ष दिलें जात असे. इ. स. १५९६ मध्यें अकबराच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत दुष्काळ पडला, तेव्हां आपल्या सुभेदारांच्या बेदरकार कारभाराचा परिणाम ध्यानीं घेऊन स्वतः त्यानें देशांतील दुष्काळपीडितांना वांचविण्यासाठीं दुष्काळी कामें सुरू केलीं. अशा प्रकारें अकबरानें आपल्या रयतेला सर्वतोपरी सुराज्य देण्याचा मनःपूर्वक प्रयत्न केल्यामुळें रयतेच्या संतोषानें त्याच्या सत्तेला बळकटी आली होती. मृत्युपंथाला लागलेल्या सरंजामदारशाहींतील अंतस्थ विग्रहाचा कार्यकारणभाव ध्यानीं घेऊन त्यानें सर्व हिंदु मुसलमान सरंजामदारांना आपल्या मध्यवर्ती बादशाही सत्तेच्या रथाला मोठ्या कुशलपणें जुंपून आपल्या हयातींत त्या रथाचें सारथ्य मोठ्या कौशल्यानें पार पाडलें. अकबराच्या कारकीर्दीच्या यशस्वितेचें मुख्य मर्म त्यानें शेतकरी वर्गाच्या कल्याणाची योग्य काळजी घेतली हें खरें. पण अशा प्रकारच्या एकमुखी व एकतंत्री सत्तेच्या ठायीं फार मोठा दोष हा असतो कीं, ती सत्ता जो सावधानचित्तानें गाजवील त्यालाच धारजिणी असते. मागाहून गादीवर येणारा माणूस पूर्वीच्यासारखाच लायक असण्यावर त्या सत्तेचें चिरस्थायित्व अवलंबून असतें. अकबराच्या पश्चात् त्याच्यासारखा लायक बादशहा झालाच नाहीं. त्याचा मुलगा जहांगीर व जहांगिराचा मुलगा, सुप्रसिद्ध ताजमहालाच्या नायिकेचा रंगेल प्रियकर शहाजहान हे अकबर बादशहाच्या सिंहासनावर सूर्यापोटीं शनैश्वरसे शोभले! त्यांच्या कारकीर्दींत

त्याच्या सुभेदारांना स्वत्या सुभ्यांचे मांड मांडावयाला रान मोकळें सांपडलें. आणि युरोपांत प्रबळ होत चाललेल्या भांडवलशाहीला अर्थात् व्यापारी वर्गाला आपले व्यापारी हातपाय हिंदुस्थानांत ऐसपैस पसरविण्याचा उपक्रम करण्याला सोन्याची संधी तेव्हांच मिळाली. शहाजहानाला कैदेंत लोटून त्याचा मुलगा अवरंगजेब हा बादशहा झाला त्याच वर्षी इ० स० १६८५ मध्यें देशभर जे भयंकर दुष्काळ पडले, व दुबळ्या जनतेला जाचले, तो बादशाही सत्तेंतील बेदादीचाच परिणाम होय.

अवरंगजेबानें दुष्काळांतून लोकांना वांचविण्याची खूप धडपड केली; पण तिचा फारसा उपयोग झाला नाहीं. त्याची मध्यवर्ती सत्ता दुबळी बनलेली, व तिला सबळपणा आणण्यासाठीं एकराष्ट्रीयत्वाचे म्हणून जे प्रयत्न त्यानें केले त्यांचा मार्ग अगदीं चुकीचा ठरला. आगींत तेल ओतावें अथवा जखमेवर मिठाचें पाणी शिंपडावें तशी त्या प्रयत्नांची गत झाली. अकबरानें एकराष्ट्रीयत्वाची भावना देशभर उत्पन्न करून देशांतील परस्परविरोधी शक्तींचें एकीकरण करण्याचा प्रयत्न केला व तो यशस्वी झाला याचें कारण सर्वांविषयीं सहनशीलता, समता व सहानुभूति हे अकबराच्या कारभाराचे विशेष गुण होते. अकबरानें उत्तरेकडील सर्व रजपूत राजेरजवाड्यांची सहानुभूति मिळवून त्यांच्या मनांत विश्वास उत्पन्न केला; अवरंगजेबानें त्यांच्याशीं वैर मांडून त्यांना बंडाला प्रवृत्त केलें व त्यांच्याशीं झगडून त्यांचा नाश केला. त्यामुळें उत्तरेंत बादशाही सत्तेला तेथील राजेरजवाड्यांचा व सरदारसुभेदारांचा पाठिंबा नष्ट झाला व न शाकारलेल्या आणि वानरांनीं उड्या मारून कौलें फोडून ऊन्ह पावसाचें माहेर बनविलेल्या मोडकळत्या घरासारखी उत्तरेंतील बादशाही सत्तेची अवस्था झाली. मुसलमानी धर्म महंमद पैगंबरानें स्थापन केला तो विस्कळित व पीडित अशा अरबांची राष्ट्रीय जूट साधून त्यांचें दैन्य लयाला नेऊन त्यांना समृद्ध करण्यासाठीं स्थापन केला. त्याचे तात्कालिक परिणामही त्यांच्या दृष्टीनें उज्ज्वल असेच झाले. पण देशकालपरिस्थिति ध्यानीं न घेतां व सारासार विचार न करतां अवरंगजेबानें आपल्या वंशपरंपरेच्या बादशाही वैभवाला स्थिरता व समृद्धि प्राप्त करून घेण्यासाठीं मुसलमानी धर्माचा प्रसार जोरानें चालविला. अकबरानें हिंदु व इतर परधर्मीय यांची मैत्री व विश्वास संपादन करण्यासाठीं सर्व धर्मांविषयीं आदर बाळगून सर्वांना

मान्य होणारीं सारभूत धर्मतत्त्वें शोधून काढण्याविषयीं आस्था बाळगिली, तर अवरंगजेबानें आधींच बेबंद कारभारामुळें गांजलेल्या व दुष्काळ, दारिद्र्य, लुटालूट, बंडखोरी वगैरे आपत्तींनीं नको जन्म झालेल्या सरसकट सर्व हिंदु रयतेकडून जबर डोईपट्टी वसूल करण्याचा सपाटा चालविला! त्यानें राज्य-कारभारातून हिंदु अधिकाऱ्यांना भराभर काढून टाकलें त्यांचाही भार शेतकरी वर्गावरच पडला. ही आपत्ति असह्य झाल्यामुळें शेतकरी वर्गापुढें 'मरावें कीं जगावें' असा भयंकर पेंच उत्पन्न झाला. एकदां तर ह्या गांजलेल्या शेतकरी वर्गानें बंड पुकारून बादशाहापाशीं दाद मागण्यासाठीं थेट दिल्ली-पावेतों मोर्चा नेला होता. पण अवरंगजेबानें त्यांची नीट विचारपूस न करतां उलट त्या जमावांत पिसाळलेले हत्ती सोडून लोकांना तुडविलें!

सरकारी नोकरींतूनही याच हिंदुधर्मद्वेषाच्या भरांत अवरंगजेबानें हिंदूंचें पूर्णपणें उच्चाटण केल्यामुळें बुद्धिजीवि मध्यम वर्गही बेकार होऊन उघड्या-वर पडल्यासारखा झाला व तो मोंगल बादशाहीचा शत्रु बनला. हिंदूंच्या चातुर्वर्ण्यपूर्ण समाजव्यवस्थेंतील श्रेष्ठ वर्ण म्हणजे ब्राह्मण. देव व धर्म ब्राह्म-णाच्या मुखानें बोलावयाचा. पण त्या हिंदु देवधर्माच्या कल्पनेवर व त्यांचा अभिमान बाळगणाऱ्या सरंजामदार वर्गावर अवरंगजेबानें स्वधर्मप्रसाराचे व परधर्मविरोधाचे वज्राघात करण्याला सुरुवात करतांच ब्राह्मण वर्गाला तरी सुरक्षितता कोठें राहिली?

हाच अवरंगजेबाचा जुलमी कारभार दक्षिणेंतील हिंदूंत प्रति नवचैतन्य उत्पन्न होण्याला कारण झाला. वस्तुतः त्याचा बाप शहाजहान हा दिल्लीचा बादशहा असल्या वेळेपासूनच अवरंगजेबानें दक्षिणेंतील हिंदु राज्यांचा नाश करण्याची मोहीम हातीं घेतली होती. त्याच्या साम्राज्यविस्ताराच्या महत्त्वा-कांक्षेच्या पोलादी तरवारीला स्वधर्मप्रसाराच्या एकांगी महत्त्वाकांक्षेच्या महा भयंकर विषाचें पाणी दिलेलें असल्यानें दक्षिणेंतील हिंदु स्वरक्षण व स्वधर्म-रक्षण अशा उभयविध भावनांनीं संतप्त होऊन त्या संकटाला तोंड देण्यासाठीं एकजूट करूं लागले. ह्या एकजुटींतूनच दिल्लीच्या मोंगल बादशाहीला ग्रासून टाकणाऱ्या शिवशाहीचा म्हणजेच मराठशाहीचा उगम झाला.

शिवाजीचा स्वराज्यस्थापनेचा प्रयत्न यशस्वी कां झाला हें आपण मागें सामान्यतः पाहिलेंच आहे. अवरंगजेबाचे हिंदूवरील अत्याचार दिवसेंदिवस

वाढत असतां शिवाजीनें गरीब रयतेचा नेता या नात्यानें अवरंगजेबाला जो निर्वाणीचा खलिता पाठविला होता, त्यांत जुलमी जिझिया कराविरुद्ध तक्रार करतांना त्यानें आपल्या गरीब देशबांधवांचाच कैवार घेतला आहे; यांतच त्याच्या यशाचें मर्म आहे. परंतु निर्भेळ राजसत्ता ही एकमुखी अथवा व्यक्तिनिष्ठ असल्यानें, जी गत अकबराच्या पश्चात् त्याच्या साम्राज्याची झाली, तीच शिवाजीच्या पश्चात् त्याच्या राज्याची झाली.

शिवाजीचा मुलगा संभाजी हा छत्रपति झाला, व तो अवरंगजेबाच्या हातीं पकडला जाऊन ठार मारला गेल्यावर त्याचा सावत्र भाऊ राजाराम हा राजवटीचा कारभार पाहूं लागला. मध्यवर्ती शासनसंस्था दुबळी झाल्यामुळें तिच्या अधिकाऱ्यांना व सरंजामदारांना बळजोर होण्याला अकबराच्या पश्चात् दिल्लीच्या बादशाही राजवटींत फावलें, तीच गत शिवाजीनंतर शिवशाहींत झाली. संभाजीच्या मृत्यूनंतर राज्य टिकतें कीं बुडतें अशी जबर भीति उत्पन्न झाली. राजाराम एकतंत्री राजसत्ता गाजवून रयतेचें कल्याण करण्याला असमर्थ ठरला, तेव्हां उदय पावूं लागलेल्या सरंजामदार वर्गाला राजारामानें प्रोत्साहनच दिलें. राजवटीच्या फाटलेल्या आकाशाला अशीं ठिगळें दिल्यानें कार्यभाग होईल असें त्याला वाटलें. राजारामानंतर ताराबाईनें कांहीं दिवस आपल्या अप्रबुद्ध मुलाच्या नांवानें राज्यकारभार हांकला. तोंच इ० स० १७०७ मध्यें अवरंगजेब बादशहा मृत्यु पावून दिल्लीच्या मोंगल बादशाहीवर संकटाचें आकाश कोसळलें. महाराष्ट्रांत तेव्हां मराठी सरंजामदार वर्गाचा जोर होता. त्यांच्या जोरदार विरोधापुढें अवरंगजेबासारख्या कर्दनकाळाचाही निभाव लागला नाहीं हें पाहून कांहींही करून मराठ्यांत फूट पाडून त्यांना आपसांत भांडत ठेवल्यानें त्यांचा आपल्या मागचा ससेमिरा अंमळ कमी होईल असें दिल्लीच्या बादशहाला वाटलें; व त्यानें त्याच हेतूनें शाहूची आपल्या कैदेंतून सुटका केली व त्याला महाराष्ट्राचा कारभार करावयाला सांगून आपला अंकित म्हणून महाराष्ट्रांत पाठविलें. अर्थात् बादशाहीच्या दृष्टीनें शाहू हा एक सरंजामदारच निर्माण केला गेला. सरंजामदारीच्या नापीक व निकस बनलेल्या जमिनींत हें एक नवें बीं पेरलें गेलें.

दिल्लीचा बादशहा शाहूला आपला अंकित मानीत असला व शाहूही तसें मिरवण्यांत भूषण मानीत असला तरी मराठशाहीच्या कारभाऱ्यांनीं त्याला

छत्रपति मानलें. पण शाहूच्या अंगीं एकमुखी सत्ता गाजविण्याला अवश्य असलेला कणखरपणा नसल्यानें पेशव्याला व इतर कारभाऱ्यांना राज्य-कारभारांत महत्त्व देणें त्याला भाग पडलें. पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ भट यानें आपला कारभार स्थिर करण्यासाठीं नवे नवे सरंजामदार निर्माण करून सरंजामदार वर्गाचा योगक्षेम नीट चालविला. अनेक इतिहासज्ञ बाळाजी विश्वनाथाची ही चूक झाली असें म्हणतात. पण त्याला तेव्हां तसें करण्या-खेरीज गत्यंतरच नव्हतें. कारण मध्यवर्ती सत्ता दुबळी झाली होती, तिच्यावर सरंजामदार वर्ग तात्पुरता तरी झटपट फोंफावणें अपरिहार्य होतें. पेशवा-देखील पुढें छत्रपतीसारखाच वंशपरंपरेनें अधिकारावर येऊं लागला; व शाहूच्या कारकीर्दीच्या अखेरीला तर पेशवाच वंशपरंपरेनें मराठशाहीचा सर्वाधिकारी ठरला. शाहूच्या मृत्यूनंतरचा मराठशाहीचा कारभार पाहिला तर छत्रपति केवळ नांवाचा; सर्व कारभार पेशवे व त्यांना मान्य असलेले अथवा त्यांनीं निर्माण केलेले सरंजामदार यांच्या तंत्रानें चालावयाचा, अशीच स्थिति होती. पुढें पेशव्यांनीं निर्माण केलेले सरंजामदारच सवत्या सुभ्याचे घाट घालून एकमेकांशीं फटकून वागूं लागले, व मराठी स्वराज्य स्थापन करण्याच्या वेळचा 'शेतकऱ्यांचें व त्या द्वारा सर्व जनतेचें कल्याण' हा उदात्त हेतु कोठल्या कोठें लोपला, एकराष्ट्रीयतेच्या भावनेचा मागमूसही उरला नाहीं व एका राजवटीचे सेवक म्हणविणारे प्रतिनिधि, पेशवे, शिंदे, होळकर, पवार, भोसले, गायकवाड, वगैरे सरंजामदार आपसांत एकमेकांशीं मत्सरानें झगडून दुबळे झाले. त्यामुळें इंग्रजांसारख्या परदेशी व्यापारी भांडवलदारांचें मात्र फावलें. पेशवाई अंमलांत मराठ्यांनीं दिल्लीच्या बादशहाला आपल्या हातांतील कळसूत्री बाहुलें बनविलें व देशभर कांहीं काळ आपल्या सत्तेचा विलक्षण दरारा उत्पन्न केला हें खरें. पण ऐतिहासिक क्रमाच्या सखोल महोदधीच्या पृष्ठभागावर उसळणाऱ्या वादळापेक्षां अथवा झंझावातापेक्षां अधिक महत्त्व त्या सत्तेला नाहीं. सत्राव्या शतकाच्या उत्तरार्धांत उदय पावलेली व अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत कोमेजूं लागून एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं पूर्णपणें कोमेजून गेलेली मराठ्यांची राजसत्ता म्हणजे सरंजामदार वर्ग व मध्यवर्ती बादशाही सत्ता यांच्या आपसांतील सोंगट्यांच्या डावांत असल्या खेळांत पटाईत अशा सरंजामदार वर्गाच्या वतीनें पडलेलें दान होय.

ऐतिहासिक क्रमानें पाहतां एकतंत्री मध्यवर्ती सत्तेचें असें मरण ओढवण्याचा-च तो काळ होता.

पेशव्यांच्या कारकीर्दींत मराठ्यांचा दरारा देशभर बहुतेक सर्वत्र गाजला खरा. पण मराठी सरंजामदारशाहीला तें यश लाभण्याला प्रथम मध्यवर्ती मोंगल राजसत्तेचा दुबळेपणा व अवरंगजेबानें धर्माच्या नांवावर हिंदु रयतेचा केलेला अनन्वित छळ मुख्यतः कारण झाला. महाराष्ट्रांत तुकाराम व एकनाथ यांच्यासारख्या सुधारक संतांनीं हिंदु धर्मांतील जातिभेद व पंथभेद यांमुळें माजलेल्या विषमतेला गाडण्यासाठीं सुधारलेल्या धार्मिक शिकवणुकीनें लोकांत राष्ट्रीय एकजुटीचें नवचैतन्य उत्पन्न केलें होतें, व त्या लोकजागृतीला शिवाजी-सारख्या श्रेष्ठ पुढाऱ्याची जोड मिळाली. पेशवाईच्या ऐन अमदानींत शिव-शाहीपूर्वीच्या काळाप्रमाणें ब्राह्मणशाहीचें वर्चस्व झाल्यामुळें पुन्हा आपसांत मतभेद, वितुष्ट व वैर माजलें, व त्या काळांत जनस्वास्थ्याला अंतर्गत कीड लागली; त्या पेशवाई कारभाराचा चिकित्सक दृष्टीनें विचार करतां तो कारभार म्हणजे सरंजामदार वर्गाचे आपसांतील डावांना प्रतिडाव व पवित्र्यां-ना प्रतिपवित्रेच होत. एरव्हीं समाजजीवनाच्या सुस्थितीला व प्रगतीला आवश्यक असें आर्थिक स्वास्थ्य देशाला लाभेल असे कोणतेच उपकारक प्रयत्न त्या काळीं त्या सरंजामदार वर्गाकडून झाले नाहींत. पर प्रांतांवर स्वाऱ्या करून तेथील संपत्ति दरोडेखोरीप्रमाणें दंडेलीनें लुटून आणावयाची व त्या संपत्तीनें आणि विविध वैभवानें आपली दौलत संपन्न करावयाची; उत्तरेकडून सुवर्णनदी वाहत आणावयाची, दक्षिणेकडून वाहत आणावया-ची; स्वतःचें वैभव राज्यकर्ता या दृष्टीनें वाढवावयाचें, यापेक्षां देशकल्याणा-ची कोणतीच बाब पेशवाईतील थोरांचा थोर गणल्या गेलेल्या थोरल्या नानासाहेब पेशव्यालाही सुचली नाहीं, मग इतरांची गोष्ट कशाला! शेत-कऱ्याच्या सुस्थितीवर देशाची सुस्थिति अवलंबून आहे हें ओळखून व कष्ट करणाराला भाकरी प्रथम हें धोरण ठेवून शिवाजीनें जें शेतकऱ्यांचें व शेत-कऱ्यांसाठीं स्वराज्य स्थापन केलें, तो उदात्त हेतु शिवाजीनंतरच्या मराठी राज्यकर्त्यांनीं मनांत वागविलाच नाहीं.

सर्व रयतेचें योग्य प्रकारें कल्याण व्हावें म्हणून योग्य ती खबरदारी घेणें व न्यायानें आणि समतेनें राज्य करणें हें जें राज्यकर्त्याचें त्यांच्याच न्याय-

वा. क. ६००३

नीतिनुसार उचित कर्तव्य, तें विसरून राज्यकर्ता असा कोत्या बुद्धीचा, अहंमन्य व स्वार्थपरायण बनल्यावर त्याचें राज्य–मराठी सत्तेपुरतेंच बोलावयाचें तर–मराठी राज्य विस्तारानें हिंदुस्थानांत महाराष्ट्राबाहेर दूरवर विस्तारलें खरें पण ती वरवर हिरवी गार दिसणारी पेशवाई सत्तेची अथवा इतरत्र नांदणाऱ्या इतर सरंजामदारांची हिरवळ पिकत्या फुलत्या फळत्या शेताची नसून निरुपयोगी तणाची ती हिरवळ होती. वरून पेशवाई अंमल गुबगुबीत दिसला तरी तो गुबगुबीतपणा स्नायूंच्या बळकटपणाचा नव्हता; सुजलेल्या मांसाचा होता. पेशवाई अंमलांत ब्राह्मणाखेरीज इतरांनीं यज्ञोपवीत धारण केल्यास तांब्याचें यज्ञोपवीत करून तापवून त्यानें त्या अभागी अपराधी जीवाच्या अंगावर डागण्या दिल्याचे पुरावे सांपडतील, ब्राह्मणांखेरीज इतरांच्या विधवा स्त्रियांनीं केशवपन करूं नये अशासारखे वटहुकूम आढळतील, समुद्रवलय ओलांडून परदेशगमन केल्यानें हातून घडलेल्या महान पातकाचें क्षालन करण्यासाठीं प्रायश्चित्तपूर्वक सुवर्णयोनींतून पलीकडे जाऊन पुनर्जन्माचें नाटक यथासांग केल्याचें दिसून येईल, सोंवळ्याओंवळ्याचे अनेक विचित्र, खुळचट व क्षोभजनक प्रकारही आढळून येतील. राज्यकर्ते पेशवे ब्राह्मण म्हणून त्यांच्या न्यायाचा कांटा ब्राह्मण जातीकडे झुकता असेल; दिल्लीच्या बादशाहींतील मुसलमान सुभेदारांचा व सरंजामदारांचा तोच कांटा मुसलमानांकडे कलता असेल. पण हेतु सरंजामशाही टिकवणें हा! पण शेतकी हें जें देशाचें मायपोट, त्या धंद्याला ऊर्जितावस्था कशी येईल अथवा उत्पादक शेतकरी वर्गाला सर्व प्रकारचें स्वास्थ्य लाभून त्याच्या हातून अधिक उत्पादन झाल्यानें देशात धनधान्यसंपदेची विपुलता कशी होईल या महत्त्वाच्या प्रश्नाकडे कोणाही ब्राह्मण वा ब्राह्मणेतर सरंजामदारानें लक्ष्य दिल्याचें दिसून येणार नाहीं. त्या काळांतील समाजजीवनाला पोषक अशा खळखळ वाहणाऱ्या वेगवान प्रवाहासारखा सरंजामशाही कारभार जिवंतपणीं चालत नसून सांचपाण्याच्या डबक्यावर घोंघावणाऱ्या डांसांसारखे सरंजामदार देशांत ठायीं ठायीं घोंगावत होते!

वठूं लागलेल्या वृक्षालाही कधीं कधीं एखादा पालवीचा तुरा फुटतो. विझतांना तेलदिवा जास्त प्रकाश देतो. हिंदी सरंजमादार वर्गांत पेशव्यांकडून झांशीचें राज्य असेंच निर्माण केलें गेलें होतें.

## ४ : झांशीच्या राज्याचा जन्म व कारभार

झांशीचें राज्य हें उत्तर हिंदुस्थानांत बुंदेलखंड नांवाचा जो अत्यंत सुपीक प्रदेश आहे, त्याचा एक भाग होय. अर्थात् झांशी राज्याच्या इतिहासापेक्षां बुंदेलखंडाचा इतिहास कालमानानें अधिक जुना असणार. बुंदेलखंडाचा अति प्राचीन इतिहास हा सबळ अशा प्रत्यक्ष पुराव्याच्या अभावीं आख्याइकांत सामावलेलाच ऐकावयाला मिळतो. त्यांपैकीं एक आख्यायिका अशी आहे कीं, काशी एथील राजवंशांत पंचम या नांवाचा कोणी राजा होऊन गेला. त्याला राज्य अर्थात् स्वपराक्रमानें मिळालेलें नव्हतें अथवा बुंदेलखंडांतील लोकांनीं ‘ये बाबा पंचमा ! आमचा राजा हो ’ असें आमंत्रणही त्याला कोणीं दिलें नव्हतें. वंशपरंपरेचा राजा; विनाश्रम राज्यवैभव मिळालेलें. तें त्याच्याहून रानदांडग्या भाऊबंदांनीं त्याच्यापासून हिसकावून घेतलें व त्याला तेथून हाकलून लावलें. स्वसंरक्षणही करतां येईना, मग प्रजेचें रक्षण करणें दूरच. असला तो रडतोंडा राजा वैतागून विंध्याचलावर पळाला, व तेथें त्यानें विंध्यवासिनीदेवीसमोर त्रागा केला कीं, माझें राज्य मला मिळवून दे नाहीं तर तुझ्या पुढ्यांत मान कापून घेऊन जीव देतों! देवी त्या बावळट, नकर्त्या व आतताई राजाच्या धमकीसमोर नमली अथवा विरघळली, व तिनें राजाच्या मानेवरील तरवार काढून घेऊन ‘तुझें राज्य तुला परत मिळेल’ असा आशिर्वाद दिला! त्याप्रसंगीं राजाच्या शरिरावरील तरवारीच्या वारांनीं झालेल्या जखमांतून रक्ताचे बिंदु गळत होते; तें त्या राजाच्या अढळ देवीभक्तीचें प्रतीक ठरावें म्हणून राजानें आपणाला बुंदेले हें उपनांव घेतलें, अथवा लोकांनीं त्याला दिलें. ही आख्यायिका कितपत खरी अथवा खोटी याविषयीं अधिक चर्चा न करणें बरें. मानवानें मानवावर दंडेलीनें सत्ता गाजवण्याच्या कृत्यांना कोणतेंही मानवी कारणांचें समर्थन सारासारविचारा-

ऱ्या कसोटीवर पडताळून पाहतां अपुरें पडतें, म्हणून त्या कृत्यावर दैवी अनुग्रहाचा सोनेरी मुलामा देऊन लोकांना डोलविण्याचा प्रयत्न करण्याची ही ठराविक ठशाची प्रथा फार पूर्वींपासूनची आहे. कारण दैवी कृपेला अथवा अवकृपेला प्रत्यक्ष मोजमाप, कसोटी कांहींच लागत नाहीं !

दुसरी एक आख्यायिका अशी आहे कीं, काशीच्या राजवंशांतील हरदेव नांवाच्या एका माणसानें आपल्या प्रांतांतून एक सुंदर मुलगी पळवून आणून ती तो ओर्च्छा एथें घेऊन गेला. ओर्च्छाच्या राजानें हरदेवाचें मन वळवून ती मुलगी स्वतःला मिळविली व तिच्याशीं लग्न लावलें. पळवून आणलेली स्त्री बंदी–बुंदी म्हणजे दासी. त्यावरून ओर्च्छाच्या राजाला त्या पत्नीपासून झालेल्या संततीला बंदेल अथवा बुंदेल असें नांव पडलें. ही बुंदेलखंडाच्या जन्माची आख्यायिका अधिक व्यवहारसिद्ध व जगांतील राजवंशांच्या अथवा सत्ताधारी दंडेलांच्या आजवरच्या परंपरेला शोभते. ती आख्यायिका खरी असेल तर ओर्च्छाचा तो राजा वयस्क असावा. राजा अथवा श्रीमंत असला कीं तो म्हाताराच काय पण कापुरुष असला तरीदेखील त्याला एकामागून एक सुंदर तरुणी मिळवून त्यांना लग्नाच्या अथवा बिनलग्नाच्या बेडीनें आपल्या विलासमंदिरांत डांबून ठेवण्याचा अधिकारच असतो ! असल्या राजांना हिंदुस्थानांत आजकाल मुळींच वाव नाहीं. त्याप्रमाणेंच अशा राजांना मुली पळवून आणून पुरविणारे ‘ हरदेव ’ही हवे तेवढे भेटतात. प्रस्तुतचा ‘हरदेव’ हा राजवंशांतील एक पुरुष असल्यानें, त्यानें असलें हलकें कृत्य कसें केलें असेल असेंही कोणाला वाटण्याचें काहीं कारण नाहीं. आजकाल असे बाहेरून प्रतिष्ठित दिसणारे अनेक लोक असलीं कृत्यें करून आपली ‘राज-निष्ठा’ अथवा ‘स्वामिनिष्ठा’ बजावीत असतात. हा हिंदी सरंजामदार वर्गाच्या पडत्या काळाचा परिणाम होय असें कोणाला म्हणावयाचें असेल, तर त्यानें पेशवाईला वैभवशिखरावर गौरवपूर्वक चढविणारे थोरले नानासाहेब ऊर्फ बाळाजी बाजीराव पेशवे यांची कारकीर्द ऐतिहासिक दृष्टीनें अवलोकन करावी म्हणजे पेशव्यांनीं दिल्लीला असलेल्या आपल्या राजकार्यकुशल वकिलाला खुबसूरत मुली पाठविण्याविषयीं फर्मानें सोडल्याचे व त्या वकिलांनींही साम्राज्याच्या राजकारणाइतक्याच कळकळीनें तसल्या फर्मानांची अंमल-बजावणी केल्याचें स्पष्ट दाखले तेथें पाहावयाला सांपडतील. तरीदेखील

देशकालवर्तमानाचा एकसमयावच्छेदेंकरून विचार करतां असल्या गोष्टी ‘प्रतिष्ठित’ लोकांच्या दृष्टीनें सामान्य व क्षम्य ठरतात, हें निराळें.

झांशी परगणा हा याच बुंदेलखंडाचा एक भाग होय. तो निरनिराळ्या राजसत्तांच्या उलथापालथी अनुभवीत इ. स. १७०७ मध्यें दिल्लीचा मोंगल बादशहा बहादुरशहा याजकडून बुंदेलखंडचा राजा छत्रसाल याला जहागीर म्हणून मिळाला. छत्रसालावर माळव्याचा मोंगल सुभेदार महंमदखान बंगष यानें स्वारी केली, त्या संकटांतून थोरला बाजीराव पेशवा यानें छत्रसालाचें रक्षण केल्यामुळें छत्रसालानें बाजीरावाच्या उपकारांची फेड करण्याकरितां आपल्या एकूण तीन कोट रुपये उत्पन्नाच्या राज्यापैकीं एक कोट रुपये उत्पन्नाचा मुलूख बाजीरावाला बक्षीस दिला. बाजीराव पेशव्यानें त्या मुलुखाचे तीन भाग करून निरनिराळ्या सुभेदारांच्या हातीं त्या सुभ्यांची सर्व व्यवस्था सोंपविली. त्यांपैकीं वीस लाख रुपये वार्षिक उत्पन्नाचा झांशी प्रांत हा एक सुभा नारोशंकर मोतीवाले म्हणून सरदार होते त्यांच्या हवालीं केला. कांहीं काळानें तेथील पूर्वीच्या गोसावी राजानें बंड करून नारो शंकरला तेथून पळवून लावलें. तेव्हां पेशव्यांकडून झांशीच्या सुभ्यावर रघुनाथ हरि नेवाळकर ह्या सरदाराची नेमणूक झाली. रघुनाथरावांनीं गोसाव्यांचें बंड साफ मोडून टाकून झांशी प्रांतांत सर्वत्र शांतता केली. ह्या त्यांच्या कर्तबगारीवर खूष होऊन पेशव्यांनीं झांशीची सुभेदारी वंशपरंपरेनें त्यांच्याकडे सोंपविली.

रघुनाथ हरि नेवाळकर हे राज्यकर्त्यांच्या भाषेंत बोलावयाचें तर धूर्त व दूरदर्शी होते. गोसाव्यांच्या बंडाचें मर्म त्यांनीं बरोबर ओळखलें. मुख्य गोसावी जहागीरदार हा इतर पोटार्थी गोसावी सैनिकांच्या जोरावर पुंडावा माजवीत होता. सैन्य आपल्या पोटावर चालतें, हा नेपोलियनचा सिद्धांत रघुनाथरावांना स्वानुभवानें पटला होता. गोसाव्यांचे आखाडे जे फोफावतात व ते गोसावी लोक पुंडावा करावयाला तयार होतात ते केवळ पोटासाठीं—पैशासाठीं, हें त्यांच्या चटकन ध्यानीं आलें. भुकेलेल्या माणसाला राखेचा तोबरा देऊन भागावयाचें नाहीं, गोळाभर अन्न व घोट दोन घोट पाणी त्याला देणें हाच त्याचें समाधान करण्याचा उपाय, हें मर्म त्यांनीं तेव्हांच ओळखलें. समाजांत निर्वाहाच्या साधनांची सुव्यवस्थेच्या अभावीं वाण, शेतकी धंद्याची सर्वतोपरी आबाळ, वगैरे कारणांमुळें बेकार गोसाव्यांची संख्या

वाढत होती व बंडखोरी फोफावत होती. तिथें नेहमीं नुसत्या धाकदपटशानें अथवा रक्तपातानें आळा घालतां यावयाचा नाहीं; गोसाव्यांना दहशत बसवूं जावें तर भुकेनें तडफडत असल्यामुळें कावलेल्या इतर लोकांनीं अंगाला राख फांसून गोसावी बनावें व लूटमारीनें तरी पोट भरतें का पाहावें अशा उद्देशानें एकाऐवजीं एकवीस व एकविसांऐवजीं एकशेंएकवीस असे असंतुष्ट लोक भराभर बंडांत सामील होतील; हें मर्म रघुनाथरावांच्या तेव्हांच ध्यानीं आलें. त्यांनीं बंडखोर गोसाव्यांना पैशाच्या व नोकरीच्या लालुचीनें आपणाकडे वळवून घेतलें व मोठ्या चतुराईनें बंड मोडून बंडखोर गोसावी जहागीरदाराला शरण आणलें. अंमळ स्थिरस्थावर झाल्यावर गोसाव्यांचे आनंत, आभान, आखात व नागा हे चारही प्रमुख आखाडे, ज्यांतील गोसावी पुंडावा करण्यांत पुढाकार घेत, त्यांना त्यांनीं गोडीगुलाबीनें जवळ केलें. त्यांतील प्रत्येक गोसाव्याला दरमहा चार रुपये रोख मिळावयाचे, त्या मोबदल्यांत त्यांनीं यांच्या हांकेसरसें लढण्याला धावून यावयाचें असें ठरलें. सरंजामशाहीच्या व भांडवलशाहीच्या भाडोत्री सैनिकांसमोर कोणाबरोबर लढावयाचें हा प्रश्न नसतोच. धनी पगार देतो, तोंवर तो सांगेल त्याच्याशीं लढावयाचें, एवढेंच त्याचें काम. शेतकी अथवा इतर उद्योगधंदे करणें हें जसें निर्वाहाचें साधन, तसेंच लढाईत आपल्या देशबांधवांचेही मुडदे पाडून त्यांच्या गळ्यासभोंवार सरंजामशाही अथवा भांडवलशाही सत्तेचा राक्षसी फांस अधिक जोरानें आवळणें हाही एक निर्वाहाचा धंदाच! माणुसकीला न शोभणारीं असलीं कृत्यें उपासमारीमुळेंच लोकांना बिचाऱ्यांना करावीं लागतात. बुंदेलखंडाच्या व आजूबाजूच्या टापूंतील बिचाऱ्या शेतकरी–कामकरी लोकांचे शेतकी व उद्योगधंदे बुडाले नसते, अन्नान्नदशा झाली नसती, तर अंगाला राख फांसून गोसावीपणाचें ढोंग करून लूटमार करण्याइतका त्यांचा अधःपात कां झाला असता? आजदेखील गोसाव्यांचे पूर्वोक्त आखाडे संस्थानांसारखे श्रीमंतींत व डामडौलांत सुरू आहेत. ते आतां सरंजामदार वर्गाच्या मालिकेंत बसलेले आहेत. हें वैभव तरी त्यांनीं गुंडगिरीवर संपादन केलें आहे! याचें श्रेय पेशव्यांपूर्वींचे सत्ताधारी, पेशवे व त्यांचे सुभेदार यांनाच आहे.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत हिंदुस्थानांत ठग, पेंढारी या लोकांनीं देशांतील जनतेला सळो कीं पळो करून सोडलें होतें, व त्यांना ताळ्यावर

आणण्यासाठीं इंग्रजांनाही महासायास करावे लागले; ते ठग पेंढारीही गोसाव्यांसारखेच शेतकरी होते, व शेतकीधंदा बुडाला आणि पोटांतील आग विझण्याला कोणतेंच साधन मोकळें नाहीं म्हणून निरुपायानें ते ठग पेंढारी बनले होते. त्यांचा अधिक वृत्तांत पुढें ओघानें येईलच.

सुभेदार रघुनाथराव नेवाळकरांनीं गोसावी लोकांचें सैन्य पगारी पोसलें इतकेंच नाहीं, तर त्या लोकांनीं जी लूट मिळवावी तिचा अर्धा हिस्सा त्यांना मिळावयाचा असा स्पष्ट दंडक घालून दिला! सरंजामदार वर्गाच्या राज्य-विस्ताराच्या कल्पनेच्या मुळाशीं लोककल्याणाचा उदात्त हेतु कितपत असतो याचा हा एक मासला पाहण्यासारखा आहे. हें गोसाव्यांचें भाडोत्री सैन्य पदरीं ठेवून त्या जोरावर रघुनाथरावांनीं साऱ्या बुंदेलखंडांत आपला दरारा उत्पन्न केला हें मात्र खरें. बुंदेलखंडांतील इतर संस्थानिक तेव्हांपासून रघुनाथ-रावांना वचकून वागूं लागले व पेशव्यांच्या मुलुखांत उपद्रव करण्याला धजेनासे झाले. उलट त्यांच्यांत आपसांत कांहीं कलह अथवा बेबनाव उत्पन्न झाला तर त्यांनीं रघुनाथरावांना न्याय करण्याला विनवावें; व अशी सर्व बुंदेलखंडांत आबादीआबाद ठेवण्याबद्दल तेथले सर्व संस्थानिक रघुनाथ-रावांना सालीना सहा लाख रुपये खंडणी देत असत म्हणतात!

हें नेवाळकरांचें मूळ घराणें कोंकणांतील रत्नागिरी जिल्ह्यांत राजापूर तालुक्यातील एका खेडेगावांतलें. तेथून त्यांचे पूर्वज खानदेशांत येऊन राहिले. पेशवाईत ह्या घराण्यांतील पुरुषांच्या कर्तबगारीला चांगला वाव मिळाला; व रघुनाथरावांना झांशीची सुभेदारी वंशपरंपरेनें मिळाली तेव्हां ह्या नेवाळ-कर घराण्याचा भाग्यसूर्य मध्यान्हीं तळपूं लागला. हिंदुस्थानांतील वर्ण-भेदाच्या व जातिभेदाच्या 'हिंदु' भाषेंत बोलावयाचें तर नेवाळकर हे कऱ्हाडे ब्राह्मण अर्थात् पांढरपेशा अथवा बुद्धिजीवि मध्यम वर्गापैकीं एक होते.

रघुनाथरावांच्या मागाहून त्यांचे चिरंजीव शिवरामभाऊ हे झांशीचे सुभेदार झाले. या सुमाराला पेशवाई अंमलाची अवस्था दुसऱ्या राव-बाजीच्या दिवट्या कारभारामुळें अनेक दृष्टींनीं 'बडें घर पोकळ वासा' अशी झाली होती. त्यामुळें त्या मध्यवर्ती सत्तेच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन सारे सरंजामदार मध्यवर्ती सत्तेचें नियंत्रण धुडकावतां येईल तसें धुडकावून स्वतंत्र होण्याच्या उद्योगाला लागले होते. झांशीचे सुभेदार शिवरामभाऊ

नेवाळकर हेही त्याला अपवाद नव्हते. शिरस्ता असा कीं दरसाल सुभेदारानें आपल्या सुभ्याचा हिशेब ठराविक खंडणीसह पेशव्यांकडे पाठवावयाचा. पण पेशव्याच्या अंगीं कोणाचें आगळिकीबद्दल पारिपत्य करण्याची ताकद उरली नाहीं असें हेरून शिवरामभाऊंनीं हिशेबाच्या व खंडणीच्याही बाबतींत पेशव्यांच्या कपाळाला वाटाण्याच्या अक्षता लावण्याला सुरुवात केली.

पण जरा खोल विचार केला तर असें दिसून येतें कीं शिवरामभाऊंना कळून अथवा नकळून त्यांच्याकडून अशी बेपर्वाई घडविणारा 'बोलविता धनी' वेगळाच होता.

इ स. १६०० मध्यें इंग्रज ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाल्यापासून व तिचा हिंदुस्थानांत प्रवेश झाल्यापासून हा वेळ पावेतोंच्या दोन शतकांत इंग्रजांची भांडवलशाही सत्ता हिंदुस्थानांत चांगलीच स्थिरावली व बळावली होती. हिंदुस्थानांतील एकेका संस्थानाला आपल्या ताटाखालचें मांजर बनवून सोडण्याचा अर्थात् आपली सार्वभौम सत्ता कबूल करावयाला लावण्याचा सपाटा त्यांनीं चालविला होता. गव्हर्नर जन्रल लॉर्ड वेलस्ले यानें म्हैसूरचा टिपू सुलतान, दक्षिणेंतील निजाम, अयोध्येचा नबाब वगैरे हिंदी संस्थानांतील बड्या बड्या अवखळ संस्थानांच्या नाकांत वेसण घालून आपण दरवेशी व त्यांना अस्वलें बनवल्यावर त्याची दृष्टि ओघानेंच मराठ्यांकडे वळली. खरें पाहूं जातां मराठी सत्ताच दिल्लीच्या मोंगल बादशाहीची सत्ता संपुष्टांत येऊन नुसतें नांव शिल्लक राहिल्यावर इंग्रजी भांडवलशाहीला हिंदुस्थानांत हातपाय पसरतांना अडविणारी होती म्हणूनच त्या सर्पाच्या शेपटीवर पाय पडूं नये अशी सावधगिरी इंग्रजांकडून जरूर तोंवर व जरूर तशी बाळगली गेली. पण तो सर्प अगदीं गलितशक्ति झाला आहे, चलन वलन करण्याइतकेंही सामर्थ्य त्याच्या अंगीं उरलेलें नाहीं, रस्त्यानें जाणारीं येणारीं पोरेंही त्याला खडे मारून करमणूक करीत आहेत, असें जेव्हां वेल्स्लीनें पाहिलें, तेव्हां त्यानें आपल्या मनांत खूण गांठ मारली कीं मराठशाहींत मुसंडीखोरपणानें घुसून इंग्रजी सत्ता तेथें स्थापन करण्याला ही कशी अगदीं सोन्याची ... चालून आली आहे. त्याबरोबर त्यानें मराठशाहीच्या कक्षेंत मोडणाऱ्या ...रंजामदाराला एकएकटा गांठून इंग्रजी साम्राज्यसत्ता त्याला मान्य

आणण्यासाठीं इंग्रजांनाही महासायास करावे लागले; ते ठग पेंढारीही गोसाव्यांसारखेच शेतकरी होते, व शेतकीधंदा बुडाला आणि पोटांतील आग विझण्याला कोणतेंच साधन मोकळें नाहीं म्हणून निरुपायानें ते ठग पेंढारी बनले होते. त्यांचा अधिक वृत्तांत पुढें ओघानें येईलच.

सुभेदार रघुनाथराव नेवाळकरांनीं गोसावी लोकांचें सैन्य पगारी पोसलें इतकेंच नाहीं, तर त्या लोकांनीं जी लूट मिळवावी तिचा अर्धा हिस्सा त्यांना मिळावयाचा असा स्पष्ट दंडक घालून दिला ! सरंजामदार वर्गाच्या राज्य-विस्ताराच्या कल्पनेच्या मुळाशीं लोककल्याणाचा उदात्त हेतु कितपत असतो याचा हा एक मासला पाहण्यासारखा आहे. हें गोसाव्यांचें भाडोत्री सैन्य पदरीं ठेवून त्या जोरावर रघुनाथरावांनीं साऱ्या बुंदेलखंडांत आपला दरारा उत्पन्न केला हें मात्र खरें. बुंदेलखंडांतील इतर संस्थानिक तेव्हांपासून रघुनाथ-रावांना वचकून वागूं लागले व पेशव्यांच्या मुलुखांत उपद्रव करण्याला धजेनासे झाले. उलट त्यांच्यांत आपसांत कांहीं कलह अथवा बेबनाव उत्पन्न झाला तर त्यांनीं रघुनाथरावांना न्याय करण्याला विनवावें; व अशी सर्व बुंदेलखंडांत आबादीआबाद ठेवण्याबद्दल तेथले सर्व संस्थानिक रघुनाथ-रावांना सालीना सहा लाख रुपये खंडणी देत असत म्हणतात !

हें नेवाळकरांचें मूळ घराणें कोंकणांतील रत्नागिरी जिल्ह्यांत राजापूर तालुक्यातील एका खेडेगावातलें. तेथून त्यांचे पूर्वज खानदेशांत येऊन राहिले. पेशवाईत ह्या घराण्यांतील पुरुषांच्या कर्तबगारीला चांगला वाव मिळाला; व रघुनाथरावांना झांशीची सुभेदारी वंशपरंपरेनें मिळाली तेव्हां ह्या नेवाळ-कर घराण्याचा भाग्यसूर्य मध्यान्हीं तळपूं लागला. हिंदुस्थानांतील वर्ण-भेदाच्या व जातिभेदाच्या 'हिंदु' भाषेंत बोलावयाचें तर नेवाळकर हे कऱ्हाडे ब्राह्मण अर्थात् पांढरपेशा अथवा बुद्धिजीवि मध्यम वर्गांपैकीं एक होते.

रघुनाथरावांच्या मागाहून त्यांचे चिरंजीव शिवरामभाऊ हे झांशीचे सुभेदार झाले. या सुमाराला पेशवाई अंमलाची अवस्था दुसऱ्या राव-बाजीच्या दिवट्या कारभारामुळें अनेक दृष्टींनीं 'बडें घर पोकळ वांसा' अशी झाली होती. त्यामुळें त्या मध्यवर्ती सत्तेच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन सारे सरंजामदार मध्यवर्ती सत्तेचें नियंत्रण धुडकावतां येईल तसें धुडकावून स्वतंत्र होण्याच्या उद्योगाला लागले होते. झांशीचे सुभेदार शिवरामभाऊ

सं ता.

नेवाळकर हेही त्याला अपवाद नव्हते. शिरस्ता असा कीं दरसाल सुभेदारानें आपल्या सुभ्याचा हिशेब ठराविक खंडणीसह पेशव्यांकडे पाठवावयाचा. पण पेशव्याच्या अंगीं कोणाचें आगळिकीबद्दल पारिपत्य करण्याची ताकद उरली नाहीं असें हेरून शिवरामभाऊंनीं हिशेबाच्या व खंडणीच्याही बाबतींत पेशव्यांच्या कपाळाला वाटाण्याच्या अक्षता लावण्याला सुरुवात केली.

पण जरा खोल विचार केला तर असें दिसून येतें कीं शिवरामभाऊंना कळून अथवा नकळून त्यांच्याकडून अशी बेपर्वाई घडविणारा 'बोलविता धनी' वेगळाच होता.

इ स. १६०० मध्यें इंग्रज ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाल्यापासून व तिचा हिंदुस्थानांत प्रवेश झाल्यापासून हा वेळ पावेतोंच्या दोन शतकांत इंग्रजांची भांडवलशाही सत्ता हिंदुस्थानांत चांगलीच स्थिरावली व बळावली होती. हिंदुस्थानांतील एकेका संस्थानाला आपल्या ताटाखालचें मांजर बनवून सोडण्याचा अर्थात् आपली सार्वभौम सत्ता कबूल करावयाला लावण्याचा सपाटा त्यांनीं चालविला होता. गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ले यानें म्हैसूरचा टिपू सुलतान, दक्षिणेंतील निजाम, अयोध्येचा नबाब वगैरे हिंदी संस्थानांतील बड्या बड्या अवखळ संस्थानांच्या नाकांत वेसण घालून आपण दरवेशी व त्यांना अस्वलें बनवल्यावर त्याची दृष्टि ओघानेंच मराठ्यांकडे वळली. खरें पाहूं जातां मराठी सत्ताच दिल्लीच्या मोंगल बादशाहीची सत्ता संपुष्टांत येऊन नुसतें नांव शिल्लक राहिल्यावर इंग्रजी भांडवलशाहीला हिंदुस्थानांत हातपाय पसरतांना अडविणारी होती म्हणूनच त्या सर्पाच्या शेपटीवर पाय पडूं नये अशी सावधगिरी इंग्रजांकडून जरूर तोंवर व जरूर तशी बाळगली गेली. पण तो सर्प अगदीं गलितशक्ति झाला आहे, चलन वलन करण्याइतकेंही सामर्थ्य त्याच्या अंगीं उरलेलें नाहीं, रस्त्यानें जाणारीं येणारीं पोरेंही त्याला खडे मारून करमणूक करीत आहेत, असें जेव्हां वेल्स्लीनें पाहिलें, तेव्हां त्यानें आपल्या मनांत खूण गांठ मारली कीं मराठशाहींत मुसंडीखोरपणानें घुसून इंग्रजी सत्ता तेथें स्थापन करण्याला ही कशी अगदीं सोन्याची सुभेदारी चालून आली आहे. त्याबरोबर त्यानें मराठशाहीच्या कक्षेंत मोडणाऱ्या सरंजामदाराला एकएकटा गांठून इंग्रजी साम्राज्यसत्ता त्याला मान्य अन्वयें

करावयाला लावावयाची असा संकल्प केला. परिस्थितिही इंग्रजांना अनुकूल अशीच उत्पन्न झाली. पेशवाईंत कर्तबगार असा कोणीही जबाबदार पुरुष तेव्हां शिल्लक उरला नव्हता. महादजी शिंदे व तुकोजीराव होळकर हे खरें पाहतां पेशवाईचे डावे उजवे हात. पण पेशव्यांच्या स्वार्थीपणामुळें ते दोन्ही हात तुटून गेले होते; ते दोघेही कर्तबगार वीर मृत्युमुखीं पडले होते. नाना फडनविसांच्या बुद्धिचातुर्यावर आजवर थोरले नानासाहेब पेशवे यांच्या निधनानंतर पेशवाईचा कारभार जोमांत बरा चालला, ते नानाही हा लोक सोडून निघून गेले होते. राहतां राहिला खुद्द पेशवा रावबाजी ! तो दिवटा ! हिडीस विलासविहार, नाच रंग तमासे, ब्राह्मणभोजनें, असल्या नादानपणाच्या गोष्टी करण्यापुढें त्याला पेशवाईच्या बऱ्यावाइटाकडे लक्ष्य द्यावयाला फुरसत होती कोठें? आणि असल्या पेशव्याची—असल्या नादान धन्याची सत्ता तरी कोण जुमानतो? तुकोजीराव होळकरांच्या पश्चात् त्यांचा मुलगा यशवंतराव होळकर हा पेशव्यांशीं कांहीं बेबनावामुळें उघड उघड वैर मांडून लढण्यासाठीं थेट पुण्यावर चाल करून आला. तेव्हां ह्या दिवट्या पेशव्यानें त्याच्याशीं लढाई करून त्याला नरम आणण्याचा प्रयत्नही केला नाहीं; त्याच्याशीं मिळतें घेऊन सख्य जोडून एकजुटीची फळी मराठ-मंडळांत उभारण्याचाही प्रयत्न केला नाहीं; अथवा शरण जावयाचेंच तर इंग्रजांसारख्या परक्या शत्रूंना शरण जाण्यापेक्षां पिढ्यान् पिढ्या स्वराज्या-साठीं खांद्याला खांदा भिडवून लढणाऱ्या आपल्या मंडळींतलाच होळकर, त्याला शरण जाऊन जीव बचावला तर निदान स्वराज्याचा कांहीं तरणोपाय निघेल, इतका विवेक—इतकी माणूसकीही पेशव्याला तेव्हां सुचली नाहीं. होळकरांबरोबर आपला निभाव कोणत्याही प्रकारें लागणार नाहीं असें पाहून, लढण्याचे व त्यासाठीं आपल्या मंडळीचें साह्य मिळविण्याचे श्रम न घेतां त्यानें इंग्रजांना फितूर होऊन त्यांच्याकडे पळून जाण्याचे श्रम घेतले!

पेशवा रावबाजी ही व्यक्ति या नात्यानें एथें त्याच्या गुणावगुणांशीं फारसें कर्तव्य नाहीं. जगांत अनेक मनुष्यें आहेत व अनेक मनुष्यप्राणि आहेत. रावबाजी हा त्यांतला एक प्राणि होता. जगाच्या जीवनकलहांत एकाच व्यक्तीला असें अपार महत्त्व खरोखर नसतें. म्हणूनच रावबाजी [illegible]ून एक पेशवा, हा तेव्हांच्या मराठी साम्राज्याचा सत्ताधारी, राज्यकर्[illegible] [illegible]मभाऊ

नात्यानें त्याच्याकडे पाहावयाचें नाहीं. तथापि तेव्हांच्या संकटग्रस्त सरंजामदार वर्गापैकीं एक सरंजामदार या नात्यानें शितावरून भाताची परीक्षा करण्याला भातांतल्या कोणत्याही शिताप्रमाणें या सरंजामदाराला जर आपण चांचपून पाहूं लागलों तर काय दिसतें? भात कच्चा असून करपला आहे, तो अधिक शिजूनही उपयोगाचा नाहीं अथवा कच्चा खाऊनही उपयोगाचा नाहीं, तो टाकून देण्याच्या लायकीचा आहे असाच निष्कर्ष निघतो. स्वतःची राजसत्ता स्थापन करण्यासाठीं पैशाच्या म्हणजे श्रमांच्या व प्रत्यक्ष जीवनाच्या रूपानें रणांगणावर जनतेचा बळी घेणारे व हें सारें आम्ही आमच्या देशासाठीं करीत आहों असें भासविणारे हे राजेमहाराजे, हे सरंजामदार आपल्या हीन वय्यक्तिक स्वार्थासाठींच सदा धडपडत असतात असेंच नव्हे, तर त्या स्वार्थाला जरा धक्का लागतो असें दिसतांच आपण त्या वेळेपावेतों ज्यांना शत्रु मानलें त्यांच्याशीं संगनमत करावयाला—फितूर व्हावयालाही कमी करीत नाहींत! सरंजामदारवर्गाची समाजजीवनाच्या दृष्टीनेंही तेव्हां उपयुक्तता नष्ट झाली होती, व दंडेलीच्या जोरावर अरेराव म्हणून जगण्यालाही तो वर्ग वर्ग असमर्थ झाला होता, भांडवलशाहीसमोर मान नमविण्याखेरीज त्याला गत्यंतर उरलें नव्हतें, सरंजामशाहीऐवजीं भांडवलशाही प्रभावी होण्याचाच तो क्रमप्राप्त काळ आला होता, याचें रावबाजी हें ठळक उदाहरण होय.

आंधळयानें एक डोळा मागावा व त्याला दोन डोळे लाभावे, त्यांतलीच ही संधी लॉर्ड वेलस्लीच्या पायापाशीं चालून आली. शिवरामभाऊंनीं इंग्रजांपाशीं मैत्रीच्या तहाची याचना केली, ती वेलस्लीनें उदार मनानें मान्य केली. माणसाळलेला एक हत्ती रानटी हत्तींच्या कळपांत सोडल्यावर बाकीच्या हत्तींना पकडणें जसें पारध्याला सोपें जातें, तसाच शिवरामभाऊंच्या मैत्रीचा फायदा इंग्रजांना घेतां आला. अथवा असेंही म्हणतां येईल कीं बुंदेलखंडांत सत्ताधारीपणानें शिरण्याचा मार्ग जो इंग्रजांना तेथील संस्थानिकांच्या स्वार्थी एकजुटीमुळें कां होईना पण बंद झाला होता, त्या दरवाजाच्या कुलुपाची हरवलेली किल्ली इंग्रजांना शिवरामभाऊंशीं तह करतांच सांपडली. ता. १८ नोव्हेंबर १८०३ मध्यें इंग्रज सरकार व झांशीचे सुभेदार शिवरामभाऊ यांच्यांत ‘ वजीब उल् अर्ज ’ नांवाच्या खलित्याअन्वयें एकी झाली.

लगेच पुढील सालीं ता० ६ फेब्रुआरी इ. स. १८०४ मध्यें कॅ. बेलिस यानें इंग्रजांच्या वतीनें गव्हर्नर जनरलचे आज्ञेवरून शिवरामभाऊंशीं कँप कठारा एथें मैत्रीचा तह केला. (१) परस्परांनीं परस्परांना संकटाचे वेळीं मदत करावी. (२) शिवरामभाऊंनीं इंग्रजांच्या संमतीखेरीज युरोपांतील कोण-त्याही राष्ट्रांतील माणसाला, व हिंदुस्थानांतील कोणत्याही जातीच्या माणसा-लाही आपल्या पदरीं नोकरीला ठेवूं नये. (३) पेशवे सरकारला नेहमींप्रमाणें खंडणी द्यावी हीं त्या तहाचीं मुख्य कलमें होतीं. यावरून हें उघड दिसतें कीं इंग्रजांनीं या तहाअन्वयें झांशीच्या या पराक्रमी व अवखळ सुभेदाराला त्याच्या गळ्यांत वरच्यासारख्या तहनाम्याच्या अटींची सोनेरी पट्टासांखळी अडकवून इंग्रजी राजसत्तेच्या दारांतील एक ठाणबंदी प्राणी बनवून सोडलें ! आणि शिवरामभाऊंनींही या तहनाम्याअन्वयें त्यांच्या वांट्याला आलेलें क्रमप्राप्त कर्तव्य इमानें इतबारें बजावून आपले धनी इंग्रज यांची शाबासकी मिळविली !

वरील तहांतील मख्खी वरवर विचार करणाराच्याही सहज ध्यानीं-येण्यासारखी आहे. पेशव्याला पुढें इंग्रज ' सांगितलेल्या कामाचा व घात लेल्या अन्नाचा ' जो हुकमी हस्तक बनविणार होते, त्याची ही अशी पूर्व-तयारी चालली होती. वार्षिक खंडणी पेशव्यांना द्यावयाची अशी सल्ला शिवरामभाऊला इंग्रजांनीं दिली याचें कारण ' भवानी आमुची देवी, शिवाजी आमुचा राणा ' या हिरीरीनें मराठशाही–पेशवाई टिकावी असें म्हणणारे जे कोणी भावनाप्रधान लोक असतील त्यांना चिथावून जागे करण्याची बुद्धि पेशवाईकारभाऱ्यांना सुचूं नये; पैसा हातीं यावा व ऐषआराम चालावा. यापेक्षां पेशव्यांना अथवा त्यांच्या हस्तकांना तरी तेव्हां आणखी कांहींच नको होतें. आपले सुभेदार तिकडे काय करतात, ते गुंड गोसाव्यांचें भाडोत्री सैन्य ठेवून रयतेला लुटण्याचा धंदा त्या भाडोत्री सैन्याशीं पातीनें करतात, कीं शेतकऱ्यांना पिळून कर वसूल करतात कीं आणखी कांहीं करतात, इकडे पेशव्यांना ढुंकून देखील पाहण्याची आवश्य-कता वाटत नव्हती. त्या सरदार सुभेदारांनीं काय वाटेल तें करावें, मात्र निदान सालोसालची पूर्वीपासूनची खंडणी तरी पुण्याला पावती करावी म्हणजे झालें !

पण त्याच तहानें पेशवे हे झांशीच्या सुभेदाराचे खंडणी घेण्यापुरते नुसते नांवाचे धनी उरले. त्यांचे प्रत्यक्षपणें नाहीं तरी अप्रत्यक्षपणें इंग्रजच धनी झाले. परस्परांनीं परस्परांना मदत करावी याचा अर्थच तो. या सुभेदार शिवरामभाऊंच्या मैत्रीबद्दल इंग्रजांकडून त्यांचें अगदीं मनमोकळेपणानें अभिनंदन करण्यांत आलें व त्यांची इंग्रजी जगांत सर्वत्र वाहवा सुरू झाली. स्वधर्मप्रसारासाठीं धडपडणारे चळवळे उच्चवर्णांतील एखादा मासा त्यांच्या गळाला लागला कीं त्याचा सभा–मिरवणुकी वगैरे मार्गांनीं उदो उदो करतात, त्यांतलाच हा प्रकार म्हणावयाचा! फरक एवढाच कीं स्वधर्मांतून परधर्मांत जाणाऱ्या असल्या माणसाबद्दल स्वधर्मधुंद लोक हळहळतात, तडफडतात, चडफडतात तरी! पण शिवरामभाऊ इंग्रजांना सामील झाल्याबद्दल त्यांचे इतर बुंदेलखंडी सरंजामदार भाई त्यांच्यावर रुष्ट झाले नाहींत. उलट ते बहुतेक सारे रानटी हत्ती झांशीच्या ह्या एका माणसाळलेल्या हत्तीच्या वासानें त्याच्या मागोमाग भराभर येऊन इंग्रजांच्या अंगणांतील ठाणबंदी प्राणी बनून बसण्यांत भूषण मानूं लागले! एका शिवरामभाऊंमागोमाग भराभर बुंदेलखंडांतील संस्थानिकांनीं त्यांच्यासारखीच इंग्रजांची मांडलिकगिरी पत्करली. मोठमोठ्या लढाया करून इंग्रजांना बुंदेलखंड घशांत टाकण्याची जी गोष्ट करतां आली नसती, ती एका शिवरामभाऊंना वश केल्यामुळें करतां आली. मुसलमानी धर्माच्या कोणा एका कडव्या प्रचारकानें आपल्या अनुयायांना असें सांगितल्याचें ऐकिवांत आहे कीं परधर्मांतील एका पुरुषापेक्षां एका स्त्रीला आपल्या धर्मांत ओढून आणणें अधिक महत्त्वाचें व उपयुक्त! कारण परधर्मांतील एकटा पुरुष स्व-धर्मांत आला तर स्वधर्मीयांची संख्या अवघ्या एकानें वाढते. पण परधर्मांतील एक स्त्री स्वधर्मांत आली कीं तिचीं लहानगीं मुलेंबाळेंही पुष्कळदां तिच्याबरोबरच येतात, व शिवाय ती मग अनेक स्वधर्मी बालकांना जन्म देऊं शकते. शिवरामभाऊंना वश करून इंग्रजधार्जिणे बनवून सोडण्यांत इंग्रजांनीं अशीच दूरदृष्टि राखली यांत संशय नाहीं.

पेशव्यांच्या सरदार सुभेदारांना पेशव्यांच्या आज्ञाधारकपणाची गरज नाहींशी झाली, म्हणजे पेशवे साहजिकपणेंच त्या प्रमाणांत दुबळे झाले. अशा प्रकारें दुबळी बनलेली पेशवाई सत्ता नामशेष करणें मग अगदीं सोपें

जावें या धोरणानेंच ही सारी तयारी इंग्रजांनीं चालविली होती. राघूला पिंजऱ्यांत कोंडावयाचा असला म्हणजे त्यानें उडून जाऊं नये म्हणून पुष्कळदां त्याचे पंख कापतात; तसे इंग्रजांनीं पेशवाईचे हे पंख कापले. किंबहुना पेशवाईचा न चाले न हाले न बोले असा गोळा इंग्रजांनीं पूर्व वर्षींच ता. ३१ डिसेंबर १८०२ रोजीं केला होता. ता. ३१ डिसेंबर सन १८०२ रोजीं इंग्रज व पेशवे यांच्यांत वसई एथें झालेल्या तहाअन्वयें पेशवा इंग्रजांच्या ताटाखालचें मांजर अथवा त्यांच्या पिंजऱ्यांतला राघू बनून गेला होता यशवंतराव होळकरानें आपल्या भावाच्या वधाचा सूड उगवण्यासाठीं पुण्यावर स्वारी केली तेव्हां ही स्वारी त्याच्याशीं आपला निभाव लागत नाहीं असें पाहून जी धूम ठोकून पळाली ती थेट वसईला इंग्रजांच्या आश्रयाला गेली; आणि ' कांहींही करा; काय वाटेल तें घ्या; पण मला पेशवा करा ' अशा आग्रहानें इंग्रजांचे पाय धरून बसली! तेव्हां इंग्रज व पेशवाईचा हा नादान प्रतिनिधि यांच्यांत जो तह झाला, त्या तहाअन्वयें सहा हजार तैनाती फौजेचें लोढणें पेशव्याच्या गळ्यांत बांधलें गेलें. त्या फौजेच्या खर्चाबद्दल सालीना सव्वीस लाख रुपये उत्पन्नाचा मुलुख पेशव्यानें इंग्रजांना तोडून दिला. याच्या मोबदल्यांत पेशव्याला इंग्रजांनीं पुन्हा आणून त्याचा गुळाचा गणपति पेशवाईच्या गादीवर बसवावयाचा होता. त्याप्रमाणें इंग्रजांनीं पेशव्याला पेशवा केलाही! ती गोष्ट बाकीच्या मराठमंडळांत रुचली नाहीं; व ते कुरबुरूं लागले. शिंद्यानें तर भारे स्वामिभक्तीनें प्रेरीत होऊन जणू काय पेशवे व इंग्रज यांचा तह झालाच नाहीं अशी समजूत करून घेऊन पेशव्याची इंग्रजांच्या ताबेदारींतून मुक्तता करण्यासाठीं सैन्यही जमविलें. होळकरही पेशवा पुण्यांतून आपणाशीं सामना देण्याला भितो, तो शहरांत खणाखणी चालली असतां सिंहगडावर जाऊन तेथून दुर्बिणीनें जणू काय तमाशा पाहत बसतो, आपणाला शरण येण्याचा अथवा आपणाशीं मिळतें घेण्याचाही शहाणपणा न दाखवितां वसईला परक्या इंग्रजांच्या आश्रयाला पळ काढूं लागतो, असें पाहून माघारें बोलावलें. होळकर शत्रु खरा; शिंदे बांकून वागणारा खरा; पण त्यालाही वाटलें कीं, आपण सर्व मराठशाही सरंजामदार ज्या मराठी स्वराज्यरूपी मातेचें दूध पिऊन लहानाचे मोठे झालों व एवढे पोसलों, त्याच मातेच्या रक्तामांसावर तहानभूक भाग-

जावें या धोरणानेंच ही सारी तयारी इंग्रजांनीं चालविली होती. राघूला पिंजऱ्यांत कोंडावयाचा असला म्हणजे त्यानें उडून जाऊं नये म्हणून पुष्कळदां त्याचे पंख कापतात; तसे इंग्रजांनीं पेशवाईचे हे पंख कापले. किंबहुना पेशवाईचा न चाले न हाले न बोले असा गोळा इंग्रजांनीं पूर्व वर्षींच ता. ३१ डिसेंबर १८०२ रोजीं केला होता. ता. ३१ डिसेंबर सन १८०२ रोजीं इंग्रज व पेशवे यांच्यांत वसई एथें झालेल्या तहाअन्वयें पेशवा इंग्रजांच्या ताटाखालचें मांजर अथवा त्यांच्या पिंजऱ्यांतला राघू बनून गेला होता यशवंतराव होळकरानें आपल्या भावाच्या वधाचा सूड उगवण्या-साठीं पुण्यावर स्वारी केली तेव्हां ही स्वारी त्याच्याशीं आपला निभाव लागत नाहीं असें पाहून जी धूम ठोकून पळाली ती थेट वसईला इंग्रजांच्या आश्रयाला गेली; आणि ‘ कांहींही करा; काय वाटेल तें घ्या; पण मला पेशवा करा ’ अशा आग्रहानें इंग्रजांचे पाय धरून बसली! तेव्हां इंग्रज व पेशवाईचा हा नादान प्रतिनिधि यांच्यांत जो तह झाला, त्या तहाअन्वयें सहा हजार तैनाती फौजेचें लोढणें पेशव्याच्या गळयांत बांधलें गेलें. त्या फौजेच्या खर्चाबद्दल सालीना सव्वीस लाख रुपये उत्पन्नाचा मुलुख पेशव्यानें इंग्रजांना तोडून दिला. याच्या मोबदल्यांत पेशव्याला इंग्रजांनीं पुन्हा आणून त्याचा गुळाचा गणपति पेशवाईच्या गादीवर बसवावयाचा होता. त्या-प्रमाणें इंग्रजांनीं पेशव्याला पेशवा केलाही! ती गोष्ट बाकीच्या मराठमंडळांत रुचली नाहीं; व ते कुरबुरूं लागले. शिंद्यानें तर मारे स्वामिभक्तीनें प्रेरीत होऊन जणू काय पेशवे व इंग्रज यांचा तह झालाच नाहीं अशी समजूत करून घेऊन पेशव्याची इंग्रजांच्या ताबेदारींतून मुक्तता करण्यासाठीं सैन्यही जमविलें. होळकरही पेशवा पुण्यांतून आपणाशीं सामना देण्याला भितो, तो शहरांत खणाखणी चालली असतां सिंहगडावर जाऊन तेथून दुर्बिणीनें जणू काय तमाशा पाहत बसतो, आपणाला शरण येण्याचा अथवा आप-णाशीं मिळतें घेण्याचाही शहाणपणा न दाखवितां वसईला परक्या इंग्रजांच्या आश्रयाला पळ काढूं लागतो, असें पाहून माघारें बोलावलें. होळकर शत्रु खरा; शिंदे बांकून वागणारा खरा; पण त्यालाही वाटलें कीं, आपण सर्व मराठशाही सरंजामदार ज्या मराठी स्वराज्यरूपी मातेचें दूध पिऊन लहानाचे मोठे झालों व एवढे पोसलों, त्याच मातेच्या रक्तामांसावर तहानभूक भाग-

विण्याची अपेक्षा करणें हें अगदीं माणुसकीचें लक्षण नव्हे. होळकर काय अथवा शिंदे काय, त्यांना स्वराज्य टिकावयाला हवें होतें तें तरी पेशव्यावर त्यांची अढळ निष्ठा होती म्हणून नव्हे. पेशव्यासारख्या बुळयाबावळ्या धन्याला पुढें करून आपली दौलत आबादीआबाद राखणें त्यांना सोपें गेलें असतें, व इंग्रजांची सत्ता वाढल्यानें त्या सत्तेच्या जात्यांत पेशव्यांबरोबर आपणही पूर्णपणें भरडले जाऊं हें ते ओळखून होते. त्या मरणाला भिऊन शिंदे काय, होळकर काय, अिंग्रजी सत्तेचें संकट टाळूं पाहत होते. न्यायानें अथवा अन्यायानें लोकांच्या खुषीनें अथवा स्वतःच्या दंडेलीनें आपली सत्ता टिकविण्याची धमक अजून त्यांच्या अंगीं होती, म्हणून ते तसे धडपडत होते. पण रावबाजीच्या अंगीं तेवढीही धमक नसल्यानें तो जो पळाला तो थेट वसअीला अिंग्रजांच्या चरणांशीं जाऊन मिळाला. थोड्याशा अवधीनें इ. स. १८१७ मध्यें पेशव्यांच्या वतीनें मोरो दीक्षित व बाळाजी लक्ष्मण या दोघांनीं बेटावर एल्फिन्स्टनसाहेबांच्या बंगल्यांत जो तह केला, त्या तहांतील एका कलमाअन्वयें अिंग्रज हे मोठ्या सफाअीनें पेशवाअी सत्तेचे वारस झाले, व त्या वारसा हक्कानें झांशी व बुंदेलखंडांतील अितर सर्व संस्थानिकांवर साम्राज्यसत्ता गाजविण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झाला. आणि ह्या वारसदारी हक्काची सबब सांगून हिंदी संस्थानिकांना गिळंकृत करण्यांत अिंग्रजांनीं कधीं कसूरही केली नाहीं. दिल्लीच्या दुबळ्या शहाआलम बादशहाकडून दिवाणीची सनद मिळविल्यावर त्यांनीं त्या सनदेचाही असाच सर्रास उपयोग केला. तैनाती फौजेचें मुरून प्रभावी होणारें पण अति जालीम विष अिंग्रजांनीं जे प्रत्येक हिंदी सरंजामदाराच्या अंगांत टोंचण्यांत कमालीची तत्परता दाखविली, ती अिंग्रजी साम्राज्याच्या विस्ताराचा भव्य नकाशा अगोदर नीट आंखूनच दाखविली.

असो. पुन्हा झांशीकडे वळावयाचें तर, शिवरामभाऊंनीं अिंग्रजांना वश होऊन व बुंदेलखंडांत अिंग्रजी सत्तेचीं पाळेंमुळें खोल कशीं रुजवतां येतील याची प्रभावी जडीबुट्टी आपल्या गद्दीच्या योगानें अिंग्रजांना दाखवून देऊन आपली मानमान्यता अिंग्रजांपाशीं वाढविली, त्यांच्याकडून अभिनंदन करून घेतलें, व आपलें झांशी संस्थान शाबूत राखलें. वठलेल्या वृक्षावर फुलांफळांचा बहर येअीनासा झाला कीं पक्षी तो वृक्ष सोडून दुसऱ्या वृक्षाकडे

धाव घेतात. शिवरामभाऊंनीं देखील पेशवाईचा वठलेला वृक्ष सोडून अिंग्रजी सत्तेच्या बहरणाऱ्या वृक्षाकडे धाव घेतली. हें त्यांचें कृत्य बरोबर होतें कीं चूक होतें हा प्रश्न अजिबात निराळा.

शिवरामभाऊंनीं एकंदर अठरा वर्षें राज्याचा उपभोग घेतला. पुढें त्यांना मांदगी नांवाचा रोग झाला. त्या रोगांतून जगण्याची आशा खुंटतांच त्यांनीं संस्थानच्या कारभाराचीं सर्व सूत्रें रामचंद्रराव आपला नातू याच्या स्वाधीन केलीं; व आपण काशीला जाऊन तेथें हरिहरि म्हणत देह ठेवला.

शिवरामभाऊंना एकंदर पांच अपत्यें होतीं. कृष्णराव, रघुनाथराव, व गंगाधरराव हे तीन पुत्र व दोन कन्या. पैकीं कृष्णराव हे शिवरामभाऊंच्या निधनाच्या अगोदरच इं. स. १८११ मध्यें हा लोक सोडून गेले होते. त्यामुळेंच शिवरामभाऊंच्या पश्चात् त्यांच्याकडे सुभेदारी आली. पण रामचंद्रराव हे फार अल्पवयी होते. त्यामुळें संस्थानचा कारभार त्यांच्या नांवानें त्यांची आजी सखूबाओ हिच्याकडे आला. सखूबाओनें संस्थानचा जुना दिवाण राव गोपाळरावभाऊ याच्या साह्यानें कारभार चालविला.

झांशीच्या कारभाराचें असें पोरांडें झालें असतांना तिकडे पेशवाओंत रावबाजी पेशव्याच्या बेजबाबदार व अंदाधुंदीच्या कारभाराचा कळस झाला, व त्याला अिंग्रजांच्या पायांपाशीं जाऊन इ. स. १८१७ रोजीं पूर्वी सांगितलेला तह करावा लागला. झांशी संस्थानावरील पेशव्यांचें स्वामित्व त्या तहाअन्वयें दूर झालें; व त्या ऐवजीं अिंग्रजांचें सनदशीर स्वामित्व सुरू झालें.

पेशवे व अिंग्रज यांच्या बाबतींत लक्ष्यांत घेण्यासारखी विस्मयकारक गोष्ट ही कीं, वसओ एथील तहांत अिंग्रजांनीं त्या तहांतील अटी म्हणजे पर्यायानें पेशवाओ राजसत्ता ‘ यावश्चंद्रदिवाकरौ ’ ( Whill sun and moon endureth ) टिकविण्याचें वचन दिलें होतें. पण मुळांतच जिथें प्रामाणिकपणाच्या सूर्यचंद्रांचा अिंग्रजी कारभारांत अभाव होता, आणि स्वार्थी डावपेंचांच्या निबिड अंधारांत त्यांनीं समजून उमजून मराठी स्वराज्यावर हा घाला घातला, तिथें असल्या पोकळ वचनांची ते कसली पर्वा बाळगतात !

पेशवे व अिंग्रज यांच्यांतला हा पेशवाओच्या थडग्यावरील मृत्युलेखवजा तह ता. १३ जून अि. स. १८१७ मध्यें झाला; आणि लगेच ता. १७ नोव्हेंबर अि. स. १८१७ मध्यें म्हणजे अवघ्या पांच महिन्यांच्या अवधींत झाशी-

च्या बाबतींत नवीन तह करण्याविषयीं झांशीच्या सुभेदारांच्या मागें अिंग्रजांचें टुमणें लागलें. त्यावेळीं नाहीं म्हणून झांशीवाल्यांचा थोडाच निभाव लागणार होता! अखेर झांशीकरांच्या वतीनें दिवाण गोपाळरावभाऊ व इंग्रजांच्या वतीनें पोलिटिकल सुपरिंटेंडेंट जॉन व्हाउचप यांच्यामध्यें पिप्री एथें इंग्रजी छावणींत नवा तह झाला. या तहाअन्वयें इंग्रजांनीं झांशीचें राज्य सुभेदार नेवाळकरांच्या वंशाकडे वंशपरंपरेनें चालविण्याची कबुली अिंग्रजांकडून मिळाली. त्याच्या मोबदल्यांत झांशीच्या सुभेदारांनीं इंग्रज सरकारशीं इमानें इतबारें वागावयाचें होतें, व प्रसंगीं इंग्रज सरकाराला साह्य करावयाचें होतें! शिवाजीनें स्थापन केलेलें मराठी स्वराज्य व त्या स्वराज्याच्या सोईसाठीं प्रधान म्हणून नोकर शिवाजीनंतरच्या शाहू छत्रपतीनें नेमलेले पेशवे, त्या नोकरांचेच शाहूच्या पश्चात् मराठशाहीचे सर्वाधिकारी वहिवाटदार झाले. त्या पेशव्यांनीं झांशीचा सुभा निर्माण केला, ते सुभेदार पेशव्यांना काय वाटेल याची चिंता न करतां हजारों कोशांवरून हिंदुस्थानांत संपत्तीची पद्धतशीर लूट करण्याच्या हेतूनें आलेल्या इंग्रजांच्या ताटाखालचें मांजर होऊन बसले. तीच गत शिंदे-होळकरांची व तीच गत पेशवाईत उदयाला आलेल्या आणखी अनेक संस्थानांची!

रामचंद्रराव हे गादीवर आले तेव्हां अजाण होते. त्यांची आई व दिवाण मिळून राज्याचा कारभार चालवीत असत. त्यांनीं अजाणपणानें अथवा ऐहिक लोभांना बळी पडून इंग्रजांची मांडलिकी पत्करली असणें शक्य आहे. स्वाभिमान, स्वातंत्र्याची आवड, पारतंत्र्याची मनस्वी चीड, वगैरे गुण त्यांच्या अंगीं नसतील. मातेचें अपत्यप्रेम पुष्कळदां आंधळें असतें. आणि कष्ट करून पोट भरण्याची संवय ज्यांना नाहीं, त्यांना आयतोबाप्रमाणें शाल्योदन चापावयाला मिळालें तर हवें असतें. रामचंद्ररावांसारखे सरंजामदार जर सरंजामभ्रष्ट झाले, तर त्यांची खरोखरच समाजांत नादानांतले नादान, दुबळ्यांतले दुबळे, व निरुपयोग्यांतले निरुपयोगी अशा बेकारांची भर पडावयाची! कारण त्यांना उद्योगधंदा माहीत नसावयाचा, कष्ट करण्याची संवय नसावयाची, धकाधकीच्या जीवनांत त्यांचा वाली मग कोणीच नाहीं! इतकी जरी नाहीं, तरी ‘राज्य बुडालें तर आपल्या बाळाचें पुढें कसें होईल’ इतकी तरी काळजी रामचंद्ररावांची आई सखूबाई हिला तेव्हां

धाव घेतात. शिवरामभाऊंनीं देखील पेशवाईचा वठलेला वृक्ष सोडून अिंग्रजी सत्तेच्या बहरणाऱ्या वृक्षाकडे धाव घेतली. हें त्यांचें कृत्य बरोबर होतें कीं चूक होतें हा प्रश्न अजिबात निराळा.

शिवरामभाऊंनीं एकंदर अठरा वर्षें राज्याचा उपभोग घेतला. पुढें त्यांना मांदगी नांवाचा रोग झाला. त्या रोगांतून जगण्याची आशा खुंटतांच त्यांनीं संस्थानच्या कारभाराचीं सर्व सूत्रें रामचंद्रराव आपला नातू याच्या स्वाधीन केलीं; व आपण काशीला जाऊन तेथें हरिहरि म्हणत देह ठेवला.

शिवरामभाऊंना एकंदर पांच अपत्यें होतीं. कृष्णराव, रघुनाथराव, व गंगाधरराव हे तीन पुत्र व दोन कन्या. पैकीं कृष्णराव हे शिवरामभाऊंच्या निधनाच्या अगोदरच इं. स. १८११ मध्यें हा लोक सोडून गेले होते. त्यामुळेंच शिवरामभाऊंच्या पश्चात् त्यांच्याकडे सुभेदारी आली. पण रामचंद्रराव हे फार अल्पवयी होते. त्यामुळें संस्थानचा कारभार त्यांच्या नांवानें त्यांची आजी सखूबाअी हिच्याकडे आला. सखूबाअीनें संस्थानचा जुना दिवाण राव गोपाळरावभाऊ याच्या साह्यानें कारभार चालविला.

झांशीच्या कारभाराचें असें पोरांडें झालें असतांना तिकडे पेशवाअींत रावबाजी पेशव्याच्या बेजबाबदार व अंदाधुंदीच्या कारभाराचा कळस झाला, व त्याला अिंग्रजांच्या पायांपाशीं जाऊन इ. स. १८१७ रोजीं पूर्वी सांगितलेला तह करावा लागला. झांशी संस्थानावरील पेशव्यांचें स्वामित्व त्या तहाअन्वयें दूर झालें; व त्या ऐवजीं अिंग्रजांचें सनदशीर स्वामित्व सुरू झालें.

पेशवे व अिंग्रज यांच्या बाबतींत लक्ष्यांत घेण्यासारखी विस्मयकारक गोष्ट ही कीं, वसअी एथील तहांत अिंग्रजांनीं त्या तहांतील अटी म्हणजे पर्यायानें पेशवाअी राजसत्ता ' यावश्चंद्रदिवाकरौ ' ( Whill sun and moon endureth ) टिकविण्याचें वचन दिलें होतें. पण मुळांतच जिथें प्रामाणिकपणाच्या सूर्यचंद्रांचा अिंग्रजी कारभारांत अभाव होता, आणि स्वार्थी डावपेंचांच्या निबिड अंधारांत त्यांनीं समजून उमजून मराठी स्वराज्यावर हा घाला घातला, तिथें असल्या पोकळ वचनांची ते कसली पर्वा बाळगतात !

पेशवे व अिंग्रज यांच्यांतला हा पेशवाअीच्या थडग्यावरील मृत्युलेखवजा तह ता. १३ जून अि. स. १८१७ मध्यें झाला; आणि लगेच ता. १७ नोव्हेंबर अि. स. १८१७ मध्यें म्हणजे अवघ्या पांच महिन्यांच्या अवधींत झाशी-

च्या बाबतींत नवीन तह करण्याविषयीं झांशीच्या सुभेदारांच्या मागें अिंग्रजांचें टुमणें लागलें. त्यावेळीं नाहीं म्हणून झांशीवाल्यांचा थोडाच निभाव लागणार होता ! अखेर झांशीकरांच्या वतीनें दिवाण गोपाळरावभाऊ व इंग्रजांच्या वतीनें पोलिटिकल सुपरिंटेंडेंट जॉन व्हाउचप यांच्यामध्यें पिप्री एथें इंग्रजी छावणींत नवा तह झाला. या तहाअन्वयें इंग्रजांनीं झांशीचें राज्य सुभेदार नेवाळकरांच्या वंशाकडे वंशपरंपरेनें चालविण्याची कबुली अिंग्रजांकडून मिळाली. त्याच्या मोबदल्यांत झांशीच्या सुभेदारांनीं इंग्रज सरकारशीं इमानें इतबारें वागावयाचें होतें, व प्रसंगीं इंग्रज सरकाराला साह्य करावयाचें होतें ! शिवाजीनें स्थापन केलेलें मराठी स्वराज्य व त्या स्वराज्याच्या सोईसाठीं प्रधान म्हणून नोकर शिवाजीनंतरच्या शाहू छत्रपतीनें नेमलेले पेशवे, त्या नोकरांचेच शाहूच्या पश्चात् मराठशाहीचे सर्वाधिकारी वहिवाटदार झाले. त्या पेशव्यांनीं झांशीचा सुभा निर्माण केला, ते सुभेदार पेशव्यांना काय वाटेल याची चिंता न करतां हजारों कोशांवरून हिंदुस्थानांत संपत्तीची पद्धतशीर लूट करण्याच्या हेतूनें आलेल्या इंग्रजांच्या ताटाखालचें मांजर होऊन बसले. तीच गत शिंदे-होळकरांची व तीच गत पेशवाईंत उदयाला आलेल्या आणखीं अनेक संस्थानांची !

रामचंद्रराव हे गादीवर आले तेव्हां अजाण होते. त्यांची आई व दिवाण मिळून राज्याचा कारभार चालवीत असत. त्यांनीं अजाणपणानें अथवा ऐहिक लोभांना बळी पडून इंग्रजांची मांडलिकी पत्करली असणें शक्य आहे. स्वाभिमान, स्वातंत्र्याची आवड, पारतंत्र्याची मनस्वी चीड, वगैरे गुण त्यांच्या अंगीं नसतील. मातेचें अपत्यप्रेम पुष्कळदां आंधळें असतें. आणि कष्ट करून पोट भरण्याची संवय ज्यांना नाहीं, त्यांना आयतोबाप्रमाणें शाल्योदन चापावयाला मिळालें तर हवें असतें. रामचंद्ररावांसारखे सरंजामदार जर सरंजामभ्रष्ट झाले, तर त्यांची खरोखरच समाजांत नादानांतले नादान, दुबळ्यांतले दुबळे, व निरुपयोग्यांतले निरुपयोगी अशा बेकारांची भर पडावयाची ! कारण त्यांना उद्योगधंदा माहीत नसावयाचा, कष्ट करण्याची संवय नसावयाची, धकाधकीच्या जीवनांत त्यांचा वाली मग कोणीच नाहीं ! इतकी जरी नाहीं, तरी ‘ राज्य बुडालें तर आपल्या बाळाचें पुढें कसें होईल ’ इतकी तरी काळजी रामचंद्ररावांची आई सखूबाई हिला तेव्हां

वाटली असणें शक्य आहे. अथवा लोकप्रवाद आहे त्याप्रमाणें तिला स्वतःला अधिकारतृष्णा लागली असेल, म्हणूनही तिनें इंग्रजांशीं अतिशय नमतें घेऊन, त्यांची मांडलिकी पत्करून दौलत राखली असेल. रामचंद्रराव तेव्हां वयानें फारच लहान होता, त्यानें आपण होऊन इतका दुबळेपणा दाखवून लाचारपणानें आपलें राज्य राखण्याचा प्रयत्न केला असता असें म्हणण्याला कांहीं आधार नाहीं. कदाचित् असें कशावरून झालें नसतें? —त्यांनीं राणा प्रतापाप्रमाणें आपल्या देशाच्या स्वातंत्र्यावर परक्याचा घाला पडूं लागलेला पाहतांच प्राणांचीही पर्वा न करतां परक्यांचा प्रतिकार करण्यासाठीं कंबर कसली नसती कशावरून?

पण एथेंही सदिच्छेला रामचंद्ररावांनीं चांगलाच दगा दिला आहे. सखूबाई व दिवाण गोपाळरावभाऊ यांनीं इंग्रजांशीं लाळघोटेपणा कांहींच केला नाहीं, इतका लाळघोटेपणा स्वतः रामचंद्ररावांनीं केला असें इतिहास टाहो फोडून सांगत आहे. रामचंद्ररावांचा जन्म इ. स. १८०७ च्या सुमाराला झाला असावा. अर्थात् ते गादीवर आले तेव्हां अवघे सात आठ वर्षांचे असतील. पुढें इ. स. १८२५ मध्यें इंग्रजांनीं भरतपूरला वेढा देऊन तें जिंकून घेतलें. तेव्हांच नाना पंडिताचें बंड उद्भवलें.

मध्यहिंदुस्थानांत इंग्रजांच्या सर्वग्रासी सत्तेच्या फैलावामुळें उपासमार होऊं लागल्याकारणानें जगण्यापेक्षां मरणें बरें असें मानण्याइतके जे लोक खवळले व पेंढाऱ्यांचा लुटारूपणाचा पेशा पत्करून देशांत अनर्थपात करूं लागले, त्यांच्यांतलाच नाना पंडित हा एक प्रमुख पेंढारी होता. जालवणच्या गादीवर आपला हक्क सांगण्याच्या निमित्तानें त्यानें बंडाची उठावणी केली होती. त्याला इतरांची पुष्कळ सहानुभूति होती, व त्या जोरावर तो भराभर इंग्रजांची सत्ता एकेका प्रांतांतून उधळून लावीत होता. असा बराच मुलूख त्यानें जिंकून घेतला. लष्करी दृष्ट्या महत्त्वाचें असें काल्पी शहरही त्यानें जिंकून घेतलें. इंग्रज त्या पेंढाऱ्यांच्या बंडाचें पारिपत्य करण्याला असमर्थ ठरले. आपली सत्ता उत्तर हिंदुस्थानांत नांवाला तरी टिकते कीं नाहीं इतकें भय त्यांना उत्पन्न झालें. तेव्हां इंग्रजांनीं झांशीचे सुभेदार रामचंद्रराव यांना आपणाला या ऐन आणीबाणीच्या वेळीं साह्य करण्याबद्दल विनंति केली. ती विनंति सुभेदारांनीं मान्य करून आपलें घोडदळ,

पायदळ, तोफा वगैरे ताजी सामुग्री इंग्रजांच्या मदतीला दिली. त्या मदतीच्या जोरावर इंग्रजांनीं बंडखोरांचा पुरा धुव्वा उडविला, व आपली सत्ता बुंदेलखंडांत पूर्ववत् प्रस्थापित केली. पेंढाऱ्यांच्या बंडाचा मोड करण्याच्या या समुद्रमंथनांत झांशीच्या सुभेदारानें इंग्रजांचा पाठपुरावा केल्यामुळें पेंढाऱ्यांचीं हाडें खाशीं घुसळलीं गेलीं. पण लोणी इंग्रजांच्या पदरीं पडलें व झांशीच्या सुभेदारानें त्या ताकावरचा फेंस आपल्या तोंडाला फांसून घेण्यांतच धन्यता मानली !

पेंढारी लोक समाजांत अशांतता उत्पन्न करणारे, समाजाची घडी बिघडविणारे असे बंडखोर खरे; व असल्या बंडांचें व अज्ञानतेचें मूळ समाजांतून नाहींसें होण्यावरच समाजजीवनाचें स्वास्थ्य अवलंबून असतें हेंही खरें. परंतु हें मूळ नाहींसें करण्याचा जो उपाय अिंग्रजांनीं व त्यांचे मित्र झांशीचे सुभेदार रामचंद्रराव यांनीं शोधून काढला, तो मात्र पोटांतल्या रोगावर जादूटोण्याचे उपचार करण्यासारखा हास्यास्पद होता. पेंढाऱ्यांचा स्वतंत्र तांडा निर्माण होण्याला इंग्रजी सत्ताच कारण होती. अठराव्या शतकांत हिंदुस्थानांतील खालच्या-कामकरी शेतकरी ऊर्फ श्रमजीवि वर्गाची अवस्था अगदीं केविलवाणी झाली होती. देशांत एकसारख्या होणाऱ्या लढाया, मध्यवर्ती सत्तेचा पूर्ण अभाव, अिंग्रजांनीं एकामागून एक हिंदी संस्थानें घशांत टाकण्याचा चालविलेला सपाटा, अशा गोष्टींमुळें देशांत कमालीची आर्थिक संकटपरंपरा निर्माण झाली होती. खपणाऱ्या राबणाऱ्या लोकांच्या श्रमांना जणूं काय मोलच नाहीं, अशी मातीमोलानें राबूनही त्यांना पोटाला मिळण्याची पंचाईत पडूं लागली, तेव्हां लूटमारीकडे त्यांचा ओढा साहजिकच वळला. अशा संकटग्रस्त पोटार्थी कामकरी-शेतकरी वर्गाचाच मोठा भरणा पेंढाऱ्यांत होता. प्रामाणिकपणें मरेमरेतों कष्ट करून, जमीन कसवून अथवा उद्योगधंदा करूनही पोट भरत नाहीं, म्हणून त्यांनीं पत्करलेला लूटमारीचा पेशा पुढें त्यांच्या अंगवळणीं पडला हें खरें. पण हें पेंढाऱ्यांचें पेंढार कां उठलें याचा विचार तेव्हां कोणीं केला नाहीं. इंग्रजांनींही विचार केला नाहीं, अथवा उत्तरहिंदुस्थानांतील हिंदी संस्थानिकांनींही केला नाहीं. तो विचार करून त्याचीं कारणें दूर करण्याशीं त्या दोघांनाही कांहींच कर्तव्य नव्हतें. पेंढाऱ्यांच्या लुटालुटीमुळें इतर रयतेला त्रास होतो तो चुकावा व

रयत सुखी व्हावी, हें ध्येय डोळयांपुढें ठेवूनही त्यांनीं पेंढाऱ्यांचा मोड केला असें नाहीं. वास्तविक जें पेंढाऱ्यांनीं केलें तेंच इंग्रजांना करावयाचें होतें व त्यांनीं तें चालविलेंही होतें. इंग्रजांनीं तरी रयतेची पिळणूक करून आपला तळिराम गार करण्यापलीकडे काय चालविलें होतें ?

तथापि इंग्रजांनीं आपल्या ध्येयावर दृष्टि ठेवून लक्ष्यपूर्वक मार्गक्रमण चालविलें होतें हें मात्र खरें. त्यांना हिंदुस्थानांतील कच्च्या पक्क्या संपत्तीचे सुवर्णचे-झरे विलायतेच्या उद्यानाकडे वाहते ठेवावयाचे होते; व हिंदी संस्थानिकांना दटावून, दाबून, राबवून त्यांचें तें कार्य अव्याहत चाललें होतें. देशांत दुष्काळ पडला, बेकारी वाढली तरी जोंपर्यंत स्वतःचे आयतखाऊ ऐषआराम बिनबोभाट चालण्यासाठीं हिंदी सरंजामदारवर्ग रयतेच्या श्रम-संपदेची, घरादाराची व जीवितसर्वस्वाचीही राखरांगोळी करून भयंकर अिंग्रजी भूक शमविण्याला तत्पर होता, तोंवर रयतेच्या गाऱ्हाण्यांकडे लक्ष्य देण्याची अिंग्रजांना काय गरज ! तरीदेखील त्यांतल्यात्यांत तेव्हांचा गव्हर्नर जनरल लॉर्ड वुइलियम बेंटिंक यानें पेंढाऱ्यांचा पुढील त्रास चुकविण्यासाठीं आणखी एक चतुराईची गोष्ट केली. 'फोडा आणि झोडा' हें जें अिंग्रजी राजनीतीचें महासूत्र, त्या महासूत्रानुसार त्यांनीं एका पेंढारी पुढाऱ्याला सर्व पेंढाऱ्यांपासून फोडून आपल्या बाजूला वळवून घेतलें व त्याला होळकरांच्या राज्यांतला कांहीं प्रांत तोडून देऊन नबाब बनविलें. परस्पर हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवून भलेपणा मिरविण्याची ही अिंग्रजी युक्ति ध्यानांत ठेवण्यासारखी आहे! याप्रमाणें पेंढाऱ्यांत फूट पाडून बाकीच्या पेंढाऱ्यांचा अतिशय निर्दयपणें नायनाट करण्यांत आला. त्यांना जणूं क्रूर जंगली जनावरें समजून त्यांची कत्तल करण्यांत आली ! जे पेंढारी ईर्षेनें लढले अथवा शरण आले त्यांची कत्तल झाली; जे जीव घेऊन रानावनांत पळाले त्यांना रानांतील हिंस्र पशूंनीं फाडून खाल्लें !

असो. शरिरांत नासलेलें रक्त कोठें तरी गळूं उमटून बाहेर पडतें, त्याप्रमाणें माळव्यांतील त्रस्त रयतेच्या दुःखांना पेंढाऱ्यांच्या बंडाच्या रूपानें तोंड फुटलें. त्या जखमेवर रक्तशुद्धीचा, अर्थात् रयतेंतील हलाखी दूर होऊन असंतोष मावळेल असा कांहींही टिकावू उपाय न करताना नुसती रस्त्यावरची पसाभर दूषित कोरडी वाळू त्या जखमेवर टाकून जखम बुजवून

टाकावी त्याप्रमाणें इंग्रजांनीं पेंढाऱ्यांचा मोड केला, व झांशीच्या रामचंद्ररावांनीं त्यांना त्या कामीं अंतःकरणपूर्क साह्य केलें. दुबळ्यांच्या दुःखाला वाचा नसते म्हणतात. हिंदी रयतेलाही अंडकटाह फोडून जातील इतक्या जोराच्या विरोधाच्या आरोळ्या ठोकण्याला तेव्हां सामर्थ्य नव्हतें. आई जेवूं घालीना व बाप भिकेला घाडीना अशी श्रमजीवि हिंदी रयतेची तेव्हां अतिशय केविलवाणी स्थिति झाली होती. त्याबरोबरच हेंही कबूल केलें पाहिजे कीं रावरामचंद्ररावासारखे सरंजामदार काय अथवा इंग्रज भांडवलदारी राजसत्ताधारी काय, दोघांचीही सत्ता श्रमजीवि जनतेला म्हणजेच बहुजनसमाजजीवनाला मारक आहे, हें श्रमजीवि जनतेला तेव्हां नीटसें कळूं लागलें नव्हतें. त्यांच्यांत असंतोषाचा अग्नि धुमसत होता, पण त्या अग्नीला कार्यकारणभावानें निश्चित झालेल्या ज्वाळांचें रूप नव्हतें. त्यामुळेंच भांडवलदार इंग्रजी ईस्ट इंडिया कंपनीनेंही त्यांना बुचाडावें व हिंदी सरंजामदार वर्गानेंही बुचाडावें. अर्थात्, असली अज्ञानमूलक परिस्थितिदेखील चिरकाल टिकणारी नसते, व कालाच्या ऐतिहासिक ओघाला ती भक्कम असा बांधही घालूं शकत नाहीं. आपल्या असंतोषाला, उपासमारीला, हलाखीला अमूक वर्ग अथवा अमकी सत्ता कारण आहे अशी प्रमाणसिद्ध समजूत श्रमजीवि जनतेची पटलेली नसते तोंवर शत्रूच्या वर्मी घाव कसा घालावा हें जनतेला ताबडतोब कळत नाहीं व सरंजामशाही आणि भांडवलशाही ह्या हितशत्रूंचे डाव अचूक ओळखतां येत नाहींत. पण तहानेनें व्याकूळ झालेलें हरीण मृगजळामुळें फंसून कां होईना, तिथें पाणी आहे या आशेनें धावत जातें, व त्याची शेवटीं फसगत होते; म्हणून मृगजळ खोटें ठरलें म्हणजे त्याच्यामागें धांवणाऱ्या हरिणाची तहानही खोटी होती असें नव्हे. त्याप्रमाणेंच पेंढाऱ्यांच्या बंडासारखे नडल्याभिडल्या जनतेचे प्रयत्न मृगजळाच्या मागें धावण्यासारखे अयशस्वी झाले, तरी त्या प्रयत्नांच्या मुळाशीं असलेला असंतोष कांहीं नव्हेसा होत नाहीं. म्हणूनच पेंढाऱ्यांचा मोड करून इंग्रज उत्तर हिंदुस्थानांत आपल्या भांडवलशाही सत्तेचें आसन मजबूत करूं शकले, रामचंद्ररावांनीं बंडखोरांची दाद घेण्याचे श्रम न घेतां त्यांना भरडून काढण्याच्या कामीं इंग्रजांशीं फितूर होऊन लोकद्रोह जोडला, तरी त्यामुळें पेंढाऱ्यांतील अथवा सर्व जनतेंतील असंतोष नाहींसा झाला असें नाहीं.

रामचंद्ररावांना त्यांत एवढेंच साधतां आलें, त्यांनीं पेंढाऱ्यांच्या चितेची होळी पेटवून त्या होळीवर स्वतःच्या मतलबाची पोळी भाजून घेतली. खरें खुरें लोकराज्य हिंदुस्थानांत जेव्हां स्थापन होईल तेव्हां रामचंद्ररावांचें हें कृत्य लोकद्रोहाचें महाभयंकर पातकसें ठरेल. पण त्यावेळीं इंग्रज सरकारांत त्याच कृत्याबद्दल रामचंद्ररावांची वाहवा झाली. अिंग्रजांसारख्या परक्या सत्तेचा वरवंटा आपल्या पेंढारी बांधवांवरून फिरवतांना त्या रणक्षेत्रावर रक्ताचा चिखल व हाडांची मळणी झांशीच्या सैन्यांतील सैनिकांची झाली; पण धन्यवाद रामचंद्ररावांना मिळाले! गव्हर्नर जनरल लॉर्ड वुइलियम बेंटिंक यांनीं अि. स. १८३२ मध्यें झांशी एथें मोठा टोलेजंग दरबार भरवून पूर्वोक्त पेंढाऱ्यांचा नाश करण्याच्या कामीं त्यांची बहुमोल मदत झाल्याबद्दल त्यांना ‘ महाराजाधिराज ’ व ‘ Devoted servant of the Glorious king of England’ (वैभवशाली अिंग्लंडच्या राजाचा निष्ठावंत सेवक) हे दोन किताब बहाल केले. त्यांना छत्रचामरें, नगारा अित्यादि राजचिन्हेंही बहाल केलीं. ‘बळी तो कान पिळी’ या नात्यानें अिंग्रजांकडे रामचंद्रपंतांचें धनीपण गेलें व रामचंद्रराव अिंग्लंडच्या राजाचे सेवक ठरले. सेवाधर्माची महतीच गावयाची, रामचंद्रपंतांनीं स्वतःला सेवक म्हणवून घेण्यांत भूषणच मानावयाचें, तर पेशव्यांचे सेवक म्हणवून घेण्यांत भूषण मानावयाला हवें होतें. कारण धनी पेशव्यांच्या कृपेमुळें झांशीची सुभेदारी रामचंद्रपंतांच्या वांट्याला आली होती. पेशवाई बुडाली व इंग्रज पेशव्यांचे राजकीय वारस ठरले; व रामचंद्रराव हे मूळचे पेशव्यांचे सेवक, त्यामुळें इंग्रज हे रामचंद्ररावांचे धनी ठरले, हें तह व करारमदार यांच्या दृष्टीनें बरोबर असेल. पण स्वाभिमानी माणसाला यांत मरणप्राय अपमान वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. पण दुःखाची गोष्ट ही कीं रामचंद्ररावांना स्वतःला इंग्लंडच्या राजाचा निष्ठावंत सेवक म्हणवून घेण्यांत अपमान तर वाटला नाहींच, उलट भूषण वाटलें. इतकेंच काय पण आपणाला इंग्रजी राजसत्तेचा दासानुदास म्हणून जाहीरपणें मिरवतां येत नाहीं याची त्यांच्या मनाला एकसारखी हुरहूर लागून राहिली असावी. म्हणून त्यांनीं इंग्रज सरकारला मुद्दाम विनंति करून झांशीच्या किल्ल्यावर इंग्रजांच्या ताबेदारीचें द्योतक असें ‘ युनियन जॅक ’ लावण्याची परवानगी मिळविली. कै. पारसनीस यांच्या शब्दांत बोलावयाचें तर

'ह्या ध्वजावरून झांशी संस्थानिकाची ब्रिटिश सरकाराविषयींची पराकाष्टेची भक्ति व्यक्त होते. स्वतःच्या किल्ल्यावर जो ध्वज संस्थापित करावयाचा, तो देखील ब्रिटिश राजचिन्हांनीं अंकित असावा अितकी ज्या संस्था-निकाची अिच्छा, त्याच्या राजनिष्ठेचें परिगणन करण्यास कोण समर्थ आहे!'

रामचंद्ररावांच्या अज्ञानपणीं झांशीचा कारभार त्यांची आई सखूबाई व दिवाण राव गोपाळराव हीं दोघें पाहत होतीं हें आपण मागें पाहिलेंच आहे. पेंढाऱ्यांचा नाश करण्याच्या कामीं मदत करून त्याच्या मोबदल्यांत 'अिंग्लंडच्या राजाचा निष्ठावंत सेवक' ही पदवी झांशीच्या संस्थानिकानें मिळविली, ती रामचंद्ररावांच्या सज्ञानपणांतील गोष्ट. तेव्हां रामचंद्रराव ऐन तारुण्यांत असावे. हें ध्यानीं घेतलें, व रामचंद्ररावांची आअी सखूबाअी हिनें रामचंद्ररावांशीं फार निष्ठुरपणाचें वर्तन केलें ही लोकवार्ता खरी मानली, तर मात्र कै पारसनीस म्हणत त्याप्रमाणें सखूबाअी ही क्रूर, रागीट व 'तुळशींत भांग' शोभणारी कृत्या नसून मोठी बाणेदार, तेजस्वी व पुढें झांशीच्या राजवंशांत होऊन गेलेल्या राणी लक्ष्मीच्या--शूर वीरमणींच्या परंपरेंत आगेंमागें कुठेंतरी बसणारी नमुनेदार स्त्री होती असेंच म्हणावें लागेल. 'रामचंद्रराव हा सखूबाअीचा प्रत्यक्ष पुत्र होता तरी तो नष्ट होऊन सर्व राज्याधिकार आपल्या हातीं यावा अशी तिची इच्छा होती; व तो सिद्धीस नेण्यासाठीं तिनें रामचंद्ररावांचा जीव घेण्याचे अनेक प्रयत्न केले. एकदां तर तिनें रामचंद्रराव नेहमीं पोहावयाला जात त्या लक्ष्मी तलावांत भाले घालून ठेवले!' असा लोकापवाद सखूबाईविषयीं घेतला जातो. तो खरा आहे असें मानलें तरी केवळ राज्यलोभानेंच सखूबाई आपल्या पोटच्या मुलाचा अशा प्रकारें शेवट करण्याला तयार झाली होती असें रामचंद्ररावांच्या एकंदर कारकीर्दीवरून व कर्तबगारीवरून म्हणवत नाहीं. रामचंद्ररावांविषयीं तेव्हांचे बुंदेलखंडचे पोलिटिकल एजंट यांनीं फार प्रशंसा केली आहे. ती न्यायाच्या तराजूच्या एका पारड्यांत, व पेंढाऱ्यांचा नाश करण्याच्या कामीं रामचंद्र-रावांनीं घेतलेला पुढाकार, झांशीच्या किल्ल्यावर फडकविलेलें 'युनियन जॅक' संस्थानाच्या कारभाराकडे दुर्लक्ष्य झाल्यामुळें संस्थानांत माजलेली अनास्था वगैरे गोष्टी दुसऱ्या पारड्यांत घालून वजन केल्या, कीं कर्नल स्लीमनकृत रामचंद्रप्रशस्तीचा खरा अर्थ ध्यानीं येण्याला सायास पडत नाहींत. आणि

मग ओघानेंच अशी एक दारुण शंका विजेसारखी विचारवंताच्या मनांत सळसळून जाते कीं, 'असला कुलांगार जितका लवकर मरेल तितका चांगला' अशा स्वाभिमानप्रेरित विचारानें प्रेरित होऊन सखूबाईनें रामचंद्रपंतांना ठार मारण्याचा प्रयत्न केला नसेल कशावरून? मातृप्रेम ही मानवी मनांतील एक अतिशय जिव्हाळ्याची जागा आहे खरी. परंतु मातृप्रेमामुळें अितर जगाविषयीं अंध बनलेल्या व आपलीं अितर कर्तव्यें विसरणाऱ्या मातेपेक्षां आंधळें मातृप्रेम कर्तव्याच्या आड येऊं न देणाऱ्या मातेची थोरवी अधिक, असें सुज्ञ व शिष्टजनही मानतात. स्वाभिमान, स्वराष्ट्राभिमान वगैरे भावना अनेकदां समाजांतील विषम परिस्थितीला पोषक ठरणाऱ्या असल्या तरी त्यांतही ओज व तेज पुष्कळदां दिसून येतें. स्वयंनिर्मित अथवा वंशपरंपरागत राजा ही संस्था अिष्ट कीं अनिष्ट हा विचार बाजूला टेवला, तर राजा ही संस्था असावी असें म्हणणाऱ्या लोकांच्या दृष्टीनेंही राज्यकर्त्याला कांहीं नैतिक बंधनें पाळलीं पाहिजेत असें शिष्ट जन मानतात. स्वदेशप्रेम, स्वातंत्र्यप्रेम हीं बंधनें अशांपैकींच होत. रामचंद्रराव हा अिंग्रजांच्या आहारीं जाऊन स्वाभिमानशून्य बनला, त्याला अिंग्रजांच्या हातांतील कळसूत्री बाहुलें होऊन नाचण्यांत धन्यता वाटूं लागली, त्यामुळें आपल्या घराण्याची अब्रू गेली, पूर्वजांच्या थोरवीला काळिमा लागला, असें रामचंद्ररावांच्या बाबतींत सखूबाअीला वाटण्याजोगी परिस्थिति होती. मग तिला केवळ राज्यलोभानें पुत्रघात करूं पाहणारी कृत्या असें कसें म्हणतां येईल?

पण रामचंद्ररावांच्या हातून झांशी संस्थानची आबाळ झाली ही कांहींच नव्हे, अितकी आबाळ त्यांच्या पश्चात् झांशीच्या गादीवर आलेल्या कलिपुरुषाकडून झाली. तो भयाण वृत्तांत लिहितांना भीतीनें थरथरणाऱ्या लेखणीला प्रथम क्षणभर विसांवा देणें बरें!

# ५ : राजे गंगाधरराव

रामचंद्ररावांना ठार मारण्याचा प्रयत्न त्यांची आई सखूबाई हिनें केला असा लोकापवाद असल्याचें मागें सांगण्यांत आलेंच आहे. रामचंद्ररावांच्या टाकाऊ करणीला कंटाळून व चिडून सखूबाईनें तसें केलें असो, कीं हिंदी संस्थानें येनकेन प्रकारेण बुडवावयाचींच हें धोरण मनांत ठेऊन त्या संस्थानांत जेणेंकरून गोंधळ माजेल अशी पूर्व तयारी करण्याच्या इंग्रजी राजनीतीच्या डोळयांत सखूबाईचा तेजस्वीपणा सलूं लागल्यामुळें त्यांच्या प्रोत्साहनानें सखूबाईवर कांहीं तरी बालंट आलें असो; सखूबाईचें प्रकट जीवन त्यामुळें संपुष्टांत आलें एवढें खरें. त्या बिचारीला पुढें जन्मभर कैदेंत कुजून मरावें लागलें. झांशी दरबारच्या कारभारी मंडळीनें तिला कैदेंत लोटलें व त्याबद्दल इंग्रजांकडून त्यांना शाबासकी मिळाली आहे, यावरून देखील वरील संशयाला दुजोरा मिळतो.

रामचंद्रराव मोठ्या अनीजीनें, इंग्रजांची मनधरणी करून झांशीच्या किल्ल्यावर फडकविलेल्या ' जुनियन जॅक 'च्या सावलीला राजवैभव भोगण्याला फार दिवस जगले नाहींत. इ. स. १८३५ मध्यें त्यांचा अंत झाला. त्यांना कांहीं पुत्रसंतान नव्हतें. मरणसमयीं ते ऐन तिशीच्या घरांत असावे. त्यांची तरुण विधवा स्त्री मागें होती. सागर प्रांतांतील खेर घराण्यांत त्या बाईची एक बहीण दिली होती, तिच्या मुलाला बाईच्या मांडीवर दत्तक देऊन गादी पुढें चालविण्याचा प्रयत्न झांशी दरबारांतील कारभाऱ्यांच्या एका गटानें केला. पण दुसऱ्या गटानें त्याला विरोध करण्यासाठीं कंबरा कसल्या. झालें हें दत्तविधान शास्त्राला धरून नाहीं अशी हाकाटी ह्या विरोधी गटाकडून करण्यांत आली, व ती थेट इंग्रजांच्या कानांपावेतों जाईल अशी चोख व्यवस्थाही तेव्हां झाली! संस्थानें कच्चीं खावयाला मिळालीं तरी फार बरें अशी इंग्रजांची अपेक्षा होती, त्यांना झांशी संस्थान तळून

भाजून मिळण्याची संधी आयती चालून आली. झांशीच्या दरबारांतील गादीच्या वारशाविषयींचा दावा समोर आल्यावर अर्थात् न्यायाधीश होण्याची संधी सांपडल्यावर न्याय देणें इंग्रजांना भागच होतें. त्यांनीं पूर्वोक्त दत्तविधान बेकायदेशीर ठरविलें, व जेणेंकरून झांशी संस्थानचें हमखास वाटोळें होऊन तें तांबड्या रंगाच्या नकाशांत सामील करणें सुलभ होईल, असे प्रताप गाजविणारा व झांशीच्या राजवंशांतील रावबाजी पेशवा शोभणारा रामचंद्ररावाचा चुलता ( तिसरा ) रघुनाथराव हा हुकमी पत्ता या डावांत टाकून डाव जिंकला !

रघुनाथराव हे रामचंद्ररावांचे चुलते. रामचंद्रराव हे शिवरामभाऊंचे ज्येष्ठ चिरंजीव कृष्णराव यांचे पुत्र. वडील मुलाकडे गादीचा हक्क जावयाचा ही रूढि रामचंद्ररावाच्या बाबतींत जशी पाळली गेली, तशीच रामचंद्ररावानंतर त्यांच्या दत्तकाला इंग्रजांची मान्यता मिळाली असती तर पाळली गेली असती. पण इंग्रजांची लहर, धोरण, अथवा डावपेंच हाच जिथें कायदा, तिथें अवांतर गोष्टींना वावच कुठें होता ! रघुनाथराव हा अतिशय व्यसनी व नादान मनुष्यप्राणि आहे ही गोष्ट रामचंद्ररावांच्या मृत्यूच्या वेळींही महशूर असली पाहिजे. तो तेव्हां तारुण्याच्या पलीकडील सरहद्दीवर उभा राहून शकारी जीवन कंठीत होता. हिंदी संस्थानांच्या कारभारांत हस्तक्षेप करण्याचें कारण संस्थानांतील अंतर्गत अव्यवस्था हें आजकाल इंग्रज सत्ताधाऱ्यांकडून सांगण्यांत येतें, व त्या वेळींही त्यांचे दाखवण्याचे दात तेच होते. तेच खरे दांत होत असें मानलें, तर रघुनाथरावासारख्या मुलुखावरून ओवाळून टाकलेल्या नादान, बद्कर्तबगार व व्यसनी माणसाला झांशीच्या गादीवर त्यांनीं बसवावयाला नको होतें. परंतु राजकारणचतुर इंग्रजाचे दांत दाखवावयाचे निराळे व खावयाचे निराळे होते. त्यांना झांशीचें राज्य टिकवावयाचें नव्हतें; गिळंकृत करावयाचें होतें. त्यासाठीं त्यांना कारण पाहिजे होतें. संस्थानचा अंदाधुंदीचा कारभार हें कारण संस्थान खालसा करण्याला फार सोईचें असतें, संस्थानांत अंदाधुंदी माजेल अशी दक्षता प्रथम कांहीं काळ बाळगली कीं काम भागतें. इतका दूरवर विचार करूनच इंग्रजांनीं रामचंद्ररावांच्या पश्चात् त्यांच्या तरुण विधवेनें मांडीवर दत्तक घेतलेला कृष्णराव खेर हा वारस बेकायदेशीर ठरवून तेथें रघुनाथ-

रावाची झांशीचे महाराजाधिराज तिसरे रघुनाथराव म्हणून योजना केली असली पाहिजे.

कावळयांचा दरबार भरला कीं दरबारांत कोणत्या वस्तु येणार याची कल्पना होते. रघुनाथरावाच्या कारकीर्दीत झांशीच्या राजलक्ष्मीचे कसकसे धिंडवडे निघणार याविषयींही लोकांना कल्पना होतीच. तीच कल्पना अनेक पटीनीं सार्थ ठरली. अगदीं थोडक्यांत रघुनाथरावाच्या राज्यकारभाराचें वर्णन करावयाचें तर त्यानें गादीवर येतांच झांशींतील जनतेला झांशींतील जीवन रौरव नरकापेक्षांही तापदायक व लाजिरवाणें बनवून सोडलें! राज्याचें उत्पन्न सपाट्यासरसें घटून चौथ्या हिस्शावर आलें, दौलतीवर कर्जाचे डोंगर वाढूं लागले, संस्थानांतील मुलूख भराभर सावकारांकडे गहाण पडूं लागला, अशी राजवटीची अगदीं वाताहात उडाली. हा दिवटा महाराजाधिराज अवघा दोनच वर्षें गादीवर होता. पण ह्या दोन वर्षांत त्यानें इंग्रजांचें चोरटें मनोगत इतक्या तत्परतेनें तडीला नेलें कीं त्या दोन वर्षांच्या अवधींतच झांशीची व्यवस्था इंग्रजांना आपल्या हातीं घ्यावी लागली. आणि लगेच पुढच्या वर्षीं रघुनाथराव मरून गेला. त्याच्यामागें त्याची वज्रलेप दुष्कीर्ति, झांशींतील बेबंदशाही, पत्नी, गजरा नांवाची एक रक्षा व समशेरबहाद्दर आणि अल्लीबहाद्दर हे त्या रक्षेचे दोन पुत्र हें काय तें मागें राहिलें.

इंग्रजांनीं रघुननाथरावाच्या कारकीर्दींत झांशी राज्याची व्यवस्था आपणाकडे घेतली ती केवळ हितबुद्धीनें प्रेरित होऊन; राज्य खालसा करण्यासाठीं म्हणून नव्हे. म्हणूनच रघुनाथरावाच्या पश्चात् झांशीच्या गादीवर हक्क सांगणारांची मारे झुंबड उडाली! रघुनाथरावाची पत्नी म्हणे, मी राणी, मला राज्य मिळावें; माझ्या मांडीवर मुलगा दत्तक मिळून तो गादीचा वारस व्हावा. रामचंद्ररावांचा नाशाबीत दत्तक मुलगा कृष्णराव याला वाटे कीं झांशीचें राज्य ही माझ्या बापाची मत्ता, ती मला मिळावी. समशेर बहाद्दर व अल्लीबहाद्दर या दोघांना वाटे कीं आपण महाराजाधिराजांचे बेटे, आपणाला राज्य कां मिळूं नये? यांच्याखेरीज रघुनाथरावांचे बंधु गंगाधरराव हेहि एक गादीला वारस होतेच. अशा चौघांनींही झांशीचें राज्य आपल्या हातीं येण्यासाठीं एकच गिल्ला केला, तेव्हां इंग्रज सरकारला मोठाच पेंच पडला. त्यांनीं या चार हक्कदारांतून झांशीच्या राज्याचा खरा हक्कदार

शोधून काढण्यासाठीं एक कमिशन नेमलें. या कमिशननें गंगाधररावांना गादी देण्याची शिफारस केली व ती गव्हर्नर जनरल लॉर्ड ऑक्लंड यांनीं मान्य केली. मात्र गंगाधररावांचा हक्क मान्य करतांना पूर्वी दौलतीला जें कर्ज रघुनाथरावाच्या कारकीर्दींत झालें होतें त्याची फेड होईतों राज्याची सर्व व्यवस्था इंग्रजांतर्फेच्या व्यवस्थापकानें पाहावी, असें एक कलम त्या मंजुरीच्या खलित्यांत होतें अर्थात् गंगाधरराव झांशीच्या गादीवर आले तेव्हां नेणे कोण इंग्रज सरकारचे अधिकारी संस्थानचा कारभार पाहत होते, कर्ज वारीत होते, व तशीच व्यवस्था पुढेंही चालली होती. नांव गंगाधररावांचें व गांव कारभारी मंडळीचा, असा कारभार चालला होता.

गंगाधरराव हे इतिहासप्रसिद्ध चरित्रनायिका राणी लक्ष्मीबाअी हिचे पति असल्यानें सूर्याच्या उदयास्ताच्या वर्णनांत संधिप्रकाशाला, दिव्याच्या वर्णनांत दिव्याच्या ज्योतीला, अथवा निबिड अरण्यांत घाबरून सैरावैरा पळणाऱ्या सुंदर हरिणीच्या नयनमनोहर चित्रांत डोंगरदरडी व जंगल यांच्या पार्श्वभूमीला जें महत्त्व तेंच महत्त्व गंगाधररावांच्या जीवनवृत्तांताला राणी लक्ष्मीच्या आणि झांशी संस्थानच्या जीवनवृत्तांतांत आहे. म्हणूनच एथें गंगाधररावांच्या जीवनाचा व त्या जीवनासभोंवारच्या एकंदर परिस्थितीचा सर्वांगांनीं विचार करणें अवश्य आहे. त्यासाठीं गंगाधररावांच्या वंशवेलीकडे प्रथम नजर फेंकली पाहिजे.

नेवाळकर घराण्यांतील झांशीचे पहिले सुभेदार रघुनाथ हरि नेवाळकर हे होत. अर्थात् झांशीच्या राज्यापुरता विचार करावयाचा तर राणी लक्ष्मीच्या सासारच्या राजवंशांतील रघुनाथराव हे मूळ पुरुष होत. ते काशीक्षेत्रीं इ. स. १७९६ मध्यें मरण पावले, व त्यांच्या पश्चात् त्यांचे धाकटे बंधु शिवरामभाऊ यांना झांशीची सुभेदारी प्राप्त झाली.

शिवरामभाऊंना कृष्णराव, रघुनाथराव व गंगाधरराव असे तीन मुलगे, व दोन मुली अशीं पांच अपत्यें होतीं. पैकीं कृष्णराव हे शिवरामभाऊंच्या हयातींतच इ. स. १८११ मध्यें मरण पावले. शिवरामभाऊंच्या मुलांचीं नक्की वयें जरी उपलब्ध नाहींत, तरी स्थूल मानानें असें मानावयाला हरकत नाहीं कीं कृष्णराव हे तीनही मुलांत वडील. त्यांच्या पाठचे रघुनाथराव व रघुनाथरावाच्या पाठचे गंगाधरराव. शिवरामभाऊंच्या पश्चात् कै० कृष्ण-

रावांचा मुलगा रामचंद्रराव हा गादीवर बसला. रामचंद्ररावांनंतर चुलते रघुनाथराव व रघुनाथरावानंतर त्याचे धाकटे बंधु गंगाधरराव हे गादीवर बसले. या सर्व राजपुरुषांचीं वयें निश्चित करावयाला तारीख-वाराच्या नक्की पुराव्याच्या अभावीं आनुषंगिक पुराव्यावर भरंवसा ठेवणें भाग आहे. रामचंद्रराव हे इ. स. १८३५ मध्यें वारले, तेव्हां त्यांचें वय अठ्ठावीस वर्षांचें होतें, असें तेव्हांचे बुंदेलखंडचे पोलिटिकल एजंट कर्नल स्लीमन यांच्या लेखावरून सिद्ध होतें. अर्थात् रामचंद्ररावांचा जन्म इ. स. १८०७ मध्यें झाला असावा. त्यांच्या जन्माच्या वेळीं त्यांचे वडील कृष्णराव यांचें वय कमींत कमी वीस बावीस वर्षांचें होतें असें गृहित धरावयास हरकत नाहीं. त्यांच्यापेक्षां लहान रघुनाथराव व रघुनाथरावाहून लहान गंगाधरराव. यावरून गंगाधररावांचा जन्म इ. स. १७९५ ते १८०० च्या सुमारास झाला असावा. अर्थात् ते गादीवर आले तेव्हां त्यांचें वय पस्तीस वर्षांचें असावें. त्यावेळीं गंगाधरराव हे विधुर होते, व ते गादीवर आले त्या सुमाराला त्यांच्यासाठीं वधूसंशोधन मोठ्या जारीनें सुरू होतें, असें या विषयीं उपलब्ध असणाऱ्या माहितीवरून दिसतें.

गंगाधररावांच्या बाळपणाविषयींची कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. तथापि ते गादीवर आल्यावरही कांहीं काळ केवळ नामधारी राजे होते. त्यांचे वडील बंधु कलिपुरुष रघुनाथराव यांनीं राजवटीची सर्वप्रकारें धूळधाण चालविल्यामुळें राज्याची व्यवस्था जी इंग्रज सरकारानें आपल्या हातीं घेतली, ती गंगाधरराव हे रघुनाथरावाच्या पश्चात् झांशीचे राजे झाल्यावरही सुमारें चार वर्षें तशीच इंग्रजांच्या हातीं होती. त्यांचा एक व्यवस्थापक राज्याची सर्व व्यवस्था पाहत असे. तसें पाहूं जातां गंगाधरराव कांहीं तेव्हां वयानें लहान नव्हते; ते प्रौढत्वाच्या सरहद्दीवर उभे होते. राज्यकारभार इंग्रज सरकारनें त्यांच्यावर सोंपविलाच असता व त्यांनीं केला असता तर त्यांना तो करतां आलाच नसता असें म्हणतां येणार नाहीं. परंतु तेव्हां झांशीचें राजेपण केवळ नामधारीपणाचें शिल्लक उरलें होतें. त्या राज्याची सत्ता इंग्रज अगोदरच बळकावून बसले होते, व कोठून तरी तें राज्य खालसा करून एकछत्री अिंग्रजी मुलुखाला केव्हां जोडतां येतें अशी उत्कंठा त्यांना लागून राहिली होती, असेंच तेव्हांच्या एकंदर घटनांवरून स्पष्ट दिसतें. अवघ्या

दोन वर्षांत दौलतीची वाताहात ज्या दिवस्या रघुनाथरावानें केली, तो किती कमालीचा नादान पुरुष असावा याची त्याला गादीवर बसवितांना इंग्रजांना कल्पना नव्हती असें कोण म्हणेल? झांशीचें कमींत कमी हित साधण्याच्या सदिच्छेचा लवलेशही तेव्हां अिंग्रज अधिकाऱ्यांच्या अंतःकरणांत असता, तर त्यांनीं रघुनाथरावाला-अवघ्या दोन वर्षांत राजवटींत धुळीचे दिवे लावणाऱ्या रघुनाथरावाला झांशीच्या गादीवर बसविलेंचं नसतें. त्यांऐवजीं गंगाधररावांनाच बसविलें असतें. परंतु तसें अिंग्रजांनीं केलें नाहीं एवढें खरें. तसेंच रघुनाथरावानें दौलतीची सर्वतोपरी वाताहात चालविली, तेव्हां इंग्रजांनीं झांशीची व्यवस्था आपणाकडे घेतली हें क्षम्य मानलें, तरी गंगाधररावांना गादीवर बसवितांना त्यांना मुखत्यारी कां देण्यांत येऊं नये?

उपलब्ध असलेल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष माहितीवरून अिंग्रजांना गंगाधररावांच्या हातीं ताबडतोब मुखत्यारी न देण्याला मुख्य दोन कारणें संभवतात. अिंग्रजांच्या मनांतून तसें करतांना झांशीच्या राज्याचा पुन्हा भला मोठा लचका तोडावयाचा होता हें एक कारण, व गंगाधररावांच्या कर्तबगारीवर व राज्यकर्तेपणाच्या पात्रतेवर त्यांचा विश्वास नसेल हें दुसरें. दिखाऊ अितिहासाच्या नोंदींत निराळेंच कारण असें होण्याला सांपडतें तें असें कीं, रघुनाथरावांच्या कारकीर्दींत दौलतीला भयंकर कर्ज झालें होतें, तें सर्व फेडून संस्थानची आबादीआबाद करण्यासाठीं अिंग्रजांनीं सर्व कारभार आपल्या हातीं घेतला; व तें सर्व कर्ज फिटून दौलत पूर्ण निष्कर्जी होअीतों ती गंगाधररावांच्या अगर कोणाच्याही हातीं सोंपविणें अिंग्रजांना सुरक्षितपणाचें वाटलें नाहीं. पण हे हत्तीचे दाखवावयाचे दांत झाले; खरे दांत निराळेच होते. गंगाधरराव गादीवर आल्यावर तीन चार वर्षांनंतर झांशीच्या राज्याचीं सर्व सूत्रें त्यांच्या हातीं सुपूर्द करतांना तेव्हांचा बुंदेलखंडाचा पोलिटिकल एजंट वुअिलियम हेन्री स्लीमन यानें एका नव्या आठ कलमी कराराचें लोढणें जें गंगाधररावांच्या गळ्यांत अडकवून दिलें, आणि त्या कराराअन्वयें सव्वादोन लाखांहून अधिक उत्पन्नाचा झांशीच्या राज्यांतील मुलूख तैनाती फौजेच्या खर्चाकरितां म्हणून अलाहिदा तोडून घेतला, ते अिंग्रजांचे खरे खावयाचे दांत होत. म्हणजे पर्यायानें असेंच म्हणावयाचें कीं गंगाधररावांनीं झांशीवर राजपणा गाजवण्याचा हक्क अिंग्रजांपासून सालीना सव्वादोन लाखां-

वर उत्पन्नाच्या मुलुखाच्या मोबदल्यांत विकत घेतला. ख्रिस्ती धर्मगुरु मागील काळांत स्वर्ग लोकाच्या यात्रेकरूकडून भरपूर पैसा घेऊन त्याला स्वर्गांत जाण्याचा परवाना विकत देत असत, त्यांतलाच हा प्रकार म्हणावयाचा! मात्र हा मुलूख तोडून घेतांना अिंग्रजांनीं कारण अगदीं सोज्वळ सांगितलें. तें असें कीं, बुंदेले लोक हे फार आडदांड, दंगाधोपा करतात, त्यांच्या बंदोबस्तासाठीं सैन्य ठेवणें भाग आहे, व तो खर्च झांशीनें सोसावा असें इंग्रजांचें आग्रहाचें सांगणें आहे.

आणि गंगाधररावांना इंग्रजांची भीड मोडवली नाहीं, त्यांच्या आग्रहाला नकार देववला नाहीं. त्यांनीं इंग्रजांना हवा तसा करार त्यांच्याशीं करून व हवा तेवढा मुलुख त्यांना तोडून देऊन झांशीची मुख्त्यारी मिळविली.

गंगाधररावांचा एकंदर जीवनवृत्तांत ध्यानीं घेतला, तर त्याला जागोजागीं परोपरीच्या संशयाच्या भेगा पडलेल्या, व शंकाकुशंकांचीं जळमटें त्यावर दाटलेलीं दिसतात. आणि तशा भेगाळलेल्या व जळमटलेल्या स्थितींतच त्यांचा जीवनवृत्तांत सुरू होतो आणि संपतोही. या सगळ्याची परस्पर वजाबाकी व फिटंफाट केली तर गंगाधररावाच्या कारकीर्दीत झांशीच्या राज्याची फारशी भरभराट झाली नसली तरी रघुनाथरावाच्या कारकीर्दीतल्यासारखी फारशी दैना तरी झालेली दिसून येत नाहीं. कांहींशी आबादीआबादच दिसून येते. त्यांना मुख्त्यारी देतेवेळीं इंग्रज व्यवस्थापकानें झांशीच्या खजिन्यांत सुमारें तीस लाख रुपये शिल्लक ठेवली होती, त्या संपत्तीचा संस्थानच्या भावी सुस्थितीशीं संबंध येत असला तरीदेखील गंगाधररावांनीं आपल्या हयातींत राज्य बरें केलें, अथवा राज्य बरें झालें, असें म्हणावयाला हरकत नाहीं.

राज्यकर्ता ह्या दृष्टीनें गंगाधररावांच्या जीवनाचें एवढें समालोचन पुरेसें होईल. पण इतिहासांत त्यांना ते सुप्रसिद्ध राणी लक्ष्मीचे पति म्हणून स्थान आहे, व राणीचें वैवाहिक जीवन हें तिच्या एकंदर जीवितकार्याचा आढावा घेतांना प्रामुख्यानें जमेला धरावें लागतें. इतिहास लक्ष्मीला आज झांशीची राणी म्हणून ओळखतो, व तिच्या जीवनांतील सर्व यशापयशाची निष्पत्ति तिच्या राणीपणामुळेंच झाली आहे. अर्थात् 'राणी झाली नसती तर', व 'राणी झाल्यामुळें' अशी तिच्या जीवितकार्याची दुहेरी छाननी इतिहास-

कथनांत अत्यंत महत्त्वाची आहे. म्हणूनच 'कुमारी मनुताई तांबे' यांची 'झांशीची राणी श्री. सौ. लक्ष्मीबाईसाहेब' कशी झाली, हा राणीपणाचा मुकुट तिच्या मस्तकावर चढला तो सोनेरी होता कीं कांटेरी होता, वगैरे अनेक जिव्हाळ्याच्या प्रश्नांची फोड करण्यासाठीं गंगाधररावांचें खासगी वैयक्तिक जीवन नजरेखालीं घालणें भाग आहे.

गंगाधररावांना इंग्रजांनीं झांशीच्या गादीवर स्थापन केलें, त्या सुमाराला त्यांचें वय पस्तीस ते चाळीस वर्षांच्या सुमारानें असावें, हें आपण मागें पाहिलेंच आहे. बुंदेलखंडांतील बहुतेक संस्थानिक त्यांना 'काका' म्हणत व वडीलकीचा मान देत असत, त्यावरूनही ते गादीवर आले तेव्हां प्रौढत्व पावलेले असावे असेंच अनुमान निघतें.

गंगाधररावांचा एकंदर स्वभाव तऱ्हेवाईक, विचित्र, व अपवादभूत होता, असें त्यांच्याविषयीं उपलब्ध असलेल्या एकंदर माहितीवरून व किंवदन्तीवरून दिसून येतें. ते वंदनीय राणी लक्ष्मीचे पति म्हणून भावनावश होऊन कोणींही त्यांचीं रसभरित यशोगीतें गावीं. पण भावनावशता म्हणजे कार्यकारणभाव नव्हे व काव्यकल्पनांच्या भराऱ्या म्हणजे वस्तुस्थिति कथन करणारा इतिहास नव्हे. एकोणिसाव्या शतकांतील हिंदी सरंजामदार वर्ग म्हणजे वठलेला वृक्ष हें तर खरेंच. असल्या वठलेल्या वृक्षावरील अंकुर वाढून फोंफावत नसले, वृक्षाच्या खोडांतून जीवनरसाचा पुरवठा न झाल्यामुळें ते कांहीं काळानें करपून जाणारे असले, तरी त्या अंकुरांच्या असल्या क्षणभंगुर जीवनांतही हिरवळीची व नाजुकपणाची क्षीण रम्यता आढळते. झांशीची राणी लक्ष्मी हा सरंजामदार वर्गाच्या वठलेल्या वृक्षावरील एक क्षणभंगुर पण नाजुक हिरवळीनें शोभणारा असा जिवंत अंकुर होता. तो कसा तें आपण पुढें पाहूंच. सरंजामदार वर्ग तेव्हां नष्टप्राय व नष्ट होण्याच्या लायकीचा असला तरी त्यांतही राणी लक्ष्मीसारख्या तेजस्वी व्यक्ती मुळींच नसतील असें नाहीं. असल्या अपवादात्मक व्यक्तिमहात्म्याची ऐतिहासिक सत्य पर्वा करीत नाहीं, व असल्या तुरळक सरंजामदारांचें तेव्हां भांडवलशाहीसमोर कांहीं चाललें नाहीं, हें निराळें. पण गंगाधररावांची कारकीर्द अशा तेजस्वी अपवादांपैकीं होती असेंही म्हणतां येत नाहीं. हिंदुस्थानांत तेव्हां इतके सरंजामदार वाडवडिलांची मालमत्ता म्हणून नकर्तेपणानें बुरसलेलें

[stamp]

राजवैभव भोगीत होते, त्यांतले गंगाधरराव हे एक. त्यांच्या कारकीर्दींत ठळकपणानें चांगुलपणा दिसत असेल तर तो एवढाच कीं त्यांचे चुलते रघुनाथराव यांनीं राजलक्ष्मीची जशी विटंबना केली तशी त्यांनीं केली नाहीं. रघुनाथरावाच्या राज्याचें उत्पन्न चौथ्या हिश्श्यावर आलें, राज्यांतील बराच मुलुख सावकारांकडे गहाण पडला; पण त्याच राजवटींत त्यांच्या गजरा नांवाच्या नाटकशाळेची प्रतिष्ठा अतिशय वाढली. इतकेंच नव्हे तर ती गजरा मेल्यावर झांशीच्या किल्ल्यावर तिची कबर बांधली जाऊन तेथें दर गुरुवारीं त्या कबरीसमोर मोठी यात्रा भरूं लागली. त्या कबरीच्या खर्चासाठीं दीड हजार रुपयांचा एक गांव इनाम तोडून देण्यांत आला होता; व तें इनाम अद्यापिही चालत असेल! एका बाजूनें कष्टाळू रयत रुपयांतील चार आणे वसूल देण्यालाही असमर्थ ठरण्याइतकी कंगाल व्हावी, आणि दुसऱ्या बाजूनें नादान राजाची नाटकशाळा होऊन मिरवणाऱ्या स्त्रीच्या थडग्यापुढें सालीना दीड हजार रुपयांची खैरात व्हावी! आणि हे दीड हजार रुपये कुठचे? तर त्या गांवच्या शेतकऱ्यांनीं आपल्या घामाची पांवळी पाडून पिकविलेले! असें कांहीं गंगाधररावांनीं केलें नाहीं हे त्यांचे झांशीच्या रयतेवर उपकारच म्हणावयाचे! नाहींतर म्हणतात त्यांतली अवस्था; राजानें मारलें आणि पावसानें भिजवलें, दाद कोणापाशीं मागायची आणि फिर्याद कोणापाशीं करायची?

बावनकशी कर्तृत्व ज्याला म्हणतां येईल, तें गंगाधररावांच्या जीवनांत बहुतेक अभावानें तळपत असलें तरी त्याबद्दल त्यांना कोणीं दोष द्यावयाला नको. तेव्हां सरंजामदार वर्गांत घरोघर त्याच मातीच्या चुली होत्या. तशा स्थितींतही गंगाधररावांना तत्कालीन बुंदेलखंडदेशीय संस्थानिकांत बराच मान होता. मूळपासून झांशी संस्थानचें नांव मोठें, तेथील राजाला मान्यता मोठी, इंग्रजांनींदेखील बुंदेलखंडांत आपल्या अधिकाराची घडी नीट बसविण्यासाठीं वेळोवेळीं झांशीकरांचेंच साह्य घेतलेलें, अशा अनेक पूर्वकारणांमुळें झांशीच्या गादीवर असलेल्या कोणाही पुरुषाला केवळ नव्हे तर त्या गादीला मान देणें हें तेथील इतर संस्थानिकांचें परंपरानिगडित कर्तव्य होतें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. पेशवाईच्या पडत्या काळांत व पेशवाई बुडाल्यावर देखील पेशव्यांविषयीं झांशीच्या राजवंशानें पेशव्यांच्या वंशाविषयीं आदरभाव बाळगला, अथवा आज शिवशाहीच्या सावलीला

कथनांत अत्यंत महत्त्वाची आहे. म्हणूनच 'कुमारी मनुताई तांबे' यांची 'झांशीची राणी श्री. सौ. लक्ष्मीबाईसाहेब' कशी झाली, हा राणीपणाचा मुकुट तिच्या मस्तकावर चढला तो सोनेरी होता कीं कांटेरी होता, वगैरे अनेक जिव्हाळ्याच्या प्रश्नांची फोड करण्यासाठीं गंगाधररावांचें खासगी वैयक्तिक जीवन नजरेखालीं घालणें भाग आहे.

गंगाधररावांना इंग्रजांनीं झांशीच्या गादीवर स्थापन केलें, त्या सुमाराला त्यांचें वय पस्तीस ते चाळीस वर्षांच्या सुमारानें असावें, हें आपण मागें पाहिलेंच आहे. बुंदेलखंडांतील बहुतेक संस्थानिक त्यांना 'काका' म्हणत व वडीलकीचा मान देत असत, त्यावरूनही ते गादीवर आले तेव्हां प्रौढत्व पावलेले असावे असेंच अनुमान निघतें.

गंगाधररावांचा एकंदर स्वभाव तऱ्हेवाईक, विचित्र, व अपवादभूत होता, असें त्यांच्याविषयीं उपलब्ध असलेल्या एकंदर माहितीवरून व किं-वदन्तीवरून दिसून येतें. ते वंदनीय राणी लक्ष्मीचे पति म्हणून भावनावश होऊन कोणींही त्यांचीं रसभरित यशोगीतें गावीं. पण भावनावशता म्हणजे कार्यकारणभाव नव्हे व काव्यकल्पनांच्या भराऱ्या म्हणजे वस्तुस्थिति कथन करणारा इतिहास नव्हे. एकोणिसाव्या शतकांतील हिंदी सरंजामदार वर्ग म्हणजे वठलेला वृक्ष हें तर खरेंच. असल्या वठलेल्या वृक्षावरील अंकुर वाढून फोंफावत नसले, वृक्षाच्या खोडांतून जीवनरसाचा पुरवठा न झाल्या-मुळें ते कांहीं काळानें करपून जाणारे असले, तरी त्या अंकुरांच्या असल्या क्षणभंगुर जीवनांतही हिरवळीची व नाजुकपणाची क्षीण रम्यता आढळते. झांशीची राणी लक्ष्मी हा सरंजामदार वर्गाच्या वठलेल्या वृक्षावरील एक क्षणभंगुर पण नाजुक हिरवळीनें शोभणारा असा जिवंत अंकुर होता. तो कसा तें आपण पुढें पाहूंच. सरंजामदार वर्ग तेव्हां नष्टप्राय व नष्ट होण्याच्या लायकीचा असला तरी त्यांतही राणी लक्ष्मीसारख्या तेजस्वी व्यक्ती मुळींच नसतील असें नाहीं. असल्या अपवादात्मक व्यक्तिमहात्म्याची ऐतिहासिक सत्य पर्वा करीत नाहीं, व असल्या तुरळक सरंजामदारांचें तेव्हां भांडवलशाही-समोर कांहीं चाललें नाहीं, हें निराळें. पण गंगाधररावांची कारकीर्द अशा तेजस्वी अपवादांपैकीं होती असेंही म्हणतां येत नाहीं. हिंदुस्थानांत तेव्हां इतके सरंजामदार वाडवडिलांची मालमत्ता म्हणून नकर्तेपणानें बुरसलेलें

संचित... क्र. २५८७

राजवैभव भोगीत होते, त्यांतले गंगाधरराव हे एक. त्यांच्या कारकीर्दीत ठळकपणानें चांगुलपणा दिसत असेल तर तो एवढाच कीं त्यांचे चुलते रघुनाथराव यांनीं राजलक्ष्मीची जशी विटंबना केली तशी त्यांनीं केली नाहीं. रघुनाथरावाच्या राज्याचें उत्पन्न चौथ्या हिश्श्यावर आलें, राज्यांतील बराच मुलुख सावकारांकडे गहाण पडला; पण त्याच राजवटींत त्यांच्या गजरा नांवाच्या नाटकशाळेची प्रतिष्ठा अतिशय वाढली. इतकेंच नव्हे तर ती गजरा मेल्यावर झांशीच्या किल्ल्यावर तिची कबर बांधली जाऊन तेथें दर गुरुवारीं त्या कबरीसमोर मोठी यात्रा भरूं लागली. त्या कबरीच्या खर्चासाठीं दीड हजार रुपयांचा एक गांव इनाम तोडून देण्यांत आला होता; व तें इनाम अद्यापिही चालत असेल! एका बाजूनें कष्टाळू रयत रुपयांतील चार आणे वसूल देण्यालाही असमर्थ ठरण्याइतकी कंगाल व्हावी, आणि दुसऱ्या बाजूनें नादान राजाची नाटकशाळा होऊन मिरवणाऱ्या स्त्रीच्या थडग्यापुढें सालीना दीड हजार रुपयांची खैरात व्हावी! आणि हे दीड हजार रुपये कुठचे? तर त्या गांवच्या शेतकऱ्यांनीं आपल्या घामाची पांवळी पाडून पिकविलेले! असें कांहीं गंगाधररावांनीं केलें नाहीं हे त्यांचे झांशीच्या रयतेवर उपकारच म्हणावयाचे! नाहींतर म्हणतात त्यांतली अवस्था; राजानें मारलें आणि पावसानें भिजवलें, दाद कोणापाशीं मागायची आणि फिर्याद कोणापाशीं करायची?

बावनकशी कर्तृत्व ज्याला म्हणतां येईल, तें गंगाधररावांच्या जीवनांत बहुतेक अभावानें तळपत असलें तरी त्याबद्दल त्यांना कोणीं दोष द्यावयाला नको. तेव्हां सरंजामदार वर्गांत घरोघर त्याच मातीच्या चुली होत्या. तशा स्थितींतही गंगाधररावांना तत्कालीन बुंदेलखंडदेशीय संस्थानिकांत बराच मान होता. मूळपासून झांशी संस्थानचें नांव मोठें, तेथील राजाला मान्यता मोठी, इंग्रजांनींदेखील बुंदेलखंडांत आपल्या अधिकाराची घडी नीट बसविण्यासाठीं वेळोवेळीं झांशीकरांचेंच साह्य घेतलेलें, अशा अनेक पूर्वकारणांमुळें झांशीच्या गादीवर असलेल्या कोणाही पुरुषाला केवळ नव्हे तर त्या गादीला मान देणें हें तेथील इतर संस्थानिकांचें परंपरानिगडित कर्तव्य होतें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. पेशवाईच्या पडत्या काळांत व पेशवाई बुडाल्यावर देखील पेशव्यांविषयीं झांशीच्या राजवंशानें पेशव्यांच्या वंशाविषयीं आदरभाव बाळगला, अथवा आज शिवशाहीच्या सावलीला

एका काळीं वाढून वैभवाला चढलेल्या विद्यमान मराठा संस्थानिकांकडून शिवछत्रपतींच्या वंशजांना मान दिला जातो, याच्या मुळाशींदेखील परंपरा-निगडित कृतज्ञताच आहे. तसा मानही गंगाधररावांच्या वांट्याला आला असेल.

गंगाधररावांच्या स्वाभिमानी बाण्याच्या कांहीं लोकवार्ता प्रचलित आहेत. त्यांतील एक अशी:–'एके वर्षी दसरा रविवारीं पडला. कांटिंजेंट फौज ठरावाप्रमाणें यावयाची ती न आली. त्या फौजेचे प्रमुख स्लीमन यांनीं सांगून पाठविलें कीं आज रविवार, आम्ही कमर कसीत नाहीं. त्याजला हुकूम पाठविला कीं, माझे मुलाजमकी तनखेबद्दल मुलुख दिला तेव्हां ठरावाप्रमाणें फौजेसह यावें, नाहींपेक्षां आजचे मुहूर्तानें मुलुखावर जप्ती पाठवितों. असें हलकाऱ्याच्या हातीं सांगोन हत्तीवर बसून हत्ती उभा ठेवला. त्यामुळें स्लीमनसाहेबास फौजेसह येणें भाग पडलें.'

या एका लोकवार्तेंत गंगाधररावांचा स्वाभिमानी बाणा जसा दिसून येतो, तसेंच इंग्रजांच्या तैनाती फौजेची तेव्हां हिंदी संस्थानिकांच्या राज्यकारभाराच्या शरिरांतील प्राणघातक काळपुळीसारखी अवस्था असल्याचेंही दिसून येतें.

एकदां इ. स. १८५० या वर्षी अर्थात् राणी लक्ष्मीशीं त्यांचें लग्न झाल्यानंतर ते सहकुटुंब सहपरिवार काशीयात्रेला गेले असतां तेथील अधिकारी त्यांना सामोरा आला नाहीं. या अपमानाबद्दल गंगाधररावांनीं कलकत्तेकर इंग्रजांना लिहून त्या अधिकाऱ्याला माफी मागावयाला लावलें असें म्हणतात.

ह्या बाणेदारपणाच्या गोष्टींप्रमाणेंच विक्षिप्तपणाची एक गोष्ट सांगतां येण्याजोगी आहे. तीही काशीलाच घडलेली आहे. गंगाधरराव काशीयात्रेला गेले असतांना राजेंद्रबाबू या नांवाचा कोणी एक फार मोठा बंगाली बाबू अधिकारी तेथें होता. त्यानें गंगाधररावांना खडी ताजीम न देतां मोठ्या गर्विष्ठपणानें त्यांची अमर्यादा केली. हें पाहतांच गंगाधररावांनीं बाबूजींना धरून कांहीं वेळपावेतों काखेंत हात घालून उभें केलें. पुढें बाबूजींनीं कलकत्त्याला इंग्रजांकडे अर्ज केला. तेव्हां तिकडून बाबूजींना लिहून आलें कीं, 'महाराज गंगाधरराव हे राजे आहेत. तुम्हांस त्यांस खडी ताजीम द्यावयाची नव्हती तर तुम्ही आपल्या घरीं बसावयाचें होतें.'

याही लोकवार्तेतूत मनाला जाणवणाऱ्या गंगाधररावांच्या विक्षिप्त बाणेदारपणांत एक प्रकारचा भेसूरपणा दिसून येतो. बंगाली बाबू अधिकारी आपल्याच एका परंपरागत उच्च स्थानाधिष्ठित देशबांधवासमोर मान नमविण्याचें नाकारतो, याचें कारण त्या अधिकाऱ्याच्या दृष्टीनें गंगाधररावांच्या ठायीं योग्य आदरविषयाचा अभाव हेंच असणार. आणि कलकत्तेकर इंग्रजांनीं देखील बंगाली बाबूंना जें उत्तर दिलें, त्याचा अर्थ हिंदी राजेरजवाडे म्हणजे हास्यास्पद बुजगावणीं होत असाच होतो. गंगाधररावांनीं बंगाली बाबूला त्याच्या चुकीची जाणीव करून देण्यासाठीं जो उपाय अंमलांत आणला, तोही शिष्टसंमत व सौजन्यपूर्ण होता असें नाहीं. अशा स्थितींत दरवेशाच्या हातीं अस्वलाला जो मान तोच मान अिंग्रजांच्या राजवटींत गंगाधररावांना मिळत होता, असाच निष्कर्ष निघतो.

पण पुढें जी गोष्ट सांगावयाची, ती मात्र राणी लक्ष्मीचें नांव आठवून विचार करतां कोणाच्याही मनाला चरका देणारी व हळहळ लावणारी आहे. गंगाधररावांवर जनानीपणाचा दुष्ट आरोप करणारी ती गोष्ट आहे. गंगाधरराव जेव्हां तेव्हां स्त्रीवेश घेऊन हातांत बांगड्या भरीत असत, ते बांगड्या भरून ताबुतांसमोर नाचत असत, अशा त्या दुष्ट वार्ता होत्या. या दुष्ट वार्तांतून ध्वनित होणाऱ्या महाराजांच्या अंगच्या दोषाला पुष्टी देणारा पुरावा 'तीर्थयात्राप्रबंध' या पुस्तकांत सांपडतो. काशीयात्रेला गंगाधरराव गेल्या वेळचीच गोष्ट. सरदार अण्णासाहेब विंचूरकर हेही तेव्हांच काशीयात्रेला गेले होते. त्यांची व गंगाधररावांची काशींत प्रथमच भेट झाली. त्या भेटींत अण्णासाहेबांचा गंगाधररावांविषयीं जो ग्रह झाला, त्याविषयीं वरील प्रबंधांत 'या मोठ्या संस्थानिक पुरुषाची स्थिति व लोकरीतीहून कांहींसा वेगळाच आचार पाहून आश्चर्य वाटलें' असें म्हटलें आहे. या 'चक्षुर्वैसत्यं' अभिप्रायाचा वर दिलेल्या दुष्ट लोकवार्तेशीं अर्थानें कांहीं संबंध असो अथवा नसो, पण गंगाधररावांचा आचार लोकरीतीहून कांहीं वेगळाच आहे असें लोकांना वाटण्यासारखें त्यांचें आचरण केव्हां केव्हां घडे असें तरी यावरून सिद्ध होतें.

आतां, गंगाधरराव बांगड्या भरीत असल्याची जी लोकवार्ता तेव्हां प्रचलित होती, ती दुष्ट असली तरी सर्वत्र पसरली होती खास. [ खुद्द गंगाधर-

एका काळीं वाढून वैभवाला चढलेल्या विद्यमान मराठा संस्थानिकांकडून शिवछत्रपतींच्या वंशजांना मान दिला जातो, याच्या मुळाशींदेखील परंपरा-निगडित कृतज्ञताच आहे. तसा मानही गंगाधररावांच्या वांट्याला आला असेल.

गंगाधररावांच्या स्वाभिमानी बाण्याच्या कांहीं लोकवार्ता प्रचलित आहेत. त्यांतील एक अशीः—'एके वर्षी दसरा रविवारीं पडला. कांटिंजेंट फौज ठरावाप्रमाणें यावयाची ती न आली. त्या फौजेचे प्रमुख स्लीमन यांनीं सांगून पाठविलें कीं आज रविवार, आम्ही कमर कसीत नाहीं. त्याजला हुकूम पाठविला कीं, माझे मुलाजमकी तनखेबद्दल मुलुख दिला तेव्हां ठरावाप्रमाणें फौजेसह यावें, नाहींपेक्षां आजचे मुहूर्तानें मुलुखावर जप्ती पाठवितों. असें हलकाऱ्याच्या हातीं सांगोन हत्तीवर बसून हत्ती उभा ठेवला. त्यामुळें स्लीमनसाहेबास फौजेसह येणें भाग पडलें.'

या एका लोकवार्तेंत गंगाधररावांचा स्वाभिमानी बाणा जसा दिसून येतो, तसेंच इंग्रजांच्या तैनाती फौजेची तेव्हां हिंदी संस्थानिकांच्या राज्यकारभाराच्या शरिरांतील प्राणघातक काळपुळीसारखी अवस्था असल्याचेंही दिसून येतें.

एकदां इ. स. १८५० या वर्षी अर्थात् राणी लक्ष्मीशीं त्यांचें लग्न झाल्यानंतर ते सहकुटुंब सहपरिवार काशीयात्रेला गेले असतां तेथील अधिकारी त्यांना सामोरा आला नाहीं. या अपमानाबद्दल गंगाधररावांनीं कलकत्तेकर इंग्रजांना लिहून त्या अधिकाऱ्याला माफी मागावयाला लावलें असें म्हणतात.

ह्या बाणेदारपणाच्या गोष्टींप्रमाणेंच विक्षिप्तपणाची एक गोष्ट सांगतां येण्याजोगी आहे. तीही काशीलाच घडलेली आहे. गंगाधरराव काशीयात्रेला गेले असतांना राजेंद्रबाबू या नांवाचा कोणी एक फार मोठा बंगाली बाबू अधिकारी तेथें होता. त्यानें गंगाधररावांना खडी ताजीम न देतां मोठ्या गर्विष्ठपणानें त्यांची अमर्यादा केली. हें पाहतांच गंगाधररावांनीं बाबूजींना धरून कांहीं वेळपावेतों काखेंत हात घालून उभें केलें. पुढें बाबूजींनीं कलकत्त्याला इंग्रजांकडे अर्ज केला. तेव्हां तिकडून बाबूजींना लिहून आलें कीं, 'महाराज गंगाधरराव हे राजे आहेत. तुम्हांस त्यांस खडी ताजीम द्यावयाची नव्हती तर तुम्ही आपल्या घरीं बसावयाचें होतें.'

याही लोकवार्तेंतूत मनाला जाणवणाऱ्या गंगाधररावांच्या विक्षिप्त बाणेदारपणांत एक प्रकारचा भेसूरपणा दिसून येतो. बंगाली बाबू अधिकारी आपल्याच एका परंपरागत उच्च स्थानाधिष्ठित देशबांधवासमोर मान नमविण्याचें नाकारतो, याचें कारण त्या अधिकाऱ्याच्या दृष्टीनें गंगाधररावांच्या ठायीं योग्य आदरविषयाचा अभाव हेंच असणार. आणि कलकत्तेकर इंग्रजांनीं देखील बंगाली बाबूंना जें उत्तर दिलें, त्याचा अर्थ हिंदी राजेरजवाडे म्हणजे हास्यास्पद बुजगावणीं होत असाच होतो. गंगाधररावांनीं बंगाली बाबूला त्याच्या चुकीची जाणीव करून देण्यासाठीं जो उपाय अंमलांत आणला, तोही शिष्टसंमत व सौजन्यपूर्ण होता असें नाहीं. अशा स्थितींत दरवेशाच्या हातीं अस्वलाला जो मान तोच मान अिंग्रजांच्या राजवटींत गंगाधररावांना मिळत होता, असाच निष्कर्ष निघतो.

पण पुढें जी गोष्ट सांगावयाची, ती मात्र राणी लक्ष्मीचें नांव आठवून विचार करतां कोणाच्याही मनाला चरका देणारी व हळहळ लावणारी आहे. गंगाधररावांवर जनानीपणाचा दुष्ट आरोप करणारी ती गोष्ट आहे. गंगाधरराव जेव्हां तेव्हां स्त्रीवेश घेऊन हातांत बांगड्या भरीत असत, ते बांगड्या भरून ताबुतांसमोर नाचत असत, अशा त्या दुष्ट वार्ता होत्या. या दुष्ट वार्तांतून ध्वनित होणाऱ्या महाराजांच्या अंगच्या दोषाला पुष्टी देणारा पुरावा 'तीर्थयात्राप्रबंध' या पुस्तकांत सांपडतो. काशीयात्रेला गंगाधरराव गेल्या वेळचीच गोष्ट. सरदार अण्णासाहेब विंचूरकर हेही तेव्हांच काशीयात्रेला गेले होते. त्यांची व गंगाधररावांची काशींत प्रथमच भेट झाली. त्या भेटींत अण्णासाहेबांचा गंगाधररावांविषयीं जो ग्रह झाला, त्याविषयीं वरील प्रबंधांत '·या मोठ्या संस्थानिक पुरुषाची स्थिति व लोकरीतीहून कांहींसा वेगळाच आचार पाहून आश्चर्य वाटलें' असें म्हटलें आहे. या 'चक्षुर्वैसत्यं' अभिप्रायाचा वर दिलेल्या दुष्ट लोकवार्तेशीं अर्थानें कांहीं संबंध असो अथवा नसो, पण गंगाधररावांचा आचार लोकरीतीहून कांहीं वेगळाच आहे असें लोकांना वाटण्यासारखें त्यांचें आचरण केव्हां केव्हां घडे असें तरी यावरून सिद्ध होतें.

आतां, गंगाधरराव बांगड्या भरीत असल्याची जी लोकवार्ता तेव्हां प्रचलित होती, ती दुष्ट असली तरी सर्वत्र पसरली होती खास. [ खुद्द गंगाधर-

रावांचे दत्तक पुत्र दामोदरराव यांनीं कै. पारसनीस यांना पुरविलेली माहिती जमेला धरली तरी सदर लोकवार्तेला अंशतः पुष्टीच मिळते. दामोदररावांचा खुलासा कीं, 'दत्तकाची नामंजुरी झाल्यावर बाबासाहेब आजारी असतां रेसिडेंट मेजर एलिस व डॉ. एलन भेटण्यास आले. त्या वेळेस रीतीप्रमाणें साहेबानें मिजाजपुरसी केली. त्याच्या जबाबांत बाबासाहेबांनीं कळविलें कीं 'आतां आम्ही बायका (हतवीर्य) झालों, आमची हाल विचारण्यांत काय फायदा?' यावरून गंगाधररावांविषयींच्या 'बांगडी' प्रकाराबाबतच्या आख्यायिकेला कोठें तरी मूळ आहे, व पुढें त्या प्रकारचा 'पराचा कावळा' झालेला आहे, एवढें दामोदररावांनीं--त्यांच्या प्रत्यक्ष पुत्रानें दिलेल्या प्रच्छन्न कबुलीवरून तरी मुळींच मानावयाला हरकत नाहीं. पण अशी दुष्ट लोकवार्ता उठण्याचें कारण म्हणून जें दामोदररावांनीं सांगितलें आहे, तें मात्र चुकीचें असून सारवासारवीच्या स्वरुपाचें दिसतें. गंगाधररावांचा दत्तक नामंजूर झाला तो गंगाधररावांच्या पश्चात्! गंगाधररावांचें देहावसान ता. २१ नोव्हेंबर सन १८५३ रोजीं झालें. त्याच्या केवळ एकच दिवस अगोदर त्यांनीं दामोदरराव ऊर्फ आनंदराव यांना दत्तक घेतलें होतें राणीनें ता. ३ डिसेंबर सन १८५३ रोजीं हा दत्तक मंजूर होण्याबद्दल खलिता वरील इंग्रज अधिकाऱ्यांकडे रवाना केला. तेव्हांपासून या दत्तक प्रकरणीं उभय पक्षीं कमालीच्या वाटाघाटी होऊन अखेर ता. २७ फेब्रुवारी सन १८५४ मध्यें गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यानें दत्तक कायमचा नामंजूर करून झांशीचें राज्य खालसा केलें. याप्रमाणें दत्तकाच्या मंजुरीचा प्रश्न गंगाधररावांच्या मृत्यूनंतर निकालांत निघाला असतांना गंगाधरराव त्याबद्दल इंग्रज अधिकाऱ्यांपाशीं 'आम्ही बायका (हतवीर्य) झालों असे उद्गार कोठून काढणार? यापेक्षां ह्या मर्मभेदक प्रश्नाचा जास्त विचार न करणें चांगलें!

गंगाधररावांविषयींच्या ह्या लोकवार्ता त्यांतील गाळींव व निर्भेळ अशा अल्प सत्यांशापुरत्या ध्यानीं आणल्या, व हेच गंगाधरराव राणी लक्ष्मीचे पति होत हें सत्य ध्यानीं आणलें, तरी ज्याच्या मनांत अनेक परींची कालबाकालव होणार नाहीं असा जिवंत मनुष्यप्राणीच सांपडणार नाहीं.

हा गंगाधररावांच्या लग्नाचा बनावही अत्यंत विस्मयजनक असाच घडून आला, गंगाधररावांचें पहिलें लग्न कधीं झालें होतें वगैरे कांहीं माहिती

निश्चित अशी उपलब्ध नाहीं. तथापि मनूताईशीं त्यांचें लग्न झालें हें दुसरें एवढें मात्र निश्चित. आणि हें लग्नही परिश्रमपूर्वक जुळून आलें. गंगाधरराव दुसऱ्या लग्नाच्या वेळीं मनूताईच्या मानानें बरेच वयस्क होते. हें लग्न ठरण्यापूर्वी केव्हां त्यांना विधुरावस्था प्राप्त झाली, तें दुःख त्यांना किती दिवस भोगावें लागलें, वगैरे गोष्टींचा निश्चित सुगावा लागत नाहीं परंतु एवढें मात्र निश्चित कीं मनूताई सहासात वर्षांच्या असतांनाच गंगाधररावांसाठीं वधूसंशोधनाच्या मोहिमेवर निघालेल्या मंडळींची टोळधाड मनूताईवर आली, व लगेच एका वर्षांत लग्न लागलें देखील! अर्थात् लग्नांत मनूताईचें वय सात आठ वर्षांचें फार तर असेल.

मनूताईचे वडील मोरोपंत तांबे हे काशीला शेवटच्या रावबाजींचे बंधु चिमाजीअप्पा यांचे मूळचे आश्रित. मनूताई चार वर्षांच्या असतांनाच त्यांची आई हा लोक सोडून गेली. याच सुमाराला मोरोपंतांचे अन्नदाते अप्पासाहेब हेही निवर्तले. त्यामुळें त्यांना पोट पाटीशीं बांधून ब्रह्मावर्ताला रावबाजींच्या आश्रयाला जावें लागलें. मनूताई उपजतच चलाख, पाणीदार, सुंदर, धीट व ठसठशीत अशी होती. तिच्या चपळपणावरून वाड्यांतील लोक तिला कौतुकानें 'छबेली' म्हणत असत. रावबाजीला पोटीं औरस पुत्रसंतान नव्हतें. पण म्हणून त्यानें नाउमेद न होतां एकामागून एक नानासाहेब, दादासाहेब, बाळासाहेब असे तिघे मुलगे दत्तक घेतले होते. हे मुलगे तेव्हां वयानें लहान असल्यानें ते मनूबाईला आयतेच खेळगडी लाभले. त्या श्रीमंतपुत्रांच्या सहवासांत तिला परोपरीचे मर्दानी खेळ शिकतां आले, लिहितां वाचतांही तिला तेथेंच येऊं लागलें. ह्या श्रीमंती सहवासांत एक विशेष परिणाम मनूबाईच्या मनावर झाला तो हा कीं आपणही असेंच श्रीमंती वैभव भोगावें, हत्ती-घोडे-पालखींतून मिरवावें व आयुष्याची चैन करावी. मनूताईच्या लहानपणींच्या ज्या कांहीं आख्यायिका, ज्या तिच्या भावी राणीपणाचीं चिन्हें म्हणून सांगण्यांत येतात, त्या खऱ्या असल्या पाहिजेत यांत संशय नाहीं. मात्र त्यांत सूक्ष्म व चिकित्सक बुद्धीच्या माणसाला चुकचुकण्यासारखा बराच भाग आहे.

रावबाजी काय अथवा त्याचे दत्तक चिरंजीव काय, ब्रह्मावर्तांत मेलेलें अन्न खाऊन मेलेलें जिणें जगत होते. त्यांचें त्यांना त्या जिण्यांत भूषण

वाटत असेल; पण खावयाला काळ व भुईला भार असलें तें लाजिरवाणें जिणें होतें. हिंदी सरंजामदार वर्गाच्या तेव्हांच्या क्रमप्राप्त निकृष्टावस्थेचें तें एक ठळक प्रतिक होतें. धड मान सन्मान नाहीं, धड पराक्रमाला जागा नाहीं, असलें डबक्यांतल्या बेडकांसारखें आयुष्य कंठण्यांत भूषण तें काय?

मागें सांगितल्याप्रमाणें मनूताईचा जन्म मुळांत कांहीं असलें मेलेलें वैभव भोगण्याचीं साधनें उपलब्ध असलेल्या सरंजामदार वर्गांत झाला नव्हता. गरीब मध्यम वर्गांतील एक सामान्य व्यक्ति असे मोरोपंत तांबे होते. एखाद्या विक्राळ दरडीच्या उतरंडीवर फुललेल्या सुगंधी फुलवेलीवरील फुलें जशीं परडींतील पानपाचोळयांत पडून कुजून नाश पावतात, तीं कोणत्याही सत्कारणीं लागत नाहींत, अशीच खालच्या मध्यम वर्गांतील लोकांची स्थिति असते, व तशीच स्थिति मनूताईच्या जीविताची झाली. क्रियाहीन, तेजहीन, आत्मविश्वासहीन अशा बडें घर पण पोकळ वांसा शोभणाऱ्या सरंजामदार वर्गाच्या एका घरकुलांत ती येऊन पडली, म्हणून 'सांच पाण्याच्या डबक्यावर घोंगावणाऱ्या माशांतील एक' असलें अनिष्ट वळण तिच्या आयुष्याला लागलें. मेणे पालख्या व हत्तीघोडे तिला तेथें पाहावयाला मिळाले, व तसलें राजवैभव मिळविण्याला रावबाजी अथवा त्यांचे दत्तक पुत्र यांना कांहींही श्रम करावे लागले नसल्याचेंही तिनें पाहिलें. कदाचित् त्या तिच्या चिरमुडल्या वयांतील बाळबुद्धीला तेव्हां तिला स्वतःला न कळत असेंही वाटलें असेल कीं आपणाइतकी हुषारी व तरतरी ज्यांच्या अंगीं नाहीं, त्यांना इतकें ऐषआरामाचें जीवन कंठतां येतें, मग आपणाला कां येऊं नये? आणि विनाश्रम असले ऐषआराम भोगतां येतात याचें प्रत्यक्ष उदाहरण डोळ्यांसमोर दिसत असल्यावर आपणालाही असलें आयतें वैभव लाभावें असल्या आयतखाऊपणाच्या कल्पनांनीं तिच्या मनांत बाळपणापासून मूळ धरल्यास त्यांत नवल तें काय?

असल्या चमत्कारिक सरंजामशाही वातावरणांत मनूताईचें बाळपण गेलें. ती स्वतः एका सामान्यतः गरीब कारकुनी पेशाच्या बुद्धिजीवि ब्राह्मणाची मुलगी खरी; व असल्या बुद्धिजीवि गरिबांना स्वतःच्या चरितार्थासाठीं धनवंत सावकार-सरंजामदार लोकांच्या तोंडाकडे पाहत बसावें लागतें हाही अनुभव नवा नाहीं. तसले मानहानीचे प्रसंग ब्रह्मावर्तीं मोरोपंतांवर अनेक

वेळां आले असतील, व त्या अपमानाग्नीची झळ मनूबाईसारख्या कोंवळ्या कळीला अनेक वेळां लागली असेल. आपल्या सौंगड्यांना गजान्तलक्ष्मीचा उपभोग घेतां येतो तसा आपणाला कां घेतां येऊं नये असे प्रश्न तिच्या बाळ मनांत रोज रोज उभे राहत असतील. अप्रगल्भ अशा बाळमनाची धाव प्रत्यक्षापलीकडे जाऊं शकत नाहीं. मनूताईनें पाहिलें असेल, एकाच वाड्यांत राहणारीं आम्ही मुलें, मग ते श्रीमंतांचे व मी गरिबाची कां? वैभव मिळविण्यासाठीं कोणीच कांहीं श्रम करीत नाहीं, मग ते आमचे धनी आणि आम्ही त्यांचे आश्रित कां? नानासाहेब काय, दादासाहेब काय, केवळ रावबाजींच्या मांडीवर दत्तक दिले गेले म्हणून ते ह्या राजवैभवाचे धनी ठरले, हा देखावा डोळ्यांसमोर दिसत असतांना आपणालाही असल्या राजवैभवाचा उपभोग कां मिळूं नये? या प्रश्नांनीं तिचें चित्त तिला नकळत पावलोपावलीं विषण्ण होत असेल.

मनूताईविषयींची एक आख्यायिका अशी सांगतात कीं एकदां लहानगे नानासाहेब हत्तीवरून मिरवत निघाले व मनूताईवर रुसण्याची त्यांची श्रीमंती लहर लागल्यामुळें त्यांनीं वडील माणसांचें सांगणें धुडकावूनसुद्धां मनूताईला आपल्याबरोबर हत्तीवर बसूं देण्याचें नाकारलें. त्यामुळें तेजस्वी मनूताई अतिशय हिरमुसली झाली व मनांतल्या मनांत धुसमुसूं लागली. मोरोपंतांनाही तो अपमान जाणवला. त्यांची मुलगी त्यांच्या व जगाच्या दृष्टीनें फार चुणचुणीत असेल, कबूल! ती पेशव्यांच्या दत्तक मुलांपेक्षां प्रत्येक बाबतींत व्यक्तिशः श्रेष्ठ असेल, कबूल! पण सरंजामदारी तिच्या पाठीशीं कोठें उभी होती? बिचारे मोरोपंत! ही अपमानास्पद परिस्थिति त्यांना सहनही होईना व टाळवेनाही. त्यांचें मन अतिशय संत्रस्त झालें. मनांतून त्यांना कितीही वाटलें कीं हें बरें नव्हे. पण उपयोग काय? 'आपण पेशव्यांचे आश्रित असलों तरी आपण कारकुनी फडांत तरी काम करतों. तेवढेंही काम न करतां स्वतः श्रीमंत म्हणून मिरवणारे व आम्हांला गरीब म्हणून हीन लेखणारे हे कोण? केवळ वडिलार्जित संपत्तीवर व स्वदेश विकून मिळविलेल्या वर्षासनावर आयतखाऊपणानें चैन करणाऱ्या सरंजामदार धन्यांची सेवा करणें हें महत्पाप' ही कल्पनाही तेव्हां मोरोपंतांच्या मनांत डोकावली नसेल कशावरून? असली विषमता नष्ट झालीच पाहिजे असेंही

त्यांच्या मनानें तेव्हां घेतलें असेल. पण दुर्बळांचे बोल पचपचित! मनांतला अपमानाग्नि भडकूं द्यावा, असें माणसाला नेहमीं वाटतें. पण तो भडकूं द्यावयाचा झाला तरी त्यापूर्वी सारासार विचार करावा लागतो. नाहींतर त्या अग्नीच्या भडक्यांत स्वतःचीच जळून खाक व्हावयाची! त्यांनीं जर नानासाहेबांना 'असें करूं नये, गरिबांच्या वर्मी घाव घालूं नये' असलीं नीतितत्त्वें पाजण्याला प्रारंभ केला असता, तर नेमका त्यांच्या पोटावर मार बसला असता. हांजी हांजी व जोहुकुमी वर्तन हीच आश्रित वर्गाची कामगिरी, व त्या कामगिरीवर त्याचा आधार अवलंबून असतो. त्या कामगिरीला बाध आणणारें वर्तन आश्रित करूं लागला तर धनी त्याला बरा आश्रय देईल!

नानासाहेबांनीं आपल्या लाडक्या कन्येला असें हिरमुष्टी केलें, हें पाहून मोरोपंतांच्या हृदयाचें पाणी पाणी झालें. आणि खुद्द मनूताईलाही त्याचें कांहींच वाटलें नाहीं असें कसें म्हणतां येईल! ती फार चलाख पोरगी होती; 'ता' म्हणतांच 'ताकभात' ओळखणारी होती. तो अपमान तिच्या मनाला चांगलाच जाणवला. आणि मोरोपंतांनीं जेव्हां 'तुझ्या नशिबीं हत्ती कोठून येणार' असें उद्गार तिच्याकडे पाहून काढले, तेव्हां 'एक सोडून दहा हत्ती माझ्या नशिबीं आहेत' असें रोखठोक उत्तर तिनें दिलें असें म्हणतात

बोलून चालून ही ऐकीव गोष्ट. पण वस्तुस्थितीचा पाठिंबा त्या गोष्टीला आहे. रानबोरीच्या डहाळीला डाळिंबें लागल्यासारखें अथवा कांदा फोडतांच कस्तूरीचा घमघमाट सुटल्यासारखें असंभवनीय त्यांत कांहींच वाटत नाहीं. रावबाजीसारख्या रंगढंगबहादूर विलासवीराच्या वाड्यांत तसल्याच गोष्टी नेहमीं चालावयाच्या व बोलावयाच्या. शिवाय तो सनातनी जुना जमाना! सात वर्षांची मुलगी तेव्हां झाली कीं गळ्याला लागली असें म्हणून मुलीचे लग्न कसें होईल ह्या काळजीचा दगड छातीवर घेऊन जगणारे सनातनी धर्मनिष्ठ व नीतिनिष्ठ तेव्हां पांढरपेशा–त्यांतही विशेषतः ब्राह्मण वर्गांत फार! त्या न्यायानें मनूताई तेव्हां 'उपवर' झाली होती, गळ्याला लागली होती. रिकामटेकड्या श्रीमंतांच्या घरांतील रिकामटेकड्या माणसांना मनूताई ही एक चांगली करमणूक होती. तीं 'नवरा कसा हवा' 'दागिने किती हवे' 'सासू कशी हवी' 'सासरा कसा हवा' असल्या गोष्टी तिला विचारीत व पढवीत असतील. अगदीं लहानपणापासून मनूताईच्या नजरेसमोर

आदर्श ठेवण्यांत आला असेल तर तो हा! आपला बाप गरीब असतांना आपणाला हें वैभव भोगावयाला मिळतें तें कसें, हा विचार तिच्या बाळ मनांत तेव्हां अनेक वेळां आला असेल. असलें सुख आयतें मिळालें तर तें कोणाला नकोसें वाटेल! किंबहुना विनाश्रम जितकें सुख मिळेल तितकें मिळविण्याची प्रवृत्ति सध्यांच्या समाजरचनेंत मूळपासूनच दृढमूल झालेली आहे. या समाजरचनेंतील विस्मयजनक विशेष जो त्या काळीं प्रकर्षानें दिसून येत असे व आजही दिसून येतो तो हा कीं स्त्रियांचें कोणत्याही सभ्य पर्यायानें कां होईना पण मोल ठरावयाचें; ज्या स्त्रीचें जसें सौंदर्य, तसें अधिक मोल तिला यावयाचें. त्या पर्यायांतही पर्याय असे कीं, एखाद्या श्रीमान वयोवृद्धाला लग्न करावयाचें झालें व कोणतीही मुलगी त्याला लग्नाला सहज मिळेनाशी झाली कीं कोरांटीच्या फुलाला गुलाबाचें फूल मानून घेण्याची त्याच्या मनाची तयारी होते. एखादी मुलगी अतिशय सुंदर असली कीं ती कोणी तरी ‘श्रीमंत पतीची राणी’ होण्यासाठींच जणूं काय जन्माला आली आहे असा तिच्या नातलगांचा व आजूबाजूच्या मंडळीचा समज असतो. एखादी मुलगी सुंदर पण गरिबाची असली तर थोडया फार शारिरिक, बौद्धिक अथवा मानसिक वैगुण्यांनीं युक्त असा व वेळीं वयस्कही, पण धनवान् पति तिच्या वांट्याला यावयाचा, हीही गोष्ट पूर्वीच्या काळींच काय पण अगदीं आजकालपावेतों सामान्य आहे. मनूताईही सुंदर होती, ती गरिबाची कन्या होती, व ती वरील सर्वसाधारण सिद्धांताला अपवाद नव्हती. ह्या गोंडस, सुंदर व तरतरीत मुलीला कोणत्या तरी राजघराण्यांत द्यावयाचीच अशा वाटाघाटी रावबाजींच्या वाडयांतील अंतर्गृहांत नेहमीं चालत असतील. त्या मनूताईनें ऐकल्या असतील, व सभोंवारच्या विवाहित श्रीमंती स्त्रियांचे डामडौल पाहून तिलाही वाटूं लागलें असेल कीं माझ्या वांट्यालाही असलीच गजांतलक्ष्मी आहे. लग्न करून श्रीमंत पतीची राणी होणें, यापेक्षां निराळें असें कांहीं कर्तव्य आपणाला आहे असें जर बाळपणापासून तिच्या दृष्टी-समोर आलेंच नाहीं, तर निराळी कल्पना तिच्या मनांत येणार कोठून?

आणि मोरोपंतांनादेखील आपली सुंदर मुलगी ही आपणाला सर्व प्रकारचें ऐहिक सौख्य मिळवून देणारी कामधेनु आहे असेंच वाटलें असेल. त्यांना-देखील आयतें सुख अधिकांत अधिक मिळालें तर तें नकोसें कसें व कां

वाटेल ? मुलीच्या जिवावर नशीब काढतां आलें तर काढावें असा विचार मनांत येणें हा कांहीं माणुसकीचा दाखला नव्हे, व कोणत्याही सज्जन माणसाला ही गोष्ट शोभण्यासारखी नाहीं. परंतु परान्नपुष्ट असें जीवन कंठणाऱ्या गरीब मध्यम वर्गांत सामावणाऱ्या मोरोपंतासारख्या आश्रिताच्या मनांत तशा स्थितींत यापेक्षां निराळे उज्ज्वल विचार यावे तरी कोठून ?

किंबहुना अशा प्रकारचे 'शिष्ट'मान्य विषम विवाह घडून येणें ही वधूपक्ष व वरपक्ष या दोघांच्याही मतलबाची बाब असल्यानें आपल्या 'उपवर' झालेल्या मुलीला असें संपत्तीनें भरघोंस व स्वतःला सोईस्कर स्थळ कोठें सांपडेल हा विचार मनूताईच्या विवाहापूर्वी मोरोपंतांच्या मनांत घोळत असला पाहिजे. आणि असाच विवाहविषयक विचारांचा हलकल्लोळ तेव्हां झांशीचे महाराज गंगाधरराव यांच्या व त्यांच्या आश्रितांच्याही मनांत माजून राहिला असला पाहिजे. मुलगी सुंदर व झांशीच्या राजवैभवाला तोडीस तोड ज्याचें वैभव आहे अशा खानदानीच्या कुळांतील लाभावी अशी गंगाधररावांचीही विधुरावस्थेंतील इच्छा कशी नसेल ? तें शक्य नाहींसें झालें कीं मग त्याहून खालची पायरी गांठावयाची म्हणजे गरजू गरिबाची कुलशीलानें चांगली अशी मुलगी शोधावयाची. कोणत्याही कारणानें कां असेना पण वैभवाच्या दृष्टीनें गंगाधररावांना तोडीस तोड शोभेल अशी सरंजामदार कुळांतील वधू प्राप्त होणें दुरापास्त झालें असलें पाहिजे, व म्हणूनच परावलंबी व गरजू अशा गरीब मध्यम वर्गांतील ब्राह्मण घराण्यांकडे त्यांची दृष्टि वळली असली पाहिजे.

अशा दोन गरजवंतांची गांठ ब्रह्मावर्ती एके दिवशीं पडली; व 'श्रेय सांपडलें' असें दोघांनाही वाटलें !

वा. ........ नं. ........
ता. ........
ठा.क्र.

## ७ : मनूताई 'राणी लक्ष्मी' झाली

मनूबाईचा विवाह ही कांदंबरींतील विचित्र घटनांनाही तोंडांत बोट घालावयाला लावण्यासारखी एक घटना घडून आली. हा योग जुळवून आणण्याच्या कामीं तात्या दीक्षित या वेदशास्त्रसंपन्न गृहस्थांनीं मध्यस्थाची उर्फ भद्रेश्वर दीक्षिताची कामगिरी बजावली.

मोरोपंत तांब्यांना आपली एकुलती एक मुलगी वैभवशाली घराण्यांत पडावी असें स्वाभाविकपणेंच वाटत होतें. कारण रावबाजींचे आश्रित म्हणून कां होईना, वैभवशाली जीवन त्यांच्या अंगवळणीं पडलें होतें. त्या हेतूनें प्रेरित होऊन त्यांनीं सभोंवारच्या टापूंत ठिकठिकाणीं तालेवार व सजातीय अशा वराचा शोध कसून चालविला होता. मनाजोगें तालेवार स्थळ आपल्या मुलीला लाभणें हा भाग आपल्या प्रयत्नापेक्षां व तिच्या योग्यतेपेक्षां आपल्या व तिच्या नशिबावरच अधिक अवलंबून आहे, असें मोरोपंतांच्या मनानें घेतलें होतें. या देवभोळेपणाबद्दल मात्र मोरोपंतांना जरादेखील दोष देण्याचें कारण नाहीं. मनुष्याची मनस्थिति पाण्यासारखी, अथवा परिस्थितिसापेक्ष असते. 'पाण्या, तुझा रंग कसा ! तर जसा येईल तसा' या न्यायानें सभोंवारची प्राप्त परिस्थिति जशी, तशी माणसाची मनोवृत्ति बनणार. मूळपासून निर्वाहासाठीं कष्ट करण्याची, म्हणजे श्रम करून निर्वाहाला लागणाऱ्या वस्तु प्रत्यक्ष उत्पन्न करण्याची संवय नाहीं, हा बुद्धिजीवि अशा गरीब मध्यम वर्गाचा विशेष. आणि दुसरें कांहीं करावें, पेशवाईत कांहीं ब्राह्मणांनीं, प्रभूंनीं, गौडसारस्वतांनीं वगैरे कोणीं आपल्या लेखणीनें व बुद्धीनें तर क्वचित् कोणीं तरवारीनें देश दणाणून सोडला त्याप्रमाणें कांहीं पराक्रम करावा तर आतां संधीच नव्हती ! ती संधी नव्हती याचा अर्थ, प्रत्यक्ष धनोत्पादक श्रम करण्याची संवय मध्यम वर्गाला नाहींच. ह्या वर्गानें सरंजामशाही टिकविण्याच्या बौद्धिक उद्योगांत गढून राहून सरं-

जामदारांच्या जिवावर जगावें; कोणी कारकुनी फडांत काम करावें तर कोणीं कारस्थानें राजकारणें करावीं, कोणी धर्मोपदेश करावा, कोणीं देवप्रतिष्ठा वाढवावी, अशा अनेक उचापती भानगडींनीं सरंजामशाहीला आयुरारोग्य चिंतावें ही मध्यम वर्गाची कामगिरी ! पण सरंजामशाहीच कोळमडून कोसळूं लागली, तेव्हां तिच्या खालीं हा वर्ग चिरडला जाणार; सूर्य मावळला कीं त्याचे प्रकाशकिरण त्याच्याबरोबर मावळणार, हें ओघानेंच आलें. अशा आणीबाणीच्या वेळीं देखील रंजल्यागांजल्या लोकांनीं संतापून आपणाविरुद्ध उचल खाऊं नये, आपलें आसन उघडून टाकण्यासाठीं विळा हातोडा कुऱ्हाड पहार तरवार भाला बरची काय सांपडेल तें घेऊन धावून येऊं नये, असली विवेकी वृत्ति त्या लोकांची बनविण्यासाठीं अथवा विवेकाची गुंगी त्यांना आणण्यासाठींच देवधर्मांचा विशेष उपयोग आजवर मृतप्राय सरंजामशाहीकडून व मृत्युपंथाला लागलेल्या भांडवलदार साम्राज्यशाहीकडून केला जातो.

सुखदुःख हें सारें नशिबाचें देणें घेणें आहे हेंच बाळकडू मोरोपंतांनीं प्यालेलें. कसलीही पात्रता अंगीं नसतां नशिबानें वैभव भोगतां येतें, याचा प्रत्यक्ष पुरावा त्यांच्या धन्यांचा दिसतच होता. आयतखाऊपणाचा दोष स्वतःच्या माथीं मारून न घेतां ‘ नशिबानें दिलें म्हणून सुख भोगतों ’ अशी स्वतःच्या परावलंबी जीवनयात्रेची संगति लावण्याची संवय जडलेल्या मोरोपंतांनीं मनूताईच्या नशिबाची परीक्षा पाहण्याचें ठरवून तिची पत्रिका या ज्योतिषाला दाखव, त्या जोशाला दाखव असा सपाटा सुरू केला.

याच सुमाराला एके दिवशीं झांशी संस्थानांतील प्रसिद्ध ज्योतिःशास्त्रकोविद वेदशास्त्रसंपन्न तात्या दीक्षित हे ब्रह्मावर्ती रावबाजींच्या भेटीला आले व मोरोपंतांनीं मनूताईची पत्रिका पाहून भविष्य वर्तविण्याबद्दल त्यांना विनंति केली. झांशीचे अधिपति गंगाधरराव हे तेव्हां विधुर होते, त्यांना लग्न कर्तव्य होतें, तात्या दीक्षित हे झांशीतील आश्रित होते, या सर्व गोष्टींचा एकसमयावच्छेदेंकरून विचार केला कीं तात्या दीक्षित कांहींतरी पूर्वसंकल्प ठरवूनच ब्रह्मावर्ती आले असले पाहिजेत, याविषयीं शंका बाळगण्याचें कारण उरत नाहीं. तेथें तात्यांनीं आपण होऊन मनूताईची पत्रिका मोरोपंतांकडे पाहावयाला मागितली असो अथवा मोरोपंतांनीं ती दाखविली असो. पण

त्या पत्रिकेला तात्यांची दृष्ट लागली. त्यांनीं पत्रिका पाहून मनूताई राजपदावर विराजमान होणार असें भविष्य ताबडतोब वर्तविलें! लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट कीं, त्याकाळीं जातिभेदाच्या सनातनी भुताचा धिंगाणा आजच्यापेक्षां फारच अधिक नेटानें सुरू होता. पोटजातींच्या एकीकरणाची कल्पनाही तेव्हां कोणाच्या ध्यानीं मनीं नव्हती. मोरोपंत हे कऱ्हाडे ब्राह्मण, ते आपल्या मुलीला वर शोधणार तो कऱ्हाडाच शोधणार. असा राजपुरुष शोभणारा कऱ्हाडा तेव्हां त्याच टापूंत गोविंदपंत बुंदेल्यांच्या वंशांतील जालवण व गुलसराई एथील जहागिरदार वंशांत अथवा झांशीच्या नेवाळकर वंशांत मिळाला तर मिळवावयाचा. पैकीं जालवण व गुलसराई एथें तशी शक्यता नाहीं हें मोरोपंतांना अगोदरच चवकशीअंतीं माहीत झालें होतें. अशी वस्तुस्थिति असतांना तात्या दीक्षितांनीं 'मनूताई राणी होणार' असें भविष्य वर्तविलें, आणि लगेच झांशीच्या गंगाधररावांना लग्न कर्तव्य असल्याचेंही सांगून टाकलें. त्या ठिकाणीं मुलगी दिली गेली तर तिच्या पत्रिकेंतील ग्रहांचा पडताळा ताबडतोब येईल असेंही सुचविलें. गंगाधरराव व मनूताई यांच्या कुंडल्या ह्या ज्योतिषीबुवांनीं ताडून पाहिल्याचें कोठें ऐकिवांत नाहीं. तथापि एवढा जाडा ज्योतिषी! स्वतःच्या भविष्यज्ञानावर व भविष्यकथननैपुण्यावर त्याचा इतका जाडा भर! असा जातिवंत ज्योतिषी वधूप्रमाणें वराचीही पत्रिका पाहिल्याखेरीज दोघांचा विवाह व्हावा अशी कशी गळ घालील? पण तात्यांनीं मनूताईचे राजयोग वर्तविले तेव्हांच 'झांशीचे गंगाधरराव हे योग्य वर आहेत व त्यांना मुलगी दिल्यास तिच्या राजयोगाचा दाखला हातोहात पटणार आहे' असेंही मोरोपंतांना आग्रहपूर्वक सांगितलें. यावरून गंगाधररावांची कुंडली तात्यांना माहीत होती असें म्हटलें पाहिजे. अर्थात् ज्याचा भविष्यवादीपणा इतका अचूक व सर्वांच्या अनुभवाला पटलेला, त्याला मनूताईच्या राजयोगाबरोबरच वैधव्ययोग आणि गंगाधररावांचा मृत्युकाल तेव्हां कसा कळला नाहीं?

यावरून हें उघड दिसतें कीं तात्या दीक्षित हा गंगाधररावांसाठीं वधूसंशोधनाच्या खास कामगिरीवर निघालेला एक निष्णात टेहळ्या होता. शिकारी लोक रानांत गेल्यावर प्रथम शिकारी कुत्र्याला शिकारीच्या मागावर सोडतात त्यांतला तात्या हा एक शिकारी कुत्रा एखाद्या वधूची शिकार

शोधून काढण्यासाठीं पाठविण्यांत आला होता. गंगाधररावांविषयीं खरे अथवा खोटे पण विपरीत समज तेव्हां त्यांच्या हितशत्रूंकडून प्रसृत करण्यांत आले असतील. झांशीच्या गादीवर डोळा ठेवून टपून बसलेल्या मंडळींनेंही हे उपद्व्याप केले असतील. शिवाय गंगाधरराव तेव्हांच्या काळाच्या मानानेंही अशा लग्नाला अंमळ वयस्कच होते म्हटलें पाहिजे. म्हणूनच त्यांना कुलीन, हुषार, सुंदर अशी रूपगुणसंपन्न वधू मिळणें दुरापास्त झालें असावें. पण राजेसाहेबांना वधूसाठीं इतकी पंचाईत पडली आहे असें जाहीर झालें तर तो केवढा कमीपणा! म्हणूनच कीं काय, राजप्रतिष्ठारक्षणाचा डाव अथपासून इतिपर्यंत अगदीं सोळा आणे पार पाडण्यांत आला. रावबाजींचा कोणताही स्त्रीविषय आवडता; यांना या बाबतींत आपलें वजन खर्च करून मध्यस्थी करण्याची विनंति मोरोपंतांनीं केली, व ती रावबाजींनीं आनंदानें मान्य केली. रावबाजींची गंगाधररावांना मनूताईला पदरांत घेण्याबद्दल विनंति, मनूताईला राणीपद लाभावें ही मोरोपंतांची उत्कंठा, तात्या दीक्षितांनीं गंगाधररावांपाशीं मनूताईच्या रूपगुणसंपन्नतेची व उत्तम ग्रहमानाची केलेली वाखाणणी, असा सारा बनाव प्रकटपणें सोळा आणे जमून आला. नंतर वधूपरीक्षेचें नाटक यथासांग पार पडलें. अखेर विवाह ठरला, तो झांशीला व्हावयाचा ठरला, व मोठ्या थाटामाटानें तो समारंभ पारही पडला. मनूताईचें सासरचें नांव लक्ष्मी असें ठेवण्यांत आलें. वधूपक्षाकडील मंडळीला मोठमोठ्या देणग्या गंगाधररावांनीं दिल्या. हा विवाहयोग जुळवून आणण्यासाठीं आपलें चातुर्यसर्वस्व कामीं लावल्याबद्दल तात्या दीक्षितांनाही चांगली गरगरीत देणगी मिळाली असेल, यांत शंका नाहीं.

मनूताईसाठीं गंगाधरराव हें स्थळ सुचवून तें पटवून देतांना तात्यांनीं झांशी दरबारांतील सरदारकीचें मधाचें बोट मोरोपंतांच्या जिभेला लावलें होतें कीं नाहीं, हें कळण्याला कांहीं मार्ग नाहीं. पण मोरोपंत हे मनूताईच्या जिवावर एकदम झांशी दरबारचे सरदार झाले एवढें खरें. त्यांना त्या सरदारकीबद्दल सालीना छत्तीसशें रुपये नेमणूक मिळूं लागली.

ह्या विवाहामुळें मनूताईच्या जन्माचें सफा वाटोळें झालें असलें तरी मोरोपंतांचें भाग्य मात्र सर्वतोपरी उघडलें एवढें खरें. मोरोपंत हेही तेव्हां विधुर होते. त्यांना स्वतःला विवाह कर्तव्य होता. त्या सुमाराला त्यांचें वय

बत्तिशीच्या आंत बाहेर होतें. पण 'राजश्री' मोरोपंत तांब्यांचे 'सरदार' मोरोपंत तांबे झाल्यावर त्यांना वधू मिळण्याला चिंता उरली नाहीं. गुलसराई संस्थानांतील वासुदेव शिवराव खानवलकर यांनीं आपली कन्या मोरोपंतांना दिली. स्वतःच्या मुलीला राणीपद, स्वतःला सरदारकी व मनोजोगी बायको, असे मोरोपंतांना राणी लक्ष्मीच्या विवाहप्रकरणीं एका दगडानें तीन पक्षी मारतां आले. झांशी दरबारची सरदारकी व राजाचें सासरेपण आयतें मिळाल्यावर ब्रह्मावर्ती आश्रिताच्या कारकुनी पेशानें धन्याच्या ताटाखालच्या मांजराप्रमाणें आयुष्य कंठण्याची मोरोपंतांना कांहीं आवश्यकता उरली नाहीं. झांशीचें राज्य राणी लक्ष्मीचें व राणी ही त्यांची कन्या! अर्थात झांशीचें राज्यही पर्यायानें त्यांचेंच! ते ब्रह्मावर्त सोडून झांशीला कायमचे जाऊन ऐषआरामांत राहूं लागले. गोडशे भटजी तर याहूनही पुढें जाऊन म्हणतात कीं, 'आपणाला द्वितीय लग्न कर्तव्य आहे; व सोय करील तो माझा सोयरा, त्याला मी मुलगी देणार' असें मोरोपंतांचें धोरण प्रथमपासून होतें.

ही गौरवाची, प्रतिष्ठेची, देखतभुलीची पोशागी भाषा सोडून खरें बोलूं लागावें तर काय बोलावें लागेल? ह्या सोनेरी बेगडीनें मढविलेल्या देव्हाऱ्यांत देवपद पावलेल्या नारळाची बेगड काढून व करवंटी फोडून पाहिलें तर आंत काय दिसेल? वरून लालभडक व गोंडस दिसणारें हें कौंडाळाचें फळ फोडून आंतील गीर चाखून पाहिला तर कशी चव लागेल? वर वर पाहतां पाण्याप्रमाणें पातळ दिसणाऱ्या तेजाबाच्या बरणींत हात बुडवला तर हाताची काय गत होईल?

बोलूं नये पण बोलावें लागतें; व बोलूं जावें तर जीभ लुली पडते! चाऱ्याची पेंडी तोंडाशीं धरून त्या चाऱ्याच्या आशेनें गरीब गाय जशी खाटकाच्या गोठ्याकडे जाते, तशी मनूताई त्या उंची वस्त्रालंकाराच्या, त्या बहुमोल दागदागिन्यांच्या, त्या हौसेमौजेच्या नादानें हंसत खेळत बागडत गंगाधररावांच्या संसारांत पदार्पण करती झाली. त्या चिरमुड्या परकऱ्या पोरीला तेव्हां संसार कशाशीं खातात तें तरी काय माहीत! पण मोरोपंतांसारख्यांची गोष्ट निराळी होती. ते जगांत चांगले वागलेले वहिवाटलेले होते. त्यानीं ह्या विवाहाला संमति द्यावयाला नको होती. तात्या दीक्षित,

रावबाजी व इतर स्नेही सोबती यांची गोष्ट निराळी होती. तात्या हा बोलून चालून गंगाधररावांचा ह्या शिकारीपुरता शिकारी कुत्रा. धन्याला शिकारीचा वास काढून द्यावयाचा एवढें त्याचें काम. असलें इमान कुत्र्याच्या ठायीं जितकें खुलून दिसतें तितकेंच तें सारासार विचारानें वागणाऱ्या माणसांच्या ठायीं ओंगळ, हिडीस व किळसवाणें दिसतें. हाच मनुष्य व पशु यांतील भेद. ज्योतिःशास्त्र खरें कीं खोटें या प्रश्नाचा विचार एथें सुतराम् कर्तव्य नाहीं. ज्योतिःशास्त्र खरें आहे असें धरून चालणारे लोक आजही पुष्कळ आहेत व तेव्हां तर पुष्कळच होते. तें शास्त्र खरें आहे असेंही आपण धरून चालूं. पण त्या शास्त्राचें ज्ञान तात्याला पूर्ण होतें असें म्हणावें, तर त्याला गंगाधररावांचा मृत्युयोग आधीं कां कळला नाहीं? अथवा कळला तर त्यानें तो गंगाधररावांना सांगितला कां नाहीं? तें कळल्यावर देखील एका कोंवळ्या पोरीच्या जन्माचें वाटोळें करण्यासाठीं विवाहाला उतावळे होण्याइतके गंगाधरराव उतावळे होते असें म्हणावयाचें काय? निदान तात्यानें हें ज्योतिषगुह्य मोरोपंतापाशीं तरी बोलून दाखवावयाला हवें होतें. तें कळल्यावरदेखील मोरोपंतांनीं मनूताईला आपल्या हातानें त्या वैधव्याच्या खोल दरींत लोटलें असेल काय? आज जगांत सर्वत्र रूढ असलेलीं सर्व शास्त्रें, सर्व धर्म, सर्व नीतिनिर्बंध हे श्रीमंत व सत्ताधारी वर्गाचे जोहुकूम खुषमस्करे आहेत, या विधानाची सत्यता या प्रसंगींही तंतोतंत पटते. ज्योतिःशास्त्राला तात्यानें मनूताईच्या वडिलांपेक्षांही वयानें थोर अशा वयाच्या गंगाधररावांशीं मनूताईची लग्नगांठ मारून देण्याच्या ओंगळ कामांत राबविलें! कारण तात्या झाला तरी पोटार्थी! तो श्रीमंतांचा आश्रित!! ज्योतिष हें त्याचें आयुध. वधूसंशोधन करून आण असा श्रीमंतांचा हुकूम होतांच त्यानें तें आयुध हातीं घेऊन समरांगणांत उडी घेतली नसती व श्रीमंतांच्या वतीनें निकरानें लढून जय मिळविला नसता तर 'हात् दळभद्र्या! तुला अलम हिंदुस्थानांत एकही मनाजोगी पोरगी ज्योतिःशास्त्राच्या जाळ्यांत पकडून आणतां येऊं नये? मग तूं कसला ज्योतिषी! चल हो चालता कर काळें इथून!' असें सांगून श्रीमंतांनीं त्याला वेळीं अर्धचंद्रही दिला असता! तात्याच्या दृष्टीनें बोलावयाचें तर त्याच्यासारख्या बुद्धिजीवि गरीब मध्यमवर्गीयाला, पोटासाठीं तेव्हां तसें वागणें भागच होतें.

पण गंगाधररावांनीं तरी कांहीं सारासार विचार करावयाचा होता कीं नाहीं? स्वतःची पोरगी शोभेल इतक्या लहान वयाच्या मुलीशीं त्यांनीं तरी विवाह कां करावा? त्यांच्या मनावर धर्माचा पगडा असेल, निपुत्रिकाला मरणोत्तर मुक्ति नाहीं अशी त्यांची प्रामाणिक समजूत असेल. अशी धार्मिक व पारलौकिक भावना असणें योग्य कीं अयोग्य हा वादग्रस्त प्रश्न विचारांत घ्यावयाचा नाहीं असें ठरविलें तर तेव्हांच्या समाजजीवनांत समाजाचा वरचा थर मानल्या जाणाऱ्या वर्गांत असे भावनातरंग सर्वसामान्य होते. हें सर्व खरें मानलें तरी ज्या धर्मानें त्यांना पुत्रप्राप्तीचें धार्मिक महत्त्व पटवून दिलें होतें, त्याच धर्मानें त्यांना दत्तक हा पुत्रप्राप्तीचा पर्यायही सांगून ठेवलाच होता. आणि पुढें त्यांना त्याच पर्यायाचा अवलंब करावा लागलाही. एवढ्यासाठीं एका अगदीं कोंवळ्या व अजाण कुमारिकेचा बळी घेण्याचें कांहीं कारण नव्हतें. वंशवेल खुंटली तर कसें होईल, ह्या दारुण चिंतेची आग जी त्यांच्या अंतःकरणांत धडधड पेट घेऊं लागली होती, ती विझण्याला ज्वालाभक्षक असा दत्तक घेऊन तो शाबीत करून घेण्याची खबरदारी त्यांनीं वेळींच घेतली असती तरी काम भागलें असतें. त्यासाठीं राणी लक्ष्मी हें सुकुमार पुष्प त्या अग्नीच्या तोंडावर फेंकण्याची कांहीं आवश्यकता नव्हती. आवश्यकता नव्हती इतकेंच काय पण व्यवहार व माणुसकी या दृष्टींनींही ती गोष्ट फार अनुचित झाली. गंगाधररावांचें वय किती आणि राणी लक्ष्मीचें वय किती? त्या सुकुमार पुष्पानें ती आग विझली तर नाहींच; पण उलट आगींत तेल पडावें तशी अवस्था झाली. तेल पेटून गेलें व आग अधिक भडकली. आग विझविण्यासाठीं आंत फेंकलेलें सुकुमार पुष्प जळून होरपळून त्याची वाताहात झाली व आग तर विझली नाहींच. पुढें ओघानें आपणाला माहीत होईलच कीं गंगाधररावांना शेवटीं राणी लक्ष्मीच्या उदरीं औरस पुत्राचा चिर लाभ तर झाला नाहींच; पण त्यांनीं अगदीं मरणघडीला दत्तक घेतला तोही त्यांच्या पश्चात नाशाबीत ठरला!

गंगाधरराव व राणी लक्ष्मी यांचें वय पाहतां तो जोडा किती विषम— किती विजोड होता! अनेक पशुपक्ष्यांना ज्याच्या ढोलींत सुखानें राहतां येतें अशा जुनाट वटवृक्षाला जाईच्या कोमल वेलीचा टेकू द्यावा, अथवा प्रचंड रणगाडा ओढून नेण्यासाठीं त्या गाड्याला एका हत्तीबरोबर दुसरी सुकुमार

कालवड जुंपावी, अथवा पाण्याच्या दणकट कातडी मोटेला तलम झिरझिरीत रेशमी वस्त्राचें ठिगळ द्यावें, त्यांतला तो प्रकार होता !

पण गंगाधररावांच्या वर्तनानें जितका विस्मय वाटणार नाहीं, तितकें विस्मयकारक वर्तन मोरोपंत तांबे यांचें होतें. गंगाधरराव काय, बोलून चालून परके ! आपणाशीं लक्ष्मीसारख्या अल्पवयी मुलीचा विवाह झाल्यानें तिच्या जन्माचें वाटोळें होत आहे अशी कल्पना त्या विवाहेच्छु पतीच्या मनांत येण्यापूर्वी वधूपित्याच्या मनांत आली पाहिजे होती. तथापि ती तशी मोरोपंत तांब्यांच्या मनांत आली नाहीं. अथवा आली असली तरी ती स्वार्थामुळें टिकली नाहीं. मुलीच्या कल्याणासाठीं मुलीचें लग्न करावयाचें एवढा एकच पवित्र हेतु जर त्यांच्या मनांत असता, तर त्यांनीं या गरजू धनवान जामातापेक्षां तुल्यगुण व योग्य जामात शोधून काढला असता, व ती मुलगी रूपगुणसंपन्न असल्यानें तें त्यांना सहज शक्यही झालें असतें. पण त्यांना मुलीचा उपयोग आपल्या संसाराच्या व्यापाराच्या कामीं भांडवल म्हणून करावयाचा होता; मुलीचें अधिकांत अधिक आर्थिक मोल जो कोणी देईल, त्याच्याशीं तिचें लग्न करून द्यावयाचें होतें, व मुलीचें लग्न करून देऊन होणाऱ्या अर्थलाभावर त्यांना आपलें स्वतःचें लग्न उरकून घ्यावयाचें होतें. अर्थात् मुलीला अनुसरून वर पाहणें वगैरे सर्व गोष्टी 'शिळोप्याच्या गप्पा' ठरल्या, व गंगाधररावांसारख्या श्रीमंत बिजवराच्या तावडींत बिचारी लक्ष्मी सांपडली ! स्वतःपेक्षां वयस्क व ज्याच्याविषयीं भयंकर अपवाद समाजांत रूढ आहेत अशा माणसाची अवजड वैवाहिक धोंड आपल्या लाडक्या कन्येच्या गळ्यांत बांधून तिला संसारसागरांत बुडून मरण्यासाठीं लोटावयाचें असलें कृत्य करणारा मनुष्य कसल्या छातीचा असला पाहिजे !

गरीब मध्यम वर्गाविषयीं एथवर जागोजागीं जें हृदयविदारक विवेचन करण्यांत आलें आहे, त्या वर्गाच्या एका महत्त्वाच्या अंगाचें हें प्रतिबिंब पाहतांना पाहणाराला वाटेल कीं असलें हिडीस, भयंकर व माणुसकीला काळिमा आणणारें प्रतिबिंब पाहण्यापेक्षां हे डोळे फुटलेले चांगले ! कष्टांविना सुखांत जीवन घालविण्याची जी संवय ह्या वर्गाला जडलेली, त्या संवयीपायीं पत्करावा लागणारा कोण हा लाचारपणा ! आणि तरीदेखील आश्चर्याची गोष्ट ही कीं हा लाचारपणा ज्या विषम सामाजिक स्थितीमुळें

आपल्या वांट्याला आला, त्या परिस्थितीला तगवून धरण्याचें कार्य हा वर्ग करीत असतो! याचें कारण त्या वर्गाच्या जीवनाला ज्या धनवान सत्ताधाऱ्यांचा आधार, त्यांना तीच परिस्थिति तगवावयाची असते. त्याखेरीज त्यांना तरणोपाय नसतो. पण तीच समाजजीवनांत आज पूर्ण निरुपयोगी ठरलेली परिस्थिति, मूळ ती कां उत्पन्न झाली व आतां ती कां टिकणें शक्य नाहीं यांचा विचार न करतां ती टिकविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे मुळापासून वठलेल्या वृक्षाला पानां-फुला-फळांनीं संपन्न करण्याचा अथवा कंबरेला हलक्या सांगडीऐवजीं मोठा थोरला दगड बांधून त्या आधारानें खवळलेला महासागर तरून जाण्याचा हास्यास्पद प्रयत्न करणें होय.

वर सांगितलेल्या गंगाधरराव—तात्या—मोरोपंत आणि मंडळीच्या उलाढालीमुळें गंगाधररावांना एकदांची बायको मिळाली. मोरोपंतांना आपल्या पोटच्या कन्येच्या वैवाहिक जीवनाची होळी पेटवतां येऊन त्यावर स्वतःच्या सांसारिक हौसामौजांची पोळी भाजून घेतां आली. तात्या दीक्षितालाही भरपूर पैसा मिळाला असेल. फक्त वाटोळें झालें काय तें एकट्या लक्ष्मीचें; व तेंही आमरण कधींही भरून न येण्यासारखें वाटोळें झालें. हें सांगतांनाही अंतःकरणाची तगमग होते. कोणीं तरी शेंकडों इंगळ्या आणून अंतःकरणाला डसवल्या आहेत अशा अथवा रसरसत्या खदिरांगारांची रास आणून अंतःकरणावर ओतली आहे अशा वेदना होतात. सुगंधवेलीवरची न उमललेली मुकी कळी खुडून कोणा प्रेताला वाहावी, तशी राणी लक्ष्मीच्या जीवनसर्वस्वाची या घटनेपायीं वाताहात झाली! स्त्रीजीवन आणि त्यांतल्या त्यांत विशेषतः हिंदी मध्यम वर्गांतील आणि धनिक अशा भांडवलदार सरंजामदार वर्गांतील स्त्रीजीवन आजही दिवाणखान्यांतील डौलदार झुंबरासारखें आहे, व राणी लक्ष्मीच्या वेळीं तर तें फारच तसें होतें. झुंबर दिसावयाला फार सुंदर दिसतो. प्रकाशकिरण त्या झुंबराच्या पैलूदार लोलकांतून परावर्तन अथवा वक्रीभवन पावून ठायीं ठायीं सप्तरंगी किरणशलाकांचीं कारंजीं थुइथुइ उडवतांना दिसतात. असें दिवाणखान्यांतील झुंबराचें सौंदर्य जरी प्रलोभनीय असलें, तरी झुंबर ही बोलून चालून शोभेची वस्तु. तो दिवाणखान्याचा अलंकार, आधार नव्हे. इमारत कोसळली व दिवाणखानाही कोसळून पडूं लागला, तर त्याला झुंबराचा टेकू म्हणून उपयोग मुळींच व्हावयाचा नाहीं. बुद्धि-

जीवि मध्यम वर्गातील अथवा धनिक भांडवलदार–सरंजामदार अशा वर्गातील स्त्री ही देखील दिवाणखान्यांतील झुंबरासारखी परावलंबी असते. तिला समाजजीवनांत स्वतंत्र असें अस्तित्व मुळींच नसतें. म्हणूनच कीं काय, तिला ‘ अर्धांगी ’ म्हणतात. अर्धांगी या शब्दाचा व्यवहारांत प्रत्ययाला येणारा अर्थ हा कीं जिला स्वतंत्र अस्तित्व नाहीं, जी केवळ पतीची पत्नी म्हणूनच शिष्टांत ओळखली जावयाची, ती अर्धांगी. धर्मवचनांच्या आधारें ‘अर्धांगी’ या शब्दाचा कोणीही कितीही सोज्वळ अर्थ लावून दाखवील. पण त्या सगळ्यापेक्षां महत्त्वाचें असें स्त्रियांच्या परवशतेचा पुरस्कार करणारें अर्थात् सरंजामशाही धार्जिणें मनुवचन आहे कीं, ‘बाळपणीं पिता, तरुणपणीं पति व वृद्धपणीं पुत्र हे स्त्रीचे रक्षणकर्ते होत. अर्थात् स्त्रीला स्वातंत्र्य नाहीं.’ अथवा स्वातंत्र्याची गरज नाहीं !

स्त्रीजातीविषयींच्या असल्या धर्मकल्पना ज्या समाजांत रूढ झालेल्या, आणि समाजधारणेचा मक्ता ज्या वर्गानें घेतलेला, त्या पांढरपेशा शिष्ट वर्गांत राणी लक्ष्मीच्या विस्मयजनक लग्नासारखे प्रकार न झाले तरच आश्चर्य ! निराळ्या अर्थानें बोलावयाचें तर समाजजीवनांत अडगळीप्रमाणें व त्याज्य ठरलेला जो वर्ग, त्या वर्गाची आत्मरक्षणार्थ चाललेली धडपड ही कुजलेल्या निर्माल्याच्या दुर्गंधीसारखी शिसारी आणणारीच असावयाची !

राणी लक्ष्मीच्या वैवाहिक जीवनाविषयीं ‘ **माझा प्रवास अथवा सन १८५७ सालच्या बंडाची हकिकत** ’ या आत्मवृत्तांत कै. गोडशे भटजींनीं असें लिहिलें आहे : “...लग्न झाल्यापासून लक्ष्मीबाईस कोणत्याही प्रकारचें सुख नव्हतें. नवरा तर × × होता. परंतु त्याचा अंमलही फार कडवा असे. याजमुळें तिला स्वतंत्रता फार थोडी होती. वाड्याच्या बाहेर पडण्याची तिला मोकळीक नव्हती इतकेंच नव्हे, पण बाईसाहेब बहुतकरून कुलपांत असत. तिच्याभोंवतीं नेहमीं बायकांचा पहारा असे. पुरुषाचें वारेंही तिला लागूं दिलें नाहीं. अशा प्रकारच्या जुलमी वागविण्यानें तिचे राजशाली गुण नाहींसे होऊन तिला कांहीं दुर्गुणही जडते. परंतु सुदैवानें गंगाधरबाबा लग्न झाल्यावर फार दिवस जगले नाहींत.... ”

याहून राणी लक्ष्मीच्या वैवाहिक जीवनाच्या विटंबनेचा कोळसा उगाळावा तितकें काळेंच निघणार !

मराठी ग्रंथसंग्रहालय
क्र. अं. ६००३

## ८ : गंगाधररावांचा अंत व दत्तक प्रकरण

राणी लक्ष्मीचें वैवाहिक जीवन कसें असेल, याचा झाला यापेक्षां ऊहापोह न करणेंच श्रेयस्कर आहे. राणीच होती ती; दागदागिने, कपडेलत्ते, नोकरचाकर वगैरे श्रीमंती साधनांचा तिला काय तोटा! गंगाधररावही आपल्या परीनें तिला प्रसन्न राखण्याची खटपट करीत होते म्हणतात. हा राणीचा वैवाहिक काल दुःखाचा असो कीं बिनदुःखाचा असो; गंगाधरराव लवकर कालवश झाले ही गोष्ट सुदैवाची असो कीं दुर्दैवाची असो; राणीचें झळझळीत वैधव्य हें मळमळीत सौभाग्यापेक्षां सुखावह असो कीं दुःखावह असो; तिचें वैवाहिक जीवन हां हां म्हणतां—काळाच्या डोळ्यांच्या पापणीची उघडझांप व्हावी इतक्या अल्प काळांत सुरू होऊन संपलेंही! जणूं काय ती विधवा म्हणून जगण्यालाच जन्माला आली होती, व कोंवळें कौमार्य आणि झळझळीत वैधव्य यांच्यामध्यें दुर्दशामय सौभाग्याचा शेवाळलेला ओढा होता व तो ओलांडून पुढें जातांना ती ठेंचाळली इतकेंच. वयाच्या सातव्या अगर आठव्या वर्षी लग्न आणि अठराव्या वर्षीं वैधव्य! आणि दरम्यानचें 'सौभाग्य' तें तसें! दरम्यान् सन १८५१ मध्यें राणी लक्ष्मीनें एका पुत्राला जन्म दिला होता, पण तो पुत्र पुढें अवघा तीन महिन्यांत वारला, असें सांगतात. एकूण काय, अखेरपावेतों झांशीच्या राजवंशाला वारस नाहीं!

अशा स्थितींत गंगाधररावांना संग्रहणीच्या दुखण्यानें घेरलें. त्या दुखण्यांतून ते जगण्याची आशा जसजशी दुरावूं लागली, तसतशी 'आतां ही वंशवेल पुढें कशी जगणार' ह्या चिंतेनें एकूण एक कारभाऱ्यांना, सरदार दरखदारांना व आश्रितांना अगदीं बेचैन करून सोडलें. सर्वांना बेचैन करून सोडलें असें म्हणण्याचें कारण त्या सर्वांची सर्व थोरवी, प्रतिष्ठा, मानमरातब, ऐषआराम, सत्ता, सर्व कांहीं झांशीचें राज्य चालू राहण्यावर अवलंबून

होतें; आणि झांशीचें राज्य त्या राज्याला वारस लाभण्यावर अवलंबून होतें, खरोखर किती शरमेची व विस्मयाची गोष्ट ही ! राज्याला वारस नाहीं म्हणून राज्य खालसा होणार, आणि राज्य खालसा झाल्यामुळें कारभारी-सरदार-आश्रित चट सारे बेकार होऊन अन्नाला महाग होणार ! आणि ज्यांना स्वतःच्या पायावर उभें राहण्याचेंही सामर्थ्य नाहीं, ज्यांच्या जीवनाला पराक्रमाचा वा कष्टांचा पाया नाहीं, ते राज्य करणार, ते राज्याचा कारभार पाहणार ! ही राजवंशाची वेल सुकूं नये म्हणून आजवर सर्वांनीं प्रयत्नांची मारे शिकस्त केली होती. त्यांच्या दृष्टीनें मनुष्याधीन जेवढ्या जेवढ्या गोष्टी तेवढ्या तेवढ्या त्यांनीं सर्व केल्या होत्या. तात्या दीक्षितांची गंगाधर-रावांचें लग्न जमवण्यांतील कारवाई हीसुद्धां पूर्वोक्त राजनिष्ठापूर्वक घडलेल्या प्रयत्नांत जमा होण्यासारखी आहे. कारण झांशीच्या गादीला वारस लाभावा व कारभाऱ्यांपासून शागिर्दांपावेतों सर्व आयतखाऊंची पूर्ववत् चंगळ चालावी या उदात्त पांढरपेशा हेतूनें प्रेरित होऊनच त्यानें मनूताईच्या पत्रिकेंत राज-योग वर्तविला व गंगाधररावांचें नांव पुढें करून त्यांच्या राजवैभवाची भुरळ मोरोपंतांना पाडली. गंगाधररावांचें वर्तन जनरीतीविरुद्ध होतें अशी लोकवार्ता रूढ असतांही तिकडे मोरोपंतांनीं बळेंच काणाडोळा केला असेल तर त्याचें कारण तरी त्यांचा स्वतःचा दूरदर्शीपणाचा स्वार्थ हेंच होतें. इतक्या सायासांनीं सर्वांनीं झांशीचें राज्य टिकविण्याची आपापल्या परीनें शिकस्त चालविली असतां अचानक गंगाधररावांची प्रकृति फार बिघडली, तेव्हां सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें, कीं गंगाधरराव निपुत्रिक निधन पावल्यावर आमचें मार्गें कसें होणार !

राणी लक्ष्मी तर गंगाधररावांची अर्धांगी ! गंगाधररावांच्या पश्चात् ती विधवा होणार, मग तिला कोण विचारतो ? त्या वेळची राणीची मन-स्थिति जाणणें अति अवघड आहे. पति म्हणजे सर्व प्रकारच्या ऐहिक सुखांचें निधान अशी राणी लक्ष्मीची समजूत स्वानुभवानें झाली असेल, तर तिला लवकरच ओढवूं पाहणाऱ्या पतिनिधनामुळें पराकाष्टेचें दुःख होणें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें तिचा विवाह म्हणजे जन्मठेपेची दुःखद नजरकैद अशी परिस्थिति खरोखर होती असें मानलें तरी वैधव्याचा आघात म्हणजे राणीच्या दुःखाची परमावधि होती. राणी राणी

सं. सहीत दप्तर
ता.

म्हणजे तरी काय? कोणाच्याही कारवाईनें कां होईना पण ती विजोड्या जोडीदाराची बायको झाली म्हणून राणी! तें राणीपण सुखाचें असो कीं दुःखाचें असो; राणी लक्ष्मीला स्वतःला न कळत त्यासाठीं कमालीचा स्वार्थ-त्याग करावा लागला होता. मोरोपंतांना बायको व सरदारी मिळविण्यासाठीं पोटची पोरगी विकावी लागली होती, तर राणी लक्ष्मीला राणीपदासाठीं आपल्या अखंड यौवनाची–उभ्या जीवनाची होळी करावी लागली होती. इतकें जबरें मोल देऊन जें राजवैभव लाभलें, तेंही आळवावरचें पाणी ठरण्याचा प्रसंग येऊन ठेपल्यावर राणीलाही मरणप्राय दुःख कसें होणार नाहीं?

अशा कठीण स्थितींत गंगाधररावांचा आजार दिवसेंदिवस वाढतच गेला. गेला दिवस तो बरा असें त्यांच्या आजाराच्या बाबतींत म्हणून हळहळण्याचे प्रसंग रोज सभोंवारच्या मंडळीवर येऊं लागले. नोव्हेंबर सन १८५३ मधील ही गोष्ट. नोव्हेंबरचा पहिला आठवडा गेला, दुसरा आठवडा गेला, गंगाधररावांच्या आजाराचें पाऊल पुढें! उतार पडण्याची आशा दिवसें-दिवस दुरावत चालली. सर्वांनीं सर्व उपाय आपापल्या परीनें करून पाहिले, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. गंगाधररावांची फार इच्छा होती, कीं आपल्याला पुत्रसंतानाचा लाभ व्हावा, त्याच्या हातून आपलें तर्पण होऊन आपणाला सद्गति मिळावी. पण ती आशा आजारामुळें दुरावूं लागतांच दत्तक घेण्याचा विचार त्यांना सुचला. हा विचार त्यांना सुचला कीं त्यांनीं इतर मंडळींनीं सुचविला, हा प्रश्न एथें तितकासा महत्त्वाचा नाहीं. तो विचार मंडळींत निघाला, चर्चिला गेला, व दत्तक घेण्यासाठीं योग्य पुत्राचा शोध जारीनें सुरू झाला. नेवाळकर घराण्यांतील एक वासुदेवराव नेवाळकर यांना आनंदराव नांवाचा पुत्र होता, त्याला सर्वानुमतें दत्तक घेण्याचा बेतही निश्चित झाला.

पण तेव्हां हिंदी संस्थानिकांनीं दत्तक घेऊन आपली दौलत वाढीला लावणें ही केवळ त्यांच्या मर्जीची व सोपी गोष्ट नव्हती. सनातन हिंदु धर्माच्या समजुतीप्रमाणें पुत्रप्राप्तीनें स्वर्गप्राप्तीचा मार्ग मोकळा होत असला तरी ज्या संस्थानिकांना–ज्या सरंजामदारांना औरस पुत्र नाहीं, त्यांना धार्मिक पुत्र-प्राप्ति होऊं द्यावयाची कीं नाहीं, त्यांना स्वर्गलाभ होऊं द्यावयाचा कीं त्यांना त्रिशंकूप्रमाणेंच धड ना पृथ्वी धड ना स्वर्ग असें मधल्यामध्येंच अधो-

गति लोंबकळत ठेवावयाचें, हा प्रश्न सर्वस्वी इंग्रजांच्या लहरीवर अवलंबून होता. अर्थात् परावलंबी व दुर्बळ संस्थानिकांच्या देवाचेही देव इंग्रज होते. देवानें कोणा संस्थानिकाला दत्तक पुत्राच्या हस्तें स्वर्ग–मोक्ष–वैकुंठाचा दरवाजा मोकळा करून द्यावयाचें ठरविलें, तरी त्या उत्तम लोकाच्या दरवाजाची किल्ली इंग्रजांच्या हातीं होती. ती इंग्रजांच्या मर्जीखेरीज दुसऱ्या कोणाला लाभणारी नव्हती, व ती किल्ली सांपडल्याशिवाय तो दरवाजा उघडला जाण्याची शक्यता नव्हती. अनेक हिंदी संस्थानिकांप्रमाणेंच गंगाधररावांचा देवही तेथें इंग्रजांसमोर अगदीं हतबल झाला होता. स्वर्ग असला तर कांहीं लोकांच्या समजुतीप्रमाणें तें त्याचें राज्य असेल. तें राज्य अध्यात्मशास्त्रज्ञांच्या मताप्रमाणें ऐहिक राज्यापेक्षां चिरंतन व सर्वानंदमय असेल. न पाहिलेल्या व कधीं न दिसणाऱ्या म्हशीला पांच मण दूध निघतें म्हणावयाला कोणाचें काय जातें! पण दत्तविधानद्वारा हिंदु राजेरजवाड्यांना पुत्रप्राप्ति व पुत्रप्राप्तीच्या द्वारा स्वर्गप्राप्ति इंग्रजांच्या संमतीखेरीज करून देण्याचें सामर्थ्य हिंदु देवांच्या अंगीं तेव्हां नव्हतें व आजही नाहीं. अथवा देवावर अढळ श्रद्धा ठेवून वागणाऱ्या व देवाधर्माचें अपार स्तोम माजविणाऱ्या श्रद्धाळू लोकांच्या समजुतीसाठीं आपण सर्व सृष्टीचा कर्ता–त्राता–मारता कोणी देव आहे असें मानलें, तरी सरंजामदार वर्गापुरतें बोलावयाचें तर जगांतून सरंजामशाही अजिबात नष्ट व्हावी व ती भांडवलदारवर्गीय मारेकऱ्यांच्या हातून नष्ट व्हावी अशी त्या देवाची इच्छा असावी हें स्पष्ट दिसतें. म्हणून त्यानें भांडवलशाही-सत्ताधीश इंग्रजांना हिंदुस्थान जिंकून तेथील सरंजामशाही बुडविण्याची प्रेरणा दिली! इंग्रजांनीं देखील कांहीं हिंदूंना हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें दत्तक घेण्याला बंदी केली नव्हती. कोणाही हिंदूनें एक सोडून एकवीस स्त्रिया पुत्रप्राप्तीसाठीं केल्या तरी तूं असें कां केलेंस असें इंग्रजांनीं कधीं त्याला दरडावून हटकलें नाहीं. अथवा कोणीं हरप्रयत्नांनींही पुत्रप्राप्ति न झाल्यामुळें दत्तक पुत्र मिळविला, तो एक पुत्र स्वर्गाच्या सरहद्दीपावेतों पितृरथ ओढीत नेऊं शकणार नाहीं अथवा अर्ध्या वाटेंतच दमून भागून मटकन् खालीं बसेल या भीतीनें आणखी अनेक दत्तक पुत्र कोणा हिंदूनें त्या रथाला जुंपले, तरी असें कां केलेंस असला कडवट सवाल इंग्रजांनीं कधीं कोणा हिंदूला केला नाहीं. क्षुल्लक गोरगरीब हिंदूंच्या बाबतींत देखील इंग्रजांनीं असें कधीं केलें

नाहीं, तें परोपरीच्या कारारमदारांनीं स्नेहबद्ध केलेल्या हिंदी सरंजामदार मित्रांच्या बाबतींत ते तसें भलतें सलतें कसें बरें करतील! कोणाही हिंदु सरंजामदाराला एकच काय हवे तितके पुत्र दत्तक घेण्याची इंग्रजांनीं पूर्ण मुभा ठेवली होती. याचें प्रत्यक्ष उदाहरण रावबाजी हें एक होय. रावबाजीनें एक नव्हे, दोन नव्हे, तीन दत्तक घेतले होते; पण त्याबद्दल इंग्रजांनीं त्याला कधीं एका शद्बानेंही दुखवलें नाहीं. इंग्रजांचा हस्तक्षेप फक्त सरंजामाला वारस असावा म्हणून दत्तक घेणारांच्या प्रकरणीं होत असे. एका विद्यमान सरंजामदाराकडे चाललेली सरंजामी त्याच्या दत्तकाकडे चालवावयाची कीं नाहीं या बाबतींत अखेरचा निर्णय देण्याचा अधिकार इंग्रजांनीं म्हणजे नवोदित वर्धिष्णु भांडवलशाहीनें संपादन केला होता. आणि इंग्रजांनीं या बाबतींत औदार्य दाखवावयाचें नाहीं असें ठरविलें होतें. या अपराधाबद्दल इंग्रजांचें पारिपत्य करण्याला हिंदी सरंजामदार वर्गाचा देव असमर्थ होता, असे अनुदार दिसणारे उद्‌गार काढण्यापेक्षां आपण असें म्हणूं कीं समाजजीवनावरचा हा सरंजामशाहीचा डाग धुवून टाकण्यासाठीं त्या देवानेंच भांडवलशाहीवाल्या इंग्रजांना हिंदुस्थानांत पाठविलें होतें. 'जशास तसें' या मासल्याची ही शाद्बिक अडवणुकीची भाषा सोडून शास्त्रीय परिभाषेंत खरें बोलावयाचें तर वंशवृद्धीसाठीं झटण्याच्या भावनेचा मानवी मनांतील उगम खासगी संपत्ति सांठविण्याच्या कल्पनेपासून व त्या कल्पनेच्या समर्थनार्थ झालेला आहे, व पितृप्रधान कुटुंबपद्धतीचा उगमही अर्थातच तेथून झालेला आहे. अशा प्रकारची समाजधारणा समाजाच्या एका विशिष्ट आर्थिक पद्धतींत अवश्य होती. म्हणून तेव्हां ती रूढ होऊन प्रख्या पावली व तीच धर्माची एक महत्त्वाची बाब बनली. झांशीच्या गंगाधररावांना अथवा राणी लक्ष्मीला तेव्हां गंगाधररावांच्या आसन्नमरण स्थितींत झटपट दत्तक घ्यावासा वाटला, आणि दत्तक जाण्याला तयार असलेला मुलगाही हातोहात सांपडला, याचें कारण वंशपरंपरा कायम टिकली नाहीं तर तेव्हां इंग्रजांनीं भराभर हिंदी राज्यें खालसा करण्याचा सपाटा चालविला होता, त्या अरिष्टाला तोंड द्यावयाला दुसरें कोणतेंच सामर्थ्य अथवा साधन त्या मंडळीसमोर नव्हतें. इंग्रजांशीं त्यांचे कांहीं करारमदार झाले होते, व ते इंग्रजांकडून यथावत् पाळले जावे यासाठीं वंशवेल जिवंत ठेवणें ही वंशपरंपरेच्या सरंजामदारांच्या

बाबतींत एक अत्यंत निकडीची व अतिशय महत्त्वाची बाब बनून राहिली होती. याच्या उलट इंग्रजांनाही हिंदी संस्थानें खालसा करावयाला कांहींना कांहीं निमित्त पाहिजे होतें. त्यासाठीं संस्थानिकांच्या पश्चात् त्यांच्या वारसांचा दौलतीवरील हक्क मान्य करण्याच्या वेळीं शक्य तितकें नकारकरणीचें धोरण ठेवावयाचें, हा राजकारणाचा नवा अचूक पवित्रा थेट विलायतेहून ठरून आला होता.

अशी परिस्थिति असल्यामुळें व तेव्हांचा हिंदुस्थानचा इंग्रज गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यानें भराभर सरंजामदारांना दत्तकांच्या परवानग्या नाकारून वा अन्य उपायांनीं एकेक संस्थान भराभर खालसा करण्याचा सपाटा चालविला असल्यामुळें त्याच जात्यांत आपणही भरडले तर जाणार नाहीं ना, या चिंतेनें गंगाधरराव, राणी लक्ष्मी व 'सरदार' मोरोपंत ऊर्फ मामासाहेब तांबे, संस्थानचे दिवाण नरसिंहराव, नाना भोपटकर, लाहोरीमल्ल, तट्टीचंद वगैरे त्या संस्थानच्या प्रमुख कारभाऱ्यांना अगदीं बेचैन करून सोडलें होतें. हा दौलतीला वारस निर्माण करण्याचा प्रश्न गंगाधररावांखेरीज इतर मंडळीच्या मर्जीनें सुटणारा असता तर त्या मंडळीनें कदाचित् मागेंच महाराजांच्या मांडीवर दत्तक देऊन तो हरयुक्तीनें मंजूर करून आणण्याचीही शिकस्त केली असती. पण गंगाधररावांना अखेरपावेतों उमेद वाटत होती कीं आपणाला पुत्रसंतानाचा लाभ होईल; आपल्या गादीला औरस वारस उत्पन्न होईल. अशा स्थितींत त्यांच्यापाशीं दत्तकाची गोष्ट कोणीं कशी काढावी !

पण 'गेलें तें उदक व राहिली ती गंगा' असें मानून आतां जो काय तुटपुंजा वेळ होता तेवढ्या वेळांत दत्तविधान झटपट उरकून घेणें हेंच सर्व मंडळीच्या व गंगाधररावांच्याही मतानें इष्ट ठरलें. लगेच मुलगा हुडकून काढण्यांत आला, व दत्तविधानाचा समारंभही तांतडीनें ठरवण्यांत आला. मागाहून इंग्रजांना यांत एखादा 'खो' घालण्याला अवसर सांपडूं नये यास्तव बुंदेलखंडचे दुय्यम पोलिटिकल एजंट मेजर एलिस आणि लष्करी अधिकारी कॅप्टन मार्टिन यांना त्या समारंभाला अगत्यपूर्वक आमंत्रण देण्यांत आलें. त्यांच्या समक्ष जाहीरपणें दत्तविधानाचा समारंभ यथाशास्त्र थाटामाटानें साजरा झाला. तेव्हां गंगाधरराव व त्यांच्याजवळची इतर

मातबर मंडळी यांची अटकळ अशी कीं यथाशास्त्र यथाविधि दत्तक घेतला आहे, व याला खुद्द बड्या इंग्रज अधिकाऱ्यांची साक्ष आहे; आतां सरकारला हा दत्तक नाशाबित ठरवितां येणार नाहीं. शिवाय इंग्रज व झांशी-चे अधिपति यांच्याशीं वेळोवेळीं झालेल्या करारमदारांप्रमाणें झांशीचें राज्य 'यावच्चंद्र दिवाकरौ' गंगाधररावांच्या वंशाकडे चालविण्याला इंग्रज वचन-बद्ध झालेले होतेच. लोकांचा सनदशीर विश्वासघात करण्याच्या व लोकांना लुबाडून आपली तुंबडी भरण्याच्या चौदा विद्या चौसष्ट कला इंग्रजांनीं कितीही चातुर्यानें आत्मसात् केलेल्या असोत, इंग्रजी भांडवलशाही सत्ता हिंदुस्थानांत बळी माजलेली असल्यामुळें तिची प्रसन्नता संपादन करण्याखेरीज आपला तरणोपाय नाहीं, हें सर्व राजे महाराजे ओळखून होते. आपली आतां जिवंत राहण्याची पात्रता नाहीं, किंबहुना आपण केव्हांच गतप्राण झालों असून आपलें दिसणारें चलनवलन ही केवळ मावळती धुगधुगी आहे; जीव मरण पावल्यावरही कांहीं काळ त्या प्रेतांत उबारा असतो, तशा प्रकारचा आपलें दिसणारें स्वरूप हा उबारा आहे; समाजजीवन सुव्यवस्थित चालण्याला आतां आपल्या ह्या सरंजामदार वर्गाची लवमात्र गरज उरली नसून औद्योगिक–यांत्रिक क्रांतीची व भांडवलशाही शासनपद्धतीची आवश्यकता ऐतिहासिक क्रमानें आतां उत्पन्न झाली आहे; हें येऊं पाहणारें यंत्रयुग व ही भांडवलदार साम्राज्यशाही बळावत फोफावत जाऊन आपला–सरंजामशाहीचा नायनाट करणार; हिंदुस्थानांतच सरंजामशाहीचें युग संपलें असें नसून साऱ्या जगांत ही औद्योगिक व यांत्रिक क्रांतीची प्रचंड वावटळ उसळली आहे व ती भांडवलशाही साम्राज्यसत्ता कांहीं काळ बळावणार अशी ग्वाहि देत आहे; एवढें जर हिंदुस्थानांतील सरंजामदार वर्गाला तेव्हां कळलें असतें, तर नखाच्या कामाला कुऱ्हाडी कशाला लागल्या असत्या! तें कोणालाच कळलें नाहीं; कोणीं तें कळून घेतलें नाहीं; कोणाची तें कळून घेण्याची पात्रताही नव्हती; व गंगाधरराव आणि त्यांचे आधारस्तंभही त्याला अपवाद नव्हते. त्यांना पूर्वींचे करारमदार आठवत होते. ते करारमदार पाळण्यावरच इंग्रजांची हिंदुस्थानांतील सत्ता अवलंबून आहे, एरव्हीं त्यांची धडगत नाहीं, असा आडमाप आत्मविश्वासही त्यांना वाटत असावा. त्याबरोबर असेंही वाटत असावें कीं, इंग्रज सरकाराची सत्ता बुंदेलखंडांत स्थिर

व्हावी यासाठीं आम्हीं व आमच्या पूर्वजांनीं काय करावयाचें बाकी ठेवलें आहे? आणि खरोखरच त्यांनीं काय करावयाचें बाकी ठेवलें होतें? मूळचे धनी—धनीच मानावयाचे तर—त्यांनीं धाब्यावर बसवून सुभ्याची यादी पुण्यास पेशव्यांकडे पाठविण्याचें बंद केलें व इंग्रजांशीं अर्थात् मराठशाहीच्या शत्रूंशीं सख्य केलें. शिवरावभाऊंच्या मागाहून रामचंद्रराव हे झांशीचे सुभेदार झाले, त्यांनीं 'इंग्लंडच्या राजाचा निष्ठावंत सेवक' म्हणवून घेण्यांत स्वतः धन्यता मानली व झांशीच्या किल्ल्यावर 'युनियन जॅक' फडकाविण्याची परवानगी इंग्रजांपासून मागून घेतली. खुद्द गंगाधररावांनीं राज्याधिकार आपल्या हातीं घेतांना रु. २,२७,४५८ उत्पन्नाचा मुलुख तैनाती फौजेसाठीं म्हणून इंग्रजांना तोडून दिला. अशी झांशीवाल्यांनीं स्वतः इंग्रजांची ताबेदारी पत्करून व पेशव्यांच्या आणि छत्रपतींच्या गादीला कुठच्या झाडाचा पाला मानून इतर सर्व संस्थानिकांना तसा धडा घालून दिला. बुंदेलखंडांत इंग्रजांचें बुड स्थिर व्हावयाला हा झांशीकरांचा इंग्रजधार्जिणेपणाच कारण झाला. इतके उपकारांचे डोंगर गंगाधररावांचे पूर्वज व ते स्वतः यांनीं इंग्रजांच्या डोकीवर रचून ठेवले होते. ते उपकार न स्मरण्याइतके इंग्रज कृतघ्न कसे होतील?

आपला दत्तक पुत्र आपल्या पश्चात् वारस म्हणून इंग्रजांकडून मान्य केला जाईल असा गंगाधररावांना पूर्ण भरंवसा होता. कायद्यानें बोलावयाचें तर त्या दत्तविधानांत कांहीं चूकही नव्हती. गंगाधरराव त्या दत्तविधानाच्या वेळीं बुद्धीनें शाबूत होते. दत्तविधानांत कांहीं घोंटाळा नाहीं अशी मेजर एलिस व कॅ. मार्टिन या दोघां बड्या इंग्रज अधिकाऱ्यांची समक्ष खात्री झाली होती. झांशीचें राज्य या राजवंशाकडे वंशपरंपरेनें चालेल असें स्पष्ट आश्वासन इंग्रजांनीं सुभेदार रामचंद्रराव यांच्याशीं झालेल्या तहांत दिलें होतें. गंगाधररावांनीं आपल्या डोळ्यांदेखत दत्तकाविषयींचा खलिता तेव्हांचे बुंदेलखंडचे पोलिटिकल एजंट मेजर माल्कम यांच्याकडे रवाना करविला होता. त्याच खलित्याची एक प्रत पूर्वींच दुय्यम पो. ए. मेजर एलिस यांना योग्य तजविजीसाठीं देण्यांत आली होती. आपल्या पश्चात् आपल्या दत्तकाकडे राज्य चालविलें जाईल, आपल्या पत्नीला तिच्या आयुष्याच्या अखेरच्या क्षणापावेतों कसलीही उणीव पडावयाची नाहीं व तिच्या राणीपदाच्या थोर

दर्जाप्रमाणें तिला वागविलें जाईल, असा पूर्ण भरंवसा बाळगूनच गंगाधररावांनीं देह ठेवला होता.

पण सर्व मंडळी पाहतात तों काय! एकंदर प्रकार विपरीत दिसूं लागला. झांशींत सर्वत्र कडेकोट बंदोबस्ताची तयारी सुरू झाली. लष्करी तुकड्या भराभर येऊन झांशीच्या किल्ल्याच्या बंदोबस्तासाठीं ठाणें देऊन बसल्या. गव्हर्नरजनरल लॉर्ड डलहौसी यांजकडून दत्तकाविषयीं निर्णयात्मक हुकूम येण्यापूर्वीं ही सारी तरतूद चालली होती. गव्हर्नर जनरलकडून कांहींच उत्तर येईना म्हणून राणी लक्ष्मीनें पुन्हा एक खलिता त्यांचे नांवें पाठविला. त्यांत राणीनें इंग्रजांचीं स्तुतिस्तोत्रें गाइलीं होतीं, व तहांतील कलमांची आठवण करून देण्यांत आली होती. झांशीच्या राज्यकर्त्यांनीं आजवर वेळोवेळीं इंग्रजांशीं कशा प्रकारें निःसीम राजनिष्ठा व्यक्त केली आहे याचाही पाढा त्यांत वाचला होता, मृताच्या आत्म्याला शांति प्राप्त होण्यासाठीं औरस मुलाप्रमाणेंच दत्तक मुलाचाही धार्मिक उपयोग होतो हें हिंदुधर्मगुह्यही त्या खलित्यांत समजावून देण्यांत आलें होतें, दत्तक घेतला गेला तो शास्त्राधारें घेतला गेला आहे असें निक्षून सांगितलें होतें, अधिकाऱ्यांच्या साक्षीनें दत्तविधान झालें ही गोष्टही त्या खलित्यांत ठळकपणें नमूद करण्यांत आली होती; एवढेंच काय पण तेहरी, दतिया, जालवण, वोरछा एथील राजांनीं दत्तक घेतलेले इंग्रजांनीं मान्य केले आहेत हेंही इंग्रजांच्या नजरेला त्या खलित्याच्या द्वारा आणून राणीनें आपली बाजू एखाद्या निष्णात वकिलाला शोभेल अशा प्रकारें रंगवून इंग्रजांपुढें मांडली होती.

इकडून गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी याजकडून दत्तक प्रकरणाचा निकाल लागण्याला जसजसा उशीर होऊं लागला, तसतशी राणीची व झांशीच्या इतर कारभारी मंडळींची चिंता एकसारखी वाढूं लागली. त्यांतच भर आणखी अनेक तोतया वारसांची पडली. अनेकांना वाटलें कीं झांशीचे महाराज वारले आहेत, गादी रिकामी पडली आहे, दत्तकांना परवानगी न देतां भराभर संस्थानें खालसा करण्याचा सपाटा लॉर्ड डलहौसीनें चालविला आहे, या वाहत्या गंगेंत हात धुवून घेतां आलें तर पाहावे तरी! कै. रामचंद्ररावांच्या पश्चात् त्यांच्या पत्नीनें दत्तक घेतलेला कृष्णराव, व खानदेश प्रांतीं पारोळ्याला राहणारा सदाशिवराव या नांवाचा गंगाधररावांचा एक

दूरचा भाऊबंद हे झांशीच्या गादीवर आपला हक्क सांगण्यासाठीं पुढें सरसावले. कृष्णरावाला एकदां गादीचा वारस होण्याला अपात्र ठरविण्यांत आलेंच होतें. सदाशिवराव तर दूरचा. तथापि त्यांनीं मनांत विचार केला असेल कीं ‘फुकटचें राज्य जर मिळालें तर घ्यावयाला आपलें काय जातें! इंग्रज अर्धा मुलूख दे म्हणेल, पाऊण मुलूख दे म्हणेल; त्याला मी म्हणेन कीं काय हवें तें तुला खुशाल घे, व राहिल्यासाहिल्याचा राजा मला कर म्हणजे झालें. इंग्रजाला द्यावयाचें तें मला माझ्या पदरचें थोडेंच द्यावें लागणार आहे!’

परंतु त्या तोतया वारसांचें राजकारण अखेर कांहीं फलद्रूप झालें नाहीं; व राणीची मनीषाही पूर्ण झाली नाहीं. बिचारी राणी दत्तकाची परवानगी आज येईल, उद्यां येईल, इंग्रजी कृपेचा मिष्टान्नाचा कवळ आज मुखीं पडेल, उद्यां मुखीं पडेल, या आशेनें तहानभुकेनें व्याकुळ झालेल्या पांखरीसारखी तोंड उघडून बसली होती. अशा स्थितींत झांशी संस्थानच्या बाबतींत अखेरचा निर्णय गव्हर्नर जनरल याचेकडून ठरून बुंदेलखंडच्या पोलिटिकल एजंटाकडे आला. त्यानें तो राणी लक्ष्मीला कळविला जाऊन त्याची योग्य अंमलबजावणी होण्यासाठीं झांशीचे असि. पो. ए. मेजर एलिस यांच्याकडे पाठविला.

त्या निर्णयांत काय लिहिलें असेल बरें? झांशी संस्थानचे इंग्रजांशीं झालेले सर्व करारमदार व तहनामे त्यांतील खऱ्या अर्थानें वाचले व त्यांचा सभ्यतेला शोभणारा कायदेशीर अर्थ ध्यानीं घेतला, तर इंग्रजांनीं झांशीच्या दत्तविधानाला मान्यता देऊन तें राज्य दत्तकवंशाकडे चालवावयाला हवें होतें. मेजर एलिस याचेंही मत तसेंच होतें व तें त्यानें वरिष्ठांकडे पाठविण्याच्या आपल्या खलित्यांत स्पष्टपणें नमूद केलें होतें. इंग्रजांनीं हिंदी राजेरजवाड्यांच्या बाबतींत या दत्तक प्रकरणीं स्वीकारलेली परंपरा पाहिली तरी तेहरी, दतिया, जालवण, वोरछा एथील दत्तकांना पूर्वी मान्यता मिळाली होती तशीच मान्यता झांशीच्या दत्तकाला मिळणेंही रास्त ठरलें असतें. परंतु एवढ्यावरच जर त्या प्रश्नाचा निकाल लागावयाचा असता तरची ती गोष्ट! पण एका सुभाषितकारानें राजनीतीला वारांगनेची उपमा दिलेली आहे, तसले रंगढंग एथें इंग्रजी राजनीतीलाही करावयाचे असल्यावर तिला ह्या सरळ गोष्टींचें काय

होय! अशी वस्तुस्थिति असतांना झांशीच्या दत्तकप्रकरणीं इंग्रजांनीं काय निकाल दिला असेल हें काय निराळें सांगावयाला पाहिजे? ग. ज. लॉर्ड डलहौसी यानें आपला लेखी निर्णय बुंदेलखंडच्या पोलिटिकल एजंटांकडे पाठविला; त्यांनीं तो झांशीचे असि० पॉ० ए० मेजर एलिस यांच्याकडे पाठविला; व एलिसनें तो जाहीरनामा प्रसिद्ध केला. तो पुढीलप्रमाणें होता.

* * *

"ग्वालेर, बुंदेलखंड व रेवा एथील पोलिटिकल एजंट मेजर डी. ए. माल्कम यांजकडून असें जाहीर केलें जातें कीं, झांशीचे अधिपति महाराज गंगाधरराव हे ता. २१ नोव्हेंबर सन १८५३ रोजीं परलोकवासी झाले. त्यांनीं मरणापूर्वीं दामोदरराव यांस दत्तक घेतलें आहे. पण ना. गव्हर्नर जनरलसाहेबांनीं तें दत्तविधान नामंजूर केल्यामुळें हिंदुस्थानसरकारचे सेक्रेटरी ह्यांचेकडून ता. ७ मार्च सन १८५४चा हुकूम आल्याप्रमाणें झांशी संस्थान खालसा करण्यांत आलें आहे. त्याप्रमाणें या जाहीरनाम्याचे द्वारा सर्व लोकांस कळविणेंत येतें कीं झांशी प्रांत तूर्त बुंदेलखंडचे पोलि. एजंट मेजर एलिस यांच्या ताब्यांत दिला आहे. यास्तव झांशी प्रांतांतील सर्व प्रजेनें आपण ब्रिटिश सरकारचे अंमलाखालीं आहों असें समजावें, व मेजर एलिस साहेबांस वसूल देत जावा आणि सुखानें व संतोषानें राहावें. कळावें. ता. १३ मार्च सन १८५४"

* * *

दत्तक मंजूर झाल्याची मंगल वार्ता आपल्या कानीं केव्हां एकदां येईल, इंग्रजी कृपेचा कवळ मुखीं केव्हां पडेल, या आशेनें ताहान-भुकेनें व्याकूळ झालेल्या पांखरीसारखी राणी मुख उघडून बसली होती; त्या तिच्या मुखीं कृपेच्या कवळाऐवजीं असा पसाभर जळजळीत फुफाटा फेंकण्यांत आला!

## ९ : झांशीच्या मालिकेंतील इतर दुर्दैवी हिंदी राज्यें

इंग्रजांनीं झांशी संस्थान खालसा केलें, त्यांत त्यांनीं झांशीच्या अधिपतींशीं वेळोवेळीं केलेल्या करारांना व दिलेल्या वचनांना सफा हरताळ फांसला हें सूर्यचंद्राइतकें सत्य आहे. झांशीचा दत्तक गव्हर्नर जनरलनें नामंजूर केला, म्हणून झांशीचें राज्य खालसा करण्यांत आलें असें सांगणें, म्हणजे एखाद्या मनगटमस्त खुनी बेरडानें उघड उघड खून करून मग मृत मनुष्य अमक्या आजारानें अथवा तमक्या अपघातानें मेला असें कारण पुढें करण्यासारखें आहे.

परंतु एकट्या झांशीच्या बाबतींतच इंग्रजांनीं असें विश्वासघातकी व स्वार्थसाधु राक्षसी धोरण तेव्हां आंखलें होतें कीं काय, हें पाहण्यासाठीं तेव्हां हिंदुस्थानांतील इतर राज्यांची काय हालहवाल होती हेंही पाहिलें पाहिजे.

पेशव्यांची सत्ता सन १८१८ सालीं इंग्रजांनीं दिवट्या रावबाजीकडून सालीना आठ लाख नेमणूक देण्याच्या करारानें कशी मिळविली हें मागें आपण पाहिलेंच आहे. पेशवे ज्यांचे वस्तुतः सेवक, त्या छत्रपतींना नामशेष करण्यासाठीं इंग्रजांनीं अंमळ निराळा डाव टाकला. परंतु वास्तविक मराठशाही बुडविण्याच्या कामीं इंग्रजांनीं छत्रपति व पेशवे या दोघांनाही सारखेंच राबविलें; व चोरून आणलेल्या खव्याची वांटणी करतांना भांडणाऱ्या दोन बोक्यांचा न्याय करणाऱ्या धूर्त वानराप्रमाणें थेट वर्तन केलें. प्रथम इंग्रजांना मराठशाही कारभारांत चंचुप्रवेश करण्याची संधी मिळाली ती नारायणराव पेशव्याच्या वधानंतर रघुनाथराव पेशव्याच्या निमित्तानें मिळाली. रघुनाथरावानें पेशवाईपदाच्या लोभानें इंग्रजांना फितुर होण्यापावेतों मजल मारली, तेव्हां इंग्रजांचा मराठशाहींत प्रथम शिरकाव झाला. पुढें त्यांनीं हळू हळू पुण्याच्या पेशवे दरबारांत हात घुसवला, व पेशव्यांना इतर मराठमंडळांतून फोडून त्यांच्याशीं तह करून तैनाती फौजेचें लोढणें त्यांच्या

गळयांत बांधलें. पेशवे हे मराठशाहीचे सूत्रधार! तेव्हां त्या एका सूत्रधाराला इंग्रजांनीं कांखोटीला मारल्यावर बाकीचे सारे त्या अनुरोधानें कांखोटीला आलेच. मात्र पेशवे हे मराठशाहीचे प्रत्यक्ष कर्ते कारभारी म्हणून त्यांना इंग्रजांनीं प्रथम काखोटीला मारलें असें नव्हे. छत्रपतींना बाजूला ठेवलें तर पेशवे एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभकालीं मराठशाहीचे 'कुंकवाला आधार' होते. म्हणून त्यांना प्रथम पाशबद्ध करून मग इंग्रजांनीं हां हां म्हणतां शिंदे, होळकर, भोंसले वगैरे प्रमुख मराठा सरंजामदारांशीं स्वतंत्रपणें तह करून त्यांचीही तीच गत करून सोडली. त्या सर्वांच्या गळयांत आपल्या तैनाती फौजेचें जड लोढणें अडकवलें. मराठेमंडळीतील ह्या फुटीमुळें तेव्हां पेशवे, शिंदे, होळकर, भोंसले या सर्वांत एकमेकांबद्दल 'खासें नाक कापलें गेलें' असा आत्मघातकी संतोष वाटला खरा. पण यामुळें खव्याची वांटणी करणाऱ्या धूर्त वानराच्या कारवाईनें त्या बोक्यांची जी गत झाली तीच गत आपणां सर्वांची आपसांतील फुटीमुळें झाली आहे असें त्यांना मग कळून आलें. त्याबरोबर ते किंचित् सावध होऊन मराठमंडळाची एकजूट करण्याच्या उद्योगाला लागले. हा डाव आपण पूर्वींच्याच मसलतीनें खेळलों तर आपल्यावरच उलटेल अशीं चिन्हें दिसूं लागतांच त्यांनीं आपला पवित्रा बाळाजीपंत नातू नांवाच्या एका फितुरानें साह्य घेऊन बदलला. तेव्हांचा छत्रपति प्रतापसिंह हा 'मी राज्याचा मालक असून पेशव्यानें मला बाजूला लोटून स्वतः राज्य करावें म्हणजे काय!' हा विचार मनांत आणून असंतुष्ट झाला होता. त्याची असंतुष्टता अगदींच असमर्थनीय होती अशांतली गोष्ट नाहीं. रावबाजी पेशव्याची राज्यकर्ता या नात्यानें, व माणूस या नात्यानेंही सर्वांगीण नालायकी तेव्हां जगजाहीर झाली होती. मराठशाहीचा मालक या नात्यानें वंशपरंपरेनें छत्रपतीचें बुजगावणें अजून मराठमंडळांतील कर्त्या पुरुषांनीं कायम ठेवलें होतें. त्यामुळें 'मी छत्रपतीचा वंशज; मी मराठशाहीचा धनी; मी मराठमोळ्या दुनियेचा देव; आणि पेशवा हा माझा वंशपरंपरेचा सेवक; माझा पुजारी! हा पुजारी मला देवाला दूर लोटून तेथें बसतो म्हणजे काय!' अशी ईर्षा प्रतापसिंहाच्या मनांत येणें अगदीं क्रमप्राप्त होतें. प्रतापसिंहाला कर्तबगारी दाखविण्याला अवसरच न मिळाल्यामुळें तो कर्तबगार होता कीं नव्हता याविषयीं निर्णय देणें अवघड आहे. तथापि प्रतापसिंहाची व राव-

बाजीची बरोबरी कालत्रयींही झाली नसती हेंही तितकेंच खरें. रावबाजी-सारख्या नादान पेशव्याच्या अंकित आपण राहावें, ही भयंकर जाचणूकशी प्रतापसिंहाला साहजिकच वाटली असेल. अथवा पेशवे व छत्रपति यांच्यांत फूट पाडून दोघांना निरनिराळे गिळंकृत करण्याच्या इंग्रजी डावाची ही पहिली फलश्रुति असेल. प्रतापसिंहाला आपल्या वाटेंतून पेशव्याचा कांटा काढून टाकून आपण छत्रपति व्हावेंसें वाटलें, व त्याला इंग्रजांची पुष्टि मिळाली. त्याबरोबर तो इंग्रजांना जाऊन मिळाला, व इंग्रजांनीं 'बंडखोर' पेशव्यांचें निर्दालन करून त्याला मराठशाहीचे मालक राजाधिराज छत्रपति करण्याचें अघळपघळ अभिवचन दिलें.

याप्रमाणें छत्रपति प्रतापसिंहाला इंग्रजांनीं आपल्या हातांतील बाहुलें बनवून पेशव्याला राजाविरुद्ध बंड करणारा बंडखोर ठरविलें तेंही त्याच्याच मुखानें. 'दुसरे बाजीराव पेशवे बंडखोर असल्यामुळें त्यांना आम्हीं पेशवे-पदावरून दूर केलें आहे. त्यांच्या दुर्गुणांमुळें मराठी राज्याचें अपरिमित नुकसान झालें असून आणखीही नुकसान होण्याचा संभव आहे. यास्तव यापुढें त्यांना जे लोक साह्य करतील त्यांनाही बंडखोर ठरविलें जाईल.' असा छत्रपति प्रतापसिंहाच्या सहीचा जो जाहीरनामा प्रसिद्ध झाला, त्याच्याशीं छत्रपतीचा नांवापेक्षां जास्त संबंध नव्हता. इंग्रज व पेशवे यांच्यांत बेबनाव झाल्याचा बहाणा करून इंग्रजांना पेशव्याविरुद्ध लढाईला उभें राहण्याची संधी आणून देणें, पेशव्याला बंडखोर ठरविणें, त्यापूर्वीं इंग्रज व छत्रपति यांच्यांत परस्पर फितुरीचें नाजुक राजकारणी जाळें विणणें, वगैरे सर्व गोष्टी तेव्हांचा इंग्रजांचा—एल्फिन्स्टन साहेबाचा हस्तक बाळाजीपंत नातू याच्या हस्तें पार पडल्या.

बाळाजीपंत नातूची ही कृति अत्यंत निषेधार्ह तर खरीच; पण रावबाजी, छत्रपति प्रतापसिंह, अथवा एल्फिन्स्टन म्हणजेच इंग्रज यांची कृतिही तितकीच निषेधार्ह होती. पेशवा नादान होता खरा. पण त्याला मारण्या-साठीं प्रतापसिंहानें परक्या इंग्रजांशीं संगनमत कां करावें? इंग्रजांवर विश्वास टाकून त्यांच्या मांडीवर मान टेंकून निर्धास्तपणें झोंपीं जाण्याजोगा त्यांच्या ठायींचा कोणता गुण प्रतापसिंहाच्या नजरेला आला होता? त्यानें तरी पेशव्यांच्या दुर्वर्तनामुळें व अनागोंदी कारभारामुळें रसातळाला जाणाऱ्या

देशाला वांचविण्यासाठीं आपल्या इतर मराठा सरदारांशीं संगनमत करून पेशव्याविरुद्ध संयुक्त फळी उभारून राजशासनविषयक आपलें कर्तव्य कां पार पाडलें नाहीं? पेशवाई म्हणजे निव्वळ ब्राह्मणशाही होती, व मूठभर ब्राह्मणांच्या स्वार्थी सत्तेतून मराठयांच्या–ब्राह्मणेतरांच्या महाराष्ट्राची सोडवणूक करण्यासाठीं प्रतापसिंह पेशव्यांविरुद्ध उठला असें कोणी म्हणतात. त्याच्या उठावणीचा खरोखर तोच अर्थ असता, तर तो निःसंशय स्पृहणीय होता. बहुजनसमाजाच्या हितासाठीं प्रतापसिंहानें अपराध्यांची उचलबांगडीच काय पण कत्तल केली असती तरीदेखील तें सत्कृत्यच ठरलें असतें. शिंदे, होळकर, नागपूरकर भोंसले वगैरे मराठे सरदारही पेशवाई कारभारावर खूष होते अशांतला प्रकार नाहीं. त्यांनाही पेशवे नको होते. ते एकएकटे मोठें निश्चित यश मिळविण्याला असमर्थ असले, तरी त्या सर्वांची जर एकी झाली असती व प्रतापसिंहाच्या छत्रपतिपणाची त्यांत भर पडली असती तर पेशव्यांच्या बेबंद कारभारापासून देश मुक्त झाला असता. इंग्रजांना, मराठशाहीकडे काण्या डोळयानें पाहण्याला मग धास्ती वाटली असती. इंग्रज हे भले राज्यकर्ते व लायक मित्र आहेत, असा समज होण्याला इंग्रजांनीं आपल्या वर्तनांतून मुळींच जागा दिली नव्हती. असें असतां प्रतापसिंहानें असें कांहींही न करतां एकदम इंग्रजांशीं पेशव्यांविरुद्ध संगनमत केलें, फसून कां होईना पण त्या दुर्जनांची संगत धरली, ही एकच गोष्ट तो राजा या पदवीला पुरा पात्र नव्हता एवढें म्हणण्याला पुरेशी आहे. बाळाजीपंत नातू हा नीच हलकट माणूस आहे, याच्या सांवलीला देखील भल्या माणसानें उभें राहूं नयें, इतकें न कळण्याइतका प्रतापसिंह भोळा नव्हता. तो भोळा होता असें मानलें तर राजेपणाच्या त्याच्या नालायकींत आणखी भर पडते. त्यानें केवळ राजवटीचें आयतें ठावकें मिळवण्यासाठीं ह्या सर्व कारवाया केल्या. पेशव्यांनीं आपल्या कुकर्मांनीं कलुषित केलेल्या लोकमताच्या भावनावशतेचा फायदा घेऊन राज्य बळकावण्याची ती एक संधिसाधुपणाची शकल होती. जनतेची दिशाभूल करून आपला कावा साधण्याची ही सर्व राज्यकर्त्यांची कला जगजाहीरच आहे. आजची भांडवलदार साम्राज्यशाही तीच कला नेहमीं उपयोगांत आणते, आणि सरंजामशाहीलाही तीच कला उपयोगी पडत असे व असते.

शिंदे-होळकर-भोंसले यांच्याशीं प्रतापसिंहानें संगनमत कां केलें नाहीं असें मागें म्हटलें खरें. पण पेशवे काय, छत्रपति काय, अथवा शिंदे-होळकर-भोंसले काय, एकाच सरंजामशाही माळेचे मणी, एकाच कडू वेलीचीं तीं फळें. तीं एकजात कडूच असावयाचीं. जो हीन स्वार्थसाधुपणा पेशव्यांच्या अंगीं होता, तोच छत्रपतींच्या व तोच शिंदे-होळकर-भोंसले आदि-करून सरदारांच्या अंगीं होता. असा जो तो आपापल्या परीनें स्वार्थाला जपत असतांना बाळाजीपंत नातूनेंही कुशल धंदेवाइकाप्रमाणें स्वार्थसाधुपणाचा धंदा केला, यांत पेशवे, छत्रपति, शिंदे, होळकर, भोंसले वगैरे मंडळीपेक्षां फारसें निराळें तें काय केलें ?

प्रतापसिंहानें जें केलें त्याचें फळ त्याला यथायोग्य मिळालें. पेशव्यांचा निःपात करून व मराठा सरदारांना नमवून व याप्रमाणें मराठशाही नष्ट करून तेथें आपली सार्वभौम सत्ता इंग्रजांनीं मजबूत स्थापन केली, व लगेच प्रतापसिंहाशीं दरडावणीची भाषा सुरू केली. 'तूं आमच्या मेहेरबानीनें छत्रपति झाला आहेस. एरव्हीं तुला कोण विचारीत होतें?' असे इंग्रजांचे चढेलपणाचे बोल ऐकण्याचें प्रतापसिंहाच्या कपाळीं आलें. तेव्हां तो आपल्या वंशपरंपरागत छत्रपतित्वाचें नांव सांगून छत्रपतिपणा ही आपली मिरास आहे हें सिद्ध करण्याचा प्रयत्न करूं लागला. वंशपरंपरेनें चालणाऱ्या राजवंशाच्या दृष्टीनें ती प्रतापसिंहाची सरंजामी मिरास होती खरी. पण ज्या सामाजिक गरजेंतून सरंजामशाही उदयाला आली ती गरज आतां नष्ट झाल्यामुळें सरंजामशाहीची आवश्यकता उरली नव्हती. अर्थोत्पादन पद्धतीनुसार निर्माण झालेली सामाजिक गरज हा कोणत्याही शासनसंस्थेचा पाया असतो. ती गरज संपल्यावर, तो पाया खचल्यावर त्यावरील इमारत कशी टिकणार? वास्तविक इंग्रजांच्या रूपानें हिंदुस्थानांत येऊन बलवत्तर झालेल्या भांडवलशाहीच्या कृपेनें जगणाऱ्या छत्रपतीचें छत्रपतित्व केव्हांच लयाला गेलें होतें. त्यांत पेंढा भरून त्याचें बुजगावणें इंग्रजांनीं उभें करून ठेवलें होतें. त्या प्राप्त परिस्थितींत समाधान मानून राहण्याला प्रतापसिंह नाखूष आहे असें इंग्रजांना दिसून येतांच त्यांनीं त्याला चौदावें रत्न दाखविलें. प्रतापसिंहाला वाटलें होतें कीं इंग्रजांनीं महाराष्ट्राच्या खेडोपाडीं छत्रपतींच्या नांवाची द्वाहि फिरवून त्यांची सार्वभौम सत्ता आपल्या तोंडानें कबूल केली आहे, त्याअर्थीं आज

ना उद्यां हें आपलें राज्य आयतें आपल्या हातीं येणार. पण ती त्याची कल्पना साफ चुकीची ठरली. प्रतापसिंहाला निमूटपणें इंग्रज रेसिडेंटच्या सल्ल्यानें व इंग्रजांनीं मेहेरनजर करून मुलूख दिला तेवढ्यावरच 'राज्य' करीत स्वस्थ बसावें लागलें. पुढें प्रतापसिंह व इंग्रज यांच्यांत आणखी अनेक कटकटी उपस्थित झाल्या. त्या कटकटींत प्रतापसिंहाची बाजू जरी खरी होती, व्यक्तिशः तो जरी सज्जन असून शक्य त्या चांगल्या प्रकारें स्वाभिमानपूर्वक राज्य करण्याचा प्रयत्न करीत होता, तरीही त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं. त्याच्यावर पुढें नाना प्रकारचे खोटे नाटे आरोप लादण्यांत आले. ते आरोप शाबीत करण्याला खोटे नाटे साक्षीदारही बाळाजीपंत नातूनें मिळविले. प्रतापसिंहाचा सखा भाऊ अप्पासाहेब हाही त्या कटांत सामील झाला. असें प्रतापसिंहाची चौकशी करण्याचें नाटक इंग्रजांनीं सोळा आणे पार पाडलें; व प्रतापसिंहाला 'राजद्रोही' अर्थात् 'इंग्रजद्रोही' ठरवून पदच्युत करण्यांत येऊन त्यांचे जागीं फितूर अप्पासाहेब व बाळाजीपंत नातू हे अनुक्रमें छत्रपति व छत्रपतीचा दिवाण नेमले गेले! या अप्पासाहेबाला उपमा द्यावयाचीच झाली तर ती झांशीच्या गादीवर बसून गादी विटाळून गेलेल्या तिसऱ्या रघुनाथरावाचीच द्यावी लागेल. सन १८४८ मध्यें अप्पासाहेब निपुत्रिक मरण पावला, व त्यामुळें साताराची गादी सफा कशी बुडवावी याविषयीं इंग्रजांना डोकें शिणवावें लागलें नाहीं. गंगाधररावांप्रमाणेंच त्यानेंही मरण्यापूर्वी एक मुलगा दत्तक घेतला होता. पण त्याला गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यानें मंजुरी दिली नाहीं; व साताराचें राज्य खालसा केलें. हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकारी आपली दाद घेत नाहींत म्हणून प्रतापसिंहानें रंगो बापूजी नांवाच्या आपल्या विश्वासांतील गृहस्थाला विलायतेंत आपल्या तर्फें दाद लावून घेण्यासाठीं पाठविलें होतें. पण त्याचाही कांहीं उपयोग झाला नाहीं. रंगो बापूजी चवदा वर्षें विलायतेंत राहून यशाचा लवलेशही न मिळवितां अखेर सन १८५३ मध्यें कसाबसा जिवंत माघारा आला इतकेंच. तो विलायतेंत असल्याच्या दरम्यान इकडे साताराचें राज्य बुडालें! आणि बुडालें तेंही इतकें बिन्बोभाट, कीं तें बुडतांना दंगाधोपा, बंड बंडाळी, अत्याचार वगैरे कांहींएक झालें नाहीं! याचा अर्थच हा कीं राज्य राजाचें बुडालें. लोकांचें राज्य होतें कोठें तें बुडेल!

महाराष्ट्रांत सरंजामशाहीला इंग्रजी भांडवलशाहीनें जसें जायबंदी करून मृतवत् करून सोडलें, तशीच गत पंजाबांत शीखांचीही करण्यांत आली. शीख हे अतिशय शूर व कडवे म्हणून प्रसिद्ध. मुसलमानांच्या अपरिमित जुलूमजबरदस्तीला विटून संतप्त झालेल्या त्या शूर शीखांनीं मोठ्या हिरीरीनें स्वतःचें स्वतंत्र राज्य स्थापन केलें. ही शीखांची सत्ता म्हणजे सरंजामशाहीचा ठळक विजय होय. सरंजामशाही हिंदुस्थानांत कशी बळावली याचें स्थूल विवेचन मागें करण्यांत आलें असल्यानें एथें त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. मध्यवर्ती मोंगल बादशाही सत्तेच्या दुबळेपणांतून व विस्कळितपणांतून पंजाबांतील शीख सत्ता उदयाला आली. तिला बलिष्ठ व संघटित करण्याच्या कामीं 'अफूची गोळी' ह्या नांवाला पात्र ठरलेल्या धर्मभावनांचा भरपूर उपयोग करून घेण्यांत आला; शीखांचा स्वतंत्र धर्मपंथ जोपासून त्या धर्माच्या नांवावर शीख मुसलमानांविरुद्ध एक जोमदार फळी सरंजामदारांनीं निर्माण केली. शीख सत्ता महाराणा रणजितसिंग याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांतील एक सामर्थ्यवान व तेजस्वी अशी सत्ता गणली जात असे. रणजितसिंगालादेखील इंग्रजांचें भय होतें. पण त्यानें धूर्तपणें इंग्रजांशीं मैत्री राखून तें भय टाळलें होतें. इंग्रजांनीं देखील भलेपणानें रणजितसिंगाशीं द्रोह केला नाहीं असें नव्हे. हिंदुस्थानांतील मुसलमानी सत्तेचीही गळचेपी इंग्रजांकडून झाली होती व होत होती. पंजाब प्रांत हा लोकसंख्येच्या मानानें मुसलमानी प्रभुत्वाचा प्रांत गणला जाण्याजोगा होता. शिवाय खैबर घाटापलीकडील रानवट अफगाण लोकांचेंही इंग्रजांना भय होतें. पंजाब, जम्मू, काश्मीर व मुलतान ह्या प्रांतांवर रणजितसिंग व त्याचे शीख लोक अंमल बसवीत व गाजवीत असतांना बंगाल, बहार, अयोध्या, लखनौ, दिल्ली, अलाहाबाद या प्रांतांतील मुसलमानी सत्तेच्या मानेसभोंवार इंग्रजी सत्तेचे पाश पडले, तेही रणजितसिंगाच्या पथ्याचे होते, व रणजितसिंगाचा मुसलमानांना वाटणारा दरारा इंग्रजांच्या पथ्याचा होता. म्हणून दोघांचाही स्नेहसंबंध टिकला.

पण रणजितसिंगाच्या मृत्यूनें सर्वच पारडें फिरलें. रणजितसिंगाच्या पश्चात् त्याची तरुण राणी चंद्रकुंवर व दिलीपसिंह हा अल्पवयी राजपुत्र हीं राहिलीं. तेव्हां रणजितसिंगाच्या राज्याची व्यवस्था आपल्या हातीं आली तर पाहावी म्हणून निरनिराळ्या शीख सरदारांनीं मोरे एकच गर्दी उडवून दिली.

कांहीं इंग्रज इतिहासकाराच्या मतें राणी चंद्रकुंवर ही अतिशय उत्शृंखल वृत्तीची स्त्री होती; व तिचा ओढा राजा लालसिंग नांवाच्या एका नीच शीख सरदाराकडे होता. त्या लालसिंगाला दिवाण नेमून राज्याचा कारभार चालविण्याचें राणीनें ठरविलें, व त्यांत इंग्रजांनीं कांहींही ढवळाढवळ केली नाहीं. पण चंचल राणी व तिचा नीच वृत्तीचा प्रियकर यांना राजवटींत मन मानेल तसा धिंगाणा घालूं देणें म्हणजेच त्या राज्यांत त्याच्या नाशाचीं नवीं बीजें रुजवण्यासारखें होतें. असल्या गोष्टीला प्रोत्साहन देऊन इंग्रजांनीं राजवैभवाला हपापलेल्या निरनिराळ्या शीख सरदारांना आपसांत एक-मेकाशीं भांडून दुफळी माजविण्याचा मार्ग मोकळा करून दिला. सातारा व झांशी हीं राज्यें खालसा करण्यापूर्वी तेथें बजबज माजविण्यासाठीं नेमका हाच उपाय इंग्रजांनीं अंमलांत आणला होता. साताऱ्याच्या गादीवरून प्रतापसिंहाला पदच्युत करून अप्पासाहेबाला छत्रपति करण्यांत आलें, व त्याच्या कारकीर्दींत राजवटीची सर्वतोपरी वाताहात झाल्यावर लगेच तें राज्य दत्तक नामंजूर करून खालसा करणें इंग्रजांना सोपें गेलें.

पंजाबच्या राज्याच्या बाबतींतही इंग्रजांचा हा प्रयत्न पूर्णपणें यशस्वी झाला. आधींच सरंजामशाही ही लोकहिताच्या गोष्टी करून समाजजीवन सुखाचें करण्यापेक्षां आपलेच चोज पुरविण्यांत दंग असावयाची. त्यांतूनही एखादा राजा लोकहितदक्षतेनें वागूं लागला, तरी त्याला तसें लोकहित साधण्यापुरतें मनःस्वास्थ्य तर पाहिजे! देशांत दंगेधोपे चालले असले, धन-धान्यसंपदेच्या उत्पादनाचा मार्ग श्रमजीवि जनतेला सुलभ करून न देतां त्यांची पिळणूक करून राज्याच्या वाढत्या गरजा भागविण्याची पाळी राजा-वर आली, म्हणजे तेथें त्या राजाचा काय उपाय चालणार! त्याची इच्छा लोकांचें कल्याण करण्यासाठीं केवढ्याही मोठ्या गोष्टी करण्याची असली, तरी नुसत्या पवित्र इच्छेनें अथवा कल्पनेनें असल्या गोष्टी थोड्याच यशस्वी होतात! साताऱच्या छत्रपति प्रतापसिंहानें आपल्या शेतकरी रयतेचें कल्याण साधण्यांतच आपलें कल्याण आहे हें ओळखून त्या दृष्टीनें शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचे प्रयत्न यथामति केले. पण टिटवीनें चोंचीनें समुद्र उपसून कधीं तो कोरडा कसा होणार? मोठा धन्वंतरि असला, तरी तो गतप्राण झालेल्या जीवाला जिवंतपणा कसा देणार?

रणजितसिंगाच्या कारकीर्दींत पंजाबांतील बहुसंख्य अशा सामान्य शेतकरी व कामकरी समाजांत पुष्कळ अंशीं स्वास्थ्य नांदत होतें. पण त्याच्या पश्चात् सर्वच घडी बिघडल्यावर कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहींसा झाला. राणी चंद्रकुंवर हिनें आपल्या बेजबाबदार प्रियकराला आपला दिवाण व आपल्या अल्पवयी पुत्राचा पालनकर्ता नेमलें. तो आपल्या हीन स्वार्थापलीकडे खऱ्या जनहिताकडे कशाला लक्ष देतो ? खुद्द राजदरबारांतदेखील तो अत्यंत अप्रिय होता. त्या काळीं उभ्या पंजाबांत त्याच्याइतका नष्ट माणूस दुसरा नव्हता. चैन, आपसांतील यादवी, इंग्रजांची खुषमस्करी वगैरे गोष्टीसाठीं पाण्यासारखा पैसा तो खर्च करूं लागला. देशांतील शेतकी व उद्योगधंदे यांना अनास्थेमुळें अवकळा येऊन सरकारसारा देण्याचेंही त्राण कामकरी—शेतकरी बहुजनसमाजाच्या अंगीं उरलें नाहीं. वाढता खर्च व घटतें उत्पन्न यांची तोंडमिळवणी करण्यासाठीं सैन्याच्या संख्येंत व पगारांत कपात आणि जहागिरी खालसा करण्यांत येऊं लागल्या. बड्या बड्या इंग्रज अधिकाऱ्यांसाठीं पाण्यासारखा पैसा खर्च करून त्यांची सरबराई ठेवणें, स्वतः भरमसाट पैसा लुबाडतां येईल तितका लुबाडणें, अशी लालसिंगाची दिवाणगिरी होती. उद्यां पंजाब खालसा करावयाचा, ह्या धोरणानें तेथील सामान्य जनतेंत भयंकर असंतोष त्यांच्या राज्यकर्त्यांविषयीं माजेल अशी कारवाई करण्यासाठीं इंग्रजांना तरी लालसिंगापेक्षां दुसरा कोणता विश्वासू व चतुर प्रतिनिधि तेथें नेमतां आला असता ?

पण लालसिंगही इंग्रजी भांडवलशाही सत्तेची वाढती राक्षसी भूक शमविण्याला असमर्थ ठरला, व त्याचा आणि इंग्रजांचा काश्मीर प्रांत विकण्याच्या बाबतींत बेबनाव झालाच. त्याबरोबर त्याला पकडून खटला भरून तुरुंगांत लोटण्यांत आलें. नंतर पंजाबची व्यवस्था बड्या बड्या शीख सरंजामदारांच्या व्यवस्थापक मंडळाकडे इंग्रजांनीं सोंपविली; व त्या मंडळावर सासूपणा गाजविण्याला इंग्रज रेसिडेंट तेथें येऊन बसला. व्यवस्थापक मंडळ केवळ नांवाला होतें; रेसिडेंट हाच पंजाबचा खराखुरा राजा—सुलतान होता !

हिंदी सरंजामदार वर्गाच्या दृष्टीनें इंग्रजांनीं पंजाब प्रांत अगदीं अन्यायानें जवळ जवळ घशांत टाकला, व त्यामुळें त्या वर्गांत भयंकर कोलाहल माजला. सरदार, जहागिरदार, दिवाण अशा निरनिराळ्या अधिकारांच्या जागांना व

वैभवाला मुकलेले लोक नव्या इंग्रजी अमदानींत सर्वतोपरी हतबल होऊन निकृष्टावस्थेप्रत येऊन पोहोंचले ते लोक मनांतून इंग्रजांवर अत्यंत रुष्ट झाले. काश्मीर हा अत्यंत सुपीक प्रांत, आणि तो एक प्रकारें पंजाबच्या राज्याचें नाकच. तो इंग्रजांनीं निर्दय सावकाराच्या वृत्तीनें, एक कोटी रुपयांना गुलाबसिंग या जम्मूच्या मांडलिक राजाला विकला. ही इंग्रजांनीं जणूं दुधारी तरवारच पंजाबच्या राज्याच्या छातींत खुपसली! गुलाबसिंह हा पंजाबचा मांडलिक शीख, तो याप्रमाणें स्वतंत्र होऊन फुटून निघाला व इंग्रजांचा मिंधा अर्थात् स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या शीखांचा प्रतिस्पर्धी झाला. आणि पंजाबचें उत्पन्न तेवढें घटलें. आणि हा सारा उपद्व्याप कशासाठीं? तर पंजाबवर सक्तीनें लादलेली दीड कोट रुपये खंडणी वसूल करण्यासाठीं! महाराणा रणजितसिंग याच्या मृत्यूच्या वेळीं खजिन्यांत वीस कोट रुपये शिल्लक होते. त्यांचा एवढ्या दरम्यान अवाढव्य खर्च व अव्यवस्था यांपायीं चुराडा होऊन अवघे जेमतेम पन्नास लाख रुपये शिल्लक राहिले होते, ते तर इंग्रजांनीं खंडणीपोटीं लांबविलेच; पण बाकीच्या एक कोटीची भर करण्यासाठीं काश्मीर प्रांत विकण्यांत आला!

साप हा भयंकर प्राणघातक विषारी प्राणी खरा. पण त्याचे दांत कोणी पाडूं लागला कीं निरुपायानें तो दांत पाडण्याच्या हत्याराला कडकडून चावे घेऊं लागतो. त्याप्रमाणें इंग्रजांच्या ह्या कारवायांमुळें चिडलेल्या सर्व खानदानी शीख सरदारांनीं रणशिंग फुंकलें. चोहोंकडून उठावणी सुरू झाली. पण ती परिणामीं आत्मघातकीपणाची ठरली. दरम्यान कोणी शीख सरदार मरण पावला कीं त्याच्या मुलाला गादीवर बसवतांना इंग्रजांनीं भरमसाट खंडणी सक्तीनें वसूल करावी! ती वसूल करण्यासाठीं प्रांतांचे प्रांत काश्मीरच्या गुलाबसिंहासारख्या स्वार्थी फितुरांना विकावे! याप्रमाणें हतबल झालेल्या शीख सरदारांचा सर्वसामर्थ्यवान इंग्रजांशीं लढून कसा पल्ला येणार? उलट त्यांना बंडखोर, फितूर, राजद्रोही म्हणून चेंचून काढण्याला मात्र इंग्रजांना आयती संधी मिळाली. कारण इंग्रज जे लढले ते शीखांचे प्रतिस्पर्धी म्हणून लढले नसून राणा दिलीपसिंहाचे अर्थात् पंजाबच्या राज्याचे रक्षणकर्ते म्हणून लढले! ह्या लढाईचा शेवट गुजराथच्या मैदानावर ता. १२ फेब्रुआरी सन १८८९ रोजीं झाला.

लगेच मार्च १८८९ रोजीं लाहोरचा इंग्रज रेसिडेंट सर हेन्री लॉरेन्स याच्या नेतृत्वाखालीं लाहोर एथें पंजाबचा अधिपति दिलीपसिंह याचा अखेरचा दरबार झाला. त्या दरबारांत पंजाबचें राज्य खालसा केल्याचें जाहीर करण्यांत आलें. शीखांचें पूज्य निशाण लाहोरच्या किल्ल्यावरून उतरण्यांत येऊन तेथें इंग्रजांचें युनियन जॅक दिमाखानें फडकूं लागलें. राजमाता चंद्रकुंवर हिला बंडाला चिथावणी दिल्याच्या आरोपावरून कैद करून हद्दपार करण्यांत आलेंच होतें. दिलीपसिंहाला कांहीं नेमणूक करून देण्यांत आली. तेव्हां तो अल्पवयी होता. त्याला विलायतेंत नेऊन खिस्ती धर्माची दीक्षा देण्यांत आली, व तो तिकडे एका गौरकाय मृगनयनेशीं विवाहबद्ध होऊन संसार करीत अखेरपावेतों तेथेंच राहिला. त्याची आपल्या मायभूमीला येण्याची फार इच्छा होती. पण त्याला येऊं कोणं देतो! याप्रमाणें पंजाबचें राज्य गिळंकृत करण्याचा इंग्रजांचा फारा दिवसांचा डाव असा सिद्धीला गेला.

झांशी, सातारा व पंजाब हीं राज्यें बुडविण्यासाठीं इंग्रजांनीं ज्या किळसवाण्या कारवाया केल्या, त्यांची धांवती ओळख आपणाला झालीच आहे. ब्रह्मदेश, सिकीम, अर्काट, तंजावर, संबळपूर, खैरपूर, व या सर्वांहून अतिशय महत्त्वाची अशीं मध्यप्रांत—नागपूरचें भोंसल्यांचें राज्य व अयोध्येच्या नबाबाचें राज्य हीं बुडविण्यासाठीं असेच अनन्वित डावपेंच त्यांनीं लढविले. ब्रह्मदेश कां घशांत टाकला; तर शेफर्ड नांवाच्या इंग्रज व्यापाऱ्याच्या हातून एका ब्रह्मी खलाशाचा खून झाल्यामुळें ब्रह्मी सरकारनें त्याला ९९९ रुपये दंड केला म्हणून! वास्तविक खुनाला खून घेण्याइतका शेपर्डचा अपराध भयंकर होता. पण इंग्रजांना भिऊन ब्रह्मी अधिकाऱ्यांनीं आपण होऊनच ब्रह्मी खलाशाच्या म्हणजे हिंदी माणसाच्या जीविताची किंमत इतकी कमी करून घेतली. पण यांतही इंग्रजांना अपमान वाटला; व त्या अपमानाची किंमत म्हणून त्यांनीं ब्रह्मदेशाचा बळी घेतला. ब्रह्मी राजानें आपल्या राज्यांत व्यापाराचें जाळें इंग्रजांना विणूं दिलें, त्याचा हा परिणाम झाला! अर्काटचा नबाब हा इंग्रजांचा दक्षिण हिंदुस्थानांतील अगदीं पहिला जिवाचा दोस्त म्हणावयाला हरकत नाहीं. हिंदुस्थानांत इंग्रजांचें पाऊल प्रथम रोंवलें गेलें तें या नबाबाच्या साह्यामुळें, व दक्षिण हिंदुस्थानांतून फ्रेंच सत्तेची उचलबांगडी करण्याचें काम इंग्रजांना याच्याच साह्यानें करतां आलें. इतका जो

इंग्रजांचा हितकर्ता, त्याचें राज्य त्याच्या गादीला वारस नाहीं या सबबीवर इ. स. १८६५ मध्यें खालसा करण्यांत आलें. याच कारणासाठीं तंजावरचें मराठी राज्य व संबळपूरचें राज्यही खालसा करण्यांत आलें. सिकीमच्या राज्यांत दार्जिलिंग हें थंड हवेचें उत्कृष्ठ ठिकाण असल्यामुळें तें प्रथम सालीना थोडीशी खंडणी देण्याच्या करारानें इंग्रजांनीं घेतलें. नंतर तेथें जमिनीची लागवड करतां येऊन कायमचा पाय रोंवतां यावा या हेतूनें इंग्रज व्यापारी हालचाली करूं लागले. ही ढवळाढवळ सिकीमच्या राजाला मान्य झाली नाहीं व त्यानें त्या व्यापाऱ्यांना तेथून आपलें चंबूगवाळें आवरण्याला सांगितलें, हा त्याचा अपराध मानून त्याच्या राज्याचा एक भला मोठा लचका तोडण्यांत आला. अलीकडे हिमालयाच्या पायथ्याशीं उत्तम चहाची लागवड होते व त्या लागवडीपायीं हजारों हिंदी मजुरांना गुलामाप्रमाणें राबवून घेण्यांत येतें, ते चहाचे मळे याच भागांत आहेत! सिंध प्रांत जिंकतांना हीच अप्रामाणिक भेदनीति इंग्रजांनीं अंमलांत आणली. खैरपूर संस्थान सिंध प्रांतांत होतें, त्या संस्थानच्या अमिराचा भाऊ अल्लीमुराद याला इंग्रजांनीं फितूर करून आपल्या बाजूला वळवून घेतलें, व त्याला अमिराविरुद्ध झुंजवून अमिराला पराभूत करून स्वतः अमीर होण्याला साह्य केलें. आणि थोड्या दिवसांनीं ह्या नव्या अमीराला नीट राज्य करतां येत नाहीं म्हणून तें खालसा केलें. वऱ्हाड हा निजामाच्या राज्यांतील एक अतिशय सुपीक प्रांत. वऱ्हाडच्या जमिनीला सोन्याचें ताट म्हणतात. कापसाचें वऱ्हाड हें आगर. हिंदुस्थानांत विणकला तेव्हां इतक्या उन्नतावस्थेला पोहोचली होती कीं विलायतेंतील यांत्रिक कापडमागांनाही हिंदुस्थानांतील हातमागांशीं टक्कर देणें अशक्य होऊन बसलें होतें. ही आपत्ति टाळण्यासाठीं इंग्रजांना हिंदी विणकलेची गळचेपी करावयाची होती. तैनाती फौजेचें जड जोखड निजामाला असह्य झाल्यामुळें त्याला त्या फौजेचा खर्च भागविण्यापायीं पुष्कळ कर्ज झालें. त्या कर्जाची फेड निजामाला करतां येईना, म्हणून त्या कर्जफेडीसाठीं वऱ्हाड प्रांत निजामापासून इंग्रजांनीं हिसकावून घेतला.

नागपूरचें भोंसल्यांचें राज्य बुडविण्याच्या कामींही हेंच अचूक तंत्र इंग्रजांना उपयोगी पडलें. प्रथम सन १८०३ मध्यें देवगांवच्या तहांत इंग्रजांनीं भोंसल्यांचा कटक प्रांत गिळंकृत केला; व तेव्हांच तैनाती फौजेची धोंड

भोंसल्यांच्या डोकीवर दिली. भोळा बावळा दुसरा रघोजी भोंसले व त्याचा खुळावेडा मुलगा परसोजी भोंसले हीं कळसूत्रीं बाहुलीं गादीवर होतीं तोंवर मन मानेल तसा धिंगाणा इंग्रजांना त्या राज्यांत घालतां आला. पण त्यानंतर गादीवर आलेले अप्पासाहेब भोंसले जरा स्वतंत्र बाण्यानें वागूं लागतांच वांकडें आलें व उभय पक्षांत सन १८१८ सालीं म्हणजे पेशवाई बुडाली त्याच सालीं लढाई जुंपली. मरणाच्या पंथाला लागलेल्या रोग्याला प्राणवायु देऊन त्याचें आयुष्य वाढविण्याचा प्रयत्न करतात त्याप्रमाणें अप्पासाहेबानें तेव्हां सर्व मराठा सरंजामदारांची एकजूट करून इंग्रजांशीं तोंड देण्याचा प्रयत्न करून पाहिला; पण तो फसला. खुद्द त्याच्याच दरबारांतील फितूर लोकांनीं इंग्रजांशीं सन्मान्य तह करण्याचें आमिष दाखवून त्याला इंग्रजांच्या छावणींत नेऊन कैद करविलें. तेथून पुढें तो कांहीं काळ कैद भोगून मध्येंच नापत्ता झाला, व ना राज्य ना घरदार अशा स्थितींत वणवण भटकण्यांतच त्याची इतिश्री झाली. तथापि नागपूरच्या राज्याची राजकीय उत्तरक्रिया करण्याची तयारी अजून पूर्ण झाली नव्हती. तोंवर तें प्रेत बाहेर कसें आणावें! म्हणून ज्या दरबारी फितुरांनीं अप्पासाहेबाला विश्वासघातानें कैद करून दिलें, त्याच फितुरांच्या साह्यानें एक सोईस्कर असें अल्पवयी कळसूत्री बाहुलें शोधून काढून दुसऱ्या रघूजी भोंसल्याची पत्नी बांकाबाई हिच्या मांडीवर बसविण्यांत आलें. राज्याधिकाराची तृष्णा असलेल्या महत्त्वाकांक्षी स्त्रिया प्रत्येक राजवंशांत असतातच. तशीच बांकाबाईही होती. पोटीं पुत्रसंतान नसतां इंग्रजांनीं आपणाला राजमाता होण्याचा मान दिला व अज्ञान राजाचें पालन करण्याच्या निमित्तानें राज्यकारभार आपल्या हातीं आला, ही इंग्रजांची मोठी कृपाशी तिला वाटली तर त्यांत नवल नाहीं. ती संधी साधून इंग्रजांनीं नागपूरशीं उगाच एक तह केला; व त्या तहाच्या निमित्तानें मोक्याचा कांहीं प्रदेश पदरांत पाडून घेतला.

ज्या हेतूनें एका बावळटाला हुडकून काढून इंग्रजांनीं तिसरा रघोजी राजा बनविलें. तो हेतु पूर्णत्वानें साध्य करूं देऊन हा गुळाचा गणपति तिसरा रघोजी सन १८५२ सालीं निपुत्रिकपणेंच निजधामाला गेला. बांकाबाई व तिचे इतर साह्यकारी यांनीं संगनमत करून ह्या दत्तक वंशाच्या कलमावर पुन्हा दत्तकाचें नवें कलम लावलें. राजाच्या औरस वंशापैकीं कोणी जवळ-

चा वारस पुढें आला तर आपली राजवट संपुष्टांत येईल या भयानें बांकाबाई व तिचे साह्यकारी यांनीं ही चपळाई केली. पण ती फळाला आली नाहीं. गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यानें औरसांपैकीं वारसदाराचा विचार देखील न करतां दत्तक नामंजूर करून नागपूरचें राज्य लेखणीच्या एका फटकाऱ्यासरसें खालसा करून टाकलें !

## १० : दिल्ली-अयोध्या खंडण

लॉर्ड डलहौसीच्या अर्थात् इंग्रजांच्या हिंदी संस्थानें भराभर खालसा करण्याच्या धोरणाची मीमांसा करण्यापूर्वी दिल्लीची बादशाही व अयोध्येचे नबाब यांच्यावरूनही इतर संस्थानाप्रमाणेंच इंग्रजी सत्तेचा वरवंटा क्रमानें कसा फिरला, हें नजरेखालीं घालणें अवश्य आहे.

मोंगल बादशाहीच्या ऱ्हासाला अवरंगजेब बादशहाच्या कारकीर्दीतच कशी सुरुवात झाली, बादशहातीच्या नाशाचीं बीजें अवरंगजेबाच्या कडक, पक्षपाती व अत्याचारी धोरणामुळें त्याच्या अत्याचारांनीं भुसभुशीत झालेल्या त्याच्या सत्तेच्या जमिनींत कशीं फोफावलीं, हें मागें तिसऱ्या परिच्छेदांत आपण विहंगम दृष्टीनें पाहिलेंच आहे. अवरंगजेबाच्या पश्चात् त्यानें माजविलेला असंतोष तेवढा शिल्लक राहिला व कडी अंमल त्याचा त्याच्याबरोबर लयाला गेला. पुढील बादशहा हे केवळ नांवाचेच बादशहा झाले. त्यांना हुकमत गाजवितां आली नाहीं व त्यांना कोणीं जुमानलें नाहीं. मध्यवर्ती सत्ता अशी लुली पडल्यामुळें ठिकठिकाणचे वजीर, नबाब, सुभेदार वगैरे जो तो शिरजोर होऊन मी थोर कीं तूं थोर अशा भावनेनें आपसांत भांडूं लागला, व सवता सुभा स्थापून कारभार करूं लागला. बिचाऱ्या मोंगल बादशहाचें कोणीच ऐकेना; कोणीच मध्यवर्ती बादशाही सत्तेला जुमानीना. उत्तरेंत अयोध्या, रोहिलखंड, बंगाल, दक्षिणेंत निजाम, राजपुतान्यांत रजपूत राजे, भरतपूरचे जाट असे अनेक सवते सुभे स्थापन होऊन मध्यवर्ती सत्तेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. दरम्यान् नादिरशहा व अहमदशहा अबदाली सारख्यांचे भयंकर हल्लेही दिल्लीवर झाले, व या सर्वांनीं लागून बादशहातीला अगदीं मृतवत् करून सोडलें. कांहीं काळ मराठ्यांनीं दिल्लीच्या बादशहावर दरारा गाजविला, व बादशाही सत्ता आपल्या हातीं खेळविली. इंग्रजांनीं रावबाजीशीं वसई मुक्कामीं सन १८०२ मध्यें जो तह केला, त्या

तहाअन्वयें मराठशाहींत इंग्रजांचा पुष्कळच हात शिरकला. लगेच पुढच्या वर्षीं इंग्रजांनीं महादजी शिंद्याशीं सुर्जीअंजनगांव एथें तह केला. त्या तहाअन्वयें दिल्लीच्या बादशहाचे पालनकर्ते शिंद्याऐवजीं इंग्रज ठरले. पेशव्यांच्या नांवें दिल्लीच्या बादशहाच्या वजिरीच्या सनदा ज्या मिळाल्या होत्या, त्या तरी महादजी शिंद्यानेंच मिळविल्या होत्या. दिल्लीचा बादशहा हा यापुढें इंग्रजांचा केवळ एक नेमणूकदार बनला; व इंग्रज त्याचे वजीर म्हणजेच बादशहातीच्या नांवावर मनाला मानेल तें करणारे सर्वाधिकारी ठरले. तेव्हांपासून बादशहाची तोंडदेखली प्रतिष्ठादेखील शक्य तितकी कमींत कमी करण्याचा प्रयत्न इंग्रजांकडून चिकाटीनें व धिमेपणानें होत होता. असें होतां होतां सन १८३५ सालीं बादशाही शिक्क्याचें नाणेंही बंद करण्यांत येऊन ईस्ट इंडिया कंपनीच्या नांवचा नवा रुपया सर्वत्र जारी करण्यांत आला. मोंगल बादशाही सत्ता इंग्रजांनीं हिंदुस्थानांतून कायमची नाहींशी केली याचें हें प्रत्यंतर होय.

कंपनीचें राज्य हिंदुस्थानांत निर्वेधपणें सुरू झालें, तेव्हां त्यांना बादशहा ही एक अडगळशी वाटूं लागली. कारण बादशहा कितीही अंकित झाला तरी तो बादशहा! त्याला कायम ठेवून इंग्रजांना आपली सार्वभौम सत्ता हिंदुस्थानांत कशी गाजवतां येणार? खरोखर हिंदुस्थानांत आतां इंग्रजांची भांडवलशाही साम्राज्यसत्ता सर्वंकष होऊन बसली होती. अर्थात् आतां सर्व आडपडदे टाकून देऊन आपण साम्राज्य सरकार असल्याचें जाहीर करावयाचें काय तें बाकी राहिलें होतें. तोंच सन १८४९ मध्यें तेव्हांचा बादशहा बहादुरशहा याचा थोरला शहाजादा दाराबख्त हा पैगंबरवासी झाला. अर्थात् आतां ह्या वृद्ध बादशहाच्या पश्चात् बादशहा कोणी व्हावयाचें हा प्रश्न उपस्थित झाला. बादशहाची आवडती, तरुण व सुंदर अशी झीनतमहाल या नांवाची एक बेगम होती. तिला एक मुलगा होता. तो जरी सर्व शहाजाद्यांत वयानें फार लहान होता, तरी त्यालाच बादशहाच्या पश्चात् गादी मिळाली पाहिजे असा, तरुण कैकेयीनें आपल्या रूपयौवनाच्या जोरावर आपल्या मुलाला राज्यलाभ झाला पाहिजे म्हणून हट्ट धरला होता त्याप्रमाणें, ह्या बेगमेनें हट्ट धरला. वृद्ध बादशहाला तेव्हां सुंदर व तरुण बेगमेच्या प्रेमपाशांत घोंटाळत बसण्याखेरीज दुसरा उद्योगच नव्हता. त्यानें

बेगमेची इच्छा पूर्ण झाली पाहिजे असा हट्ट इंग्रज अधिकाऱ्यापाशीं धरला. पण दाराबख्तचा मुलगा फकरुद्दीन हा ऐन वेळीं बादशहात ही आपल्या 'बापाची मत्ता' अर्थात् वारस हक्कानें आपल्या मालकीची आहे असें सांगावयाला पुढें आला. त्याबरोबर झीनतमहालचा एक पक्ष व फकरुद्दिनचा दुसरा पक्ष असा कलहाग्नि बादशहाच्या राजवाड्यांत भडकला. फकरुद्दीनला विरोध करण्यासाठीं बेगमेनें चंग बांधले. इतर कोणतेही उपाय चालेनात तेव्हां फकरुद्दीनची सुंता झालेली आहे हा त्याचा दोष बेगमेच्या पक्षाकडून पुढें आणण्यांत आला. अर्थात् हा धार्मिक अडथळा होता. धनवान सत्ताधारी लोक सत्ता बळकावण्यासाठीं धर्माला राबवितात, धर्माच्या नांवावर आपले भलेबुरे मनोरथ साध्य करून घेतात, त्यांतलाच हा एक मासला. नाहींतर अकबराच्या वेळेपासून बादशाही वंशांत सुंतेला फांटाच दिला गेला होता. अकबराचा जन्म अत्यंत संकटांत अमरकोटच्या निर्जन प्रदेशांत झाला असल्यानें त्याचा सुंता-विधि तसाच राहून गेला, व पुढें त्याची मुसलमानी धर्मांतील असल्या कर्म-कांडावर श्रद्धा नव्हती म्हणून, व त्याच्या पुढच्या बादशहांनीं 'बाबा वाक्यं-प्रमाणम्' म्हणून सुंताविधीला फांटा दिला होता. पण बेगमेच्या इस्लामनिष्ठ सल्लागारांनीं फकरुद्दिनाचें नेमकें हें वर्म म्हणून पुढें मांडलें! ह्या सबबीचा इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. बेगमेच्या बाजूनें बोलणाऱ्या मौलवींनीं सुंता करणें ही अधार्मिक गोष्ट म्हणून इंग्रजांना सांगितली असेल, तर फकरुद्दिनाच्या पक्षाच्या मौलवींनीं सुंता करणें हें इस्लामचें एक महत्त्वाचें अंग होय असें कुराणाच्या आधारें पटवून दिलें असेल. पण या सुंतेचा खरा प्रकार तर याहूनही निराळा होता. फकरुद्दिनाची सुंता धार्मिक विधि म्हणून करण्यांत आली नसून त्याला झालेल्या एका आजारामुळें तो प्रकार घडला होता. या नाजुक प्रकरणावर इतका उद्बोधक विचारविनिमय झालेला ऐकल्यावर गव्हर्नर जनरलनें त्या गोष्टीला मुळींच महत्त्व देऊं नये हें अगदीं स्वाभाविक होतें.

तथापि ह्या भानगडींचा फायदा घेऊन बादशहात नष्ट करण्याचा आपला डाव साधावयाला मात्र इंग्रजांनीं कमी केलें नाहीं. ज्ञानेश्वरानें रेड्याच्या मुखांतून वेद वदविले म्हणतात, तसा एखाद्या नालायक उपटसुंभाचा शोध करून त्याला आणून महाराजा बनवून सोडावयाचें या कामीं इंग्रजांचा

अगदीं हातखंडा होता. मात्र असें करतांना एखादें कांहींतरी जबर घबाड हातीं लागलें पाहिजे. फकरुद्दिनाशीं खासगी बोलणीं करून त्याला कांहीं आमिष दाखवून बादशहा या पदवीवरील हक्क सोडल्याची व दिल्ली सोडून दुसरीकडे जाऊन राहण्यास कबूल असल्याविषयींची कबुली इंग्रज अधिकाऱ्यांनीं लिहून घेतली. फुकटांत तैनात मिळाली ती शहाजाद्याला महाग नाहीं, व फुकटांत बादशाही गिळंकृत करतां आली ती इंग्रजांना महाग नाहीं. इतकी खटपट करूनही फकरुद्दीन इंग्रजांचे कृपाकवळ सेवन करण्याला फार दिवस जगला नाहीं. त्याचा संशयास्पद रीतीनें अंत झाला. कोणी म्हणतात, त्याला विषप्रयोग करण्यांत आला. विषप्रयोग झाला असेल तर तो झीनतमहाल बेगमेच्या वतीनेंच झाला असेल. कारण तिला आपला मुलगा बादशहाच्या पश्चात् वारस ठरवून घ्यावयाचा होता; व तो तिचा डाव फकरुद्दिनानें आणि त्याच्या पक्षानें उधळून लावला होता.

फकरुद्दिनाचा शेवट झाल्यावर बेगमेनें पुन्हा आपलें घोडें पुढें दामटलें; जवानबख्ताला बादशहाचा वारस ठरविण्याचीं कारस्थानें सुरू केलीं. बेगम किती पाताळयंत्री व हुषार आहे ही एथपावेतों इतर सर्व शहाजाद्यांची खात्री झाली असल्यानें, व आपसांतल्या भांडणानें आपलाच सर्वनाश होतो इतका धडा त्यांना शिकावयाला मिळाला असल्यामुळेंही असेल कदाचित्, इतर सर्व विद्यमान शहाजाद्यांनीं जवानबख्त हाच वारस ठरावा, त्याला आमचा विरोध नाहीं, अशी कबुली दिली. पण इतक्या समजूतदारपणानें हा बादशाही वारसाचा प्रश्न सुटावा असें इंग्रजांना कोठें वाटत होतें! त्यांना वांदराच्या जखमेसारखी ह्या प्रश्नाची आणखी विचकाविचकी व्हावयाला हवी होती. हिंदी राज्यें घशांत टाकण्याचें जें एक तंत्र इंग्रजांनीं बनविलें होतें, त्या तंत्राला अनुसरूनच प्रत्येक राज्यभक्षणाचें नाटक अथपासून इतिपावेतों रंगदार रीतीनें रंगभूमीवर करून दाखविलें जात असे. पेशव्यांना नष्ट करतांना त्यांच्या बरोबरीनें छत्रपति प्रतापसिंहाचें मोहरें नाचविण्यांत आलें; प्रतापसिंहाला लोळवितांना त्यांचा भाऊ अप्पासाहेब हें मोहरें उपयोगीं पडलें. पंजाबांतही तसाच प्रकार झाला; व तोच प्रकार दिल्लीलाही. शहाजाद्यांनीं जवानबख्ताला वारस ठरविण्याविषयीं कबुली लिहून दिलेल्या कागदावरील शाई वाळते न वाळते, तोंच सर्वांत वडील शहाजादा

मिर्झा महंमद कुरेश हा 'जवानबख्त हा बादशहाचा वारस नसून मी वारस आहें' असें सांगण्याला पुढें आला.

याच सुमाराला लॉर्ड डलहौसीची गव्हर्नर जनरल या नात्याची कारकीर्द संपल्यामुळें त्याचे जागीं लॉर्ड कॅनिंग हा नवा गव्हर्नर आला. डलहौसीचें अपुरें काम पुरें करणें त्याला भागच होतें. त्याला पूर्वनियोजित धोरणाहून निराळें धोरण आंखतां येणें शक्यही नव्हतें. त्यानें 'मिर्झा महंमद कुरेश याला बादशहाच्या पश्चात फक्त शहाजादा ही पदवी वापरण्याचा अधिकार असावा. त्यानें दिल्लीचा किल्ला इंग्रजांच्या हवालीं करून कुतुबमिनारजवळ राहावयाला जावें. याबद्दल त्याला दरमहा पंधरा हजार रुपये नेमणूक मिळावी' या अटींवर हा प्रश्न सोडविण्याचें ठरवून त्या योजनेला विलायतेंतील इंग्रज श्रेष्ठांची परवानगी आणविली. सर्वनाश होण्याची वेळ प्राप्त झाली असतां अर्धें मुर्धें काय सांपडेल तें पदरांत पाडून घेऊन बाकीच्याची आशा सोडावयाची, ह्या शिष्टमान्य नीतीचा अवलंब मिर्झा कुरेशनें एथें केला हें सांगावयाला नकोच.

याप्रमाणें दिल्लीच्या मोंगल बादशाहीचा शेवट करण्याचा इंग्रजांचा डाव तत्त्वतः यशस्वी झाला. तत्त्वतः म्हणण्याचें कारण, बेगम झीनतमहाल, तिचा शहाजादा व त्यांच्या पक्षाची इतर मंडळी यांचे बादशाही टिकविण्याचे पाताळयंत्री खटाटोप अजून गुप्तपणें चाललेच होते. रानांत शिकाऱ्याच्या हातच्या बंदुकीच्या गोळ्यांनीं व शिकारी कुत्र्यांच्या चाव्यांनीं जखमी होऊन मरणाला टेंकलेल्या जनावरानें शिकाऱ्यावर गुरगुरावें, त्याच मासल्याचा तो विरोध होता.

अयोध्येचा नबाब व हैद्राबाद (दक्षिण) चा निजाम हे दोघेही दिल्लीच्या मध्यवर्ती मोंगल बादशाही सत्तेचे सेवक. त्या मध्यवर्ती सत्तेचा ऱ्हास होऊन तिचीं शकलें कशीं झालीं, ठिकठिकाणचे वजीर, नबाब व सुभेदार हळूहळू दिल्लीच्या बादशहाला जुमानीतनासे होऊन स्वतंत्रपणें कारभार कसा करूं लागले, हें मागें तिसऱ्या परिच्छेदांत आपण पाहिलेंच आहे. अयोध्या व हैद्राबाद हीं दोन मुसलमानी राज्यें खालसा करतां आलीं तर करण्याचा इंग्रजांचा मनोदय पूर्वीपासून होता. परिस्थितीच्या अनुकूल अथवा प्रतिकूल ओघाप्रमाणें त्या मनोदयाला कृतींत उतरवितांना थोडीफार मुरड घालावी

लागली असेल इतकेंच. पैकीं हैदराबादचें राज्य त्याचा वऱ्हाडापुरता लचका तोडून व त्याला पूर्ण अनुकूल करून घेऊन मांडलिक या नात्यानें इंग्रजांनीं टिकूं दिलें. कारण तें इंग्रजी साम्राज्यसत्ता हिंदुस्थानांत दृढमूल होण्याला पोषक होईल अशी तेव्हांच्या हिंदुस्थानांतील इंग्रज राज्यकर्त्यांची अटकळ होती. ती त्यांची अटकळ चुकीची नव्हती.

हैदराबादच्या निजामाचा बचाव होण्याचें मुख्य कारण एक तर तें राज्य दिल्लीपासून फार दूर; अर्थात् बादशाही सत्तेच्या बाबतींत इंग्रजांविरुद्ध ढवळाढवळ करणें निजामाला फारसें शक्य नव्हतें. उलट इंग्रजांची कृपा संपादन करून जगण्यासाठीं झटणारा निजाम दक्षिणेंत इंग्रजांचा दोस्त व मांडलिक म्हणून नांदत असल्यानें व प्रसंग पडल्यास इंग्रजांच्या बाजूनें लढण्याला तो बद्धपरिकर असल्यानें दक्षिणेंतील बंदोबस्तासाठीं केवळ डोळ्यांत तेल घालून बसण्याची आवश्यकता इंग्रजांना उरली नाहीं. पंख कापून रावा पिंजऱ्यांत ठेववा, तसें निजामचें राज्य हें हिंदुस्थानांतील इंग्रजी साम्राज्य-सत्तेच्या शोभेसाठींच जणूं काय इंग्रजांनीं राखून ठेवलें होतें.

पण अयोध्येची गोष्ट निराळी होती. निजामापेक्षां अयोध्येचें राज्य गिळंकृत करणें अनेक दृष्टींनीं जितकें सोपें, तितकेंच किफायतशीर व तितकेंच आवश्यकही आहे, अशी इंग्रज राज्यकर्त्यांची खातरजमा झाली होती. शितावरून भाताची परीक्षा करण्यांत इंग्रज मोठे धूर्त! सन १७६१ मध्यें मराठे व अहमदशहा अबदाली यांच्यांत पानिपत एथें घनघोर युद्ध झालें, त्यावेळीं अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला हा मराठ्यांच्या विनवण्यांकडे लक्ष न देतां अबदालीला जाऊन मिळाला व त्यामुळें पानिपतावर मराठ्यांचा मरणतुल्य पराभव झाला; पण मराठ्यांनीं त्या संकटांतूनही पुन्हा वर डोकें काढलें, व थोरल्या माधवराव पेशव्याच्या कारकीर्दींत ते सुजाउद्दौल्याला पानिपत एथील द्रोहाबद्दल प्रायश्चित्त देण्यासाठीं पुढें सरसावले. तेव्हां सुजाउद्दौला इंग्रजांच्या पंखांखालीं गेला. याप्रमाणें एकवार कचाटींत सांपड-लेल्या अयोध्येच्या नबाबाची अवस्था पुढें क्रमाक्रमानें चरकांत घातलेल्या उसासारखी झाली, ही गोष्ट इंग्रजांनीं हिंदुस्थानांत सरंजामदार वर्गाशीं सुरू ठेवलेल्या धोरणानुसार झाली. इंग्रजांनीं सुजाउद्दौला आश्रयाला आला तेव्हां त्याच्या कपाळावर दोस्तीचा तह नुसता कोरला, तर सन १७७५ मध्यें सुजा-

उद्दौला वारल्यावर त्याचा मुलगा असफउद्दौला नवाब झाला तेव्हां त्याच्या गळ्यांत त्यांनीं पूर्वींच्याहून अंमळ जहाल कलमांच्या कराराचा सांखळी-पट्टा अडकवून दिला. या तहाअन्वयें बनारस, गाझीपूर, जौनपूर, व इतर बराचसा मुलुख मिळून तेवीस लाख सालीना उत्पन्नाचा मुलुख मैत्रीचें मोल म्हणून इंग्रजांना मिळाला. याखेरीज नबाबाच्या राज्यांतील तैनाती फौज वाढविण्यांत येऊन त्या फौजेच्या खर्चासाठीं सालीना सुमारें बत्तीस लाख रुपये नबाबाच्या राज्यांतून वसूल करण्याचा अधिकार इंग्रजांनीं नबाबापासून मिळविलाच. एवढीच नबाबाची कुतरओढ करून कांहीं इंग्रज स्वस्थ बसले नाहींत. नबाबाच्या घरांत इंग्रजांना भांडणें पेटविण्याला सोईस्कर अशी भाऊबंदकी नव्हती म्हणून निराश न होतां इंग्रजांनीं मोठ्या चातुर्यानें तेथें भाऊबंदकीचें बीं पेरलें. सुजाउद्दौला हा इंग्रजांचा जुना दोस्त; त्याच्या बेगमांची त्यांना फार काळजी वाटली, व त्यांनीं नबाबाच्या खजिन्यांतील सर्व संपत्ति जणूं काय तें स्त्रीधन समजून त्या बेगमांना दिली. शिवाय त्यांना स्वतंत्र जहागीरही तोडून दिली. नबाबाच्या खजिन्यांत अलोट संपत्ति होती. ती एकदम घशांत टाकण्याचा झटपटीचा डाव ते खेळले असते तर त्या रसरसत्या आगीच्या खाईंतून भाजलेला कंद उपसून काढतांना त्यांचा हात चांगलाच पोळला असता; सुखानें त्यांना ती संपत्ति गिळतां आली नसती. तो हात बेगमांचा पोळला जावा व संपत्ति आपल्या भक्ष्यस्थानीं पडावी, असा हा इंग्रजी कावा होता.

इंग्रज अधिकारी जे नबाबाच्या लष्करांत शिरले, आणि कांहींनीं इंग्रज रेसिडेंटच्या वशिल्यानें नबाबाच्या दिवाणी कारभारांतही शिरकाव करून घेतला, त्यांनीं लक्षावधि कोट्यावधि रुपयांची संपत्ति नबाबाशीं केलेल्या सावकारी-वरचें व्याज म्हणून, दलाली म्हणून, लांच म्हणून, जबरदस्तीनें केलेलें नबाबाच्या व लोकांच्या संपत्तीचें अपहारण म्हणून वगैरे ज्या ज्या प्रकारें लुटतां आली त्या त्या प्रकारें लुटून नेण्यांत कसूर केली नाहीं.

बेगमेला अलोट संपत्ति व स्वतंत्र जहागीर सक्तीनें अयोध्येच्या नबाबाकडून तोडून देवविण्याची दक्षता जी घेण्यांत आली होती, तिचा फायदा वॉरन हेस्टिंग्सनें पैसे उकळण्याच्या कामीं पुरेपूर अन्यायानें करून घेतला. हेस्टिंग्स हा पूर्वी बंगालचा गव्हर्नर होता, व आतां तो हिंदुस्थानचा गव्हर्नर

जनरल झाला होता. या प्राण्याला मनुष्य म्हणणें म्हणजे माणुसकी या शद्बाची विटंबना करण्यासारखें आहे. त्याच्या खासगी व सार्वजनिक आयुष्याविषयींच्या किळसवाण्या लोकवार्ता हाच त्याच्या कारकीर्दीचा विशेष होय. अशा प्राण्यानें अयोध्येचा नबाब व बेगम यांच्याकडून पैसा उकळण्याचें ठरविल्यावर तो कोणते अनर्थ करणार नाहीं म्हणून म्हणावें ! त्यानें बेगमांवर इंग्रजांविरुद्ध बंडाला प्रवृत्त झाल्याचा गंभीर आरोप करून त्या अपराधाबद्दल त्यांची दौलत व त्यांच्या जहागिरी जप्त करण्याचा सपाटा चालविला. इतका नीचपणा खुद्द नबाबाला करावयाचा नव्हता. पण त्याला हेस्टिंग्सनें तें करावयाला सांगितलें; व त्यानें चालढकल करतांच स्वतः बेगमांवर केवळ पैसा उकळण्यासाठीं अमानुष सक्ती केली. तीही आपल्याच नव्हे तर खुद्द बेगमांच्या नोकरांकडून ! अशी बेगमांची विटंबना करून त्यानें त्यांच्यापासून पाऊण कोटी रुपयांपेक्षां जास्त पैसा पिळून काढला. खुद्द नबाबानें यापूर्वी सन १७७५ सालीं बेगमांची स्वतंत्र व्यवस्था करून देतांना त्यांच्यापासून सुमारें साडेआठ लाख रुपये उकळलेच होते. हीं सर्व कारस्थानें बिनबोभाट पार पाडतां यावीं यासाठीं इंग्रजांनीं नबाबाचा वजीर म्हणून सरदार हैदर बेगखान नांवाचा आपल्या वशिल्यांतला माणूस नबाबावर लादला होता. एखाद्या संस्थानची पद्धतशीर वाताहात करावयाची असली म्हणजे तेथें एखादा 'बाळाजीपंत नातू' निवडून शोधून काढून त्या संस्थानच्या गळ्यांत बांधावयाचा, हा इंग्रजी राजकारणांतील पवित्रा कांहीं नवा नाहीं.

याप्रमाणें नबाब दिवसेंदिवस आर्थिक अडचणींत येत होता, तरी त्याचा ऐषआराम कांहीं कमी नव्हता; व इंग्रजांच्या तैनाती फौजेच्या बकासुराची भूक सारखी वाढतच होती. हा नबाब असफुद्दौला सन १७९७ मध्यें मरण पावला. त्यापूर्वी त्याचें वजीरपद इंग्रजांनीं दुसरा एक 'सवाई बाळाजीपंत नातू' सरदार तजफल हुसेन याला दिलें होतें. नबाबाच्या पश्चात् त्याच्या मुलाला नबाबगिरीऐवजीं तुरुंगाची वाट दाखविण्यांत आली व वजीराच्या मदतीनें अधिक सवलती व पैसा इंग्रजांना देणारा सुजाउद्दौल्याचा दुसरा मुलगा सादतअल्ली याला नबाब करण्याचें ठरलें. प्रत्येक वेळीं नवी राजवट सुरू होतांना त्या राज्याच्या काळजाचा तहनाम्याच्या तीक्ष्ण शस्त्रानें नवा लचका तोडावयाचा, हा इंग्रजांचा शिरस्ताच बनून गेला होता. त्याप्रमाणें

सादतअल्लीनें इंग्रजांशीं सन १७९८ मध्यें नवा तह केला. त्या तहाअन्वयें तैनाती फौजेचें अयोध्येच्या उरावरील दडपण आणखी वाढविण्यांत आलें; व त्याबरोबर सुमारें पाऊण कोटीचा नवा खर्च नबाबाच्या माथीं बसला. शिवाय नबाबाच्या ताब्यांतील मोक्याचे असे फत्तेगड व अलाहाबाद हे किल्ले सभोंवारच्या मुलुखासह इंग्रजांनीं घेतले, व लढाईचा प्रसंग आला तर त्या सुरक्षित जागांचा उपयोग इंग्रजांना व्हावयाचा असतांना त्या किल्ल्यांच्या डागडुगीचा खर्चही नबाबाकडूनच घेण्यांत आला! शिवाय नाना प्रकारचीं बक्षिसें, नजराणे, अशा कितीतरी प्रकारच्या जळवा अयोध्येच्या राज्याला लावून तेथील अर्थरूपी रक्त इंग्रजांनीं शोषून घेतलें.

या द्रव्यशोषणाला थोडे दिवस लोटतात न लोटतात तोंच लॉर्ड वेलस्ले हा नवा गव्हर्नर जनरल आला. त्यानें अयोध्येवर आणखी तैनाती फौज लादण्याचें ठरविलें. तो खर्च देण्याचें आपणाला मुळींच सामर्थ्य नाहीं असें नबाब सादतअल्ली यानें केविलवाणीनें सांगतांच त्याला नालायक राज्यकर्ता ठरवून त्याची हकालपट्टी करण्याचा बेत इंग्रजांच्या गोटांत शिजूं लागला. अखेर सादतअल्लीनें सन १८०१ मध्यें इंग्रजांशीं नवा तह करून आपला बचाव केला. या नव्या तहाअन्वयें अयोध्या प्रांतांतील अत्यंत सुपीक व महत्त्वाचा असा वार्षिक दीड कोट रुपये उत्पन्नाचा प्रांत इंग्रजांनीं नबाबाकडून मिळविला.

सादतअल्लीनंतर त्याचा मुलगा गाझीउद्दीन हैदर हा नबाब झाला. यानें एतद्देशीय राजेरजवाड्यांशीं लढण्याच्या कामीं इंग्रजांना कोट्यावधि रुपये देऊन त्यांची कृपा संपादन केल्या कारणानें इंग्रजांत त्याची वाहवा झाली, व प्रजेची अनेक परींनीं भयंकर पिळणूक करून प्रजेला त्राहि भगवान् करून सोडणारी ही स्वारी लायक राज्यकर्ता व इंग्रजांचा जिवलग दोस्त ठरली! गाझीउद्दीन सन १८२७ मध्यें वारला व त्याचा मुलगा नासिरुद्दीन हा नबाब झाला. नेहमीं नीच लोकांच्या संगतींत वावरणारा, सर्व प्रकारच्या व्यसनांत निपुण असलेला, रात्रंदिवस विषयकर्दमांत लोळणारा, व अर्थातच राज्यकारभाराकडे जरादेखील लक्ष्य न देणारा असा हा नबाब होता! त्याचा जनानखाना शेंकडों सुंदर स्त्रियांनीं गजबजलेला होता. आणि तरीही एका गौरकाय उनाड नाटकशाळेच्या तंत्रानें तो वागे हें विशेष! ह्या गौरकाय

नाटकशाळेचा प्रवेश तेथें गोऱ्या अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीनें झाला असला पाहिजे हें उघड होतें. तिच्या कारकीर्दीत तिच्यासारख्या नीच लोकांचीच दरबारांतदेखील भरताड झाली व त्या बयेच्या मर्जीतला नबाबाचा एक गोरा न्हावी हा नबाबाचा मुख्य दिवाण नेमला गेला! ह्या नबाबानें मरतांनाही आपल्या काळवंडलेल्या कारकीर्दीला शोभणारी, आपल्या मुलाला दूर लोटून एका नाटकशाळेच्या मुलाला आपल्या पश्चात् नबाबगिरी मिळावी अशी शिफारस रेसिडेंटमार्फत गव्हर्नर जनरलला केली होती.

परंतु इंग्रज रेसिडेंटनें त्या दोघांही वारसांना दूर लोटून महंमद अल्ली-शहा याला नबाब केलें. कारण तो इंग्रजांना पाहिजे तसा एकतर्फी तह करून नबाब होण्याला अर्थातच अयोध्येचें राज्य इंग्रज म्हणतील त्या मातीमोलानें त्यांच्या स्वाधीन करावयाला राजीखुषीनें तयार झाला. सन १८३९ मध्यें गव्हर्नर जनरल लॉर्ड ऑक्लंड यानें महंमदअल्लीच्या राज्यकर्तेपणाची तोंड-भर वाखाणणी केली आहे; यावरूनच इंग्रजांचा ताळिराम त्यांना ढेंकरा येईतों संतुष्ट करणारा हा नबाब खरोखर कसा असेल याची कल्पना होईल.

पण एवढ्यावरच अयोध्येचें नष्टचर्य संपलें नव्हतें. सन १८४२ मध्यें महंमदअल्ली मरण पावल्यावर त्याचा मुलगा नबाब झाला, व पांच वर्षें कारभार करून तो मुलगा मरण पावल्यावर त्या मुलाचा मुलगा वाजीदअल्ली गादीवर बसला. हे दोघे तर एकाहून एक दुरात्मे निपजले. वाजीदअल्ली नबाब झाला तेव्हां ऐन पंचविशींतील तरणाबांड व रंगेल गडी होता. त्यानें प्रत्येक बाबतींत नबाब नासीरुद्दीन याच्यावर ताण केली. नासीरुद्दीनचा दिवाण एक हलकट गोरा न्हावी होता, तर याचा दिवाण अल्लीतकी खान हा त्याच्याहूनही नीच व हलकट होता. नासीरुद्दीन कितीही अचकट विचकट जीवन कंठीत असला तरी तो आपल्या महालाच्या चार भिंतींच्या आंत. पण हा रंगेल गडी लखनौच्या भर दरबारांत व राजरस्त्यांतूनही नाय-किणी व बजवय्ये यांचे ताफे बरोबर घेऊन अश्लील लावण्या गात मिरवत जात असे!

इतके अयोध्येच्या राज्याचे नबाबी वंशपरंपरेनें धिंडवडे निघेपावेतों सन १८४५ हें वर्ष उगवलें. तेव्हां लॉर्ड डलहौसी हा हिंदुस्थानांतील इंग्रजी साम्राज्य स्थापन करण्यासाठीं कसोशीनें झटणारा व एकामागून एक हिंदी

संस्थानें कोणत्या ना कोणत्या निमित्तानें, विलायतेंतील पार्लमेंटच्या पूर्व संकल्पित धोरणानुसार बुडवून इंग्रजी साम्राज्याला जोडण्याविषयीं इतिहासांत प्रख्या पावलेला राजकार्यधुरंधर गव्हर्नर जनरल होता. त्यानें अयोध्येचें राज्य खालसा करण्याला ही नामी संधी चालून आली आहे असें पाहिलें, व अचूक घाव घातला. त्यानें ता. १८ जून १८५५ रोजीं अयोध्येचें राज्य खालसा केल्याबद्दल जाहीरनामा फडकाविला! आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं अगदीं या कानाचें त्या कानाला न कळतां औंधच्या नवाबानें निमूटपणें आपली पगडी रेसिडेंटपुढें उतरून ठेवून महालांतून पाय बाहेर काढला!

हिंदुस्थानच्या इतर भागांतही हीच परिस्थिति तेव्हां थोड्याफार फरकानें होती. परंतु सत्तावन सालच्या बंडाच्या अनुरोधानेंच एथें विचार कर्तव्य असल्यानें त्या अवांतर गोष्टींकडे अंमळ दुर्लक्ष्य केल्यानें चालण्यासारखें आहे.

## ११ : इंग्रज हिंदुस्थानांत विजयी कां झाले ?

इंग्रज हिंदुस्थानांत आल्यापासून हिंदुस्थानला उतरती कळा लागली व सर्वतोपरी त्याचें वाटोळें होत गेलें हें खरें आहे. हिंदी राजेरजवाड्यांना अर्थात् सरंजामदार वर्गाला इंग्रजांनीं हां हां म्हणतां कसें ग्रासून टाकलें हेंही आपण मागें पाहिलेंच आहे. पण असा इंग्रजांना हिंदुस्थानांत विजय मिळण्याला आणि एका काळीं वैभवशिखरावर चमकणाऱ्या ह्या सुवर्णभूमींतील पराक्रमी हिंदी सरंजामदार वर्गाचा अधःपात, तेजोभंग व नाश होण्याला कोणती अंतस्थ परिस्थिति कारण झाली, या अंतस्थ घडामोडींची आणखी थोडी ओळख करून घेतली पाहिजे.

मानव जात जन्माला आल्यापासून तिचा जीवनार्थ कलह एकसारखा सुरू आहे. त्यासाठीं मानव निसर्गाविरुद्ध व आपल्या मानवबांधवांबरोबरही सतत झगडत असतो. निर्वाहाकरितां अन्न व आच्छादन मिळविण्यासाठीं प्रयत्न करण्याच्या त्याच्या पद्धती क्रमाक्रमानें गुंतागुंतीच्या होत व सुधारत जातात. निर्वाहाच्या वस्तु निर्माण करण्याच्या या पद्धतींचें प्रत्येक काळांतील मानवाच्या व समाजाच्या जीवनांत फार महत्त्व आहे. प्रत्येक इतिहासखंडा-वर त्यांचा ठळक ठसा उमटलेला असतो, व त्या काळांतील सामाजिक संबंध आणि चळवळी ज्या होतात, त्यांवर त्या पद्धतींचा फार परिणाम झालेला असतो. उदाहरणार्थ, प्रथम शेतकीची सुरुवात झाली तेव्हां तिचा मानवी जीवनावर फार मोठा परिणाम झाला. भटके नोमाड लोक एके ठिकाणीं वास्तव्य करून राहूं लागले, व खेडींपाडीं व शहरें वसूं लागलीं, संपत्ति व विसावा यांची वाढ होऊं लागली, व त्यांतूनच निरनिराळ्या कलांचा व हस्तव्यवसायांचा उगम झाला. असाच दुसरा क्रांतिकारक परिणाम मानवी जीवनावर यंत्रयुगामुळें घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीनें घडून आला. एका विशिष्ट ऐतिहासिक कालांतील उत्पादनपद्धति अथवा तंत्र याची तत्कालीन मानवी

जीवनाच्या विकासाशीं नेहमीं संगति असते. ह्या उत्पादनाच्या निमित्तानें ओघानेंच मनुष्यें एकमेकांशीं खरेदी विक्री, अदलाबदल असे आपल्या उत्पादनतंत्राशीं सुसंगत असणारे निश्चित संबंध जोडतात. ह्या सर्व परस्पर संबंधांची गोळाबेरीज म्हणजेच समाजाची आर्थिक रचना होय. या आर्थिक रचनेला अनुसरूनच सामाजिक रूढी पडतात, कायदेकानू केले जातात, राजकारण खेळविलें जातें, समाजांतील सर्व कांहीं त्याला अनुसरून होतें. अर्थात् समाजाच्या उत्पादनपद्धतींत अथवा तंत्रांत जसजसा बदल होत जातो, तसतशी समाजाची आर्थिक रचनाही बदलत जाते व त्या ओघानें रूढी, कायदे, कल्पना, राजकारण वगैरे बदलत जातें. हा मार्क्सवादाचा दृष्टिकोण आहे.

शासनसंस्थेविषयीं मार्क्स म्हणतो कीं, 'शासनसंस्था ही सत्ताधारी वर्गाच्या हितसंबंधांची व्यवस्था पाहणारी व्यवस्थापक मंडळी होय. अर्थात् सर्व कायदे ह्या धोरणानें केले जातात, व ह्या वर्गाचें वर्चस्व हें सर्वतोपरी इष्ट आहे असा भरंवसा लोकांच्या मनांत उत्पन्न व्हावा या धोरणानें धर्मकल्पना, शिक्षण व इतर गोष्टी अंमलांत आणल्या जातात. हेतु हा कीं जे इतर वर्ग ह्या वर्गाकडून पिळले जातात, त्यांना त्या पिळणुकीची जाणीव होऊं नये व त्यांच्यांत असंतोष माजूं नये. ह्या घोंटीव पद्धतीवरचा बुरखा काढून तिचें खरें स्वरूप कोणी चवाठ्यावर मांडूं म्हणेल व असल्या जुन्या रूढी मोडूं पाहील तर शासनसंस्था त्याचा नाश करते. परंतु इतकी कठोर खबरदारी घेऊनही नेहमीं एकच वर्ग समाजाच्या अग्रभागीं श्रेष्ठत्व मिरवूं शकतो असें नाहीं. ज्या गोष्टींनीं त्या वर्गाला एवढें महत्त्व मिळवून दिलें, त्याच गोष्टी आतां त्याला महत्त्वहीन करून खालीं ओढण्याला कारण होतात. तो वर्ग त्या काळीं सत्ताधारी झाला याचें कारण तेव्हांच्या उत्पादनपद्धतीवर अथवा तंत्रावर त्याचा ताबा होता. परंतु जशा नव्या नव्या उत्पादनपद्धती निर्माण होतात, तसतसे त्या पद्धतींचे प्रणेते वर्ग उदयाला येतात व पूर्वीच्या सत्ताधारी वर्गाचें वर्चस्व झुगारून देऊं लागतात. या नवमतवादालाच वैचारिक क्रांति असें म्हणतात. ही वैचारिक क्रांति जुन्यापुराण्या सर्व मतांची व समजुतींची सारी अडगळ अडचण पार नाहींशी करून टाकते. समाजांतील आर्थिक सत्ता ह्या नवोदित वर्गाच्या हातीं असल्याकारणानें त्याचाच या नव्याजुन्याच्या लढ्यांत विजय होतो; व जुन्या वर्गाचें ऐतिहासिक

कार्य पूर्ण झालें असल्यानें तो समाजजीवनाच्या विराट् रंगभूमीवर पडद्यामागें लोटला जातो.

ह्या नवमतवादी वर्गाचा विजय हा राजकीय व आर्थिक असा उभयविध असतो. हें नव्या उत्पादनपद्धतीचें विजयचिन्हच होय. एथूनच नव्या कल्पना, राजकारणाचे नवे ओघ, नवे कायदे, नव्या चालीरीती, या समाजधारणेला आवश्यक असलेल्या गोष्टींचा उगम व पुरवठा होतो. हा नवा वर्ग त्याच्या खालच्या वर्गाची पिळणूक करीत असतो. असा हा वर्गकलह एकसारखा सुरू असतो. हे सर्व वर्ग नष्ट होऊन एकच वर्ग जेव्हां शिल्लक राहतो, तेव्हांच हा कलह व ही पिळणूक थांबते. समाजांत पूर्ण समता अर्थात् सर्वत्र सारखी शांति–सौख्य–समृद्धि तेव्हांच नांदूं लागते. अर्थात् मार्क्स म्हणतो त्याप्रमाणें इतिहास ही वर्गकलहांची व उत्क्रांतीची प्रदीर्घ परंपरा आहे. एवढें ध्यानीं घेतलें, म्हणजे अमक्या इंग्रजानें आमचा देश बुडवला म्हणून त्याला नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. एका वर्गाची दुसऱ्या वर्गावर बळजबरी होणें व कालांतरानें त्या वर्गावर निराळ्या वर्गाची बळजबरी होणें ह्या गोष्टी पूर्वनिर्दिष्ट इतिहासक्रमाला धरून आहेत. तेव्हां हिंदुस्थानांत इंग्रजांना मिळालेला विजय म्हणजे भांडवलदार साम्राज्यशाहीला सरंजामदारशाहीवर मिळालेला विजय होय. पण मग ओघानेंच असा प्रश्न उत्पन्न होतो कीं भांडवलशाही सरंजामशाहीवर विजयी व्हावयाची होती, तर ती हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत कां विजयी झाली नाहीं ?

हा प्रश्न अगदीं सयुक्तिक ठरेल. कारण इंग्लंडांतदेखील भांडवलदार वर्ग पुढें आला तो सरंजामदार वर्गाला मागें रेंटूनच पुढें आला. हिंदुस्थानवर गिधाडांप्रमाणें तुटून पडणारे इंग्रज म्हणजे सारे इंग्रज लोक नसून तेथला भांडवलदार वर्गच होय. हिंदुस्थानांतही इंग्रज आले त्यावेळीं भांडवलदार वर्ग नव्हता असें नाहीं. हिंदुस्थान हा शेतकीप्रधान देश खरा; पण शेतकी हा हिंदी लोकांचा मुख्य धंदा असला तरी लोहारकाम, सुतारकाम, नावा बांधणें, ओतकाम, कलाकुसरीचीं कामें, व यापेक्षांही हिंदुस्थानचा अत्यंत भरभराटीचा धंदा म्हणजे कापडाचा होय. निरनिराळ्या प्रकारचें सुती, रेशमी, लोंकरीचें व जरतारी कापड व त्या अनुरोधानें कापूस पिंजणें, सूत कांतणें, रंगविणें, व जर कांतणें वगैरे कारखाने देशांत अनेक ठिकाणीं स्थापन झाले होते व त्यांची

क्रमशः वाढही होत होती. कालांतरानें हेच कारखाने वाढले असते, त्यांना यंत्रांची जोड मिळाली असती, व त्यांची भरभराट होऊन इंग्लंडांत भांडवलदार वर्गापुढें सरंजामदार वर्गाला इतबल व्हावें लागलें तशीच गत हिंदुस्थानांतही झाली असती. हिंदुस्थानांत लोखंड विपुल होतें, कोळसा विपुल होता, व देशाची औद्योगिक भरभराट व्हावयाला या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. इंग्लंडांत तरी झपाट्यानें औद्योगिक प्रगति व्हावयाला याच गोष्टींचा मुख्य उपयोग झाला. मात्र, हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थिति तेव्हां अतिशय बजबजलेली असल्यानें अशी देशाची प्रगति होण्याला थोडा विलंब लागला असता इतकेंच. यापेक्षांही लवकर इंग्रज भांडवलदार व्यापारी वर्ग हिंदुस्थानांत आला. त्या वर्गानें आपल्या देशांत औद्योगिक व यांत्रिक क्रांति अनुभवली होती, व त्या क्रांतींतूनच त्याचा जन्म होऊन त्याला बल लाभलें होतें. अशा वर्गाचे प्रतिनिधि हिंदुस्थानांत आले, तर त्यांना हिंदुस्थानांतही तोच क्रांतिवन्हि चेतविण्याचे कामीं साह्य करतां आलें नसतें का? सहज हां हां म्हणतां हें साध्य झालें असतें. हिंदुस्थानांत बाल्यावस्थेंत असलेल्या भांडवलदार वर्गाला त्या इंग्रजांना आपले पाठचे भाऊ समजून, त्यांना कडेवर घेऊन क्रांतीच्या मार्गानें चालवितां आलें असतें. परंतु इंग्रजांनीं तसें कांहीं केलें नाहीं. त्यांनीं हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांची भरभराट करण्याऐवजीं ते धंदे हरप्रयत्नांनीं ठार मारले; त्यांनीं हिंदुस्थानांतील औद्योगिक व यांत्रिक क्रांतीला कसून विरोध केला. कारण त्यांतच त्यांचें हित होतें; त्यांना हिंदुस्थानांत लूट करण्यासाठीं तशीच परिस्थिति पाहिजे होती. म्हणूनच त्यांनीं अत्यंत प्रतिगामी अशा सरंजामदार वर्गाचा एथें पाठपुरावा केला. तो पाठपुरावा कसा केला हें आपण मागें पाहिलेंच आहे, व तसा पाठपुरावा करण्यांतील त्यांचा हेतुही पूर्वीं स्थूलतः स्पष्ट करण्यांत आला आहे.

असें होण्याचें कारण, उद्योगधंतील नफेबाजीसाठीं कमालीची चढाओढ हाच मुळीं भांडवलशाहीचा पाया होय. त्यांचें हिंदुस्थानांतील कामकरी—शेतकरी जनतेशीं मैत्री करून भागण्याजोगें नव्हतें; त्यांचा हिंदुस्थानांत येण्याचा हेतूच मुळांत हिंदी श्रमजीवि जनतेला पिळून गबर होण्याचा होता. पिळणूक करणारा वर्ग व पिळला जाणारा वर्ग यांचें हिताहित एक कधींच असूं शकत नाहीं. ही पिळणूक सोपी जावी, म्हणून इंग्रजांनीं मागें सांगि-

तत्याप्रमाणें हिंदी सरंजामदार वर्गाला हाताशीं धरलें, त्याला मरणाच्या दारीं जगवलें, व हिंदुस्थानचें कुरण त्यांच्या साह्यानें व्यापून मग त्याला लाथाडलें. अशा ह्या मरत्या सरंजामदार वर्गाला हाताशीं धरून इंग्रजांनीं हिंदी श्रमजीवि जनतेला पिळून लुटण्यासाठीं जे जे प्रयत्न केले, त्या त्या प्रयत्नांत हिंदी सरंजामदार वर्ग व वरचा मध्यम वर्ग हे मोठेच भागीदार होते.

इंग्रजांनीं हिंदुस्थानांत आपला जम कसा बसविला, हें पुढें पाहण्यापूर्वीं त्यांच्या देशांत त्यांचें स्थान तेव्हां कोणतें होतें हें पाहणें उद्बोधक होईल. कारण इंग्रज हिंदुस्थानांत आल्या वेळीं हिंदुस्थानची जी परिस्थिति, त्या परिस्थितीहून तीनशें वर्षांपूर्वीं इंग्रजांना जावें लागलेंच होतें. अर्थात् औद्योगिक व यांत्रिक क्रांतीच्या बाबतींत इंग्लंड देश हिंदुस्थानापेक्षां प्रगतिपथावर तीनशें वर्षांइतक्या कालानें पुढें होता.

इंग्लंडांतील सरंजामदार वर्ग तेराव्या शतकाच्या प्रारंभींच मृत्युपंथाला लागला होता. तेव्हां जमिनीचा सारा शेतकऱ्यानें द्यावयाचा तो पैशाच्या रूपानें देण्याला प्रारंभ झाला होता. आंतराष्ट्रीय व्यापाराची वाढ होऊं लागल्यामुळें मालाच्या देवघेवीला सोईस्कर असे व्यवहार पैशाच्या मोलानें करण्याचा सर्रास प्रघात सुरू झाला होता. जाड्या भरड्या देशी कपड्याऐवजीं तलम परदेशी कापड वापरणें व हरतऱ्हेच्या इतर चैनीच्या वस्तू विकत घेऊन ऐषआरामांत जिवाची विलायत करून सोडणें या चैनी गोष्टींची चटक सरदार–सरंजामदारांना लागली; व ह्या चैनीच्या वस्तू मिळवावयाच्या तर पैसा पाहिजे. पैशानें मिळत नाहीं अशी एकही वस्तू नाहीं; त्यामुळें 'प्रत्येकाला पैसा हवा हवासा वाटूं लागला; व प्रत्येकजण पैसा सांठवूं लागला. नोकरचाकर, घरदार, खाणेंपिणें, दारूपाणी अशी सरंजामदारींतील कोणतीही संपत्ति पैशाच्या मोबदल्यांत मिळूं लागली. त्याप्रमाणेंच ज्या वस्तु कुटुंबांत घरबसल्या मिळत नाहींत अशा अनेक वस्तूंची गरज समाजांत अधिकाधिक भासूं लागली, व त्या वस्तूही पैशाशिवाय प्राप्त होणें शक्य नव्हतें. त्यामुळें निरनिराळे वर्ग पैसा मिळविण्यासाठीं धडपड करूं लागले व उत्पादन आणि त्याची अदलाबदल मोठ्या प्रमाणावर होऊं लागली.' याप्रमाणें व्यापार वाढूं लागला, तसा मध्यम वर्ग व्यापाराच्या जोरावर अधिकाधिक पुढें येऊन सामर्थ्यवान व सत्ताधारी बनूं लागला. पूर्वीं जीं गांवें शेतकरी–कामकरी वर्गाला त्यांच्या

सरंजामदार धन्याच्या कृपाछत्राखालीं आसरा देत होतीं, तीं ह्या नव्या भांडवलदार व्यापारी वर्गाचीं मोठमोठीं गुदामें झालीं. अर्थात् सरंजामदारांची त्या व्यापारी गांवांवरील सत्ता नष्ट होऊन भांडवलदार वर्ग तेथला धनी झाला. त्या वर्गाला दुकानांतून व कारखान्यांतून कामकरी वर्गाची मनाला येईल तशी पिळणूक करतां येऊं लागली.

पण याप्रमाणें आपला पडता काळ आला म्हणून सरंजामदार वर्ग स्वस्थ बसला नाहीं. त्यालाही पैसा हवा होता; कारण त्याला सर्व चैनीच्या वस्तू हव्या होत्या, व त्या पैशाखेरीज मिळत नव्हत्या. तो पैसा मिळविण्याचें त्यांचें मोठें साधन म्हणजे त्याची जमीन. त्या जमिनीवरील करांत भयंकर वाढ करून शेतकऱ्यांची पिळणूक करावी, गांवांतील उद्योगधंद्यांवरही करवाढ करावी, व्यापारी तांडे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाऊं लागले कीं ते रस्त्यांतच लुटावे, असा उद्योग सरंजामदार वर्गानें सुरू केला. याचा स्वाभाविक परिणाम असा झाला कीं नाडला जाणारा शेतकरी वर्ग त्रासला व कोपला. विलायतेंत वॅट टायलर व जॉन बाल ह्या शेतकरी पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं शेतकऱ्यांनीं सन १३८१ मध्यें सरंजामदार वर्गाविरुद्ध उघड उघड बंडाचा बाहुटा उभारला. शेतकऱ्यांचा कैवार घ्यावयाचा म्हणून नव्हे, तर सर्वत्र बजबज माजून आपल्या संपत्तीवर सरंजामदार वर्गाची धाड पडते, म्हणून मध्यम वर्गालाही तेव्हां शेतकऱ्यांच्या बंडाळीचें कौतुक करावेंसें वाटलें.

ह्या सरंजामदार वर्गाला तोंड देण्यासाठीं ह्या व्यापारी मध्यम वर्गाच्या प्रोत्साहनानें मध्यवर्ती राजसत्ता विलायतेंत स्थापन झाली. ह्या राजसत्तेखालील सैन्याला पुरवठा व्यापारी वर्गानें करावयाचा व त्या जोरावर सरंजामदार वर्गाला झोडपून काढून आपल्या व्यापारी हितसंबंधांचें रक्षण करावयाचें असा क्रम सुरू झाला. शिवाय आपसांतील भांडणानें सरंजामदार वर्ग दिवसेंदिवस अधिकाधिक दुबळा होत होता, व त्या दुबळेपणाचा फायदा व्यापारी मध्यम वर्गानें पाठीशीं घातलेल्या राजसत्तेला मिळत होता. ह्या स्वतंत्र राजसत्तेच्या पाणीदार शस्त्रानें सज्ज होऊन व्यापारी मध्यम वर्गानें सरंजामदार वर्गावर हल्ले चढविले. याप्रमाणें राजसत्ता नुसती समोरासमोर दिसावयाला; पण त्या सत्तेच्या पाठीशीं असलेला व्यापारी भांडवलदार वर्ग व सरंजामदार वर्ग यांचा चाललेला झगडा पंधराव्या शतकांत अतिशय विकोपाला गेला.

खासगी मालकीच्या व्यापाराची भरभराट होऊं लागली खरी; त्याचा व समाजजीवनावरही परिणाम झाला. समाजाची तेथवर बसलेली घडी विस्कळित होऊं लागली; व सरंजामदार वर्गाच्या विस्कळितपणामुळें चर्चला—धर्मसंस्थेला महत्त्व येऊन आर्थिक सत्ता चर्चच्या अर्थात् धार्मिक चळवळीच्या हातीं केंद्रीभूत होऊं लागली. चर्च हा इंग्लंडांतील सर्वांत मोठा जमीनदार होता असेंच केवळ नव्हे, तर आंतरराष्ट्रीय व्यापारांतही चर्चचा भांडवलदार या नात्यानें फार मोठा वांटा होता. इतकेंच नव्हे, तर लोकांच्या भोळ्याभाबड्या धार्मिक अंधःश्रद्धांचा उपयोग चर्चला बहुजनसमाजावर आपलें वर्चस्व ठेवण्याच्या कामीं फार चांगला होत असे. त्यामुळें ह्या सर्वग्राही शक्तीला पायबंद लावणें हा भांडवलदार व्यापारी वर्गाचा पहिला उद्योग होऊन बसला. परंतु इंग्रज हिंदुस्थानांत प्रथम आले तेव्हां एथील सरंजामदार वर्गाची जी स्थिति होती, त्याप्रमाणेंच इंग्लंडांतील चर्चचाही 'वठलेला वृक्ष' बनला होता. आपसांतील भांडणतंटे, फाटाफूट, व धर्मगुरूंचे आणि मठांतील संतसंतिणींचे दुराचार यामुळें खिस्ती धर्माच्या मूळच्या तत्त्वांना पूर्णपणें हरताळ फांसला जात होता, व त्यामुळें धर्मसंस्था ही एक तिरस्काराची बाब होऊन बसली होती. प्रत्येक धर्ममठ हें ओंगळ व्यभिचारस्थान झालें होतें. धर्मगुरु आणि संतिणी यांना सर्रास व्यभिचारकर्दमांत लोळत पडण्याला खंत वाटत नसे. हा दुराचार धर्ममठांपुरताच मर्यादेंत राहिला होता असेंही नाहीं; तर धर्मगुरूंचा उपसर्ग इतर सभ्य नागरिक स्त्रियांच्या बाबतींतही अतिशय होई. शिवाय धर्माच्या नांवावर लोकांची पिळणूक तर होतच असे. असल्या किडलेल्या धर्मसंस्थेवर घाला घालण्याचें भांडवलदार व्यापारी वर्गानें मनांत आणल्यावर त्याला बहुजनसमाजाचा पाठिंबा मिळण्याला उशीर लागला नाहीं. भांडवलदार व्यापारी वर्गाला आपलें आर्थिक हित साधण्याच्या व धर्मसंस्था व सरंजामदार वर्ग यांना नामोहरम करण्याच्या कामीं ह्या एकंदर परिस्थितीचा चांगलाच उपयोग करून घेतां आला.

याच सुमाराला बंदुकीच्या दारूचा शोध लागला, त्यामुळें लढाईच्या तंत्रांत क्रांतिकारक फेरफार झाला. मुद्रणकलेचा शोध लागल्यामुळें विद्वता व ज्ञान या बाबतींत चर्चची मक्तेदारी लयाला गेली. भूगोल शास्त्रांतील व खगोल शास्त्रांतील नवे नवे शोध, कापडाच्या व इतर उद्योगधंद्यांची वाढ,

निरनिराळे यांत्रिक शोध, यामुळें उत्पादनाच्या तंत्रांत व साधनांत क्रांतिकारक बदल झाला; व प्रयोगद्वारा अधिकाधिक शोध लावण्याची सार्वत्रिक प्रवृत्ति उत्पन्न झाली. ह्या प्रचंड शास्त्रशुद्ध भौतिक प्रगतीमुळें धार्मिक थोतांडाची म्हणजेच धर्ममक्तेदारांची फारच कुचंबणा झाली, व पिसाळलेल्या कुत्र्यांसारखे त्यांचे भलभलते चाळे सुरू झाले.

धर्मसंस्थेची आर्थिक मक्तेदारी नाहींशी करण्यासाठीं प्रथम तिची आध्यात्मिक मक्तेदारी नाहींशी करणें अवश्य होतें. धर्मसंस्था ही सरंजामदार वर्गाशीं निगडित असल्यानें तिचा बंदोबस्त करण्यासाठीं सरंजामदार वर्गावर हल्ला चढविण्याच्या कामीं धर्मसंस्थेवर चिडलेल्या सुधारणावादी लोकांचा चांगलाच उपयोग झाला. हा प्रयत्न विशिष्ट भौगोलिक परिस्थितीच्या अनुकूलतेमुळें जेथें जेथें उत्पादनतंत्राचीं सुधारलेलीं साधनें सुलभतेनें उपलब्ध झालीं अशा हॉलंड, जर्मनीचा कांहीं भाग एथें प्रथम यशस्वी झाला. इतर ठिकाणीं जुन्या धर्मसंस्थेचें प्राबल्य अजून होतें, तिथेंही लोकांना कांहीं नव्या आर्थिक सवलती देऊन धर्मसंस्थेला जीव जगवावा लागला. प्रॉटेस्टंट मताचा उदय व रोमन कॅथॉलिक मताची पिछेहाट हें या चळवळींतील औद्योगिक क्रांतीच्या यशाचें निदर्शक होय. आज देखील विहंगम दृष्टीनें युरोप खंडाकडे पाहिलें तरी जेथें कॅथॉलिक मत प्रचलित आहे, असे कृषिप्रधान देश मागासलेले असून पुढारलेले सर्व देश प्रॉटेस्टंट मताचे आहेत.

परंतु याप्रमाणें भांडवलदार मध्यम वर्ग जरी इंग्लंडांत विजयी झाला, तरी त्या देशांतली शेतकऱ्यांची स्थिति सुधारली असें मुळींच नाहीं. उलट हा वर्ग ताज्या घोड्यावरच्या गोमाशांप्रमाणें ताज्या दमानें शेतकरी वर्गाचें रक्तशोषण करूं लागला. त्यामुळें शेतकरी वर्गाला बंडखोरी पत्करल्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं. अशा प्रसंगीं जर्मनींत जेव्हां शेतकरी वर्गाशीं झगडण्याचा प्रसंग आला, तेव्हां प्रॉटेस्टंट पंथी भांडवलदार व्यापारी मध्यमवर्ग व कॅथॉलिकपंथी सरंजामदारवर्ग हे दोघेही शेतकऱ्याला चिरडून टाकण्यासाठीं एक झाले. मार्टिन लूथरसारख्या प्रॉटेस्टंट पंथाचा जर्मनींतील एवढा मोठा पुढारी व सुधारणेचा पुरस्कर्ता, त्यानें रोमन कॅथॉलिकांना अगदीं सळो कीं पळो करून सोडलेलें; पण त्यानेंही जर्मनींतील शेतकरी वर्गाला चिरडून टाकण्यासाठीं रोमन कॅथॉलिक सरंजामदारांशीं संगनमत केलें. यावरून धर्म-

संस्था व सरंजामदारी हीं तत्त्वतः परस्परपूरक कशीं आहेत हें दिसून येतें.

इंग्लंडांतही चर्चसंस्थेच्या वतनदारीवर धाड आली; चर्चच्या खासगी मालकीच्या जमिनी भराभर खालसा करण्यांत येऊन त्या नव्या सरदार—सरंजामदारांना देण्यांत आल्या. तिथेंही शेतकऱ्यांवर संक्रांत आलीच! त्या नव्या जमीनमालकांनीं शेतांत धान्य पिकविण्याऐवजीं मेंढ्या पाळण्याचा सपाटा चालविला. कारण कापडाच्या धंद्यासाठीं लोंकर हवी, व त्या लोंकरीला धान्यापेक्षां चांगला भाव येत असे! यामुळें तेथील शेतकरी वर्गाच्या पोटावर पाय येऊं लागल्यामुळें शेतकरी चिडून बंडखोर बनला. पण त्याच्या चिडीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्याची हातची शेतकी गेली, व त्याला निरनिराळ्या कायद्यांच्या काढण्या बांधून कारखान्यांतून मजूर म्हणून राबण्यासाठीं नेण्यांत आलें. तेथें त्यानें भांडवलदार व्यापारी वर्गाच्या तुंबड्या भरण्यासाठीं मरेमरेतों राबावें, व जगावें! याप्रमाणें इंग्लंडांत 'रिफॉर्मेशन'नें अथवा सुधारणापंथानें तेथला सरंजामदारवर्गच लोळवला असें नव्हे, तर ना जमीन ना जुमला अशा बेकारांचा मजूर बहुजनसमाज निर्माण करून भांडवलशाहीची भरभराट केली!

इंग्रज व्यापारी भांडवलदार वर्गाची याप्रमाणें भरभराट होऊं लागली, त्यानें आपल्या मार्गांतील इतर सर्व अडचणी दूर करण्यासाठीं सोईस्कर असे कायदे करून घेतले, त्या कायद्यांच्या जोरावर आपला व्यापार व आपले उद्योगधंदे यांची भरभराट करून घेतली; आणि असे हे इंग्रज व्यापारी पूर्वेकडील संपन्न देशांतील संपत्ति लुटून न्यावी या इराद्यानें व्यापाराला निघाले. सन १६०० मध्यें रीतसर ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली, व हिंदुस्थानाकडे त्यांची दृष्टि वळली.

सत्राव्या व अठराव्या शतकांत हिंदुस्थान आपल्या जाळ्यांत ओढण्याचा पद्धतशीर प्रयत्न सतत सुरू होता तो, व त्यानंतरचा प्रयत्न यांत अंतर होतें. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापावेतों हिंदुस्थानांतून तेथील उत्तमोत्तम कापड वगैरे माल परदेशी विक्रीसाठीं पाठविला जाई; व त्याला तिकडे किंमतही फार येई. कापडाच्या धंद्यांत तर हिंदुस्थानचा हात धरणारा दुसरा कोणताही देश जगाच्या पाठीवर तेव्हां नव्हता. इतकेंच काय पण इंग्लंडांत अगदीं प्रथम यांत्रिक माग सुरू झाले तेव्हांही त्या यांत्रिक कापडाला हिंदु-

स्थानांतील हातकांतणीचें व हातविणीचें साधें, रेशमी, लोंकरी व जरतारी कापड लाजेनें खालीं पाहावयाला लावी. विणकला हा तेव्हां हिंदुस्थानचा राष्ट्रीय उद्योगधंदा होता, व लक्षावधि स्त्री–पुरुष या धंद्यावर सुखानें कालक्रमण करीत होते. देशांत जागोजागीं असे लहान लहान कारखाने एकेका भांडवलवाल्याच्या मालकीचे होते. त्या भांडवलदारांनीं विणकरांना कच्चा माल पुरवावयाचा, व त्यांनीं तयार केलेला पक्का माल विकत घ्यावयाचा. हंगामाच्या वेळीं शेतीधंदा करून फावल्या वेळांत शेतकऱ्याच्या स्त्रीपुरुषांनाही चरखा अथवा टकळी फिरवून हा व्यवसाय करतां येत असे. हाच लहानसान भांडवलदारांचा वर्ग हिंदुस्थानांतील उद्योगधंद्याच्या भरभराटीबरोबर भरभराट पावला असता, व विलायतेंतील लहानसान व्यापारी भांडवलदारांनीं भरभराटून तेथील सरंजामदार वर्गाचें नाक ठेंचलें आणि विलायतेंत औद्योगिक क्रांति घडवून आणली, तसेंच त्या हिंदी व्यापारी वर्गानें हिंदी सरंजामदार वर्गाचें नाक ठेंचून हिंदुस्थानला जबरदस्त उद्योगभूमि बनवून एथें औद्योगिक क्रांति घडवून आणली असती. पण तेवढ्यांत इंग्रजांनीं एथें येऊन आपले पाय रोंवले.

प्रारंभींच्या काळांत इंग्रज व्यापाऱ्यांचा हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांना थोडा फार उपयोगच झाला. कारण एथें माल तयार करून घेऊन तो परदेशांत नेऊन विकून त्यावर त्यांना नफा मिळवावयाचा असे. परंतु पुढें पुढें इंग्लंडांतील उद्योगधंदेवाल्यांना आपल्या एथें येऊन हिंदी मालानें अशी चढाओढ करावी हें सहन होईना. त्यांनीं आपल्या सरकाराकडून विलायतेंत येणाऱ्या हिंदी मालावर भयंकर जकात बसविली; व कांहीं हिंदी मालाला तर आपल्या देशांत येण्याला अजिबात बंदी करविली. सार्वजनिक प्रसंगीं हिंदी चीज वापरणें हा देखील कांहीं ठिकाणीं गुन्हा ठरविण्यांत आला! विलायतेंत हिंदी मालावर पुकारण्यांत आलेला हा बहिष्कार देखील हिंदुस्थाननें पचविला असता व उद्योगधंद्यांत पुढें पाऊल टाकलें असतें. कारण त्याला एक इंग्लंडची बाजारपेठ बंद झाली तरी बाकीच्या देशांतील हव्या तेवढ्या बाजारपेठा मोकळ्या होत्या. परंतु त्या सुमाराला हिंदुस्थानांतील पुष्कळसा प्रदेश इंग्रजांच्या म्हणजेच ईस्ट इंडिया कंपनीच्या अंमलाखालीं होता. त्यामुळें तेथें त्यांनीं हिंदी उद्योगधंद्यांना मारून तेथें आपल्या

विलायती उद्योगधंद्यांना जगवावयाचें असा चंग बांधला, तेव्हां त्यांना प्रतिबंध कोण करणार ? त्यांनीं हिंदुस्थानांत स्वतःचे कारखाने उभारून हिंदी कारागिरांना तेथें सक्तीनें मातीमोलानें राबावयाला लावलें. विलायती माल हिंदुस्थानांत आणून विकावयाचा तर त्याला हिंदुस्थानांत जकात नाहीं, अथवा असली तर फार थोडी. पण हिंदी माल देशांतल्या देशांत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पाठवावयाचा झाला तरी त्यावर मात्र प्रत्येक वेळीं भयंकर जकात इंग्रजांच्या ताब्यांतील मुलुखांत द्यावी लागे. एवढेंच करून इंग्रज थांबले नाहींत; त्यांनीं कांहीं उत्कृष्ट विणकर कारागिरांच्या हातांचे आंगठे जे तलम वस्त्राला लागणारा धागा काढण्याच्या कामीं यंत्रांसारखे उपयोगी पडत, तेही तोडावयाला कमी केलें नाहीं ! कापडधंदा हिंदुस्थानांत इतका ऊर्जितावस्थेला फार पूर्वीपासून जाऊन पोहोंचला होता त्यामुळें विलायतेंत कापड विणण्याचे यांत्रिक माग सुरू झाल्यावर देखील विलायती कापडाला हिंदी कापडाशीं टक्कर देतां येईना, म्हणून शेंकडा ८० टक्के जकात विलायतेंत जाणाऱ्या हिंदी कापडावर बसविण्यांत आली होती ! याप्रमाणें सर्व प्रकारें हिंदी उद्योगधंद्यांची गळचेपी करण्यांत आली, त्यामुळें हिंदी उद्योगधंदे यंत्रबलावर चालणाऱ्या उद्योगधंद्यांशीं चढाओढींत टिकण्याला असमर्थ ठरून भराभर बुडाले.

याप्रमाणें विलायतेंत हिंदी मालाला बंदी करण्यांत आली, व विलायतची बाजारपेठ विलायती मालाला मोकळी राहिली, तरीदेखील राष्ट्राला दरसाल लागणाऱ्या कापडापेक्षां अधिकाधिक कापड तेथील यांत्रिक कारखान्यांतून तयार होऊं लागल्यामुळें त्याच्यासाठीं नव्या बाजारपेठा मिळविणें इंग्रजी भांडवलशाहीला अवश्य होऊन बसलें. तेव्हां मात्र साऱ्या जगभर खुल्या व्यापाराचा कायदेशीर पुरस्कार त्यांना करावा लागला. खुल्या व्यापाराची ही टूम तेव्हां निघण्याचें कारण इंग्रजी उद्योगधंद्यांची वाढ तेव्हां इतकी जबरदस्त झाली होती कीं जगांतील कोणत्याही देशाला त्यांच्याशीं चढाओढींत तग धरणें शक्यच नव्हतें. इतर देशांनीं आपापल्या कक्षेंत विलायती मालावरील जकात वाढवून स्वसंरक्षण चालविलें. परंतु हिंदुस्थानला तें शक्य नव्हतें. हिंदुस्थान राजकीय व आर्थिक दृष्ट्या इंग्रजांचा ताबेदार असल्यानें त्याला मात्र इंग्रजी भांडवशाहीसमोर आत्मबलिदान करण्याखेरीज गत्यंतर नव्हतें.

ईस्ट इंडिया कंपनी हिंदुस्थानांत अशी भस्मासुरासारखी तांडव करीत असतांना कंपनीला सन १६०० मध्यें हिंदुस्थानांत व्यापार करण्याची मिळालेली मक्तेदारी रद्द करण्यांत येऊन खुल्या व्यापाराला मान्यता देण्यांत आली, व सर्व व्यापाऱ्यांना आणि कारखानदारांना व्यापारी लुटीसाठीं हिंदुस्थानचें महाद्वार मोकळें करण्यांत आलें. कंपनीची म्हणजे मूठभर इंग्रजी व्यापारी व भांडवलदार यांच्या टोळक्याची सत्ता हिंदुस्थानावर चालल्यानें त्यांना हिंदी लोकांची पिळणूक करण्याला, लांचलुचपत खाण्याला व भरमसाट खासगी नफा उकळण्याला पुरें फावतें, यास्तव यापुढें हिंदुस्थानावर सत्ता कंपनीची न चालतां थेट इंग्लंडच्या राजाची चालावी, असें मागणें इंग्रजी कारखानदारांनीं जोराजोरानें मागण्यास सुरुवात केली. हिंदी लोकांच्या हिताचा हा कळवळा इंग्रजी कारखानदारांना आला असा त्याचा अर्थ नव्हे! तर कंपनीच्या असल्या कारभारानें हिंदी लोकांची दारिद्यामुळें क्रमशक्ति कमी होते, त्यामुळें विलायती मालाला गिऱ्हाईक मिळण्याचा संभव कमी, ही तर त्या कारखानदारांची तक्रार होतीच. पण त्याहीपेक्षां जोराची त्यांची तक्रार अशी कीं, कच्चा माल भरपूर पुरवणारा देश, जणूं काय कल्पवृक्षाचें आगर, या दृष्टीनें हिंदुस्थानची वाढ व्हावयाला हवी, ती कंपनीच्या खाबूपणाच्या कारभारामुळें खुंटते!

इंग्लंडची ही गरज सन १७८३ च्या सुमारास फ्रान्सशीं इंग्लंडचा तह व्हर्सेलिस एथें झाला, व अमेरिका स्वातंत्र्ययुद्धांत विजयी होऊन इंग्लंडच्या जबड्यांतून बाहेर पडली, तेव्हां विशेष निकडीची भासूं लागली. मागें सांगितल्याप्रमाणें इंग्लंडांत यंत्रयुग अधिकाधिक प्रभावी होत होतें. पक्क्या मालाची निपज तेथें दिवसेंदिवस यंत्रांमुळें मोठया प्रमाणावर होत होती. तो पक्का माल खपविण्याला बाजारपेठ पाहिजे व ती सत्तेची पाहिजे. इंग्लंडप्रमाणेंच युरोपांतील इतर कांहीं देशांतही तेव्हां यंत्रयुग प्रभावी होऊन भांडवलशाही जोरावत चालली होती. प्रत्येक पुढारलेला देश आपल्या पक्क्या मालाला गिऱ्हाईक कोठें मिळेल या फिकिरींत होता. अशा ऐन वेळीं अमेरिका ही मोठी वसाहत हातची गेल्यामुळें ती तूट भरून काढण्याला हिंदुस्थानसारखी मोठी वसाहत बळकावून बसणें इंग्रजांना म्हणजे इंग्रज भांडवलदार व्यापारी वर्गाला अवश्य वाटलें. त्या अनुरोधानें ब्रिटिश पार्ल-

मेंटमध्यें एकामागून एक उपाययोजना करण्यांत येऊन हिंदुस्थानचा कारभार कंपनीकडून हळूहळू काढून पार्लमेंटाच्या ताब्यांत घेण्याचा क्रम सुरू झाला. हा क्रम सन १८५८ सालापावेतों म्हणजे सत्तावन सालचें बंड होऊन त्याचा उपशम होईपावेतों सुरू होता. तो त्या सालीं पूर्ण झाला.

पिटचें इंडिया बिल हा हिंदुस्थानांतील इंग्रजी भांडवलशाही सत्तेनें हिंदुस्थानांत निर्वेध अशी आपली साम्राज्यसत्ता स्थापन करण्यासाठीं वाजविलेला दुंदुभि होय. यापूर्वींच बंगाल व कर्नाटक एथें इंग्रजांनीं आपले पाय फार मजबूत रोंवले होते. बाकीच्या भागांतही त्यांना तसें करण्याला फार श्रम घ्यावे लागले नाहींत. त्या वेळच्या हिंदुस्थानचें शब्दचित्र कार्ल मार्क्सच्या शब्दांत अगदीं थोडक्यांत रंगवावयाचें तर 'हिंदुस्थानांत इंग्रजांचें वर्चस्व कसें स्थापन झालें म्हणून काय विचारतां ? मोंगल बादशहाची सार्वभौम सत्ता बादशहाच्या सुभेदारांनीं बळकावली. सुभेदारांची सत्ता मराठ्यांनीं हिसकावून घेतली. मराठ्यांकडून ती सत्ता अफगाणांनीं लांबविली. याप्रमाणें हिंदुस्थानांत आपसांतील कलहांना ऊत आला असतांना इंग्रज मध्यें येऊन पडले व त्यांनीं सर्वांचींच हाडें घुसळून त्यांना नरम केलें. हिंदुस्थान तेव्हां केवळ हिंदु व मुसलमान एवढ्यापुरताच दुभंगला आहे असें नव्हे, तर त्यांतही कितीतरी जाती पोटजाती व कितीतरी टोळ्या आहेत. अशा या समाजाचें स्थैर्य सनदशीर एकांडेपणाच्या अतिरेकी वर्तनावर व त्यापासून निर्माण झालेल्या परस्पर तिरस्काराच्या भावनांवर अवलंबून ! असा देश कोणातरी जेत्याकडून जिंकला जाण्याच्याच योग्यतेचा होता असेंच म्हणावयाला नको काय ?"

हिंदी लोकांत तेव्हां राष्ट्रीय भावनेचा अभाव होता, व त्यामुळें राष्ट्रीय एकजुटीनें कोणत्याही संकटाला तोंड देण्याची पात्रता हिंदी लोकांच्या अंगीं नव्हती. तशी पात्रता त्यांच्या ठायीं कोठून येणार ? मोंगल बादशहा, त्यानंतरचे त्यांचे सुभेदार, रजपूत, अथवा मराठे घेतले तरी ते आपली संपत्ति व आपला परिवार यांचें रक्षण करण्यापुरतीच जबाबदारी ओळखणारे. लढाईच्या वेळीं यांचें सैन्य ज्या भागांतून जाईल, तेथील पिकांची टोळधाडीसारखी नासाडी व्हावयाची; व त्या भागांत दुष्काळ पडावयाचा ! त्यामुळें शेतकरी नाना प्रकारांनीं पिळणूक करणारा घरचा राजा धनी, व शांततेच्या

काळीं लूट मिळविण्याला सोपें जावें या हेतूनें युद्धकालांत लुटणारा परका शत्रु यांत फरक काय हेंच शेतकरी वर्गाला समजेनासें झालें होतें. हालअपेष्टा भोगण्याची त्या बिचाऱ्यांना चांगलीच संवय झाली होती; कारण नेहमींचाच तो प्रकार! त्यांतही अतिरेक झाला म्हणजे त्यांचीं माथीं भडकावयाचीं, व त्यांनीं प्रतिकाराला प्रवृत्त व्हावयाचें. अशा वेळीं त्यांचा मार्गदर्शक त्यांचा धर्मोपाध्याय! तो हिंदु भटजी असला तर त्यानें आपल्या भोळसर हिंदु अनुयायाला पुढील जन्मांतील सुखाची लालूच दाखवून ह्या जन्मीं लुबाडावें; तो मुसलमान असला तर त्यानें आपल्या मुसलमान अनुयायाला स्वर्गांतील अप्सरा आणि इतर ऐषआराम यांची लालूच दाखवून लुबाडावें! भोळा शेतकरी वर्ग व कोत्या दृष्टीचे स्वयंमन्य, वैय्यक्तिक स्वार्थाला लालचावलेले, राष्ट्रीय-भावनाशून्य व कर्तव्यच्युत राज्यकर्ते. मग ते हिंदु असोत कीं मुसलमान असोत, मराठे असोत कीं रजपुत असोत कीं शीख असोत. आपल्या प्रजेला हुकमत गाजवून तिला लुबाडावें, शेजारच्या दुसऱ्याच्या प्रदेशांत जाऊन तेथील लोकांना लुटावें, आणि असें करतांना हिंदु, मुसलमान, मराठा, शीख, वगैरे सर्व एकाच हिंदी राष्ट्राचे घटक आहेत व त्यांच्याशीं वैमनस्य वाढविण्यानें आपण आपसांतील फाटाफुटीनें आत्मनाश आणि जनतेचा नाश जोडीत आहों हें ध्यानीं न आणतां कोणीही उठावें, व क्षुल्लक वय्यक्तिक स्वार्थासाठीं इंग्रजांना फितूर व्हावें. इंग्रजांप्रमाणेंच हिंदुस्थानांत आपला पसारा मांडून हिंदुस्थान लुटून नेण्याचा प्रयत्न पोर्तुगीज, फ्रेंच, डच वगैरे युरोपातील लोकांनीं आगेंमागें केला! पण औद्योगिक दृष्ट्या इंग्लंड हा देश तेव्हां फार पुढारलेला असल्यानें इंग्रजांपुढें इतरांचा टिकाव लागणें ऐतिहासिक दृष्ट्याही अशक्य होतें.

इंग्लंडांत एकमुखी राजसत्ता तेथील भांडवलदार व्यापारी वर्गानें कशी जोपासली होती, हें आपण मागें पाहिलें आहे. पण राजा हा आपल्या हातांतील खुळखुळ्यासारखा अथवा कळसूत्री बाहुल्यासारखा नाचला पाहिजे व आपण राजाला तसा नाचवूं शकतों, या अंतस्थ आत्मविश्वासानेंच तो सारा कारभार चालला होता. तीच राजसत्ता इंग्रज व्यापाऱ्यांच्या स्वार्थाला बाधक होऊं लागली तेव्हां त्यांनीं त्या सत्तेवर वज्राघात करण्याला कमी केलें नाहीं, हें इंग्लंडचा राजा पहिला चार्लस याच्या उदाहरणावरून ध्यानीं येण्यासारखें

आहे. राजा पहिला चार्लस यानें ईस्ट इंडिया कंपनीप्रमाणेंच सर वुइलियम कोर्टीन नांवाच्या धनमस्ताच्या पुढारीपणाखालील एका इंग्रज व्यापारी टोळीला पूर्वेकडील देशांत व्यापार करण्याची सनद दिली. त्यामुळें मूळच्या कंपनीचा व्यापारांत हर प्रकारांनीं तोटा होऊं लागला. त्याबरोबर चार्लसला अपराधी ठरवून त्याचें डोकें उडवावयाला पार्लमेंटनें म्हणजे इंग्रज व्यापारी भांडवलशाहीनें कमी केलें नाहीं!

राजा गादीवर बसवणें व राजाला ठार मारणें हे खेळ ब्रिटिश पार्लमेंट खेळत होतें, तें पार्लमेंट म्हणजे राष्ट्राची प्रातिनिधिक संस्था कितपत होती, हें ध्यानीं आणणेंही मौजेचें व उद्बोधक होईल. केवळ पैशाच्या जोरावर धाकदपटशा, लांचलुचपत, अनाचार असल्या गोष्टी करून मतें मिळवून पार्लमेंटांत निवडून येणें, हा निवडणुकीचा राजमार्ग होता. हा पैसाही हिंदुस्थानांतून लुटून नेलेला व त्या पैशाच्या जोरावर क्लाइव्हसारखे हिंदुस्थानांत नबाबगिरी गाजवून गबर होऊन गेलेले लोक पार्लमेंटांत निवडून यावयाचे. ते निवडून यावयाचे इतकेंच नव्हे, तर आपल्या मुठींतील आणखी होयबा सभासद त्यांनीं पैशाच्या जोरावर निवडून आणावयाचे! बेनफील्ड या नीच वृत्तीच्या बड्या इंग्रज सावकारानें तर आपल्या पैशाच्या जोरावर एकाच वेळीं आठ होयबा सभासद पार्लमेंटांत निवडून आणले होते! क्लाइव्ह विलायतेंतून हिंदुस्थानांत प्रथम नोकरीला आला, तो एक क्षुद्र कारकून म्हणून बंगाल प्रांतांत आला. आणि हिंदुस्थानांत करामत गाजवून आयुष्याच्या उत्तर कालांत विलायतेंत माघारा गेला, तो एक बडा, पराक्रमी व धनकुबेर बनून गेला, व त्याला आपल्या मायदेशांत उमराव पदाचा लाभ झाला. अशीं हिंदुस्थानांत लुटीवर जबर झाल्याचींच ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकर वर्गांतील बहुतेक सर्वांचीं उदाहरणें! अर्थात् हिंदुस्थान ही सुवर्णभूमि आहे, व आपण हिंदुस्थानांत कोणत्या तरी नोकरीच्या निमित्तानें जाण्याचा अवकाश कीं नको होईइतकी संपत्ति तेथें आपली वाट पाहत आहे, असाच इंग्लंडांतील लोकांचा ग्रह झाला. ज्याला त्याला वाटूं लागलें कीं मी क्लाइव्हप्रमाणें कारकून म्हणून हिंदुस्थानांत जाऊन नशीब काढीन! हिंदुस्थानांत ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारासाठीं कारकुनांची जेवढी मागणी, तिच्यापेक्षां पुरवठा एवढा प्रचंड होऊं लागला. कारकुनीचा भाव कडाडला व कारकुनांचा भाव साफ गडगडला. याचें

मजेदार पण तितकेंच विस्मयकारक उदाहरण म्हणजे बंगालमध्यें कंपनीच्या पदरीं कारकुनीची नोकरी मिळविण्यासाठीं उमरावपुत्र व व्यापारीपुत्र अहमहमिकेनें पुढें येऊं लागले, व जो कोणी अशी नोकरी आपणाला मिळवून देईल त्याला भरपूर लांच देण्याला तयार असल्याच्या जाहिराती वर्तमानपत्रांतून राजरोस फडकूं लागल्या! 'बंगालमध्यें कारकुनाची जागा पाहिजे. ही नोकरी मिळवून देणाराला एक हजार गिनी (सुमारें पंधरा ते सोळा हजार रुपये) दिले जातील. या व्यवहारामध्यें कोणी तिसरा दलाल नाहीं. कोणताही लेखी करार करण्याची अट न ठेवतां कबूल केलेला पैसा तावडतोब दिला जाईल' ही जाहिरात सन १७७३ मध्यें तिकडील 'पब्लिक ॲडव्हर्टायझर' पत्रांत प्रसिद्ध झाली होती; व असाच प्रकार सर्रास सुरू होता. ह्या जाहिरातींत नमूद असलेली कारकुनीच्या जागेबद्दल एक हजार गिनींची लांच ही देखील फार माफक झाली. यापेक्षांही कमी म्हणजे अवघी पांचशें पौंड लांच घेऊन कंपनीच्या एका डायरेक्टराच्या प्रियतमेनें कारकुनाची जागा विकल्याचींही उदाहरणें अधून मधून दिसून येत. परंतु सर्वसामान्य दृष्टीनें ही लांचेची रक्कम दोन ते तीन हजार पौंडांच्या दरम्यान हेलकावे खात असल्याचे दाखले तेव्हांच्या विलायती वर्तमानपत्रांतून पाहावयाला सांपडतात.

असा हा इंग्रज भांडवलदार वर्ग राज्यकर्ता म्हणून हिंदुस्थानच्या राशीला आला, त्याच्या राज्यकारभारांत न्याय नीति कशी शोधावी व कुठें शोधावी?

## १२ : शेतकरी हिंदुस्थानांत शेतकरी गुलाम!

एथवर आपण इंग्रजी सत्तेचा हिंदी सरंजामदार वर्गावर काय परिणाम झाला हें पाहिलें. पण हिंदी सरंजामदार वर्गाच्या सत्तेचा डोल्हारा देशांतील ज्या उत्पादक वर्गावर अर्थात् श्रमजीवि शेतकरी–कामकरी वर्गावर अवलंबून, त्या वर्गाच्या अहिताला इंग्रजी भांडवलशाही कशी क्रमाक्रमानें कारण झाली, हें पाहिल्याखेरीज आपणाला पुढें घडून आलेल्या सत्तावन सालच्या बंडाच्या ऐतिहासिक कार्याचा बरोबर आढावा घेतां यावयाचा नाहीं.

हिंदुस्थानांतील मध्यवर्ती मोंगल सत्ता मोडली, तिच्या जागीं आलेली सरंजामदारांची सत्ताही इंग्रजांच्या कारकीर्दींत मृतप्राय झाली; पण त्याही-पेक्षां हिंदी शेतकरी वर्गाच्या मर्मस्थानीं इंग्रजांनीं घातलेला घाव म्हणजे त्यांनीं हिंदुस्थानांत निर्माण केलेली जमीनदारी पद्धती होय. इंग्रजांच्या पूर्वी ह्या जमीनदारी पद्धतीचा मागमूसही हिंदुस्थानांत नव्हता. त्यापूर्वी स्थूलमानानें परिस्थिति अशी होती कीं शेतकऱ्यांनीं शेती करावी, धन धान्य पिकवावें, व त्याचा ठराविक हिस्सा जमिनीचा कर म्हणून राजा, नबाब अथवा बाद-शहा कोणी असेल त्याला म्हणजे त्याच्या अधिकाऱ्याला द्यावा. पुष्कळदां ग्रामपंचायतीच्या मार्फत ह्या सरकारी कराची सामुदायिक रीत्या फेड होत असे. मोंगल बादशाहीच्या पडत्या काळांत आपसांतील यादवीमुळें प्रदेश उध्वस्त होऊन जाई, शेतकीधंद्याची वाताहात होई, अशा कारणांमुळें शेत-सारा वसूल होण्याला पुष्कळदां पंचाईत पडे. आणि ज्या बेबंदशाहीमुळें शेतकऱ्याला शेतसारा भरणें शक्य होत नसे, त्याच बेबंदशाहीला तोंड देण्या-साठीं व हें सर्व करीत असतांना आपली चैन अबाधित चालविण्यासाठीं राजे महाराजे व बादशहा यांना पैशाची चणचण फार भासे. इंग्रजांनीं हिंदी संस्थानिकांच्या छातीवर तैनाती फौजेच्या अवजड धोंडी देऊन त्यांचा जीव अगदीं कासावीस करून सोडण्याचा सपाटा चालविला होता हें आपण

पूर्वी पाहिलेंच आहे. पण पुष्कळशा प्रसंगीं ही आपत्ति हिंदी संस्थानिकांनीं आपण होऊन आपल्यावर ओढून घेतली होती, व क्षयरोगपीडित रोग्याला आयुष्याच्या अखेरच्या घटकेपावेतों आपण मरणार असें पुष्कळदां वाटत नाहीं, त्याप्रमाणें आपण आपल्या हातानें आपला नाश ओढवून आणीत आहों अशी त्यांना कल्पनाही नव्हती. आपसांतील यादवींत आपल्या प्रतिस्पर्ध्याला नामोहरम करण्यासाठीं इंग्रजांच्या कवाइती फौजेचा व त्यांच्या सुधारलेल्या युद्धसामुग्रीचा उपयोग होईल या भावनेनेंच बहुतेकांनीं आपल्या घराचे दरवाजे इंग्रजांना उघडून दिले. आणि मग डोईजड खर्च तोलत नाहीं असें आढळून आल्यावर शेतकऱ्यांकडून कर वसूल करण्याचा अधिकार लिलांवानें विकावयालाही त्या राज्यकर्त्यांनीं कमी केलें नाहीं. अशा प्रकारचा अधिकार दुसऱ्या अरेरावांना अगर सावकारांना लिलांवानें विकणें म्हणजे त्यांना शेतकऱ्यावर आपल्या मनाला येईल तसे अत्याचार करण्याची मुभा देणेंच होय. त्यांनीं शेतकऱ्याला तिकडे पाहिजे तसें पिळून पैसा वसूल करावा, व जो पैसा होईल, त्याचा दहावा हिस्सा स्वतः मेहेनतान्याबद्दल घ्यावा. त्याचाही अर्थ हाच. अशा प्रकारचे अधिकार उपभोगणाऱ्या लोकांना तालुकदार अथवा जमीनदार म्हणत. हा अधिकार देणारी शासनसंस्था जसजशी दिवसेंदिवस अधिकाधिक दुबळी होत चालली, तसतसे हे अधिकारी त्या भागांत वंशपरंपरेनें वतनादार होऊन बसले.

ईस्ट इंडिया कंपनीला दिल्लीच्या दुबळ्या बादशहाकडून बंगालच्या दिवाणगिरीची सनद मिळाली ती अशीच. त्या अधिकाराचा वास्तविक अर्थ वर सांगितलेल्या वसुली अधिकाऱ्यापेक्षां निराळा नव्हता. पण त्याच दिवाणीच्या जोरावर ईस्ट इंडिया कंपनीनें बंगाल, बहार व ओरिसा प्रांतांतील शेतकरी वर्गाला पिळून पिळून जितका शेतसारा वसूल करतां येईल तितका केला. त्या पिळणुकीनें बंगाल—बहार—ओरिसामधील शेतकरी वर्ग बिचारा इतका दुबळा व निःशक्त झाला कीं लगेच चार वर्षांनीं इ. स. १७७० सालीं तेथें भयंकर दुष्काळ पडला, आणि त्या दुष्काळांत तेथील एक त्रितीयांश लोक अन्नापाण्याविणें तडफडून मेले. तरीही कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं दुष्काळग्रस्त जिवंत शेतकऱ्यांना नाडूनच काय पण दुष्काळांत तडफडून मरण पावलेल्या त्यांच्या बायकापोरांच्या शवांवरील बाळीबुगडी व वाळेबिंदले बुचाडून आपल्या वसुला-

आ. ..... नं. .....
ता. .....

ची भरपाई करून घेण्याला कमी केलें नाहीं! ह्या सक्तीच्या वसुलीमुळें पूर्वीचे कांहीं तालुकदार देखील भिकेला लागले. कंपनीला हुलकावण्या दाखवून त्यांचा थोडाच पल्ला येणार होता! आपण शेतकरी वर्गावर अतिशय जुलूम करतों, जमिनीवरील साऱ्याची भयंकर वाढ झाल्यामुळें व त्यामुळें दुष्काळासारख्या महासंकटांत सारा भरण्याचें त्राण शेतकऱ्याच्या अंगीं उरलें नसल्याकारणानें वसूल होण्याला अडचण पडते, यामुळें गव्हर्नर वॉरन हेस्टिंग्सला व आपल्या भांडवलावर भरपूर नफा उकळण्याला सोकावलेल्या विलायतेंतील भांडवलदारांना मोठी चिंता पडली. जनतेचें दारिद्र्य याला कारण आहे हें ते ध्यानींही घ्यावयाला तयार नव्हते. आपणावरून जग ओळखण्याच्या संवईनें त्यांना त्यांच्या वसुली अधिकाऱ्यांच्या व जमीनदारांच्या अप्रामाणिकपणाचा संशय आला! म्हणून हेस्टिंग्सनें वसुलीसाठीं नवें रेव्हिन्यू बोर्ड नेमिलें. ह्या बोर्डानें तर अधिकच जुलूम चालविला. वसूल ज्यांच्याकडून व्हावयाचा नाहीं, त्यांच्या अडीअडचणींचा यत्किंचित विचार न करतां त्यांच्या जमिनी भराभर खालसा करून विकून टाकावयाच्या! त्या जमिनी मग त्याच शेतकरी वर्गाला पिळून गबर झालेल्या सावकार–तालुकदारांनीं विकत घ्यावयाच्या! याप्रमाणें त्या जमिनींत आपलें रक्त ओतून शेत पिकवणारा शेतकरी तेथून हाकलला जावा व दुसराच उपटसुंभ आयतोबा मालक म्हणून तेथें येऊन बसावा, ही इंग्रज भांडवलशाहीकडून हिंदुस्थानला मिळालेली अजब देणगी होय! जमीन ही खरेदीविक्रीची वस्तु तेव्हांपासून ठरली; जमिनीवरील खासगी मालकीची प्रथा तेव्हांपासून पडली! तरीदेखील मनाजोगा जमिनीचा वसूल शेतकरी वर्गाच्या कमालीच्या वाढत्या दारिद्र्यामुळें येईना; तेव्हां ह्या अडचणीवर रामबाण उपाय म्हणून लॉर्ड कॉर्नवालीस या गव्हर्नर जनरलनें विलायतच्या धर्तीवर बंगाल बहारमध्यें कायमधारा पद्धत सुरू करून पूर्वी वसूल करणाऱ्या जुलमी लोकांनाच कायमचे जमीनदार बनवून सोडलें. आणखी कांहीं काळानें आग्रा–अयोध्येच्या बाजूनें कंपनीचा राज्यविस्तार होऊं लागला, तेव्हां तेथेंही हीच जमीनदारी पद्धत जारी करण्यांत आली. त्यांत फरक इतकाच कीं बंगाल-बिहारप्रमाणें एथें कायमधारा पद्धतीऐवजीं ठराविक काळापुरता जमिनीचा वसूल ठरवावा व त्या काळानंतर फेरपाहाणी करून पुन्हा वसूल ठरवावा ही पद्धत सुरू झाली. पुढें सत्तावन

साली जें बंड झालें, तें उत्तर हिंदुस्थानांत व तेथेंही मुख्यत्वेंकरून जेथें जमीनदारी पद्धत जारी होती त्या दिल्ली-आग्रा-संयुक्त प्रांत-बिहार या भागांतच झालें, ही एक घटना लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आजही बिहार संयुक्त प्रांतांत किसान ऊर्फ शेतकरी वर्ग आणि जमीनदार वर्ग यांच्यांतील झगडा जो दिवसेंदिवस अधिकाधिक विकोपाला जात असल्याचें दिसतें, तोच तो हा जमीनदार वर्ग! शेतकऱ्याला पाटबंधारे, बीं बियाणें, खतपाणी, गुरूंवासरूं या अनेक अडचणींच्या बाबींत हातभार लावावयाला कोणी नाहीं, जमीनदार नुसता पिळणूक करण्यापुरता, व शासनसंस्था तिकडे ढुंकूनही पाहत नाहीं, अशा असहाय स्थितींत त्या शेतकऱ्याला त्या जमीनदाराविषयीं व त्या सरकाराविषयीं काय वाटावें बरें!

ही झाली हिंदी जमीनदारांची कथा! गोऱ्या जमीनदारांची कथा तर याहूनही भीषण होती. नमुन्यादाखल बंगालमधील निळीच्या मळेवाल्या जमीनदारांचें एकच उदाहरण पुरेसें आहे. निळीचा व्यापार त्या काळीं विलायतेंत इतक्या जोरांत चालत असे कीं, त्यांत मिळणारा भरमसाट नफा अधिक नक्की करून घेण्यासाठीं अनेक इंग्रजांनीं बंगालमध्यें जमिनी घेऊन तेथील शेतकी कुळांना जमिनींत निळीची लागवड करण्याला भाग पाडलें. त्या शेतकऱ्यांनीं ठराविक दरानेंच नीळ पिकवून ती जमीनदाराला विकली पाहिजे अशी सक्ती करण्यांत येऊं लागली. कराराच्या अटी इतक्या अमानुष होत्या कीं, शेतकऱ्यांना त्या पाळणें शक्य होईना. पण म्हणून कांहीं त्या अटी बदलून सौम्य करण्यांत आल्या नाहींत; उलट त्या शेतकऱ्यांकडून सक्तीनें पाळल्या जातील असा कायदेशीर जुलूम चालवून इंग्रज सरकार जमीनदारांचें पाठीराखें झालें! एवढा जोराचा पाठिंबा असल्यावर जमीनदार अथवा त्यांचे अडते शेतकऱ्यांना गुलामांप्रमाणें सक्तीनें राबविण्याला थोडेंच कमी करतात! त्या बिचाऱ्या शेतकऱ्यांना अनेक वेळां वाटे कीं, निळीच्या उत्पन्नापेक्षां तांदूळ वगैरे धान्यांचें उत्पन्न काढलें तर त्याचें मोल बाजारांत अधिक येईल. पण त्याला तसें कोण करूं देतो! त्यानें शेतांत मरेमरेतों राबलें पाहिजे व गोऱ्या धन्याला भरमसाट नफा मिळवून देणारी नीळ पिकवून ती तो मागेल त्या मातीमोलानें त्याला विकली पाहिजे. गुलामगिरी ती यापेक्षां निराळी कोणती?

ज्या प्रांतांत जमीनदारी पद्धत सुरू नाहीं व सरकारी अधिकारी शेतकऱ्याकडून प्रत्यक्ष खंड वसूल करतात, आणि नेहमीं ठराविक मुदतीनें जमिनीची पाहणी करून शेतसारा ठरविला जातो, तेथेंही तळीं, रस्ते, पाटबंधारे वगैरे शेतकीच्या सोईचा अभाव, खतपाण्याचा अभाव, त्यामुळें जमिनीचा उतरता कस, व दर फेर पाहणींत वाढणारा शेतसारा अशा दोन दगडांच्या जात्यांत बिचारा शेतकरी वर्ग भरडला जात असे. ( ही गोष्ट केवळ भूत काळांतील असून इतिहासजमा झालेली आहे असेंही मानण्याचें कारण नाहीं. आजदेखील शेतकरी वर्गाच्या बहुधा अशाच कर्णभेदी किंचाळ्या आपल्या कानीं येतात. ) अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत एकदम उपटसुंभ्यासारखा निर्माण झालेला हा हिंदी जमीनदार वर्ग शेतकरी वर्गाशीं किती निर्दयपणें व बेमुर्वतखोरपणानें वागत असे, याचीं उदाहरणें देऊं लागल्यास शांतिधन महाजनांच्या शांतिव्रताचाही भंग होईल व त्यांचें रक्त उसळूं लागेल. शेतकऱ्याला जरूर तें साह्य करण्याचें बाजूलाच राहिलें; स्वतःला आपल्या राजवाड्यासभोंवार अगदीं थोड्या अंतरावर मनाजोगी मृगया करण्याची सोय व्हावी म्हणून, अथवा शेजारच्या दुसऱ्या जमीनदारानें आपणावर आक्रमण करतांना त्याला अडथळा व्हावा म्हणून, पिकाऊ सकस जमिनींत मुद्दाम जंगल उभारणारे जमीनदारही होते, व त्यांचे वंशज आजही त्या जमीनदाऱ्या उपभोगीत आहेत! हिंदी शेतकरी वर्गावर हिंदी लोकांकडून जुलम करवून कायदेशीर पैसा उकळण्याची ही इंग्रजांची सोय झाली; ते कशाला शेतकऱ्याची दाद घेतात! ही हलाखी शेतकऱ्याला विशेष तीव्रतेनें जाणवण्याचें कारण आतां त्याला पूर्वीप्रमाणें जीवनाला आवश्यक असणाऱ्या वस्तू शेतांत पिकलेल्या मालाच्या मोबदल्यांत मिळण्याची सोय उरली नव्हती, सर्व व्यवहार नाण्याच्या भाषेंत सुरू झाले होते. कारण देशी उद्योगधंदे बुडून ती जागा विलायती मालानें घेतली होती, व तो माल विकत घेण्यासाठीं पैसा मोजावा लागे. शेतांत पिकणारें धान्य, कापूस वगैरे कच्चा मालही त्याला आतां बाजारांत विकला जाईल त्या भावानें पैशाच्या मोबदल्यांत विकावा लागे, व मातीमोलानें इंग्रज व्यापाऱ्यांच्या पदरीं पडलेला तो माल त्याचें सोनें करण्यासाठीं विलायतेंत पाठविला जाई. असें एका बाजूनें वाढतें दारिद्र्य, व दुसऱ्या बाजूनें जमीनदार तालुकदार अथवा वसुली अधिकारी यांचा जुलूम अशा

कात्रींत मान सांपडलेल्या बिचाऱ्या शेतकऱ्याला जाळ्यांत पकडून गट्ट करण्यासाठीं गांवोगांवीं सावकारी कोळी जाळें पसरून बसलेले होतेच. शेतकरी नेमका त्या जाळ्यांत जाऊन अडकून पडावयाचा. भयंकर व्याजानें सावकाराचें कर्ज काढून तें गुरुंवासरूं, खतपाणी, बींबियाणें, औतकाठी, यांत शेतकऱ्यानें घालावयाचें, त्यांत स्वतःच्या व स्वतःच्या बायकोपोरांच्या श्रमांची भर टाकावयाची, आणि जें काय पिकेल तें कराच्या रूपानें सरकारच्या आणि कर्जावरील व्याजाच्या रूपानें सावकाराच्या घशांत पडावयाचें. त्यांतच आणखी कधीं सुका दुष्काळ तर कधीं ओला दुष्काळ तर कधीं गुरांची रोगराई अशा संकटांची भर पडावयाची. यांतून शेतकऱ्याला मिळावयाचें काय; तर डोकीवर कर्जाचे डोंगर व पोटाची उपासमार! सावकारांच्या जाळ्यांत जिथें मोठमोठे राजेमहाराजेही एकामागून एक अडकून पडत होते व दरसाल दर शेंकडा ६० रुपयेपावेतोंदेखील व्याज सावकार लोक आपल्या त्या तालेवार ऋणकोंकडून मिळवीत होते, तिथें गरीब शेतकऱ्याला याहून कोणत्या मर्यादेपावेतों व किती निर्दयपणें पिळीत असेल, याची कल्पनाच करणें बरें.

ही गोष्ट खरी कीं इंग्रजांनीं ताब्यांत घेतलेल्या अथवा जिंकलेल्या प्रदेशांत शक्य तेथें कालवे काढले, विहिरी खोदल्या, रस्ते तयार केले; आणि हिंदुस्थानांत आगगाडी सुरू केली, तारायंत्र सुरू केलें. पण हें सर्व त्यांनीं हिंदुस्थानची लूट पद्धतशीर रीतीनें शक्य तितक्या कमी श्रमांनीं व शक्य तों हिंदी लोकांच्या डोळ्यांवर न येतां करतां यावी या हेतूनें केलें. हिंदुस्थानांतील कच्चा माल समुद्रकिनाऱ्यावर व तेथून जहाजांतून विलायतेंत न्यावयाचा, आणि विलायतेंतील पक्का माल हिंदुस्थानांत विकण्यासाठीं आणलेला हिंदुस्थानच्या अंतर्भागांत शक्य तितका दूरवर पोंचता करावयाचा, यासाठीं हिंदुस्थान हा कच्चा माल स्वस्ताईनें पुरवणारा देश बनवून सोडण्यासाठीं इंग्रजी भांडवलशाहीला हिंदुस्थानांत आगगाडी आणणें भाग पडलें. विलायतेंत यांत्रिक साधनांनीं तयार झालेला माल हिंदुस्थानांत येऊं लागल्यामुळें एथें जी सामाजिक क्रांति घडून येत होती, ती आगगाडीच्या सुरुवातीनें पूर्ण झाली. राजकारणाच्या दृष्टीनें विचार करतां, अकबर अथवा अवरंगजेब यांना राष्ट्रीय ऐक्याची जी गोष्ट साध्य झाली नाहीं, ती यामुळें इंग्रजांना साध्य झाली, आगगाडीच्या साधनानें मध्यवर्ती सरकारचें सैन्य देशाच्या

दूरच्या कोनाकोंपऱ्यांतही अगदीं थोड्या दिवसांत जाऊन पोहोंचण्याची सोय झाली; त्यामुळें कोणा संस्थानिकाला त्या सत्ताविरुद्ध बंडाळी माजवून ती चालविण्याची पूर्वींसारखी सोय उरली नाहीं, व हिंदुस्थानांत अगदीं खोलवर घुसून आपल्या राज्याची वाढ करण्याची इंग्रजांची सोय झाली. याखेरीज खेडीपाडीं व संस्थानें यांची या सोईमुळें सांखळी जोडली गेल्यामुळें त्यांचा सरंजामशाहींतील अलगपणा आपोआप नाहींसा झाला. हिंदुस्थानांत पहिला आगगाडीचा रस्ता सन १८५३ मध्यें तयार झाला. त्याच वर्षी कार्ल मार्क्सनें त्याविषयीं काढलेले उद्गार आज अचूक भविष्याच्या मोलानें ध्यानीं घ्यावे लागतात. मार्क्स म्हणतो, "बाष्पशक्तीनें हिंदुस्थान व युरोप यांचें दळणवळण जलद व नियमित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे; व हिंदुस्थानचीं प्रमुख बंदरें दळणवळणाच्या साधनानें दक्षिण–पूर्वदिशेला पसरलेल्या अटलांटिक महासागरांतील बंदरांना जोडलीं आहेत. एकलकोंडेपणा व कूपमंडूकपणाची वृत्ति यांपासून हिंदुस्थानचा उद्धार होण्याला बाष्पशक्तिच कारण झाली आहे. आतां हिंदुस्थान व विलायत यांमधील अंतर आगगाडीचा मार्ग आणि जलमार्ग या साधनांच्या द्वारा अवघ्या आठ दिवसांत तोडतां येतें असें सिद्ध होण्याचा व एका काळीं सुवर्णभूमि म्हणून गाजलेला हिंदुस्थान पश्चिम जगतांत समाविष्ट होण्याचा दिवस फार दूर नाहीं."

कालवे, पाटबंधारे, विहिरी, वगैरे पाणीपुरवठ्याचीं साधनेंही इंग्रजी अंमलांत हिंदी शेतकरी वर्गाला पूर्वींच्याहून पुष्कळच अधिक प्रमाणांत उपलब्ध झालीं हें खरें! परंतु तीं केव्हां? तर आपला यंत्रनिर्मित पक्का माल हिंदुस्थानांत खपावयाला हवा असल्यास हिंदी शेतकरी जिवंत तरी राहिला पाहिजे, व तो जिवंत राहण्यासाठीं पाणीपुरवठ्याच्या सोईची अत्यंत आवश्यकता आहे, असें इंग्रजी भांडवलशाहीला कळून आलें तेव्हां! पण हिंदी शेतकरी वर्गाचें नष्टचर्य एवढ्यावर तरी कुठें संपलें होतें? जी गत त्या वर्गाची, तीच गत खेड्यापाड्यांतील कारागिरांची झाली. यांत्रिक पद्धतीनें तयार करण्यांत आलेला माल हाती मालापेक्षां कमी श्रमांत व कमी खर्चांत विलायतेंत तयार होई. तो हिंदुस्थानांत आल्यावर हिंदी माल कसा खपणार? हिंदी मालाला गिऱ्हाईक नाहींसें झाल्याबरोबर व कंपनीनेंही हिंदी उद्योगधंद्यांना पाठिंबा देण्याचें बंद केल्यावर हिंदी कारागीर उपाशी मरूं लागला.

स्वतःच्या कारागिरीच्या मोबदल्यांत स्वतःच्या गरजेचा इतर माल घेण्याची सोय उरली नाहीं. व पैशाशिवाय गरजेच्या वस्तू मिळणें अशक्य झालें. आणि पैसा मिळविण्याला साधन तर कांहीं नाहीं! अशा स्थितींत शेतकी हा एकच मार्ग चार पैसे मिळविण्यासाठीं कारागीर वर्गाला मोकळा राहिला. तो वर्ग शेतीवर गेल्यावर, आधींच शेतकीच्या धंद्यांत उपासमार होत असलेल्या शेतकरी वर्गाची गत दुष्काळांत तेरावा महिना यावा तशी केविलवाणी झाली. कारागिराचा शेतकरी बनला खरा. पण शेतीला तरी जमीन कुठें आहे? सारी जमीन हिंदुस्थानांत जमीनदार, तालुकदार, खोत, कुळकर्णी, मिराशी, असे वतनदार अगोदरच व्यापून बसले होते. ते शेतकरी वर्गाला त्याच्या हितासाठीं सवलती थोड्याच देतात!

याप्रमाणें हिंदुस्थान हा आंतून अठरा विश्वे दारिद्र्यानें पोखरला जाऊन अगतिक झाला असतांना लॉर्ड डलहौसीनें पाहिजे त्या खऱ्या व खोट्या कारणांसाठीं हिंदी संस्थानें बुडविण्याचा सपाटा चालविला, म्हणून त्याला प्रतिबंध कोण कसा करणार!

## १३ : 'मेरी झाँसी नहीं दूंगी!'

"मेरी झाँसी नहीं दूंगी!"

मर्मस्थानीं घाव बसतांच नागिणीनें फणा आपटून संतापानें फुत्कार सोडले. पण त्या फुत्कारांना कोण भीक घालतो?

झांशी संस्थान खालसा केल्याबद्दलचा जाहीरनामा झांशी नगरांत फडकतांच राणी लक्ष्मी, तिचे वडील 'सरदार' मोरोपंत तांबे, व झुंबराच्या लोलकांप्रमाणें संस्थानच्या आश्रयावर हेलावणारे सरे लहान मोठे आश्रित या सर्वांनीं विस्मयपूर्वक तोंडांत बोटें घालून एकमेकांत कुजबुजण्याला सुरुवात केली, "काय; झांशीचें राज्य खालसा? काय म्हणून? कै० राजे गंगाधररावांचा दत्तक पुत्र असतांना झांशी खालसा? केवढी अन्यायाची गोष्ट ही! केवढा भयंकर अन्याय आहे हा!"

त्या बातमीवर कोणाचाही विश्वास बसेना. वास्तविक दत्तक घेण्यापूर्वीपासून व दत्तक घेतल्यावरही गंगाधररावांना, व त्यांच्या पश्चात् ह्या सर्व मंडळीला सभोंवारच्या परिस्थितीवरून कळावयाला पाहिजे होतें कीं, सातारा राज्याची इतिश्री करणारे इंग्रज लोक त्या राज्याच्या अंकित असलेलें झांशीचें राज्य निर्बाध राखतील तरी कसें? कसायानें दुष्काळांत मरतुकडेली पण दुधाळ गाय रुपया आठ आण्यांना विकत घेतली व ती कसाईखान्यांत पाठविली, तिची पुढें काय गत होणार हें ध्यानीं न आणतां तिच्या पोटांतील वासरानें जगण्याची आशा धरली तरी ती पूर्ण व्हावी कशी? सर्वंकष इंग्रजी भांडवलशाही लांडग्यासारखी हिंदी सरंजामदार वर्गांतील लठ्ठ लठ्ठ बोकडांचाही भराभर चट्टामट्टा करीत असतांना त्या कळपांतील लंगड्या कोंकरानें लांडग्याच्या दयाळूपणावर विश्वास ठेवावा हा जितका शहाणपणा, तितकाच शहाणपणा झांशीचें राज्य इंग्रज सरकार आपल्याकडे वंशपरंपरेनें चालवील अशा राणी लक्ष्मीच्या आशावादांत होता. तिला वाटलें, एवढें थोर राज-

घराणें बुडविणें म्हणजे काय तोंडची गोष्ट आहे! झांशीचा संस्थानिक म्हणजे काल मेला व आज पितर झाला असा कोणी उचला उपरा थोडाच आहे! त्याच्यामागें केवढा उज्ज्वल इतिहास आहे! आज ज्या इंग्रजांच्या कृपेची आम्हांला अपेक्षा आहे, त्या इंग्रजांसाठीं आम्हीं काय केलें नाहीं? पेशव्यांना सोडून त्यांची मांडलिकी पत्करली, त्यांची तैनाती फौज स्वतःच्या खर्चानें पदरीं ठेवून घेतली, त्या फौजेच्या खर्चासाठीं मुलूख तोडून दिला, इंग्रजांची सत्ता हिंदुस्थानांत बळकट होण्यासाठीं त्यांना वेळोवेळीं मनुष्यबळानें व द्रव्यबळानें साह्य केलें, इंग्रजांचें युनियन जॅक देखील, त्यांनीं आमच्यावर न लादतां आम्ही तें आग्रहानें मागून घेऊन स्वतःच्या माथ्यावर फडकवलें! इतका स्वामिनिष्ठ जो मांडलिक, त्याला इंग्रज सरकार दगा देईल? इंग्रजांना हिंदुस्थानांत राहावयाचें आहे कीं नाहीं? जळांत राहून माशाशीं वैर करून त्यांचा थोडाच पल्ला येणार आहे? ज्या शिडीनें इंग्रज एथें वैभव शिखरावर चढले, ती शिडी लाथाडून त्यांचें कसें चालेल?

राणी लक्ष्मी तेव्हां केवळ एवढेंच मनांत आणून थांबली नसेल; तिनें आणखीही कितीतरी टोलेजंग असे शेखमहंमदी मनोरथांचे मनोरे तेव्हां आपल्या मनांत रचिले असतील. वाइटांतून चांगलें निपजावें त्याप्रमाणें तिच्या वैधव्यांतून तिला नुक्तें कुठें स्वातंत्र्य मिळालें होतें. तिच्या पराक्रमांना, बुद्धिचातुर्याला, सदिच्छांना गंगाधररावांच्या हयातींत मुळींच वाव नव्हता, तो आतां नुक्ता कोठें मिळाला होता. ह्या स्वातंत्र्याचा व ह्या राजवैभवाचा कोणत्या कारणीं सदुपयोग करूं आणि कोणत्या कारणीं करूं नको असें तिला तेव्हां वाटूं लागलें होतें. राणी ह्या दृष्टीनें तिचें अधिकारक्षेत्र बरेंच मर्यादित होतें खरें. पण त्या मर्यादित क्षेत्रांतही अनेक सत्कृत्यें कशीं करतां येतात, याविषयींचें इंदूरच्या राणी अहल्याबाई होळकरांचें उदाहरण तिच्या दृष्टीसमोर होतें. आपणही तसेंच व्हावें असें तिला वाटत असल्यास नवल नाहीं. आपलें राजवैभव हें उसनें लेणें आहे, आणि त्यापेक्षांही हिंदु स्त्रीचें जीवन हेंही उसनें लेणें आहे, याची तिला काय कल्पना! बळी देण्याला न्यावयाच्या पशूला पुष्पमालांनीं व गंधलेपनानें सजवितात तसा हा राजवैभवाचा साजशृंगार आपल्या अंगावर लग्नाच्या वेळीं चढविण्यांत आला आहे इतकी तिला कुठची जाणीव! परान्नपुष्ट समाजाला आपलें खरें स्थान कोणतें हें सहसा

कळत नाहीं. त्याला स्वतःचें असें नक्की स्थान नसतेंच. आणि राणी लक्ष्मीही त्याला अपवाद नव्हती. ती गरीब ब्राह्मणाच्या पोटीं जन्माला आली, श्रीमंतांच्या सहवासांत वाढून लहानाची मोठी झाली, म्हाताऱ्या नेभळट नवऱ्याची बायको होऊन राणी झाली, आणि राणी झाली म्हणून ती आतां आपल्या राजवैभवासाठीं झटते, यांत तिचें नक्की स्थान कोणतें म्हणून समजावयाचें? सारींच उसनवारीचीं लेणीं अंगाखांद्यावर शोभणारीं, त्यांतून कोणत्या लेण्याची शाश्वती तिनें धरणें शोभलें असतें? पण एथें शोभलें असतें काय, हा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. लग्नाच्या पूर्वीं लोकांच्या हत्तीवरून मिरवणें तिला शोभलें नसेल; पण लग्नानंतर अनेक हत्ती तिच्या दारीं झुलले व ती त्या गजान्तलक्ष्मीची स्वामिनी शोभली ना? राजे व राण्या—सरंजामदार लोकांना राजवैभव भोगण्यासाठीं कांहीं श्रम करावे लागत नाहींत, कोणत्या तरी नात्यानें हक्कदार ठरतां आलें कीं काम भागतें. नाहींतरी, राणी लक्ष्मीनें मनांत आणलें असेल, आपल्या पतींनीं काय पराक्रम केला होता म्हणून ते राजे झाले? ते गादीचे वारस होते म्हणून ते राजे झाले, मी त्यांची पत्नी आहें म्हणून व दत्तक पुत्राची आई आहें म्हणून, राजमाता व राज्यकर्ती आहें. राणी लक्ष्मीची चूक झाली ती हीच कीं तिनें आपल्या सभोंवार कोणता वणवा पेटला आहे तें पाहिलें नाहीं. अथवा पाहिलें असलें तर तें नीटसें तिच्या ध्यानीं आलें नाहीं.

अशा स्थितींत झांशी संस्थान इंग्रज सरकारनें खालसा केल्याचा जाहीरनामा झांशी नगराच्या वेशीवर फडकला, तेव्हां प्रथम राणी लक्ष्मी, तिचे वडील मोरोपंत तांबे, अथवा सभोंवारची इतर खाशी मंडळी यांना तें खरें वाटलें नाहीं. त्यांनीं यांतलें खरें काय व खोटें काय याचा निवाडा करण्यासाठीं चवकशी चालविली, इतक्यांत मेजर एलिस हा गव्हर्नर जनरलचा प्रतिनिधि झांशी खालसा केल्याविषयींचा ठराव राणी लक्ष्मीला वाचून दाखविण्यासाठीं राजवाड्यांत आला. हिंदु राणीची मुखचर्या कोठल्या कोणा गोऱ्या साहेबाला उघडी कशी दिसेल? ती काय कोणा मोलमजुराची स्त्री आहे? अथवा कोणा शेतकऱ्याची स्त्री आहे? अथवा गरीब पांढरपेशाची स्त्री आहे? सर्व वर्गांनीं जिच्यासाठीं राबावें व जिला आयता ऐषआराम प्राप्त करून देण्यासाठीं स्वतः सतत हालअपेष्टा भोगाव्या, अशी राणी ती! तशांत नुक्तीच

वैधव्याची कुऱ्हाड तिच्या मानेवर पडलेली! त्यामुळें परक्या कोणालाही राणीचें मुखच काय पण नखही दिसणें मुष्किलीचें होतें. साहेब येणार अशी बातमी तिला अगोदरच मिळाली होती. त्याला भेटण्यासाठीं ती दरबारी दिवाणखान्यांत चिकाच्या पडद्याच्या आडवशाला बसली होती. तिनें मेजर एलिसचा यथोचित सत्कार केला. तो सत्कार तिनें एलिसला भला मनुष्य समजून केला कीं काय हा प्रश्नच एथें अप्रस्तुत आहे. सत्ताधारी व श्रीमान स्त्री–पुरुषांचा आणि भलेपणाचा अर्थाअर्थीं कांहीं संबंध नसला तरी कांहीं अडत नाहीं, असे दाखले राणी लक्ष्मीनें खुद्द आपल्या हयातींत हवे तेवढे अनुभवले होते. रावबाजी कुठें भला माणूस होता? पण पुष्कळ लोक त्याच्यासमोर गोंडा घोळीतच होते कीं नाहीं? झांशीचा तिसरा रघुनाथराव कुठें भला होता? तो राजा झालाच कीं नाहीं? आजच्या समाजांत भलेपणा हा सत्ता व संपत्ति यांवर मोजला जातो. जो धनवान तो भला! जो सत्ताधारी तो भला! मेजर एलिस इंग्रजी सत्तेचा प्रतिनिधि होता. त्याच्या कृपाकटाक्षावर बुंदेलखंडांतील देशी संस्थानिकांचें भवितव्य पुष्कळसें–नव्हे, सर्वस्वी अवलंबून होतें म्हटलें तरी चालेल. त्याला मान देणें इतकेंच काय; पण तो वरिष्ट सत्तेचा प्रतिनिधि व आपण त्याच्यापुढें मांडलिक हें नातें ध्यानीं घेऊन त्याला बहुमानानें वागविणें राणी लक्ष्मीला भाग होतें. तेथें खुषीनाखुषीचा प्रश्नच नव्हता; सक्तीच्या खुषीचा प्रश्न होता.

राणी लक्ष्मी व मेजर एलिस यांची त्या दरबारी दिवाणखान्यांत भेट झाली, व एलिसनें झांशीचें राज्य खालसा करण्यांत आल्याबद्दलचा गव्हर्नर जनरलचा खलिता राणीला वाचून दाखविला. त्या खलित्यांतील एकेक शब्द ऐकून राणी लक्ष्मीचें हृदय तीळ तीळ तुटलें असेल, नेत्रांवाटे अश्रूंच्या गंगा यमुना लोटूं लागल्या असतील, छातीची धडधड सुरू झाली असेल, डोक्यावरचें आकाश फाटलें व पायांतळची धरणी दुभंग झाली असें वाटलें असेल; तिच्यासारख्या स्वाभिमानी, तेजस्वी व महत्त्वाकांक्षी व्यक्तीला तो मरणापेक्षांही दारुण अपमानसा वाटला असेल. तेवढ्यांत मेजर एलिसनें तिला आश्वासनपूर्वक सांगितलें, "राणीसाहेब! आपलें राज्य जरी खालसा करण्यांत आलें असलें, तरी आपणाला सरकारांतून भरपूर वर्षासन देण्यांत येईल, व आपला मानमरातब योग्य त्या रीतीनें राखला जाईल."

वाचनालय ता. २८/... ठाणे.

मेजर एलिसचे ते शब्द राणी लक्ष्मीला दुःखावर डागण्या दिल्यासारखे वाटले. तिचा शोक अनावर झाला. जिनें आपल्या प्रजेच्या कल्याणासाठीं, दानधर्मासाठीं, स्वतःसाठीं, स्वतःच्या आश्रित वर्गासाठीं कितीतरी गोष्टी राजसत्ता हातीं आल्यावर सत्तेनें करण्याचें मनांतून योजिलें होतें, तिच्यावर इंग्रज सरकारच्या कृपेनें जगण्याचा प्रसंग आला! आपल्या लाखमाप प्रजचा मानमरातब व योगक्षेम योग्य प्रकारें चालविणें हें आपलें कर्तव्य आहे आणि तें आपण निष्ठापूर्वक बजावणार अशी जिची दांडगी उमेद, तिचा मानमरातब व योगक्षेम नीट चालविण्याचें आश्वासन देण्याला एक परका गोरा अधिकारी उभा राहतो! धिक् जिणें! धिक् जिणें! लॉर्ड वुइलियम बेंटिंकनें सतीची चाल कायद्यानें बंद केल्याबद्दल राणी लक्ष्मीला तो पूर्वी जरी असहाय हिंदी स्त्रीवर्गाचा कैवारीसा वाटला असला, तरी त्या वेळीं तिची स्वतःची दीनावस्था पाहून तिला देव आठवला असेल, धर्म आठवला असेल, मृत पतीबरोबर सती गेल्यानें त्या चितेखालून स्वर्गलोकाचा कळीचा दरवाजा आपोआप उघडता असता अथवा वैकुंठाहून भगवान् श्रीविष्णूचें विमान अशा पुण्यसतीला स्वर्गांत न्यावयाला आलें असतें अशी कल्पना तिच्या मनांत आली असेल. आणि त्या उद्वेगाच्या भरांत तिनें बेंटिंकला शिव्याशापांची लाखोली वाहिली असेल, "किती पापी दुरात्मा हा साहेब! यानें आमच्या सतीधर्मावर घाला घातला व मोक्षाचा मार्ग बंद करून टाकला. नाहींपेक्षां मी पतीबरोबर सती गेल्यें असत्यें, तर इहलोकीं जयजयकार व परलोकीं उत्तम पदाची प्राप्ति झाली असती. निदान ही असली विटंबना भोगण्याचें तरी माझ्या वांट्याला आलें नसतें."

पण मनांत वाटणाऱ्या उद्वेगामुळें व निराशेमुळें ती तरुण राणी हतबुद्ध झाली नाहीं. मेजर एलिसच्या तोंडचे उद्गार ऐकून, कोणींतरी नागिणीच्या शेपटीवर पाय दिल्यावर ती नागीण जशी खवळते तशी ती खवळून चिकाच्या पडद्याआडून फुत्कारानें बोल बोलली, "मेरी झाँसी नहीं दूँगी!"

"मेरी झाँसी!" राणी लक्ष्मी म्हणाली, "माझी झांशी मी देणार नाहीं."

"हमारी झांसी!" कंपनी सरकारचा प्रतिनिधि अगोदरच बोलून गेला होता कीं झांशी कंपनी सरकारनें अगोदरच खालसा केली आहे. तुमचा

आतां एथें कांहींही हक्क उरलेला नाहीं. आतां आम्ही तुमच्यावर मेहेरनजर करून तुमचा मानसन्मान राखूं, तुम्हांला प्रशस्त वर्षासन करून देऊं, उपाशीं मरूं तर देणार नाहींच पण पोटासाठीं वणवणही करावयाला लावणार नाहीं. तेंच मेजर एलिसनें पुन्हा सांगितलें, "झांशीचें राज्य खालसा करण्यांत आलें आहे. पण आपणांला भरपूर वर्षासन मिळेल व आपला योग्य तो मान राखला जाईल!"

आणि काळ तेव्हां त्या दरबारी दिवाणखान्याच्या एका कोंपऱ्यांत उभा राहून मेजर एलिस आणि राणी लक्ष्मी यांना पाहून अदृश्य रूपानें उपहासानें स्वतःशीं हंसत होता. त्या काळाच्या हास्यांत कितीतरी गूढ अर्थ सांठवला होता. त्या काळाच्या मनांतील विचारांचीं प्रतिबिंबें त्या दरबारी दिवाणखान्याबाहेर—त्या राजवाड्याबाहेर—त्या श्रीमंती मोहल्याबाहेर—त्या वैभवसंपन्न झांशी राजधानीबाहेर हजारों लाखों मैल औरस चौरस पसरलेल्या प्रदेशांतील कष्टाळू शेतकऱ्यांच्या तळमळीच्या व हालअपेष्टांच्या रूपानें उमटलीं होतीं. राणीचे 'मेरी झाँसी नहीं दूँगी' हे शब्द मेजर एलिसनें त्या वेळीं दरबारांत ऐकले असतील; व तसेच कंपनी सरकारच्या वतीचे शब्द राणी लक्ष्मीलाही त्या वेळींच ऐकावयास मिळाले असतील. तोंवर राणीला कल्पनाही नसेल कीं कंपनी सरकार माझ्या घरांत मला परकी ठरवून घरांतून बाहेर ओढून काढणार आहे. अथवा मेजर एलिसलाही तोंवर कल्पना नसेल कीं पेशवे व छत्रपति यांचे वारस म्हणून झांशी घशांत टाकण्याच्या कंपनी सरकारच्या डावाला राणी—ही एक अबला विरोध करील.

'मेरी झाँसी नहीं दूँगी' ह्या राणी लक्ष्मीच्या उद्गारांत अत्यंत गूढ असा अर्थ सांठवलेला होता. तो अर्थ तिचा तिलाही कळला नसेल. तो मेजर एलिसलाही कळला नसेल.

"नर्मदेंतील गोट्यांप्रमाणें आमचें असें हें घरंगळत जाणें आणखी कोठवर चालावयाचें? एका काळीं दिल्लीचे बादशहा शोभणाऱ्या पेशवे सरकारांचे माझे वडील हे आश्रित. जन्मगांवाहून पुणें, पुण्याहून काशी, काशीहून ब्रह्मावर्त, ब्रह्मावर्ताहून झांशी इतकी जिवाची धांवपळ करीत माझे वाडवडील एथवर आले. पेशव्यांचे आश्रित आम्ही; आम्ही श्रीमंत पेशव्यांचे आश्रित. आमची अशी दुरवस्था होण्यांत जशी आमची तशीच पेशव्यांचीही अप्रतिष्ठा

आहे. अशीच जर तुम्ही राजे महाराजे आमची फंसवणूक करूं लागलां, तर आम्हीं तरी तुमचें अभिष्ट कां म्हणून चिंतावयाचें ? शेतकऱ्यांची पिळणूक करणें तुम्हांला सोपें जातें; कारण शेतकरी बिचारा भोळा असतो. तो सुसंस्कृत कोठें असतो ? त्याला लिहितां वाचतां कोठें येतें ? त्याला कायदा कोठें कळतो ? त्याला राजकारण कोठें खेळतां येतें ? असला वर्ग ताब्यांत ठेवून त्याच्या जिवावर राज्यकर्ते म्हणून मिरवणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. राज्यकर्ते हो ! गरीब मध्यम वर्ग हा तुमच्या हातीं सांपडलेला उजव्या सोंडेचा गणपति आहे. तुम्ही त्या गणपतीला रोज एकवीस मोदकांचा नेवेद्य दाखवा व त्याला प्रसन्न करून त्याच्यापासून पाहिजे तो वर मागून घ्या. त्या मोदकांचें साहित्य तुम्ही कोठून मागून आणलें कीं चोरून आणलें कीं कोणाला लुबाडून आणलें हें हा गणपति तुम्हांला कधीं विचारणार नाहीं. त्याला आयतें मोदकांच्या नेवेद्याचें ताट आणून द्यावें, आणि त्याचा आशिर्वाद घेऊन तुम्ही कोणतीही गोष्ट फत्ते करावी. तुमच्यासाठीं जप–तप–अनुष्ठानें करून देवाला प्रसन्न करणारा आमच्या पुरोहित वर्गाखेरीज कोण आहे ? लेखणीच्या फर्डेगिरीवर राज्येंचीं राज्यें झुलविणारा तुमचा साह्यकारी कारकून-खोत-कुळकर्णी-चिटणीस या लेखणीबहाद्दर वर्गाखेरीज कोण आहे ? तुमच्या कवाइती फौजेची एवढी प्रतिष्ठा सांगूं नका. सातारचें राज्य तुम्हीं बुडविलें, तेव्हां कवाइती फौज काय तुमच्यापाशीं नव्हती ? तरवारी व बंदुका नव्हत्या ? आणि लढवय्ये लोक नव्हते ? पण तरीदेखील बाळाजीपंत नातु आणि भाऊभट लेले या बुद्धिवंतांची गरज तुम्हांला लागलीच ! मागाहून इंग्रजांची कृपा संपादन करतां येईल, अशा आशेनें–नुसत्या आशेनें नातूनें तुमच्यासाठीं अजब कारस्थानांचें भुयार खणून त्या भुयारांतून तुम्हां इंग्रजांना नेमकें कसें साताऱ्च्या छत्रपतीच्या अंतःपुरांत नेऊन सोडलें ! भाऊभट लेल्यानेंही अशाच आशेनें साताऱ्च्या राजा प्रतापसिंहाविरुद्ध तुम्हांला हवा तसला पुरावा किती तत्परतेनें व चतुराईनें तयार करून दिला ? बरें; याबद्दल इंग्रजांना किंमत तरी मोठीशी द्यावी लागली काय ? मुळींच नाहीं. कोटमाप उत्पन्नाची मराठशाही मिळविण्यासाठीं नातूला किती क्षुल्लक जहागीर तुम्हीं दिली ! तरीदेखील नातु तेवढ्यावरच खूष झाला, व त्यानें–स्वराष्ट्राभिमानी लोकांच्या जळजळीत भाषेत सांगावयाचें तर–स्वतःच्या प्राणांपेक्षां, किंवा प्राणांपेक्षां

आतां एथें कांहींही हक्क उरलेला नाहीं. आतां आम्ही तुमच्यावर मेहेरनजर करून तुमचा मानसन्मान राखूं, तुम्हांला प्रशस्त वर्षासन करून देऊं, उपाशीं मरूं तर देणार नाहींच पण पोटासाठीं वणवणही करावयाला लावणार नाहीं. तेंच मेजर एलिसनें पुन्हा सांगितलें, "झांशीचें राज्य खालसा करण्यांत आलें आहे. पण आपणांला भरपूर वर्षासन मिळेल व आपला योग्य तो मान राखला जाईल!"

आणि काळ तेव्हां त्या दरबारी दिवाणखान्याच्या एका कोंपऱ्यांत उभा राहून मेजर एलिस आणि राणी लक्ष्मी यांना पाहून अदृश्य रूपानें उपहासानें स्वतःशीं हंसत होता. त्या काळाच्या हास्यांत कितीतरी गूढ अर्थ सांठवला होता. त्या काळाच्या मनांतील विचारांचीं प्रतिबिंबें त्या दरबारी दिवाणखान्याबाहेर—त्या राजवाड्याबाहेर—त्या श्रीमंती मोहल्याबाहेर—त्या वैभवसंपन्न झांशी राजधानीबाहेर हजारों लाखों मैल औरस चौरस पसरलेल्या प्रदेशांतील कष्टाळू शेतकऱ्यांच्या तळमळीच्या व हालअपेष्टांच्या रूपानें उमटलीं होतीं. राणीचे 'मेरी झाँसी नहीं दूँगी' हे शब्द मेजर एलिसनें त्या वेळीं दरबारांत ऐकले असतील; व तसेच कंपनी सरकारच्या वतीचे शब्द राणी लक्ष्मीलाही त्या वेळींच ऐकावयास मिळाले असतील. तोंवर राणीला कल्पनाही नसेल कीं कंपनी सरकार माझ्या घरांत मला परकी ठरवून घरांतून बाहेर ओढून काढणार आहे. अथवा मेजर एलिसलाही तोंवर कल्पना नसेल कीं पेशवे व छत्रपति यांचे वारस म्हणून झांशी घशांत टाकण्याच्या कंपनी सरकारच्या डावाला राणी—ही एक अबला विरोध करील.

'मेरी झाँसी नहीं दूँगी' ह्या राणी लक्ष्मीच्या उद्गारांत अत्यंत गूढ असा अर्थ सांठवलेला होता. तो अर्थ तिचा तिलाही कळला नसेल. तो मेजर एलिसलाही कळला नसेल.

"नर्मदेंतील गोट्यांप्रमाणें आमचें असें हें घरंगळत जाणें आणखी कोठवर चालावयाचें? एका काळीं दिल्लीचे बादशहा शोभणाऱ्या पेशवे सरकारांचे माझे वडील हे आश्रित. जन्मगांवाहून पुणें, पुण्याहून काशी, काशीहून ब्रह्मावर्त, ब्रह्मावर्ताहून झांशी इतकी जिवाची धांवपळ करीत माझे वाडवडील एथवर आले. पेशव्यांचे आश्रित आम्ही; आम्ही श्रीमंत पेशव्यांचे आश्रित. आमची अशी दुरवस्था होण्यांत जशी आमची तशीच पेशव्यांचीही अप्रतिष्ठा.

आहे. अशीच जर तुम्ही राजे महाराजे आमची फंसवणूक करूं लागलां, तर आम्हीं तरी तुमचें अभिष्ट कां म्हणून चिंतावयाचें ? शेतकऱ्यांची पिळणूक करणें तुम्हांला सोपें जातें; कारण शेतकरी बिचारा भोळा असतो. तो सुसंस्कृत कोठें असतो ? त्याला लिहितां वाचतां कोठें येतें ? त्याला कायदा कोठें कळतो ? त्याला राजकारण कोठें खेळतां येतें ? असला वर्ग ताब्यांत ठेवून त्याच्या जिवावर राज्यकर्ते म्हणून मिरवणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. राज्यकर्ते हो ! गरीब मध्यम वर्ग हा तुमच्या हातीं सांपडलेला उजव्या सोंडेचा गणपति आहे. तुम्ही त्या गणपतीला रोज एकवीस मोदकांचा नैवेद्य दाखवा व त्याला प्रसन्न करून त्याच्यापासून पाहिजे तो वर मागून घ्या. त्या मोदकांचें साहित्य तुम्ही कोठून मागून आणलें कीं चोरून आणलें कीं कोणाला लुबाडून आणलें हें हा गणपति तुम्हांला कधीं विचारणार नाहीं. त्याला आयतें मोदकांच्या नैवेद्याचें ताट आणून द्यावें, आणि त्याचा आशिर्वाद घेऊन तुम्ही कोणतीही गोष्ट फत्ते करावी. तुमच्यासाठीं जप–तप–अनुष्ठानें करून देवाला प्रसन्न करणारा आमच्या पुरोहित वर्गाखेरीज कोण आहे ? लेखणीच्या फर्डेगिरीवर राज्येंचीं राज्यें झुलविणारा तुमचा साह्यकारी कारकून-खोत-कुळकर्णी-चिटणीस या लेखणीबहाद्दर वर्गाखेरीज कोण आहे ? तुमच्या कवाइती फौजेची एवढी प्रतिष्ठा सांगूं नका. सातारचें राज्य तुम्हीं बुडविलें, तेव्हां कवाइती फौज काय तुमच्यापाशीं नव्हती ? तरवारी व बंदुका नव्हत्या ? आणि लढवय्ये लोक नव्हते ? पण तरीदेखील बाळाजीपंत नातु आणि भाऊभट लेले या बुद्धिवंतांची गरज तुम्हांला लागलीच ! मागाहून इंग्रजांची कृपा संपादन करतां येईल, अशा आशेनें–नुसत्या आशेनें नातूनें तुमच्यासाठीं अजब कारस्थानांचें भुयार खणून त्या भुयारांतून तुम्हां इंग्रजांना नेमकें कसें सातारच्या छत्रपतीच्या अंतःपुरांत नेऊन सोडलें ? भाऊभट लेल्यानेंही अशाच आशेनें सातारच्या राजा प्रतापसिंहाविरुद्ध तुम्हांला हवा तसला पुरावा किती तत्परतेनें व चतुराईनें तयार करून दिला ? बरें; याबद्दल इंग्रजांना किंमत तरी मोठीशी द्यावी लागली काय ? मुळींच नाहीं. कोटमाप उत्पन्नाची मराठशाही मिळविण्यासाठीं नातूला किती क्षुल्लक जहागीर तुम्हीं दिली ! तरीदेखील नातु तेवढ्यावरच खूष झाला, व त्यानें–स्वराष्ट्राभिमानी लोकांच्या जळजळीत भाषेंत सांगावयाचें तर–स्वतःच्या प्राणांपेक्षां, किंवा प्राणांपेक्षा

अब्रू थोर म्हणणाऱ्या संभावितांच्या भाषेंत सांगावयाचें तर अब्रूपेक्षांही थोर असें मोल त्या जहागिरीला दिलें. स्वराष्ट्राच्या निशाणासाठीं प्राणार्पणाला तयार असणाऱ्यांनीं स्वार्थत्यागाचा धडा नातूपासून घ्यावा, असा स्वतःच्या जन्मभूमीच्या राष्ट्रीय झेंड्याचा–शनवार वाड्यावरील भगव्या झेंड्याचाही मोह न बाळगतां तो झेंडा आपल्या हातानें उतरून तेथें इंग्रज हो! तुमचें 'युनियन जॅक' फडकविणारा अल्पसंतुष्ट सेवक–वीर–ब्राह्मण–मुत्सद्दी व आणखी काय म्हणाल तो नातु कोण होता? अवघ्या दीडशें रुपयां-साठीं राजा प्रतापसिंहाविरुद्ध खोटा पुरावा तयार करून देणारा अल्पसंतुष्ट भाऊभट लेले कोण होता? गरीब मध्यम वर्ग निष्ठावंत पण लाचार आहे; उपयोगी पण अल्पसंतुष्ट आहे. मी कांहीं मला हिंदुस्थानची बादशाहीण करा अशी मागणी तुमच्याकडे करीत नाहीं. भलभलत्या कारणांनीं वेळोवेळीं भल-भलत्या अटी झांशीच्या अधिपतींवर तुम्हीं लादल्या व लक्षावधि उत्पन्ना-चा मुलुख गडप केला, त्याबद्दलही मी तुम्हांला दोष देत नाहीं, अथवा ती जिंदगी झांशीची राणी या नात्यानें परतही मागत नाहीं. मी फक्त एवढेंच मागत्यें कीं जी काय वडिलार्जित दौलत झांशीचें राज्य म्हणून बाकी उरली आहे, ती आमची आमच्याकडे कायम टिकावी. आम्हीं आजवर तुमच्याशीं इमान राखलें आहे, तसें तुम्हीं आमच्याशीं इमान राखावें..."

राणी लक्ष्मीच्या मनांत झांशीच्या राज्याविषयींच्या ज्या अपेक्षा घोळत होत्या, त्यांची गोळाबेरीज वरील उद्गारांतील अभिप्रेत अशा अर्थापेक्षां निराळी नव्हती. तिला तरी संकटाच्या वेळीं तिच्या पूर्वजांनीं केलेल्या गोष्टींपेक्षां आणखी काय आठवणार?

पण काळ मात्र उपहासपूर्वक राणी लक्ष्मीला व मेजर एलिसलाही सांगत होता, "आहारे खुळ्यांनो! माझी झांशी, म्हणे माझी झांशी! झांशी त्या कष्ट करणाऱ्या व कर देणाऱ्या कष्टाळू शेतकऱ्यांची; झांशी त्या कामकऱ्यांची. आली कोणा कारकुनाची पोरगी, व झांशीच्या राणीपदावर चढून एकदम विनाआयास एवढ्या मोठ्या वैभवाची स्वयंसिद्ध स्वामिनी झाली, म्हणून म्हणे माझी झांशी! गोरगरीब व कष्टाळूंना पिळून गबर झालेल्या भांडवल-शाहीचा प्रतिनिधि म्हणे माझी झांशी! पण खुळ्यांनो, झांशी तुमची नाहीं. झांशी जरी तुम्ही सरंजामदारांनीं मध्यवर्ती सत्तेला हुलकावणी देऊन आपलें

राज्य म्हणून राबावली असली; झांशी जरी तुम्ही भांडवलदारांनीं सरंजामदारांपासून लुबाडून घेतली असली, तरी झांशी तुमची नाहीं. नानासाहेब तांबे! 'माझ्या मुलीची झांशी व मी त्या विधवा मुलीचा पालनकर्ता म्हणून झांशी माझी' म्हणाल, तर झांशी तुमचीही नाहीं! तर एका काळीं तेथें असणाऱ्या ओसाड अरण्याचें नंदनवन तेथें राबून ज्यांनीं फुलविलें, खेड्याचें सुंदर शहर ज्यांनीं बांधलें, झांशींतील लोकांच्या निर्वाहाला लागणारें अन्न जे पिकवितात, वस्त्रें जे विणतात, सर्वांच्या गरजेच्या व चैनीच्याही सर्व वस्तु जें तयार करतात, त्या शेतकऱ्यांची—त्या विणकरांची—त्या कारागिरांची—त्या श्रमजीवि वर्गाची झांशी! ती जी तुम्हीं एकाहून एक अरेरावांनीं बळकावून घेतली आहे, ती ज्यांची त्यांच्या हवालीं होईपावेतों—सर्व कामकरी-शेतकरी लोकांची खरीखुरी लोकसत्ता तेथें प्रस्थापित होईपावेतों 'झांशी माझी' 'झांशी माझी' अशा वल्गना कोणींही कराव्या. परंतु त्या सर्व वल्गनाबहाद्दरांनीं ध्यानीं ठेवावें कीं त्यांनीं लोकराज्याव्यतिरिक्त झांशीवर राज्य करण्यासाठीं—पृथ्वीवर सत्ता गाजवून पृथ्वीवरील मानव जातीची लूट करण्यासाठीं कोणतेही विजय मिळवले—छत्रसालाकडून पेशव्यांनीं, पेशव्याकडून नेवाळकरांनीं, नेवाळकरांकडून इंग्रजांनीं झांशी मिळविली अथवा हिसकावून घेतली, तरी हे विजय क्षणिकच ठरणार आहेत या सर्वांना पायांखालीं रगडून कामकरी—शेतकरी जनता हा खरा धनी पुढें येऊन दिव्य संदेश देणार आहे कीं, झांशी—झांशीच काय, सारा हिंदुस्थान—हिंदुस्थानच काय, सारें जग जो त्या जगाला जगविण्यासाठीं कष्ट करतो त्या कष्टाळूचें आहे!" काळाच्या मुखांतून निघणारें हें कठोर सत्य तेव्हां राणी लक्ष्मीला अथवा मेजर एलिसला ऐकूं गेलें नाहीं. मेजर एलिस हा राणीला चिकाच्या पडद्याआड बसून आक्रोश करण्याला भरपूर अवसर देऊन माघारा निघून गेला. 'मेरी झाँसी नहीं दूँगी!' असें राणी लक्ष्मी कळवळून कळकळून बोलत असतांनाच ती त्या झांशींतच काय पण त्या राजवाड्यांतही कोणाची कोण झाली. कसें तरी मिळालेलें वैभव कसें तरी गेलें.

पण ज्या आवेशानें राणी लक्ष्मी 'मेरी झाँसी नहीं दूँगी' असें म्हणाली, तो आवेश अखेरपावेतों कायम टिकला नाहीं. तो टिकणें शक्यच नव्हतें. भलत्या हट्टाला पेटून तिचा थोडाच निभाव लागणार होता! माणसाला मी

अमूक करीन अथवा करणार नाहीं असा निर्धार तडीला नेण्यासाठीं त्या निर्धारामागें सामर्थ्य पाहिजे असतें. त्याखेरीज असले निर्धार वल्गना ठरतात. राणी लक्ष्मीच्या मागें, म्हणजे ती ज्या वर्गाची प्रतिनिधि म्हणून बोलत होती त्या वर्गामागें अशा प्रकारचें इतिहासमान्य सामर्थ्य नव्हतें. इंग्रजांच्या अनुरंजनाखेरीज जगण्याचा मार्गच त्या वर्गाला आतां मोकळा उरला नव्हता.

राणी लक्ष्मीला संतापून जळफळत अतिशय असंतुष्टपणें कां होईना पण झांशीचें राज्य इंग्रजांच्या प्रथम हवालीं करावें लागलें, व मग अर्जविनंत्यांना प्रारंभ झाला. राज्य ताब्यांत घेण्याविषयीं सूचना बुंदेलखंडचे पोलिटिकल एजंट मेजर माल्कम यांनीं गव्हर्नर जनरलकडे कळविल्या होत्या त्या अशा कीं, (१) राणीला दरमहा कंपनी शिक्का ५००० रुपये तहहयात मिळावे. (२) झांशींतील राजवाडा राणीला राहण्यासाठीं तिच्या स्वाधीन करण्यांत यावा व त्यावर तिचीच सत्ता असावी. (३) राणी हयात आहे तोंवर तिच्यावर अथवा तिच्या नोकरमाणसांवर इंग्रज सरकारच्या कोर्टाची सत्ता चालूं नये. (४) संस्थानचें सर्व जडजवाहीर व खासगी रोकड, त्याप्रमाणेंच हिशेबीं निघणारा सरकारी खजिन्यांतील ऐवज राणीला देण्यांत यावा. त्याप्रमाणेंच त्यांच्या नातेवाइकांनाही निर्वाहासाठीं नेमणुका देण्यांत याव्या.

या अटींतील शेवटची अट तेवढी गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी याला पुरी मान्य झाली नाहीं; बाकीच्या सर्व अटी मान्य झाल्या. खजिन्यांतील खासगी शिल्लक राणीच्या हातीं लागूं द्यावयाची नाहीं असा लॉर्ड डलहौसीचा मानस होता. परंतु तो उघड कसा बोलून दाखवावा? म्हणून त्यानें ती संपत्ति लुबाडून घेण्यासाठीं पुढें केलेल्या तीक्ष्ण नखांच्या विषारी पंजाला छानदार मखमाली पिशवी शिवली. गंगाधररावांचा दत्तक पुत्र दामोदरराव हा गंगाधररावांच्या पश्चात् गादीचा वारस होण्याला अपात्र ठरला; परंतु लॉर्ड डलहौसीनें त्याचाच एथें राणीच्या तोंडाला पानें पुसण्याच्या कामीं उपयोग करून घेतला. खजिन्यांतील शिल्लक सर्व दामोदररावांच्या मालकीची आहे, व तो मालक अज्ञान असल्यामुळें त्याच्या हितसंबंधांचें रक्षण करणें हें कंपनी सरकारचें कर्तव्य आहे, अशी सबब सांगून राणीला ती संपत्ति देण्याचें नाकारण्यांत आलें. लगेच झांशीच्या खजिन्यांतील शिल्लक सहा लाख रुपये उचलून अज्ञान दामोदररावांच्या नांवें इंग्रजी खजिन्यांत नेऊन ठेवण्यांत

आले. चांदीचीं भांडीं व जडजवाहीर काय होतें तें मात्र राणीला देण्यांत येऊन तिला किल्ल्यांतून हलवून शहरांतील राजवाड्यांत नेऊन ठेवण्यांत आलें. किल्ला अर्थांतच इंग्रजांच्या ताब्यांत गेला, व तेथें 'युनियन जॅक' ही इंग्रज भांडवलशाहीची विजयपताका दिमाखानें फडकूं लागली. राणीच्या अगर आणखी कोणाच्या चिथावणीनें झांशीची फौज बिथरेल व बखेडा उत्पन्न करण्याचा प्रयत्न करील, तर त्या फौजेच्या तोंडांत सहा महिन्यांच्या पगाराएवढ्या बक्षिसाचा सुखकर बोळा कोंबून त्या सैन्याला नोकरींतून अजिबात काढून टाकण्यांत आलें.

राणी लक्ष्मीनें त्यानंतरही आपलें राजवैभव आपणाला पुन्हा मिळण्याचे अर्थात् दामोदरराव हे गंगाधररावांचे दत्तक पुत्र म्हणून मान्य केले जाण्याचे भगीरथ प्रयत्न चालविले. हिंदुस्थानांतील इंग्रज आपली दाद घेत नाहींत तर विलायतेंत तरी दाद लागतेशी पाहावी, या आशेनें तिनें पदरचे साठ हजार रुपये देऊन उमेशचंद्र बानर्जी या नांवाचा एक माणूस व त्याच्या जोडीला दुसरा एक गोरा माणूस असे दोघेजण विलायतेंत आपल्या वतीनें कंपनीच्या डायरेक्टरांच्या बोर्डाकडे शिष्टाई करण्याकाठीं पाठविले. या प्रयत्नांत अर्थातच 'मेरी झाँसी नहिं दूँगी' असा उघडा आवेश व संताप नव्हता; अजीजी-ची—नमत्या नूराची भाषा होती. आवेशानें व संतापानें वागून येथें कामच भागण्याजोगें नव्हतें. त्या दोघां वकिलांमार्फत राणी लक्ष्मीनें निरनिराळे दाखले देऊन व निरनिराळ्या जुन्या करारनाम्यांची कंपनीसरकारला आठवण देऊन झांशीच्या राज्यावर आपल्या घराण्याचा हक्क कसा आहे हें विलायतें-तील श्रेष्ठांच्या मनावर बिंबविण्याची शिकस्त केली. हे वकील जर विलायतेंत जाऊन आपली कामगिरी साताऱ्याच्या राजा प्रतापसिंहाचा वकील रंगो बापूजी याच्याप्रमाणें कसोशीनें बजावते, तर परिणाम काय झाला असता कोण जाणे! पण त्या वकिलांनीं तसें कांहींच केलें नाहीं. दावा गुदरण्यापूर्वीच साऱ्या दाव्याचा दामदुप्पट खर्च पक्षकाराकडून वसूल करून दावा नुसता न गुदरतांही ती रक्कम गट्ट करणारे व पक्षकाराला स्वगृहीं मनगटें चावीत बसविणारे असेच ते वकील निघाले.

झालें! अखेर झांशी संस्थान खालसा खाल्यावर जी गत इतर खालसा झालेल्या राज्यांची इंग्रजांकडून झाली तीच गत झांशीचीही झाली. जॉन

सलिव्हन याच्या शद्बांत हिंदी संस्थानांतील विलायती राजवटीचें वर्णन करावयाचें म्हणजे "देशी राज्य खालसा करण्यांत आलें कीं इंग्रज माणूस कमिशनर या नांवाखालीं तेथला बादशहा बनतो. त्याच्या हाताखालील तीन-चार गोरे लोक अनेक सरदार–जहागीरदारांना दूर करून तेथें कारभार पाहूं लागतात. त्या राज्यांतील मूळच्या हजारों सैनिकांच्या वांट्याला बेकारी येते, व त्यांना मिळत असलेल्या पैशावर थोडेसे गोरे सैनिक चंगळ चालवून राज्याचें 'रक्षण' करूं लागतात. राज्यघराण्याचा विध्वंस होतो. तेथील व्यापार-धंदा साफ बुडतो. राजधानीवर अवकळा येते. लोक भिकारी होतात. इंग्रज माणूस मात्र तेथें भरभराटीला येतो. गंगाकांठच्या भारतीय संपत्तीचें ( अर्थात् भारतीय कृषिवल–धनाचें ) स्पंजाप्रमाणें शोषण करावयाचें व तो स्पंज विलायतेंत तेम्स नदीच्या कांठीं नेऊन पिळावयाचा, एवढेंच काम मग इंग्रजाला असतें...."

झांशींतही इंग्रजी कारकीर्द अशीच सुरू झाली. राणी लक्ष्मी देवाळ्यांतील भंगलेल्या मूर्तीसारखी तिच्या देव्हाऱ्यांतून–किल्ल्यावरील राजवाड्यांतून काढून अडगळीच्या कोनाड्यांत अर्थात् शहरांतील दुसऱ्या राजवाड्यांत आणून टाकण्यांत आली होती. तेथें सरकारांतून दरमहा पांच हजार रुपये नेमणूक घेत माशा मारीत स्वस्थ बसावें, आपण होतों कोण आणि झालों कोण, हें आठवून रोज हळहळावें, त्या आठवणींनीं होरपळून निघणाऱ्या मनाला रडून ओरडून त्रास न व्हावा यास्तव त्याला नेमधर्म–कथा–पुराणांत गुंगवून ठेवावें, असा क्रम सुरू झाला. राज्यच गेलें; जुने सर्व अंमलदारही त्याबरोबरच गेले. पण सुंभ जळलें तरी पीळ जळला नाहीं. कानांतील अलंकार गेले तरी कानांचीं भोंकें शिल्लक राहिलींच होतीं. राज्य गेलें तरी राज्यकर्तेपणा मिरवण्याची हौस कशी जावी ? खरें राजवैभव लयाला गेलें तरी लुटुपुटूचें राजवैभव राणी लक्ष्मीनें जिवंत राखलें होतें; व त्या लुटुपुटूच्या कारभाराचे मामासाहेब तांबे व लक्ष्मणराव बांडे हे दोघे कारभारी होते. मामासाहेब तांबे जसे एकदम आश्रिताचे सरदार झाले, तसेच लक्ष्मणराव बांडे कारकुनाचे कारभारी झाले होते. राज्य बुडालें तरी आश्रित मंडळीला राणीनें कोठें जा म्हणून सांगावें ? त्यांना पोसणें तिला प्राप्तच होतें. कारण ती त्यांची राणी–त्यांची अन्नदात्री होती !

राणी लक्ष्मीला झांशीचें राज्य खालसा झाल्यानंतर किती मानखंडणा पत्करून झांशींत राहावें लागत असेल याची कल्पना करण्याला एकच गोष्ट पुरेशी आहे. दत्तक चिरंजीव दामोदरराव हे मौजिबंधाला योग्य झाले, व त्या समारंभाच्या खर्चासाठीं राणी लक्ष्मीनें इंग्रज सरकारापाशीं दामोदर-रावांच्या शिलकेंतून एक लाख रुपये मागितले, तेव्हां ती अज्ञानाची इस्टेट म्हणून राणीच्या स्वाधीन करण्याचें नाकारण्यांत आलें. पुढें संपन्न असे चार जामीन राणीला पटवावे लागले, तेव्हां त्या जामिनांच्या पतीवर राणीला एक लाख रुपये घेऊन चिरंजिवांचा मौजीबंधन समारंभ पार पाडावा लागला. ऋण काढून सण साजरा करण्याची ही प्रवृत्ति तेव्हांच्या सर्वच सरंजामदार लोकांत होती. राणी कांहीं त्याला अपवाद नव्हती. तेव्हां राणीला चिरंजिवां-च्या मुंजीसाठीं एक लाख रुपये उधळण्याची ऐपत अथवा आवश्यकता नस-तांना तिनें केवळ आपल्या थोर नांवाला शोभेसें कांहींतरी केलेंच पाहिजे या भावनेनें तो खर्च केला. 'मेरी झाँसी नहीं दूँगी' असें प्रारंभीं निग्रहानें सांगणाऱ्या राणी लक्ष्मीला अवघ्या एक लाख रुपयांसाठीं त्याच इंग्रजांपाशीं इतका लाचारपणा पत्करतांना किती दुःख वाटलें असेल!

ही राणी लक्ष्मीची दुर्दशा कथन करतांना ओघानेंच ती ज्यांच्या राज-वैभवांत वाढून लहानाची मोठी झाली त्या रावबाजीचा उत्तर वृत्तांत सांगणें आलें. कारण राणीचे वडील मोरोपंत तांबे हे रावबाजीचे आश्रित असतांनाच ही हिडीस लग्नघटना घडून आली होती. रावबाजीनें मरणापूर्वींच आपलें आठ लाखांचें वर्षासन व आपली 'पेशवा' ही पदवी आपल्या पश्चात् नानासाहेब या आपल्या मुलाला प्राप्त व्हावी अशी विनंति कंपनी सरकारकडे केली होती. त्यावेळीं त्याला 'आज कांहीं हा प्रश्न सोडविण्याची घाई नाहीं. तुमच्या पश्चात् या गोष्टीचा योग्य विचार होईल' असें उत्तर मिळालें होतें. रावबाजी सन १८५१ च्या प्रारंभीं ब्रह्मावर्त एथें मरण पावला. अर्थात् त्याला आठ लाखांचें वर्षासन पेशवाई बुडविली त्या सन १८१८ साला-पासून तब्बल तेहतीस वर्षें खावयाला मिळालें. मरणसमयीं त्याचा परिवार म्हणजे नानासाहेब हा दत्तक पुत्र, मयत दादासाहेब या दत्तकाची विधवा स्त्री रोहिणीबाई, तिचा दत्तक मुलगा रावसाहेब, व इतर परिवार. यावरून राव-बाजी व रोहिणीबाई स्वतःच्या दृष्टीनें किती घोरणी होतीं हें दिसून येतें.

रावबाजीनें तर एथें नशिबाला द्वंद्वयुद्धाचें उघड उघड आव्हान दिल्यासारखेंच दिसतें. लग्न करून व नवससायास करूनदेखील मुलगा नाहीं म्हणजे काय? औरस मुलगा नाहीं तर दत्तक घेतों. मग तरी मी सपुत्रिक झालों कीं नाहीं! दत्तक मुलगा एकच घेतला व तोही मरण पावला तर पुन्हा निपुत्रिकपणा पदरीं यावयाचा! म्हणून रावबाजीनें एकामागून एक दादासाहेब, नानासाहेब, बाळासाहेब असे तीन दत्तक घेतले. हेतु हा कीं एक मेला तर दुसरा व दुसरा मेला तर तिसरा तयार असावा. आयती दौलत मिळणार असें कळल्यावर, एथवर जो मध्यम वर्ग व गरीब मध्यम वर्ग म्हणून वर्णन केला, त्यांत दत्तक मिळण्याला कसला दुष्काळ! रावबाजीचा एक दत्तक पुत्र दादासाहेब हा वारला, त्याच्या पश्चात् आपली नेमणूक आपला हुषार व चुणचुणीत दत्तक-पुत्र नानासाहिब याला मिळावी, अशीच रावबाजीची उत्कठ इच्छा होती. ती भेटीगांठींच्या वेळीं तो वारंवार इंग्रज अधिकाऱ्यांपाशीं बोलूनही दाखवीत असे. यावरून दादासाहेबाच्या पश्चात् त्याची बायको रोहिणी—रावबाजीची सून हिनें आणखी निराळा दत्तक मांडीवर घ्यावा ही योजना खुद्द राव-बाजीला कितपत मान्य होती याविषयीं शंका आहे.

कदाचित् रोहिणीला स्वतःलाच वाटलें असेल कीं आपल्या मुलानें पेशवा कां होऊं नये! आणि आपण राजमाता म्हणून कां मिरवूं नये? वडील मुलगा वारला तर त्याच्या मुलाचा गादीवर पहिला हक्क, असा कायद्याचा कानमंत्र रोहिणीला कोणीं तरी सांगितला असावा. त्या आधारावर आपण रावबाजीच्या पश्चात् नेमणुकीसाठीं दिरांविरुद्ध भांडून दौलत मिळवूं असाही तिचा मनोदय असेल. अथवा खुद्द रावबाजीनेंच "गाजराची पुंगी, वाजली तर वाजली, नाहींतर मोडून खाल्ली' अशा दूरदर्शीपणानें रोहिणीला मांडी-वर दत्तक घ्यावयाला लावलें असेल. 'मुलगा म्हणाल तर मुलगा, मयत वडील मुलाचा मुलगा म्हणाल तर त्याचा मुलगा, कसा म्हणाल तसा वारस तयार आहे. आतां कोणत्या तोंडानें नेमणूक पेशव्यांच्या वंशाकडे चालवीत नाहीं असें म्हणाल!' असा इंग्रजांना बिनतोड पेंच घालून त्यांना अडवण्या-ची ही अजब मुत्सद्देगिरी रावबाजीच्या सुपीक मेंदूतून निघाली असल्यास नवल नाहीं. इंग्रजांचा हल्ला झाला असतांना त्या हल्ल्यापासून स्वतःचें अर्थात् ब्राह्मण्याचें रक्षण करण्यासाठीं सोंवळ्याच्या वस्त्रांचा कुंपणकूड उभा-

रण्यासारख्या अजब मुत्सद्देगिरीच्या गोष्टी रावबाजीच्या कारकीर्दींत घडल्या असें लोक बोलतात. तें खरें असलें तर त्याच मासल्याची इंग्रजांना अडवून त्यांच्याकडून नेमणूक वंशपरंपरा चालू ठेवण्याची ही मुत्सद्देगिरी होय.

रावबाजी वारल्यावर इंग्रजांनीं त्यांच्या सर्वेच वारसांच्या तोंडाला पानें पुसलीं, त्यामुळें नानासाहेबाच्या हक्कप्रस्थापनेच्या नगाऱ्यापुढें रोहिणी व रावसाहेब यांच्या हक्कप्रस्थापनेची टिमकी वाजलीच नसावी. तथापि जर इंग्रजांनीं ती नेमणूक पेशव्यांच्या वंशांत पुढें चालविण्याचें ठरविलें असतें, तर त्यांना नानासाहेब, रोहिणी, रावसाहेब यांच्यांत यादवी सुरू झाल्याचें दृश्य पाहावयाला खास मिळालें असतें. पण इंग्रजांनीं त्या थराला गोष्ट येऊंच दिली नाहीं. प्रथम सन १८५१ सालीं रावबाजी वारल्यापासून सन १८५६ पावेतों पांच वर्षें पावेतों त्यांनीं नानासाहेबाच्या नाकाला नुसतें मधाचें बोट लावून ठेवलें होतें. तोंवर वडिलार्जित नेमणूक पुढें चालावयाची कीं नाहीं हा प्रश्न तसाच भिजत पडला होता. नानासाहेबांचेंही तेव्हां इंग्रजांच्या सल्ल्याखेरीज व संमतिखेरीज पान हलत नसे असें म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. नेहमीं नानासाहेबाकडे इंग्रज अधिकाऱ्यांना टोलेजंग मेजवान्या झडाव्या, नाचरंग व ऐषआराम चालावे, यांनीं त्यांना भले म्हणावें व त्यांनीं यांना भले म्हणावें, असे प्रकार चालले होते. ह्या एकाच प्रकाराविषयीं दोघांच्या मनांतील हेतु मात्र निरनिराळा होता. नानासाहेब इंग्रजांचें इतकें अनुरंजन करीत होता, 'सुसरीबाई तुझी पाठ मऊ' म्हणून त्यांची स्तुति करीत होता, त्यांना मेजवान्या चारीत होता, त्यांच्यासमवेत नाचरंग करीत होता, हें सारें इंग्रजांनीं प्रसन्न होऊन वडिलार्जित वर्षासन बिनबोभाट आपणाकडे चालवावें व आपल्या पुतण्याच्या—रावसाहेबाच्या वतीनें दान पडूं नये यासाठीं चाललें होतें. जिथें सारा मामला इंग्रजांच्या मेहेरेनजरेवर अवलंबून, तिथें त्यांची मनधरणी करून त्यांना प्रसन्न करण्याखेरीज दुसरा उपायच वर्षासन मिळविण्याला नव्हता. उलट इंग्रजांनीं नानासाहेबांना झुलवीत ठेवलें होतें तें अशासाठीं कीं, विरोधाचें रान एकदम सर्व ठिकाणीं उठावयाला नको. ती वेळ हिंदुस्थानांत अतिशय आणीबाणीची होती. लॉर्ड डलहौसी भराभर पंजाब, अयोध्या, सातारा, नागपूर वगैरे राज्यें बुडवीत पुढें चालला होता. हे सर्व प्रकार हिंदी जनता अगदीं आनंदानें व समाधानानें सहन करीत असेल असें

मानण्याइतका लॉर्ड डलहौसी अदूरदर्शी नव्हता. जनतेच्या मनांतील असंतोषाला नानासाहेब पेशव्याच्या असंतोषानें तोंड पडण्याचा बराचसा संभव होता. तसा अनवस्था प्रसंग ओढवूं नये यास्तव नानासाहेबाला प्रारंभींच नाखूष करणें इंग्रजांना इष्ट वाटलें नाहीं.

परंतु लॉर्ड डलहौसीच्या मतें तो आणीबाणीचा प्रसंग आटोक्यांत आला, त्याबरोबर त्याच्या सूत्रचालकत्वानुसार कंपनी सरकारकडून नानासाहेबाच्या विनंतीबाबत त्याच्या कपाळाला वाटाण्याच्या अक्षता लावण्यांत आल्या. रावबाजीच्या मरणसमयीं अठ्ठावीस लाखांची संपत्ति त्याच्या खजिन्यांत शिल्लक होती, तेवढी त्याच्या कुटुंबीयांच्या ऐषआरामी चरितार्थाला पुरेशी आहे, व सरकारी कायद्याप्रमाणेंही रावबाजीच्या नातलगांचा त्या नेमणुकीवर कांहीं हक्क शाबीत होत नाहीं, अशी दुहेरी सबब सांगून लॉर्ड डलहौसीनें वडिलार्जित नेमणूक नानासाहेबाकडे चालविण्याचें साफ नाकारलें. नानासाहेबानें यावर विलायतेंत जाऊन या अन्यायाची दाद लावून घेण्यासाठीं एका इंग्रजाच्या घरांत गड्याचें काम करणारा पण दिसावयाला देखणा, बोलावयाला चुरचुरीत आणि हुषार असा अजिमुल्लाखान नांवाचा माणूस खर्चासाठीं हजारों रुपये देऊन विलायतेंत पाठविला. अजिमुल्लाखानानें त्या पैशावर विलायतेंत व इतर देशोदेशीं हिंडून जिवाची विलायत करून सोडली. पण कामाच्या नांवानें मात्र शून्य !

काय विचित्र योगायोग पाहा ! रावबाजीनें नानासाहेबाला दत्तक घेण्यापूर्वीं नानासाहेब हा मध्यम वर्गांतील एक अगदीं सामान्य मुलगा होता. श्रीमंती मिळविण्याला त्याला श्रम करावे लागले नाहींत; केवळ रावबाजीसारख्या सरंजामदाराच्या नांवानें बाटून वैभवसंपन्न होतां आलें. त्याच वर्गांतील राणी लक्ष्मीही होती. नानासाहेब व राणी लक्ष्मी हीं दोघेंही ब्रह्मावर्ती बाळपणांत एके ठिकाणीं खेळून लहानाचीं मोठीं झालीं. राणी लक्ष्मीला म्हणजेच लग्नापूर्वीच्या मनूताईला अजाणपणामुळें नानासाहेबाच्या उसन्या वैभवाचा हेवा वाटला; व नानासाहेबही तसल्या त्या पोरवयांतही मनूताईचे व तिचे वडील मोरोपंत तांबे यांचे डोळे दिपवून त्या मायलेकरांचा धनी होऊं शकला. मनूताईही अशीच विनाआयास झांशीची राणी होऊं शकली. कालांतरानें राणीचें राज्यही गेलें व नानासाहेबाची नेमणूकही गेली. त्या

उसन्या उपऱ्या वैभवापैकीं त्यांच्या हातीं काय राहिलें? तर थोडीशी शिळीपाकी बुरसलेली शिदोरी! पण त्या शिदोरीच्या मोहजालांत गुरफटून राहिल्यामुळें त्यांच्या जीवनसर्वस्वाची सत्तावन सालच्या बंडाच्या प्रचंड वडवानलांत होळी झाली!

राणी लक्ष्मी काय अथवा नानासाहेब पेशवा काय, दोघांच्याही जीवनाचा हा तिसरा टप्पा आहे. पहिला टप्पा राणी लक्ष्मीच्या बाबतींत तिच्या लग्नघटकेला व नानासाहेबाच्या बाबतींत त्याच्या दत्तविधानाच्या घटकेला संपला. तेथून दोघांच्याही जीवनाचें सरंजामदार वर्गाच्या वठलेल्या वृक्षावर कलम बांधण्यांत आलें व दुसऱ्या टप्प्याला सुरुवात झाली. सरंजामदारीचें आयतें धनवैभव प्राप्त झालेलें टिकविण्यासाठीं राणी लक्ष्मी व नानासाहेब या दोघांची मिनतवारीची निर्फळ धडपड हा त्या दोघांच्याही कलमी जीवनांतील दुसऱ्या टप्प्यांतील विशेष होय. ती सर्व धडपड निर्फळ झाली, इंग्रज कांहीं केल्या आपल्या मनांतलें साधूं देत नाहींत, अशी पूर्ण खात्री पटल्यावर 'आतां काय करावें?' अशा विचारांचा त्यांच्या जीवनांत सुरू झालेला टप्पा हा तिसरा टप्पा होय.

पण मुळांतच ह्या दोन गरीब मध्यम वर्गीय रोपट्यांचें सरंजामदार वर्गाच्या वठलेल्या वृक्षावर कलम करण्यांत आलें नसतें तर! मग मनूताईची राणी लक्ष्मी झाली नसती व धोंडूचा नानासाहेब झाला नसता. दारिद्र्य व उपासमार यांचीं दुःखें दोघांनाही भोगावीं लागलीं असतीं. श्रीमंत पेशव्यांच्या आश्रयाच्या अभावीं मोरोपंत तांबे बिचारे कुठें तरी कारकुनी, भटजीगिरी अथवा शागीर्दी करीत काळ कंठीत बसले असते. मनूताई कोणातरी मोरोपंतासारख्याच गरीब ब्राह्मणाची पत्नी होऊन संसार करूं लागली असती. धोंडूही असाच कुठें तरी भिक्षुकी अथवा कांहीं तरी करीत काळ कंठीत बसला असता.

पण असा काळ तरी त्यांनीं कोठवर कंठला असता? आणि लौकरच उद्भवलेल्या सत्तावन सालच्या बंडाच्या पूर्व स्थितींत त्यांचें स्थान कोणतें राहिलें असतें? आणि मग प्रत्यक्ष बंडांत त्यांनीं कोणता पवित्रा घेतला असता? ह्या सर्व गुंतागुंतीच्या प्रश्नांचीं उत्तरें आपणाला सत्तावन सालच्या बंडांतूनच शोधून काढावयाचीं आहेत.

## १४ : सत्तावन सालच्या बंडाचा पूर्वरंग

व्यापारी भांडवलदार इंग्रजांची सत्ता हिंदुस्थानांत जसजशी बळावत चालली, तसतशी हिंदी सरंजामदार वर्ग, हिंदी शेतकरी वर्ग, हिंदी कारागीर वर्ग, हिंदी व्यापारी वर्ग, या सर्वांनाच मोठी कठीण दशा आली, हें आपण एथवर पाहिलेंच आहे. त्यांतच प्रामुख्यानें उल्लेख करण्याजोगा आणखी एक वर्ग म्हणजे हिंदी सावकारांचा वर्ग होय. हा वर्ग इंग्रजी अमदानींत अजिबात धुळीला मिळाला नाहीं, उलट कांहीं ठिकाणीं चांगलाच फोफावला, हें खरें. आज हिंदुस्थानांत जो सावकार वर्ग भयंकर काळसर्पासारखा सर्वांना भीतिप्रद वाटत आहे व ज्या काळसर्पाचे दांत पाडण्यासाठीं सर्वतोपरी शिकस्तीचे प्रयत्न होत आहेत, त्या वर्गाचे पूर्वज म्हणजेच तेव्हांचा सावकारांचा वर्ग होय. इंग्रजांच्या नव्या आर्थिक धोरणामुळें इतर सर्व वर्ग भिकेला लागले, तरी दुष्काळांत पटापट मरण पावणाऱ्या प्राण्यांच्या मांसावर गिधाडांची मेजवानी साजरी होते त्याप्रमाणें इतर सर्वांच्या कमालीच्या दारिद्र्यांतच ह्या सावकारांची भरभराट होऊं लागली. साध्या शेतकऱ्यापासून तों अयोध्येच्या नबाबासारख्या बड्यांतल्या बड्या सरंमजामदारांपावेतों प्रत्येकाला कर्जाची गरज भासूं लागली, व इंग्रजांच्या नव्या आर्थिक धोरणामुळें हरएक देवघेवींत पैशाला अधिकाधिक महत्त्व प्राप्त होऊं लागलें. त्याबरोबर खेड्यापाड्यापासून तों राजधानीपावेतों सर्वच सावकारांना महत्त्व चढलें, व सावकार भयंकर व्याजाच्या रूपानें पैसे उकळूं लागला. दुष्काळामुळें महागाई झाली, पैशाच्या जिनसाला चार पैसे पडूं लागले, व लोकांची पैशाची गरज चौपट वाढली. पण पैसे आणावयाचे कोठून? अर्थात् सावकाराकडून व तेही कर्ज म्हणून, सावकार मागेल तें व्याज द्यावयाचें कबूल करून आणावयाचे. तात्पर्य, इतर सर्व वर्ग पिळले जाऊं लागल्यामुळें इंग्रजी अंमलावर असंतुष्ट असले, तरी हा सावकार वर्ग, तो भांडवलशाहीचाच

उजवा हात असल्यामुळें, इंग्रजी भांडवलशाहीचा पाठीराखाच राहिला. पण ह्या हिंदी सावकार वर्गाला ही इंग्रजांनीं कशी अद्दल घडविली, याचें प्रत्यंतर इंग्रजांनीं अयोध्येच्या वजिराची भयंकर कर्जबाजारी स्थिति पाहून त्या कर्जबाजारीपणाची स्वतःला, वजिराचे वहिवाटदार म्हणून झळ लागूं नये यासाठीं केलेल्या पक्षपाती वर्तनांत पाहावयाला सांपडतें. सर्व सावकारांचें कर्ज कधीं फिटणेंच शक्य नाहीं, एवढे कर्जाचे डोंगर वजिराच्या डोक्यावर वाढलेले, व चैनीपायीं रोजरोज असेच नवे नवे डोंगर वाढत असलेले पाहून इंग्रजांनीं दिवाळखोराच्या पेढीचा देण्याघेण्याचा व्यवहार सरकार भागवितें त्याप्रमाणें वजिराच्या कर्जाची फेड आणेवारीनें करण्याचें ठरविलें.

परंतु त्यांतही इंग्रजी सावकार व हिंदी सावकार हा पंक्तिप्रपंच जेव्हां उघड होऊं लागला, तेव्हां त्यामुळें ज्या सावकारांना झळ लागली, ते इंग्रजां-विरुद्ध क्षुब्ध होणें अगदीं स्वाभाविक होतें. पैसे मागणाऱ्या सावकारांचे युरोपिअन व हिंदी असे दोन वर्ग करण्यांत आले होते. युरोपिअन हक्क-दारांना मिळणाऱ्या कर्जाच्या हिस्सेरशीचा दर निराळा, व हिंदी हक्कदारांच्या बाबतींतील दर निराळा. हिंदी हक्कदार सावकारांना कमी दरानें पैसे देण्यांत वजिराचा फायदा होता; पण खुद्द त्या सावकारांचा तोटा होता. हिंदी सावकारांचें मागणें असें कीं ज्या दरानें युरोपिअन सावकारांची कर्जफेड होणार त्याच दरानें आमचीही कर्जफेड व्हावी. या एका तक्रारीवर आधारून त्यांनीं कमी दरानें पैसे घेण्याचें नाकबूल केलें. त्याचा परिणाम असा झाला कीं हिंदी सावकारांना कांहींच मिळालें नाहीं. प्रथम ह्या सावकारांना योग्य ती कर्जफेड करून देण्याची तजवीज करण्यांत आली होती. पण मागाहून त्या सावकारांच्या तोंडाला पानें पुसण्यांत आलीं. त्यांतही पूर्वीच्या शर्तींना मान्यता देऊन ज्या हिंदी सावकारांनीं काय मिळाली तेवढीच 'चोराची लंगोटी' मिळवली, त्यांना कांहींच न मिळण्यापेक्षां कांहींतरी मिळालें. त्यांनीं मुंगी होऊन साखर खाल्ली; पण बाकीच्यांनीं हत्तीचा आव आणल्यामुळें त्यांना लांकडें मोडीत बसावें लागलें. या आगळिकीविरुद्ध असंतुष्ट सावकार पुन्हा वजीराकडे दाद मागण्याला गेले. ईस्ट इंडिया कंपनीच्या पत्रव्यवहार समितीच्या सन १८२२ च्या अहवालांत अशा कर्जाविषयीं 'इतक्या भयंकर व्याजानें देण्यांत आलेलीं कर्जें, यांना कर्ज म्हणण्यापेक्षां जुगारी व्यवहार

म्हणणेंच योग्य होईल ' असे उद्गार काढले आहेत. वजिराकडे आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लागेल अशी त्या सावकारांना फारशी आशा नव्हतीच. त्यांनीं प्रेंडरगस्ट नांवाच्या एका इंग्रज एजंटाला गांठून त्याला आपल्या वतीनें अपील करण्यासाठीं विलायतेंत पाठविलें. ह्या गृहस्थानें प्रथम आपल्या पक्षकारांची तक्रार कंपनीसमोर मांडली, व लगेच एक महिन्यानें ती तक्रार रद्द समजण्याविषयीं अर्ज केला! असेच आतां एक तर घटकेंत एक असे तेरड्याचे तेरा रंग त्या एजंटानें तेथें केले. अर्थात् तो तेथें तैनाती फौजेंतील गोऱ्या शिपायासारखा वागला असावा. म्हणजे असा कीं, तैनाती फौजेचा खर्च हिंदी संस्थानिकांनीं चालवावयाचा; पण त्या सैन्यानें ऐन वेळीं बाजू घ्यावयाची इंग्रजांची!

प्रत्यक्ष कंपनी सरकारच्या अमदानींत हिंदी सावकारांना न्याय मिळाला तो या मासल्याचा! अशा प्रकारें तोट्याला धनी झालेले सावकार कंपनी-विरुद्ध चिडावे यांत कांहींच नवल नाहीं. हे झाले मोठमोठे नबाब, वजीर, राजे, महाराजे यांचे सावकार. पण खेडोपाडीं गोरगरीब शेतकरी कामकरी ऋणकोंच्या परीनें त्यांचेही सावकार होतेच. अडल्या नडल्या शेतकऱ्याला दर-महा दर रुपयास चार आणे म्हणजे सालीना तीनशें टक्के व्याजाच्या दरानें कर्ज देणारे सावकार अजूनही हिंदुस्थानांत विपुल आहेत; व त्या वेळींही होते. पण त्यांचे ऋणको शेती व उद्योगधंदे बुडाल्यामुळें दिवाळखोर झाल्यावर सावकारांनीं त्या ऋणकोंकडून पैसे कोठले वसूल करावयाचे? अशी आपली सावकारी बुडण्याला कारण कंपनीचा कारभार, अशी त्या सावकारांची खात्री झाल्यामुळें हेही सावकार हिंदुस्थानांतील इंग्रज अंमलावर नाखूष झाले. हे बहुतेक सावकार बनये ऊर्फ हिंदु होते.

इंग्रजी कारभारावर आणखी नाखूष असणारा जबरदस्त वर्ग म्हणजे पुरोहितांचा; म्हणजे देव, धर्म, दैवी चमत्कार यांच्या नांवावर जगणारांचा. आगगाडी, तारायंत्र वगैरे भौतिक शोधांनीं लोक दैवी चमत्कार म्हणून समजत असलेल्या कितीतरी महत्त्वाच्या गोष्टींवर ताण केली, व हिंदुस्थानांत आर्थिक आणि वैज्ञानिक क्रांति घडवून आणली. ह्या शोधांशीं टक्कर देण्याला पुरोहित वर्गाच्या पोतडींतील कोणतीही दैवी चमत्काराची 'यक्षिणीची कांडी' असमर्थ ठरूं लागली. विजेच्या तारायंत्राच्या शोधानें तर ह्या दैवी चमत्कारांची

हुरेंवडी उडविण्याच्या बाबतींत सोळा आणे कमालच केली! जनतेची देवावरील व धर्मावरील अंधःश्रद्धा हाच पुरोहित वर्गाचा परीस, तो परीस वरील शोधांमुळें प्रभावहीन होऊं लागला तसतसा त्यांच्या संतापाचा पारा चढूं लागला; व त्यांनीं धर्मभोळ्या देवभोळ्या शेतकऱ्यांना चिथवण्याला सुरुवात केली, "इंग्रजांनीं आमचा धर्म बुडवला रे बुडवला! आमचा धर्म बुडाला, अधर्म मातला, म्हणून दुष्काळ, दारिद्र्य अशा नाना रूपांनीं तुम्हांला ईश्वरी कोप सहन करावा लागत आहे. ह्या धर्मोच्छेदकांचा उच्छेद केल्याखेरीज तुमचें दैन्य संपणार नाहीं. पाहतां काय? उठा! बोला हिंदु धर्म की जय! बोला इस्लाम की जय!"

आधींच आर्थिक आपत्तींत सांपडून अगतिक झालेल्या भोळ्या शेतकरी वर्गाला ही धर्ममार्तंडांची हांक खरी वाटली. आपत्तींनीं डोकें भडकून गेलेल्या स्थितींत अतिशय अयुक्तिक गोष्टीही सयुक्तिकशा माणसाला वाटतात व विचारशीलता नष्ट होऊन विकारवशता-भावनावशता प्रभावी होते, हा मनुष्यस्वभावच आहे. आणि हिंदी शेतकरी वर्गही त्याला अपवाद नव्हता. त्या शेतकऱ्याला चिथावणी देण्याला एका बाजूनें सावकार उभा दुसऱ्या बाजूनें पुरोहित उभा, व ह्या दोघांच्या खांद्यांवर दोन पाय टाकून असंतुष्ट सरंजामदार वर्ग मान उंचावून मानभावीपणानें बोलत होता, "प्रजाजन हो! पाहतां काय? तुमच्या देशाची, तुमच्या राजाची तुम्हांला कांहीं चाड असेल तर उठा, जागे व्हा, बंड करा, आणि ह्या लुटारू बानिया वृत्तीच्या इंग्रजांना हिंदुस्थानांतून हाकलून लावा. त्या कामीं तुम्हांला आमचें पूर्ण पाठबळ आहे. तुमच्या कल्याणासाठीं काय करूं आणि काय करूं नको असें आम्हांला वाटतें. पण आमचीच जेथें ह्या इंग्रजांनीं ताटाखालच्या मांजरांसारखी अवस्था करून ठेविली आहे, तिथें आम्ही तरी काय करणार?"

इंग्रजांच्या सैन्यांत मुख्यतः उत्तर हिंदुस्थानांतील शिपायांचा भरणा विशेष होता. हे शिपायी तरी मुख्यतः शेतकरी वर्गांतूनच, पोटाची खळगी भरण्यासाठीं शेतीचा धंदा पुरा पडेनासा झाल्यामुळें लष्करांत नोकरीला राहिलेले होते. याच्या उलट खालसा झालेल्या अयोध्येसारख्या प्रांतांतील हिंदी शिपायी नोकरीवरून कमी झाल्यामुळें पुन्हा शेतकरी पेशा पत्करूं लागले होते. त्या सर्वांना शेतकरी वर्गाकडून आपल्या धर्मावर घाला पडल्याविषयींच्या पुरो-

हितप्रणीत वार्ता ऐकावयाला मिळाल्या. त्या शिपायांत उत्तर हिंदुस्थानी ब्राह्मणांचाही मोठा भरणा होता. हिंदी सैनिकांना सवतीच्या मुलांप्रमाणें लेखावयाचें, त्यांना पगार फारच कमी देऊन अतिशय अपमानास्पद रीतीनें वागवावयाचें, असे प्रकार इंग्रजी अंमलांत सर्रास सुरू असल्यानें आधींच त्यांचा असंतोषवन्हि धुमसूं लागला होता; त्यांत आणखी हा तेलाचा शिडकाव होऊं लागला; तसतसा तो वन्हि जास्तजास्त भडकूं लागला. हा सर्व अनर्थ देशांतील वाढत्या दारिद्र्यामुळें ओढवूं लागला व दारिद्र्यानें त्रस्तग्रस्त झालेले गरीब शेतकरी–कामकरी–बेकार लोक आवेशाच्या भरांत कोणी राजाच्या तंत्रानें तर कोणी सावकाराच्या चिथावणीनें तर कोणी धार्मिक अंधःश्रद्धेच्या थोतांडाला बळी पडून ह्या जळजळीत फुफाट्यांतून बाहेर पडण्याची धडपड करूं लागले. ही गोष्ट अगदीं अकस्मात् घडली असें नाहीं. सन १८५६ मध्यें लॉर्ड डलहौसीची कारकीर्द संपली व लॉर्ड कॅनिंग हा नवा गव्हर्नर जनरल नेमला गेला, तेव्हां कॅनिंगलाही हिंदुस्थानांत आपणापुढें कोणतें ताट वाढून ठेवलें आहे, आपणाला तेथें कोणत्या प्रसंगाला तोंड द्याव-याचें आहे, याची कल्पना होती. त्याला निरोप देण्याचा जो समारंभ लंडन एथें झाला, त्या समारंभांत त्यानें हिंदुस्थानांतील परिस्थितीविषयीं स्पष्ट उद्गार काढले, “ माझी हिंदुस्थानांतील कारकीर्द शांततेची जावी अशी माझी इच्छा आहे. पण हिंदुस्थानचें आकाश आज निरभ्र दिसलें तरी त्यांत हातभर लांबीचा लहानसा कां होईना पण ढग कदाचित उगवेल व तो वाढतां वाढतां फार वाढून विदीर्ण होऊन आम्हांला ग्रासून आमचा नाश करूं शकेल, हें मला विसरून चालतां येणार नाहीं ! ”

कॅनिंगच्या वरील विधानांत सत्य होतें; पण तें खरोखरीच्या परिस्थितीच्या पूर्ण ओळखीच्या अभावानें धुरकटलेलें सत्य होतें. कॅनिंग अथवा इंग्रज भांडवलशाहीचे इतर प्रणेते यांची दृष्टि हिंदुस्थानांत त्यांना प्राप्त झालेल्या यशानें धुंदावलेली असल्यानें त्यांना हिंदुस्थानच्या आकाशांत इतस्ततः भ्रमण करणारे पण वरकरणीं निस्तेज असे सार्वत्रिक असंतोषाचे ढग दिसले नाहींत. कॅनिंग हिंदुस्थानांत आला तेव्हां वर वर दिसावयाला सर्वत्र अगदीं शांतता होती. कारण विरोधाची उघड भाषा बोलण्याची कोणाची छातीच नव्हती. त्यामुळें कॅनिंगला हिंदुस्थानांत आल्यावर आपल्या पूर्वींचा गव्हर्नर जनरल

डलहौसी याच्या पावलावर पाऊल टाकून पण धिमेपणानें कारभार करण्याखेरीज विशेष कांहीं करतां येण्याजोगें नव्हतेंच. ठराविक भांडवलशाही चाकोरींतून राजकारणाचा गाडा हांकावयाचा, एवढेंच काम त्याला होतें. त्यानें त्या पूर्वपरंपरेला अनुसरून एकच महत्त्वाची गोष्ट केली; त्यानें दिल्लीच्या मोंगल बादशाहीचा कायमचा निकाल लावला. या बाबतींत त्यानें जेव्हां चालढकलीचें धोरण स्वीकारलें, तेव्हांच या राजकारणाच्या पोटीं कांहीं काळेंबेरें आहे असें बादशहासभोंवारच्या लोकांनीं हेरलें. दिल्लीचा तेव्हांचा बादशहा बहादुरशहा हाही वृद्ध व गलितगात्र असला तरी बादशाही वैभवाचा मोह सोडण्याला तयार नव्हता. त्यानें आपला सुनी पंथ सोडून शिया पंथाची दीक्षा घेतली, कारण त्याच्या मनांतून ज्या इराणच्या शहाला प्रसन्न करून आपल्या मदतीला ये असें म्हणावयाचें होतें, तो शहा शिया पंथाचा होता! अवरंगजेब बादशहानें स्वधर्मभावनेच्या जाज्वल्य दुरभिमानाच्या भरांत शिया पंथी मुसलमानांना कठोरपणानें परके लेखलें, त्याच अवरंगजेबाचा बहादुरशहा हा वंशज, व त्यानेंच असें धर्मांतर राज्यलोभानें केलें! 'धर्मजननी' 'धर्मजननी' म्हणून धर्माचा अवास्तव बढेजाव माजविणाऱ्या धर्माभिमान्यांकडूनच त्या धर्मजननीच्या मोबदल्यांत आर्थिक स्वार्थ कसा साध्य केला जातो, याचें हें एक उदाहरण लक्षांत ठेवण्यासारखें आहे. मार्टिन लूथरसारख्या रोमन कॅथॉलिक धर्माविरुद्ध सुधारणाप्रेमानें बंड उभारणाऱ्या प्रसिद्ध धर्ममार्तंडानेंही, जर्मनींतील सरंजामदारांच्या अत्याचारांविरुद्ध शेतकरीवर्ग अतिशय गांजला जाऊन सरंजामदार वर्गाविरुद्ध बंडाला प्रवृत्त झाला तेव्हां त्या शेतकरी वर्गाविरुद्ध आपल्या धर्मसंबंधी शत्रूंशीं अर्थात् रोमन कॅथॉलिक लोकांशीं संगनमत करावयाला कमी केलें नाहीं. सोरटी सोमनाथावर गझनीच्या महमुदानें स्वारी केली तेव्हां ज्या रजपुतांना स्वधर्मप्रेमाचा एवढा जबरदस्त पान्हा फुटला होता, त्यांनींच अकबर बादशहाला आपल्या लेकी बहिणी देऊन त्याच्याशीं सख्य केलें व त्या जोरावर आपलीं राज्यें राखलीं! श्रमजीवि वर्गाला यथास्थित पिळून खातां यावें यासाठीं त्याला गुंगी आणण्याकरितां धर्म ह्या मादक द्रव्याचा उपयोग करण्यांत सरंजामदार वर्ग काय अथवा भांडवलदार वर्ग काय, दोघेही सारखेच दक्ष व सारखेच पटाईत. हिंदुस्थानांत, अथवा याप्रमाणेंच भांडवलशाही परवशतेच्या शृंखलांनीं बद्ध

असलेल्या इतर देशांत चालू असलेल्या कालच्या व आजच्याही धार्मिक चळवळी या विधानाची साक्ष द्यावयाला पुरेशा आहेत.

असो. बहादुरशहानें शिया पंथ स्वीकारून इराणच्या शहाशीं मैत्री केली, तेव्हां इराणचा शहा, रशियाचा झार व अफगाणिस्थानचा अमीर हे बहादूरशहाला पाठीशीं घालून हिंदुस्थानांत पुन्हा मोंगल बादशाहीची प्रतिष्ठापना करण्यासाठीं इंग्रजांशीं लढाई करणार व पुन्हा मुसलमानी धर्माला जोर चढणार, ही बातमी पसरून विश्वसनीय वाटूं लागली. जिकडे तिकडे मुसलमानांत हाच एक चर्चेचा विषय होऊन बसला व जो तो ह्या आशेच्या किरणाच्या प्रकाशांत पुढचा मार्ग शोधूं लागला. जी गत मुसलमानांची तीच हिंदूंचीही इंग्रजांनीं केली असल्यानें या वेळीं हिंदु सरंजामदारांशीं हेवा दावा करण्याजोगें कांहींच हिंदूंपाशीं उरलें नव्हतें; उलट दोघांचाही रोष इंग्रजांवर होता. इंग्रज हा हिंदु—मुसलमान या दोघांचाही एकच महाप्रबळ शत्रु होता. मोंगल बादशाहीचें पुनरुज्जीवन करण्याविषयींच्या वरील बातमींत कांहीं तथ्य नव्हतें असें मात्र नाहीं. सन १८५७ च्या वसंतऋतूंत इंग्रजांची इराणशीं लढाई चालली असतां मोहमारा एथील इराणी लष्कराच्या छावणींत इराणी राजपुत्राच्या तंबूंत इंग्रजांविरुद्ध म्हणजेच फिरंग्यांविरुद्ध लढण्याला सर्व आबालवृद्ध मुसलमानांना प्रोत्साहन देणारा एक जाहीरनामा सांपडला, यावरून आगामी बंडाचीं पाळेंमुळें किती खोल गेलीं होतीं याची कल्पना करतां येईल. एथेंही मुसलमानांना इंग्रजांविरुद्ध चिथावणी देण्याच्या कामीं धर्माचा सोईस्कर उपयोग बादशहाच्या पक्षाकडून करण्यांत आलाच. बादशहाचा प्रमुख धर्मोपदेशक मौलवी हसन अस्कारी यानें मुसलमानांना इंग्रजांवर जय मिळावा हा दैवी चमत्कार घडून येण्यासाठीं रोज अल्लाची खास त्वरितगुणदायी आराधना चालविली होती. आपलें दैन्य व दारिद्र्य टाळण्याच्या कामीं आपण हतबल आहों अशी शेतकरी, कामकरी, शिपायी वगैरे सर्व लोकांची पूर्ण खात्री होऊन चुकल्यामुळें कोणाच्याही कोंबड्यानें कां उजाडेना पण एकदांचें उजाडूं दे, असें त्यांना ओघानेंच वाटलें; व त्यांत ह्या धार्मिक चिथावणीची भर पडली. हिंदु सरंजामदारांना देखील मुसलमानांच्या कोंबड्यानें तरी उजाडो असेंच वाटत होतें. पण यांतही भेद होता. तो अर्थात् हिंदु व मुसलमान हा भेद नव्हे;

तर इंग्रजांनीं धुळीला मिळविल्यामुळें असंतुष्ट झालेले सरंजामदार सावकार वगैरे लोक निराळे, व इंग्रजांना अधिक न दुखवतां त्यांचें लांगूलचालन करून त्यांची कृपा संपादन करण्यासाठीं 'गप्प बसायला काय घ्याल तें देतों' अशा भावनेनें वागणारे लोक निराळे. पंजाब, राजपुताना, मध्य हिंदुस्थान व दक्षिण एथें शिंदे–निजामासारखे सरंजामदार कांहीं होते. त्यांना एका बाजूनें इतर प्रतिस्पर्ध्यांपासून व दुसऱ्या बाजूनें स्वतःकडून पिळल्या जाणाऱ्या स्वतःच्या राज्यांतील शेतकरी वर्गाच्या असंतोषात्मक बंडखोरीपासून स्वतःचें रक्षण करण्यासाठीं व स्वतःच्या अत्याचारी कारभारावर पांघरूण घालून पीडितांची मुस्कटदाबी करण्यासाठीं इंग्रजांची कृपा पाहिजे होती. त्यांना इंग्रजांचा सासुरवास आवडत होता असा याचा अर्थ नव्हे. बंड यशस्वी झालें व इंग्रज हिंदुस्थानांतून हाकलले जाऊन आपणाला बेबंदशाही माजविण्याला स्वातंत्र्य मिळालें तर प्रत्येक संस्थानिकाला हवेंच होतें. पण इंग्रजांचा पराजय ही गोष्ट त्यांना शक्य कोटींतील वाटत नव्हती. म्हणूनच बंडखोरांना सामील होऊन ताटाबरोबर कांठही घालविण्यापेक्षां बंडखोरांना मदत न करतां उलट जरूर तर इंग्रजांचा पाठपुरावा करून बंडखोरांचा तेजोभंग करणें, हेंच अशा कांहीं संस्थानिकांना दूरदर्शीपणाचें वाटलें. ते अर्थातच बंडखोर वृत्तीपासून चार पावलें दूर होते. पंजाबांतील शीख सरदार बंडखोरीपासून अलिप्त राहिले याचें कारण त्यांचेंही धोरण कातडी बचावण्याचें होतें हें तर खरेंच; पण त्याबरोबरच त्यांना मोंगलांच्या अत्याचारी वृत्तीची इतकी शिसारी आली होती व त्या अत्याचारामुळें त्यांचें जीवन इतकें दुष्टमय झालें होतें कीं त्याच मोंगलांची सत्ता हिंदुस्थानांत पुन्हा स्थापन होऊं नये यासाठीं काय पाहिजे ती किंमत द्यावयाला शीख सरंजामदार वर्ग तयार होता. बरें; स्वतंत्रपणें आपलीं दुःखें वेशीवर टांगूं असें म्हणण्याइतकी तेव्हां शीख शेतकऱ्याच्या दुःखांना वाचा फुटली नव्हती, अथवा त्याचा आर्तस्वर सरंजामदारी, सावकारी, पुरोहितगिरी ह्या तटबंदीला वेढून अथवा ओलांडून बाहेर उमटण्याइतका एकजुटीच्या जाणिवेनें प्रभावी झालेला नव्हता. शीख सरंजामदार वर्ग त्या बंडांत ईर्षेनें सामील झाला नाहीं, यावरूनही बंडाचें पुढारीपण तेव्हां मुख्यतः मुसलमान सरंजामदार वर्गाकडे होतें ही गोष्ट सिद्ध होते.

नानासाहेब पेशवा अथवा झांशीची राणी लक्ष्मी ह्या दोन व्यक्ति महाराष्ट्रीय असल्या तरी सरंजामदार वर्गांतीलच होत. त्यांचीं व इतर नाडल्या गेलेल्या सरंजामदार वर्गांचीं दुःखें एकच. त्यामुळें मराठे व मोंगल यांची स्पर्धा सुप्रसिद्ध असतांही, हिंदी सरंजामदार वर्गाला ठार करावयाला उठलेल्या इंग्रजांना हिंदुस्थानांतून हाकलून लावतां आलें तर उत्तम या भूमिकेवरून मुसलमान बंडखोर नेत्यांशीं त्यांचें सहमत होण्याला, मार्टिन ल्यूथरनें आपल्या प्रतिस्पर्ध्यांशीं सहमत केल्याचें उदाहरण मागें सांगण्यांत आलें आहे त्याप्रमाणें, मुळींच अडचण पडली नाहीं.

ज्वालाग्राही पदार्थांच्या कोठारावर आगीची ठिणगी पडली कीं त्या कोठाराचा भडका उडावयाचाच. सन १८५७ सालापावेतों हिंदुस्थानांतील शेतकरी कामकरी शिपायी या लोकांची म्हणजे पददलित बहुजनसमाजाची मनोवृत्ति पिळणुकीच्या व त्यामुळें दारिद्र्याच्या परमावधीमुळें ज्वालाग्राही पदार्थांच्या कोठारासारखी क्षुब्ध झाली होती. तिच्यावर ठिणगी पडण्याचाच अवकाश होता. ती ठिणगीच कां; चांगला पेटता निखारा त्या कोठारावर एके दिवशीं पडला. कलकत्याजवळ डमडम एथें दारूगोळा तयार करण्याचा कारखाना इंग्रजांनीं उघडला होता. त्या कारखान्यांत नव्या प्रकारचीं काडतुसें तयार करण्यांत येऊं लागलीं. लष्करी शिपायांनीं वापरावयाच्या बंदुकांना हीं नवीं काडतुसें वापरण्यांत यावयाचीं होतीं. हीं काडतुसें दांतांनीं तोडून मग वापरावयाचीं, अशी त्यांची घडण होती. तीं कशीं वापरावीं याची कवाईत घेण्यासाठीं नेहमीं कांहीं लष्करी पलटणी तेथें जावयाच्या, त्या शिकून आल्या कीं त्यांच्याऐवजीं दुसऱ्या जावयाच्या. त्या कारखान्यांत पुष्कळ मजूरही काम करीत असत. त्यांपैकीं एक मजूर एके दिवशीं तहानेनें व्याकुळ होऊन एका ब्राह्मण लष्करी शिपायापाशीं पाणी पिण्याचा लोटा मागूं लागला. तो शिपाई ब्राह्मण असल्यानें त्यानें आपलें ब्राह्मण्य बाटेल या भयानें त्या मजुराला चांगलें खडसावलें. पण लष्करांत सर्व जातीच्या व सर्व धर्मांच्या लोकांची भरताड, त्यामुळें नाहीं म्हटलें तरी वारंवार त्यांचा वापर एकत्र यावयाचाच, हें त्या मजुराला कळत होतें. तो स्वतःही कोणत्या तरी एका धर्माचा असेल. पण तो व त्याच्यासारखे आणखी कितीतरी निरनिराळ्या जातींचे व कदाचित् निरनिराळ्या धर्मांचेही मजूर पोटासाठीं दारूगोळ्याच्या कारखान्यांत राबत

असतील. त्यांनीं तेथें जातिभेद व धर्मभेद पाळून एकलकोंडेपणानें राहावयाचा हट्ट धरला असता, सोंवळें ओवळें पाळलें असतें, तर त्यांना पोटाला कोठून मिळालें असतें! यंत्रयुगाच्या अमदानींत फोल धर्मभावनांचा फोलकटपणा मानवाच्या सामाजिक गरजांतून उत्पन्न होणाऱ्या भौतिक शोधांतील प्रगतीच्या ओघानें व क्रमानें सिद्ध होत जातो, ह्या ऐतिहासिक सत्याचा उमज त्याला पडला नसेल, ही स्वतःच्या धार्मिक अगतिकत्वाची शास्त्रीय व प्रमाणसिद्ध परिभाषा त्याच्या ध्यानीं आली नसेल; पण कालाच्या प्रवाहाची ही प्रचंड लाट पिऊन जिरविण्याचें सामर्थ्य कोणाच्याही अंगीं नाहीं, एवढें स्वतःपुरतें व स्वतःसभोंवारच्या पोटार्थी जगापुरतें तरी त्याला चांगलें स्वानुभवानें चांगलें कळत होतें. त्या मजुराला त्या ब्राह्मण शिपायानें पाणी पिण्याचा लोटा दिला नाहीं, त्यावेळीं विषाद वाटला. ज्या आंधळ्या धर्मभावनेला चिकटून राहून तो ब्राह्मण शिपाई आपला सोंवळा लोटा ओंवळा होण्याच्या भयानें त्या मजुराला देण्याला नाखूष होता, त्या धर्मभावना लष्करी शिपायांच्या बाबतींत तरी काडतुसांना लावण्यांत येणाऱ्या जनावरांच्या चरबीच्या अपवित्रतात्मक विषानें केव्हांच ठार मारून टाकल्या होत्या, हें त्या मजुराला माहीत होतें. त्या ब्राह्मण शिपायाचें दांभिक सोंवळें पाहून त्याला मजुरानें नव्या काडतुसांना कारखान्यांत चोपडण्यांत येणाऱ्या चरबीची गोष्ट सांगितली. त्याबरोबर त्या ब्राह्मणाच्या अंगावर शहारे आले, 'धर्म बुडाला रे बुडाला!'

डमडम् एथील कारखान्यांत नव्या काडतुसांना चोपडण्यांत येणारी चरबी गाई–डुकरांचीच असे, कीं आणखी कोणा प्राण्यांची असे, कीं नुसत्या गाईची असे, कीं नुसत्या डुकरांची असे, याविषयीं त्या मजुरालाही कांहीं माहीत नसेल; व चरबी म्हणजे चरबी, यापेक्षां तिची या बाबतींत जास्त चिकित्सा करणें हें कोणा विचारवंताचें काम नव्हेही. गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग यानें चवकशी करतां त्याला मीरत एथील लष्कराच्या ॲड्जुटंटकडून पुरविण्यांत आलेल्या माहितीवरून तर नव्या काडतुसांना फक्त बकऱ्याची चरबी व मेण लावण्यांत येत असे. पण लष्करी अधिकाऱ्यांच्या शद्बावर तेव्हां कोण विश्वास ठेवतो! पण त्या ब्राह्मण शिपायाच्या तोंडून ही बातमी लष्करांत चटकणीं झाली असेल, व तिचा हिंदी शिपायांना चेतविण्याच्या कामीं उपयोग करून घेणें असंतुष्ट वर्गांना फार सोईचें वाटलें असेल. गाई

हा प्राणी हिंदूंना अत्यंत पूज्य, व डुकर मुसलमानांना अत्यंत निषिद्ध. त्यामुळें हिंदु-मुसलमानांना एकदम चिथावण्याच्या कामीं त्या चरबीचें 'गाई-डुकराची चरबी' असें नामकरण करण्याची कल्पना हिंदु-मुसलमानांतील असंतुष्ट वर्गांना सुचली असेल. ख्रिस्ती मिशनरींनीं हिंदुस्थानांतील लोकांना बाटविण्यासाठीं अनन्वित अत्याचार केलेले सर्वांना माहीत होते. तोच डाव हीं नवीं काडतुसें शोधून काढण्याच्या मुळाशीं असला पाहिजे असें सर्व भोळ्या लोकांना वाटलें, व असंतुष्ट वर्गानें धार्मिक गैरसमजाचें हें आणखी एक अमोघ अस्त्र घेऊन त्या जोरावर इंग्रजांविरुद्ध झगडून आपलें गेलेलें वैभव पुन्हा मिळविण्याचें ठरविलें. ह्या नव्या काडतुसांबाबत पराचा कावळा होऊन तो हां हां म्हणतां साऱ्या लष्करभर भराऱ्या मारूं लागला. मारुतीच्या शेपटासारखी त्या कावळ्याच्या पंखाची झांप वाढत गेली. लष्करांतील शिपाई आपल्या धर्मावर घाला पडला म्हणून दिवसेंदिवस अधिकाधिक बेदिल होऊन वरिष्ठांच्या आज्ञा अमान्य करीपावेतों त्यांच्या बेदिलीची मजल जाऊन पोहोंचली. शिपायांनीं शिस्त मोडावी, त्याबद्दल त्यांना शिक्षा व्हावी, त्यामुळें आणखी शिपायी चिडावे, त्यांनीं तेंच करावें, त्यांनाही शिक्षा व्हावी, असें होतां होतां-आग धुमसतां धुमसतां केव्हां भडका उडेल याचा नेम नव्हता. पण इंग्रज अधिकारी आपल्याच घमेंडींत होते कीं आमच्याविरुद्ध बंड करण्याची कोणाचीं काय बिशाद आहे! त्याच धोरणानें इंग्रजांनीं दडपशाही चालविली होती. पण ती परिणामीं अगदीं निर्फळ ठरून महासागराच्या मध्यभागीं प्रचंड वादळांत सांपडलेल्या नौकेसारखी हिंदुस्थानांतील आपल्या सत्तेची गत होणार आहे याची इंग्रज अधिकाऱ्यांना कल्पनाही नव्हती!

## १५ : बंडाचा वणवा पेटला !

हिंदुस्थानच्या आकाशांत गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग याला विलायतेतून हिंदुस्थानांत येते वेळीं जो लहानशा पण अशुभ मेघाचा भास झाला, तोच शेवटीं खरा झाला. हिंदी जनतेच्या असंतोषाचा तो दुरून लहानसा दिसणारा मेघ बळीकडून त्रिपादभूमीचें दान मिळवून त्रिभुवनव्यापी रूप धारण करणाऱ्या बटु वामनासारखा हां हां म्हणतां विस्तारला; व त्या अरिष्टाकडे पाहून हिंदुस्थानांतील सर्वच इंग्रजांना वाटूं लागलें कीं आपला विनाशकाल समीप आला. इतके दिवस नुसती धुमसणारी हिंदुस्थानांतील आग ता. १० मे १८५७ या एके दिवशीं मीरतच्या लष्करी छावणींत बंगाल सेनेमधील शिपायांच्या त्वेषातिरेकानें एकदम पेटली व तिच्यांतून बंडाच्या ज्वाला भडकूं लागल्या.

इंग्रजांच्या सैन्यांतील हिंदी शिपायांनीं ता. ३१ मे १८५७ रोजीं एकदम सगळीकडे बंडाचा भडका उडवून द्यावयाचा, असा पूर्वींचा सर्वांचा बेत होता. त्या दरम्यान ह्या शिपायांना बंडाची चिथावणी व धीर देणाऱ्या सरंजामदारांना बंडाची सर्व तयारी करावयाची असेल. पण हा बंडाच्या पुढाऱ्यांचा पहिलाच पवित्रा चुकला, व पूर्व संकल्पापेक्षां वीस दिवस अगोदर बंड पेटलें. दक्षिणेला विंध्याद्रि–नर्मदेपावेतों उत्तर हिंदुस्थानांत बंडाच्या ज्वाला हां हां म्हणतां पसरल्या. त्यांतल्या त्यांत मीरत-कानपूर-लखनौ-दिल्ली-झांशी-बुंदेलखंड या प्रांतांत तर बंडाला विशेष जोर होता. कारण कंपनी-सरकारच्या अत्याचारांचा त्या टापूंत अगदीं कहर झाला होता.

ह्या बंडाला प्रारंभ जरी मीरत एथें लष्करी शिपायांकडून झाला, व तें लोण साऱ्या हिंदुस्थानांत शिपायांच्या हस्तेंच मुख्यतः पोहोंचविलें गेलें, तरी पण त्याला शिपायांचें बंड बहुतेक इतिहासकार म्हणतात तितकें तें खरें नाहीं. अथवा त्या बंडाला हिंदुस्थानचें स्वातंत्र्ययुद्ध म्हणून संबोधणेंही शोभत नाहीं. बंडांत हिंदी लष्करी शिपायांबरोबरच सारा शेतकरी वर्ग, बेकार कामकरी वर्ग,

गरीब मध्यम वर्गही वगैरे सर्व जनता समाविष्ट होती; कारण इंग्रजी अंमलांत हिंदुस्थानांतील अमूक एका वर्गाचें तरी हित झालें होतें असें मुळींच नाहीं; व तें होणें शक्यही नव्हतें. हें बंड सर्व हिंदी जनतेनें एकराष्ट्रीयतेच्या भावनेनें केलें असेंही म्हणतां येणार नाहीं. इंग्रजी भांडवलशाहीनें हिंदुस्थान जिंकून त्याचें एकजिनसी राष्ट्र बनविण्याचा उपक्रम अनिच्छया चालविला होता एवढें मात्र खरें. अनिच्छया म्हणण्याचें कारण हिंदी लोकांत एकराष्ट्रीयतेची भावना उत्पन्न व्हावी म्हणून त्यांनीं भराभर एकामागून एक देशी संस्थानें बुडविण्याचा सपाटा चालविला असें नसून त्यांना हिंदुस्थानची आर्थिक लूट शक्य तितक्या कमी श्रमांत व शक्य तितक्या मोठ्या प्रमाणांत करतां यावी यासाठीं त्यांची सारी खटपट चालली होती. सरंजामदार वर्गाच्या अमदानींत हिंदुस्थानांतील खेडोपाडीं दिसणारा अलगपणा अथवा तुटकपणा, जागोजागीं निरनिराळ्या संस्थानांचे सवते सुभे, या सर्वांतील फुटकळपणा व विस्कळितपणा नाहींसा होऊन हिंदुस्थान देश इंग्रजी अंमलांतील एक राजकीय व आर्थिक दृष्टया एकजिनसी व्हावा, हाच इंग्रजी भांडवलशाहीच्या हिंदुस्थानांतील सत्तेचा परिणाम दिसून येऊं लागला होता. ऐतिहासिक दृष्टया सरंजामदारी सत्तेची हिंदुस्थानांतून हकालपट्टी ही गोष्ट, म्हणजे सरंजामदार वर्गावर भांडवलदार वर्गाची सरशी अपरिहार्य होती. पण सरंजामदार वर्ग उघड्या डोळ्यांनीं आपलें मरण पाहावयाला तयार नव्हता. जुनें मोडकळलेलें घर हें जसें उंदीर–घुशींचें फार मोठें आश्रयस्थान, तसाच जुना गांवगाडा, मागासलेपणा, दळणवळणाच्या साधनांचा व त्यामुळें देशांत उत्पन्न होणाऱ्या एकोप्याचा अभाव, सवते सुभे, तेथून प्रत्येक सरंजामदाराला मन मानेल तसा प्रजेवर जुलूम करण्याची हक्काची संधी, तो जुना चरखा, तो जुना हातमाग, ते खुट्टखुट्ट चालणारे व 'हस्त व्यवसाय' या नांवाला पात्र झालेले यंत्रशक्तिविहीन उद्योगधंदे, असल्या दगडाच्या पायावर सरंजामदार वर्गाच्या सत्तेच्या हवेल्या उभ्या होत्या. हा पाया इंग्रजी भांडवलशाहीमुळें हिंदुस्थानांत घडून आलेल्या सामाजिक क्रांतीच्या आघातांनीं कोसळून पडूं लागला, म्हणून त्याविरुद्ध सरंजामदार वर्गानें पुढाकार घेऊन लोकांना चिथावणी देऊन हें बंड उभारलें होतें. घोड्याच्या शेपटीकडे तोंड करून घोड्यावर बसून डोळ्यांसमोर पल्ला तोंडीत पुढें जाणाऱ्या अजाण वीरासारखा हा सरंजामदार वर्गाचा प्रयत्न

होता. तो कसा तें प्रमाणांनीं पडताळून पाहण्यासाठीं बंडांतील घडामोडींचें धावतें विहंगमावलोकन प्रथम केलें पाहिजे.

मीरत एथें बंडाला प्रारंभ झाला, तेव्हांपासून तों बंडाचा उपशम होईं-पावेतोंच्या सर्व घडामोडी ध्यानीं घेतल्या तर, ठळकपणें नजरेला एक गोष्ट येतें ती ही कीं, बंडवाल्यांचे सर्व मार्ग दिल्लीला येऊन मिळत होते. बंड करून करावयाचें काय? तर बहादुरशहाची पुन्हा दिल्ली एथें हिंदुस्थानचा बादशहा म्हणून स्थापन करावयाची; पूर्वींची मोंगल बादशाही सत्ता हिंदुस्थानांत पुन्हा सुरू करावयाची! ज्याच्या नांवानें बादशहा म्हणून द्वाही फिरवावयाचें ठरलें होतें, तो पदभ्रष्ट बादशहा बहादुरशहा बिचारा आपल्या महालांत बसून माशाही मारूं शकणार नाहीं इतका दुबळा होऊन पडला होता. त्याची तरुण, हुषार व कारस्थानी बेगम झीनतमहाल आणि शहाजादे, सरदार, सुभेदार, नबाब, वजीर यांपैकीं प्रत्येकाला नांवापुरती तरी बादशहाची गरज होती; 'आपल्या बादशहाचें राज्य इंग्रजांनीं बुडाविलें व आमचा धर्मही बुडविला, यासाठीं आम्ही हें धर्मयुद्ध करूं या' अशी जनसमाजाची दिशाभूल करून प्रत्येकाला स्वार्थ साधावयाचा होता. आणि बादशहालाही पुन्हा हिंदुस्थानचा मालक म्हणून मिरवतां आलें तरी नको होतें असें नाहीं. अयोध्येच्या बेगमांच्या हृदयांत राज्यनाशाचें शल्य सलत होतें; म्हणून त्यांच्या वतीनें मौलवी लियाकत हुसेन हा बंडखोरीचें रान उठविण्याच्या उद्योगांत दंग होता. बिहारचा जमीनदार कुंवरसिंह याला इंग्रजी कारवाईमुळें जमीनदारीला सर्वस्वी मुकावें लागलें असल्यानें तो चिडून बंडखोर बनला होता. नानासाहेब पेशवा तर काय! एका काळीं मोंगल बादशहाचाही बादशहा शोभण्याइतक्या सर्वसमर्थतेच्या अत्युच्च शिखरावर जाऊन पोहोंचलेल्या पेशव्यांचा वंशज तो! त्याला मनांतून इंग्रजांचें राज्य बुडावें आणि तेथें मोंगल बादशाही स्थापन व्हावी असें वाटणें शक्यच नव्हतें. त्याला जर पेशवाई बुडाल्याबद्दल, अर्थात् आपल्या वांट्याला पारतंत्र्य आल्याबद्दल चीड आली होती म्हणावें, तर तसा मागमूसही त्याच्या पूर्वचरित्रांत रावबाजीच्या मरणापावेतों अथवा रावबाजी वारल्यावरही दिसत नाहीं. आणि इंग्रजांकडून वडिलार्जित वर्षासन चालू राहण्याची आशा नाहीं असें कळेपावेतों इंग्रजांशीं जिवलग दोस्ती संपादन करून त्यांच्याशीं नाच रंग तमासे करून ऐषआराम भोगण्यांत त्याला मग

कशी गोडी वाटली असती ? वैय्यक्तिक राज्यलोभ ही स्वार्थपरायणतेची शिकस्त होय हें खरें; पण असला आत्यंतिक स्वार्थ साधूं पाहणाऱ्या महत्त्वाकांक्षी माणसाची त्या स्वार्थासाठीं आपल्या सुखसर्वस्वाचा आत्यंतिक त्याग करण्याची राणा प्रतापरावासारखी तयारी पाहिली म्हणजे सर्पाच्या सोनेरी कांतींतील सौंदर्य पाहून दृष्टीला जो आल्हाद होतो तशा प्रकारचा आल्हाद मनाला होणें शक्य असतें. पण नानासाहेबाच्या बाबतींत तशा प्रकारचा आल्हाद मानावयालाही जागा नाहीं. आणि इंग्रजांनीं जर आठ लाखांचें रावबाजीला मिळणारें वर्षासन तसेंच नानासाहेबाकडे बिनबोभाट चालविलें असतें, तर याच नानासाहेबानें ग्वालेरच्या जयाजीराव शिंद्यापेक्षांही मिष्ट इंग्रजनिष्ठा ऐन बंडाच्या धामधुमींत प्रगट करावयाला कमी केलें असतें असें म्हणावयाला कांहीं आधार नाहीं. विशेषतः बंडांतील त्याची कानपुरी कामगिरी पाहिली तरी ती एकंदरींत माणुसकीला कलंक लावणारी, अंगचोरपणाची व भ्याडपणाचीच आहे. सर्पाच्या सोनेरी कांतीकडे पाहून सौंदर्यदर्शनानें जें समाधान मानावयाला जागा असते, तशी जागाही नानासाहेबाच्या चरित्रांत कोठें नाहीं. उलट एखाद्या गलितांग महारोग्याच्या ओंगळ रूपाकडे पाहून जशी किळस येते, तशी किळस वाटण्याजोगेंच त्याचें वर्तन बंडाच्या धामधुमींत कानपूर येथें घडलें. कानपूर एथें बंडवाल्यांचा पुढारी नानासाहेब होता. त्यानें बंडखोरांच्या साह्यानें कानपूर एथील इंग्रजांचा भयंकर कोंडमारा केला. इंग्रज आपणाला अलाहाबादेला बायकामुलांसह सुरक्षित जाऊं देण्याच्या अटीवर नानासाहेबाला शरण आले. नानासाहेबानें त्यांना उदार मनानें जीवदान दिलें. इंग्रज शिपाई व त्यांचीं बायकामुलें ही सर्व मंडळी नावांत बसून गंगेंतून निघालीं. त्या नावा गंगेंत मध्यावर गेल्यावर त्या असहाय जीवांवर किनाऱ्यावरून गोळ्या झाडून त्यांना विश्वासघातानें ठार करणें, हें कृत्य केवळ रानटीपणाचें व माणुसकीला कलंक लावणारें नव्हे असें कोण म्हणेल ? नानासाहेबाच्या बंडखोरींतील आणखी एक महत्त्वाची खोंच ध्यानीं घेण्यासारखी आहे ती अशी कीं, नानासाहेब हा कोणत्याही प्रकारें बंडाचा अभिजात पुढारी नव्हता; त्यानें तें पुढारीपण बंड सुरू झाल्यावर आयतें बळावलें होतें. बंडाच्या हुल्लडींत तर नानासाहेबानें कानपूर एथें बंडखोरांना हाताशीं धरून कांहीं काळ चांगलाच हलकल्लोळ उडवून दिला हें खरें. पण नानासाहेब पुढारी

व्हावयाला कानपुरांत पुढें चालून आला नसता तर बंडवाले अडून बसले असें मुळींच न होतां कदाचित् असेंही झालें असतें; कानपूर एथें विश्वासघातानें निरपराधी इंग्रज बायकामुलांचीही कत्तल जी नानासाहेबाकडून करविली गेली, तितका अमानुष प्रसंग एरव्हीं बंडवाल्यांच्या हातून घडलाही नसता. बंडाच्या सर्व इतिहासांत हिंदी बंडखोरांच्या वर्तनाला मोठा थोरला एकच एक कलंक लागलेला दिसतो, तो कानपूरच्या कत्तलीचा होय. इंग्रज भांडवलशाहीनें बंडाचा उपशम करतांना असलेच काय पण याहूनही अमानुष अत्याचार कितीतरी केले आहेत. त्यांची कोणाला गणती देखील करतां यावयाची नाहीं. पण हिंदी बंडखोरांना खरोखर कलंकभूत अशी कानपूरची कत्तल ही एकच गोष्ट होय; व तिला कारण नानासाहेब पेशवा व त्याचा विश्वासू मित्र अजिमुल्लाखान! असल्या मनुष्यप्राण्याला स्वातंत्र्यवीर म्हणणें म्हणजे स्वातंत्र्य या परमश्रेष्ठ शब्दाची पराकाष्टेची विटंबना करणें होय.

इतका अमानुष प्रकार करणारा नानासाहेब इतर बंडवाल्यांप्रमाणें विजयचिन्ह मिरवीत दिल्लीच्या रोंखानें जावयाला नाकबूल झाला, व त्यानें आपल्या परिवारासमवेत ब्रह्मावर्ताला येऊन आपणाला राज्याभिषेक करून घेतला, यावरून त्याला बंडांतून दिल्लीची मोंगल बादशाही पुन्हा जन्माला येणें अथवा जोराला चढणें मुळींच मान्य नव्हतें हें उघड आहे. कानपूर एथें बंडवाल्यांचा विजय झाल्यावर बंडखोर दिल्लीला जावयाला निघाले व ते नानासाहेबालाही आपल्या बरोबर चलण्याचा आग्रह करीत होते. पण नानासाहेबानें तें ऐकलें नाहीं, व मोठया युक्तीनें त्यानें बंडवाल्यांची कशीतरी समजूत करून आपल्या बगलबच्चांसह ब्रह्मावर्ताचा रस्ता धरला. कारण तेथें त्याला बंडांत जिंकलेल्या म्हणण्यापेक्षां जिंकल्या जाणाऱ्या साम्राज्याचा धनी म्हणून स्वतःला राज्याभिषेक अथवा साम्राज्याभिषेक करून घ्यावयाचा होता! पण नानासाहेब आपल्या वाटेनें ब्रह्मावर्ताला सम्राट होण्यासाठीं गेला, आणि बंडवाले दिल्लीकडे बहादूरशहाला बादशहा करण्यासाठीं गेले. यावरून हें उघड दिसतें कीं नानासाहेबाला जशी दिल्लीच्या बादशहाची सत्ता नको होती, तशीच बंडखोरांना नानासाहेब सम्राट होतो कीं नाहीं याची पर्वा नव्हती. तथापि एवढें खरें कीं कानपूरच्या बंडाळींत प्रमुख असलेल्या सैन्यावर नानासाहेबाचा ताबा जरी नव्हता तरी आधीं अथवा मग कां होईना पण नानासाहेब व त्याचा

आश्रित तात्या टोपी वगैरे कर्तबगार सहकाऱ्यांच्या साह्यानें कांहीं सैन्य—विप्लवोत्सुक लोक त्याला कानपूरच्या विजयानंतर मिळाले असतील. पण तेवढ्या विजयानें नानासाहेब हुरळून गेला, व बंडवाल्यांचें आणि देशाचें पुढें काय होतें याचा लवमात्र विचार न करतां राजा म्हणून मिरवत जिवाची रावबाजी करीत राहिला. हें नानासाहेबांचें राज्य औट महिनेही टिकलें नाहीं, व त्यांना गंगेपार पळ काढावा लागला. तो जो कानपुराहून ब्रह्मावर्त गांठून तेथून एका नावेंत बसून पळाला, तो पळतां पळतां दमल्याचें आजवर कोणाला माहीत नाहीं! त्याचें पुढें काय झालें याची बंडवाल्यांनींही चौकशी केली नसेल. जो आपल्या अनुयायांना सोडून पळून गेला, तो जिवंत असूनही मेल्यासारखा, असें बंडवाल्यांनीं मानलें असेल!

नानासाहेब हा बंडाचा एक प्रमुख प्रवर्तक होता म्हणून त्याच्यासाठीं इतकी जागा खर्ची घालावी लागली. यावरूनच लखनौ, अयोध्या, दिल्ली वगैरे भागांतील बंडवाल्यांच्या पुढाऱ्यांची काय अवस्था असेल याची कल्पना करतां येण्याजोगी आहे. पुरोहित वर्गाचा बहुजनसमाजाला सरंजामदार वर्गाच्या वतीनें बंडाला प्रवृत्त करण्यांत पुष्कळ हात होता व धर्मयुद्धाची शिकवण मुसलमानांना देण्यासाठीं दिल्लीला खास बादशाही मौलवीच्या नेतृत्वाखालीं धर्मोपदेशाचा कारखाना निघाला होता म्हणून मागें जें सांगितलें, तोच पवित्रा लखनौ येथेंही मांडण्यांत आला. अहमदुल्लाशाह या नांवाचा एक मौलवी मुसलमानांना बंडाला प्रवृत्त करणारीं जळजळीत व्याख्यानें देऊन तेथील लोकांत बंडखोरीचा फैलाव करूं लागला. दिल्लीला तर सरंजामदार वर्गाच्या पाठीराख्या पुरोहित वर्गानें याहूनही कमाल केली! ठायीं ठायीं मिळणाऱ्या क्षणिक विजयांमुळें बंडखोरांना व त्यांच्या पुढाऱ्यांना वाटूं लागलें होतें कीं आतां हिंदुस्थानांतून इंग्रजांचें राज्य बुडालें, मोंगलाई जमाना पूर्ववत् सुरू झाला. वृद्ध बहादूरशहाला तरी आयती बादशाही मिळाली तर ती कां नकोशी वाटेल? ही बादशाही टिकावू आहे कीं अळवावरच्या पाण्यासारखी क्षणभंगुर आहे, इतकें तारतम्य त्याला कोठून असेल? वठलेल्या वृक्षाला पालवी कोठून फुटेल? तेथें कोणा झीनतमहाल बेगमेनें इतर व शहाजाद्यांना व भाडोत्री लोकांना हाताशीं धरून कारस्थानें केलीं, तेथें कोणा मौलवीनें धर्मयुद्धाची घोषणा करून मुसलमानांचीं आधींच दारिद्य व उपासमार यांनीं भडकलेलीं माथीं आणखी

भडकवली, तेथें कोणी बंडवाले मीरत–कानपूर–लखनौ वगैरे ठिकाणीं विजय मिळवून दिल्लीला धावत आले व बहादूरशहाला बादशहा हो असें सांगूं लागले; एवढ्या मोठ्या लोंढ्याला अडविण्याचें त्राण जर आपल्या अंगीं नाहीं, तर ह्या लोंढ्यांत सचैल स्नान करून आपण मोकळे होऊं कसे! असा पोक्त विचार बहादूरशहानें केला व सर्वांना सांगितलें, "काय म्हणतां, मी बादशहा होऊं? ठीक आहे. चला मी बादशहा झालों."

इतर ठिकाणच्या प्रमाणेंच दिल्लीलाही बंडवाल्यांना क्षणिक विजय मिळाला. पण तो विजय, दिल्लीचें नांव जसें फार मोठें, तशाच मोठ्या प्रमाणांत प्रारंभापासूनच कलंकित होता. बंडखोरांत राष्ट्रीय भावनेचा पूर्ण अभाव होता, तसेंच नानासाहेब पेशवा दिल्लीला बंडखोरांबरोबर यावयाला नाखूष होता व त्याच्या मुळाशीं स्वार्थसाधु दुरभिमान होता असें जें मागें सांगितलें, त्याचेंच प्रत्यंतर त्याहूनही हिडीस स्वरूपांत दिल्लीला दिसून आलें. बंडाच्या ऐन धामधुमींत दिल्लींत बंड यशस्वी होण्याला काय करावें याविषयीं शहाणपणाच्या वाटाघाटी होण्याऐवजीं गोवधासारख्या प्रश्नावरच हिंदु-मुसलमानांत रणधुमाळी माजली होती. कांहीं हिंदूंचें मत कीं गोवध अजिबात बंद झाला पाहिजे, तर कांहीं मुसलमानांचें मत कीं गोमांस अत्यंत रुचकर असल्यानें गोवधबंदी होऊं नये. ही बाब वर दिसावयाला धार्मिक स्वरूपाची व सोज्वळ दिसते खरी; पण तशी ती नाहीं. नानासाहेब पेशव्यानें बंडखोरांबरोबर दिल्लीला न जाण्यांत व बंडवाल्यांनीं त्याला दिल्लीला येण्याचा आग्रह करण्यांत जी मखी होती, तीच मखी दिल्लींतील तेव्हांच्या गोवधचर्चेंतही होती. मुसलमान बंडखोर पुढाऱ्यांना बहादूरशहाच्या नांवानें मोंगल पादशाहीची पुनः प्रतिष्ठा करावयाची होती, तर नानासाहेब पेशव्यासारख्या हिंदु सरंजामदारांना हा बादशहाचा सासुरवास मनापासून मुळींच पसंत नव्हता. दिल्लीच्या बादशाही सत्तेच्या कैवाऱ्यांनाही पेशव्यांविरुद्ध तशीच कुरकूर करावयाला संधी होती. तीच मुसलमान सरंजामदार व हिंदु सरंजामदार यांच्यांतील परस्पर अविश्वास व फाटाफुटीची वृत्ति गोवधाविषयक तेढींत प्रतिबिंबित झाली होती. शिवाय बाह्यतः दोघेही इंग्रजी सत्तेचे प्रतिस्पर्धी असतांना व त्याच वीरश्रीनें बंडवाले दिल्लींत धुमाकूळ घालीत असतांना खुद्द बादशहा बहादूरशहा गुप्तपणें इंग्रजांशीं तहाचीं गुळमुळीत बोलणीं करीत होता, व त्याच्या परिवारांतील

खासे लोक गोऱ्या शिपायांना आपल्या अंतःपुरांत लपण्याला जागा देत होते! याहूनही नवलाची गोष्ट सांगावयाची ती ही कीं ज्या झीनतमहाल बेगमेनें हरयुक्तींनीं लोकांना इंग्रजांविरुद्ध बंड करण्याची चिथावणी देण्याचा सपाटा मूळपासून चालविला होता, तीच स्वतः आपल्या महालांत गोऱ्या लोकांना आश्रय देऊन त्यांचें बादशाही आदरातिथ्य करण्यांत दंग होती!

बंडाचें पुढारीपण याप्रमाणें स्वार्थसाधु सरंजामदार वर्गाकडे होतें. अगदीं थेट दिल्लीच्या बादशहापासून तों नानासाहेबाचा इंग्रजनिष्ठ कारभारी रामचंद्र नारायण एथपावेतों बंडाचा वणवा चेतविण्याला मदत करणाऱ्या अथवा बंडांत इंग्रजांची बाजू खंबीरपणें घेणाऱ्या सर्वांचे हात हीन अशा वैय्यक्तिक स्वार्थानें बरबटलेले होते. स्वदेश, स्वधर्म ही नुसती वरवरची झिलई होती.

ह्या बंडाच्या वडावानलापासून झांशीची राणी लक्ष्मीही अलिप्त राहूं शकली नाहीं. कारण ती एका खालसा संस्थानाची इंग्रजांवर रुष्ट झालेली राणी होती. ती मानी होती, तेजस्वी होती, मानखंडिता होती, महत्त्वाकांक्षी होती, शूर होती, व सर्व प्रकारें संत्रस्त होती. बंडाच्या वाहत्या गंगेंत हात धुवून घ्यावे असें तिला वाटलें, तर त्यांत नवल नाहीं.

## १६ : बंडाचा वणवा विझला !

झांशीचें राज्य खालसा झालें, तेव्हां त्याचे भेसूर पडसाद आजूबाजूच्या अनेक राज्यांत उमटले. मेजर इव्हॅन्स बेल या इंग्रज इतिहासकारानें याबाबत स्पष्ट कबुली दिली आहे कीं 'झांशीचें लहानसें राज्यच खरें; पण तें इंग्रज सरकारशीं राजनिष्ठा पाळणाऱ्या संस्थानांत श्रेष्ठ होतें. तें राज्य दत्तकाच्या सबबीवर खालसा करण्यांत आल्यामुळें इतर सर्व हिंदी संस्थानिकांना व त्यांच्या दिवाणांना इंग्रजांविषयीं तिरस्कार वाटूं लागला, व इंग्रजांची गैरविश्वासूक वृत्ति याखेरीज त्याचा निराळा अर्थच त्यांना लावतां येईना.'

तात्पर्य, झांशीच्या संस्थानिकानें इंग्रजांविरुद्ध उभारण्यांत आलेल्या बंडांत सामील व्हावें व पुढारीपण घ्यावें, देशाच्या स्वातंत्र्यासाठीं बंडाच्या धडाडत्या रणकुंडांत उडी घालावी, अशी परंपराच झांशीच्या राज्याची नव्हती. झांशीच्या राज्याचीच ही परंपरा नव्हती म्हणून झांशीला कोणी दोष द्यावयाला नको ! झांशी हा ज्या हिंदी सरंजामदार वर्गाचा एक घटक, त्या वर्गाची इथून तिथून अशीच स्थिति होती; व ती पूर्वीं दर्शविल्याप्रमाणें इतिहासाशीं सुसंगत होती. आणि राणी लक्ष्मीदेखील शक्य तों अनुरंजनानें इंग्रजांना प्रसन्न करण्याच्या बाबतींत अपवाद नव्हती. इतकेंच काय पण झांशीचें राज्य जर इंग्रजांनीं खालसा केलें नसतें, राणी लक्ष्मीच्या मनाजोग्या जर सर्व गोष्टी घडून आल्या असत्या, तर बंडाच्या धामधुमींत राणी लक्ष्मी ही हिंदुस्थानांतील इंग्रजी भांडवलशाहीचा एक जबरदस्त आधारस्तंभ म्हणून अखेरपावेतों उभी राहिली असती; इंग्रजांच्या वतीनें त्या टापूंत शांतता रक्षण करण्याची तिनें शिकस्त केली असती. नानासाहेब पेशवा तिचा बाळपणचा सौंगडी खरा; पण त्याच्या चिथावणीवरून देखील तिनें बंडांत उडी घातली नसती. आपलें राज्य बरें, आपली दौलत बरी कीं आपण बरी, असाच पोक्त विचार करून तिनें राज्योपभोग घेतला असता. कारण लहानपणापासून तिच्या दृष्टीसमोर

होता तो आदर्श आयतें वैभव भोगण्याचा होता; इंग्रजांशीं राजनिष्ठ राह-ण्याचा होता.

झांशीचें राज्य सन १८५४ मध्यें खालसा झाल्यावर राणी लक्ष्मी आपलें नीरस जीवन हरि हरि म्हणत कंठीत होती. त्यानंतर उत्तरेकडे त्या सर्व प्रदेशांत बंडाचें वातावरण गुप्तपणें उत्पन्न होऊं लागलें, त्यांत राणीचा हात थोडा फार नानासाहेब पेशव्याच्या सान्निध्यानें असण्याचा संभव आहे. पण तो केवढ्यापुरता? तर आपलें गेलेलें राज्य परत मिळवण्यापुरता. पण तोही प्रयत्न राणीनें विशेष संघटितपणें केला होता असें नव्हे. मीरत एथें ता. १० मे १८५७ रोजीं बंड सुरू झालें, त्याचे पडसाद झांशींत उमटावयाला ता. १ जून उजाडावी लागली. ता. ७ जून रोजीं बंडवाल्यांनीं झांशीच्या किल्ल्यावर थेट हल्ला करून तेथें बंडाला उघड उघड तोंड पाडलें. तेथील इंग्रज लष्करी अधिकारी प्रारंभीं बेसावध होते, व मागाहून असहाय होते. त्यांचा तेथें कांहीं इलाज चालला नाहीं; व बंडवाले विजयी झाले. त्यांच्या हातून तेथें अत्याचारही घडले. प्रारंभीं ह्या स्थानिक बंडाव्याला राणी लक्ष्मीची केवळ मूक संमति असेल, असें बंडवाल्यांच्या वतीनें तहाच्या अटी इंग्रजांच्या कानावर घालण्यासाठीं राणीच्या वतीचा कोणी माणूस न जातां सालेमहंमद हा तेथला एक हकीम गेला यावरून वाटतें. पण राणीचा हात अजिबात बंडांत नव्हता असेंही म्हणतां येत नाहीं. एवढें मात्र खरें कीं प्रारंभीं राणीही नानासाहेब पेशव्यांप्रमाणेंच अतिशय धूर्तपणानें वागत होती. बंडाचा वणवा नगरभर भडकला असतांना ती इंग्रजांना रक्षणाचीं आश्वासनें देतच होती; व ऐन धामधुमींत तिनें तीन दिवसपावेतों आपद्ग्रस्त इंग्रज पुरुष–बायका–मुलांना संरक्षण देऊन अन्नपाणीही दिलें. नऊ दिवस सारखी बंडाची रणधुमाळी झांशींत माजली, व ता. ९ जून हा दिवस उजाडला तो झांशींत इंग्रजांची सत्ता अगदीं नामशेष झाली अशीच घोषणा करीत उजाडला. झांशी नगरी सर्वस्वीं बंडखोरांच्या हातीं आली. राणीनें बंडखोरांना खर्चासाठीं एक लाख रुपये आपल्या खासगींतून देऊन त्यांना वाटेला लावलें व झांशीचा राज्यकारभार आपल्या हातीं घेतला. याप्रमाणें राणीला राजवाड्यांतून बाहेर पाऊल न टाकतांही राज्य संपादन करतां आलें. कारण इंग्रज अधिकारी तेव्हां देशांतील इतर ठिकठिकाचें बंड मोडण्यात गढून गेले होते; त्यांना इकडे

लक्ष्य देण्याला फुरसत नव्हती. पण म्हणून कांहीं राणी लक्ष्मीला पाहिजे तितक्या स्वस्थपणानें राजवैभव भोगावयाला मिळालें नाहीं. तिच्या जवळच्या व दूरच्या भाऊबंदांनीं तें राजवैभव परस्पर उपटण्यासाठीं तिच्या सभोंवार गिल्ला करून पाहिला, व इंग्रजांच्या वतीनें आपण तात्पुरतें झांशीचें राज्य सांभाळीत आहों असें सांगणाऱ्या ह्या धूर्त राणीवर इंग्लंडच्या राणीच्या वतीनें स्वतःच बारीकसा हल्ला करून तें राज्य आयतें लुबाडूं पाहणारी ओर्छाची राणीही तिला प्रतिस्पर्धी भेटली. दतियाच्या राजानेंही परस्पर झांशी घशांत टाकतां आली तर पाहावी, म्हणून प्रयत्न करून पाहिला. पण राणीनें तेथें त्या कोणाचेंही कांहींही चालूं दिलें नाहीं. त्या सर्व संकटांशीं धैर्यानें व दूरदर्शीपणानें तोंड देऊन आपलें तिनें राज्य अबाधित राखलें. तेंही नुसतें राखलें नाहीं, तर राज्याची व्यवस्था शक्य तितकी चोख ठेवली. पण क्षयाच्या तिसऱ्या अवस्थेंत गेलेल्या आसन्नमरण रोग्याच्या खोलींत शुश्रूषेची जय्यत तयारी व स्वच्छता कितीही ठेवली तरी ती रोग्याला जगविण्याला पुरी पडत नाहीं; त्याप्रमाणेंच राणी लक्ष्मीचा राज्यकारभार कितीही चोख असला तरी तो यशस्वी झाला नाहीं. इतर ठिकाणच्या बंडाव्याचा उपशम केल्यानंतर इंग्रज सेनानींनीं झांशीकडे आपला मोर्चा वळविला. तारीख. २० मार्च रोजीं इंग्रज सेनापति सर ह्यू रोज हा आपल्या सैन्यासह युद्धाच्या तयारीनें झांशीला येऊन पोहोंचला.

इंग्रजी न्यायाप्रमाणें राणी अपराधी होती; बंडखोर होती. ती बंडखोर तर होतीच. पण ती नानासाहेब पेशव्यासारखी नुसती बंडखोर नव्हती. ती अत्यंत महत्त्वाकांक्षी होती; पण तिची महत्त्वाकांक्षा जेवढी थोर त्यापेक्षांही त्या महत्त्वाकांक्षेपायीं स्वार्थसर्वस्वाचा होम करण्याची तिची तयारी अधिक थोर होती. कदाचित् त्या प्रसंगीं ती इंग्रजांना शरण गेली असती तर मांडलिक या नात्यानें तिचें राज्य तिला मिळालें असतेंही; व आज लहानमोठीं सातशें संस्थानें जीं हिंदुस्थानांत आहेत, त्याच मालिकेंत झांशी संस्थानही कोठें तरी दिसलें असतें. तशीं उदाहरणें बंडाच्या धामधुमींत घडलीं; अनेक घडलीं. झांशीशेजारचेच ग्वालेरचे शिंदे जे आज एवढे तालेवार संस्थानिक वैभवसंपन्न दिसतात, ते राणीविरुद्ध इंग्रजांशीं राजनिष्ठ राहिले व राणीचा पाय जितक्या प्रकारांनीं मागें ओढतां येईल तितक्या प्रकारांनीं ओढावयाला कमी

केलें नाहीं म्हणून दिसतात. राणीनें तसा नामुष्कीचा कोणताही प्रकार केला नाहीं. ती झांशीला इंग्रज सेनापति सर ह्यू रोज याच्याशीं निकरानें झगडली; व तेथें निभाव लागेना तेव्हां मोठ्या चतुराईनें झांशीची आशा सोडून दत्तक मुलाला पाठीशीं बांधून ती शत्रूची फळी फोडून बाहेर निसटली. पण ती नानासाहेब पेशव्यांप्रमाणें तोंड लपवून पळून जाण्यासाठीं निसटली नाहीं; ती वीरश्रीनें सर्वांगरोमांचित झालेली साक्षात् संग्रामदेवताची नव्या पवित्र्यानें इंग्रज शत्रूशीं युद्ध करण्यासाठीं रणांगणांत आली. शिंदे तिच्या या निश्चयाआड आले, त्यांना तिनें फजीत करून पळ काढावयाला लावलें. आरंभशूर नानासाहेबाच्या मागाहून त्याचा पुतण्या रावसाहेब पेशवा हा बंडवाले विजयी होतील आणि आपणाला पेशवा म्हणून आयतें मिरवतां येईल, ह्या धोरणानें बंडवाल्यांनीं बंड करून काबीज केलेल्या काल्पी किल्ल्यांत सुरक्षितपणें तळ देऊन राहिला होता. त्याच्या सभोंवार बंडवाल्यांचें सैन्यही बरेंच जमलें होतें, व युद्धसामुग्रीही पुष्कळ होती. काल्पीचा विजय हा झांशीकडील बंडवाल्यांनींच संपादन केलेला होता. राणी जरी रावसाहेबाला योद्धा अथवा बंडाचा कर्ता पुढारी म्हणून ओळखीत नव्हती, तरी तिला दुसरा कोणताच आधार नसल्यानें काल्पीला जावें लागलें. आपण झांशीला इतक्या निकरानें ज्या पेशवाई सत्तेचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं पेशव्यांचें नांव घेऊन तळहातावर शीर घेऊन लढलों, त्या पेशव्यानें आपल्याला कांहींदेखील मदत केली नसतांना त्याच्याच आश्रयाला आपणाला जावें लागत आहे याबद्दल राणीला तेव्हां मनांतून अतिशय खेद वाटला; ओशाळेपणाही वाटला. पण करते काय ? तिला तेथें जावें लागलें. तेथें जातांच तिनें आपली मर्यादा न सोडतां शालजोडींतल्या अहेरानें रावसाहेबाची चांगली संभावना केली. रावसाहेबानें धिम्या वृत्तीनें ती संभावना गिळली. न गिळून काय करणार ? त्याला तेव्हां राणीच्या अलौकिक शौर्य–धैर्यासमोर मस्तक नमविणें भागच होतें. त्यानें राणीला धीर दिला व पुढें मदत करण्याचें अभिवचन दिलें; पण कळकळ, अक्कल व मर्दुमकी यांच्या व्यस्त प्रमाणांत मीपणा रावसाहेबाच्या अंगीं वसत असल्यानें अखेरपावेतों–अगदीं अखेरपावेतों तो आपल्याच घमेंडींत वागला. त्यानें राणीची सल्ला मनापासून कधींच ऐकली नाहीं. त्यामुळें राणीला कल्पनेपेक्षां अधिक यातना भोगाव्या लागल्या. इतिहासक्रमानें विचार करतां परिणामीं

सरंजामदार वर्गाच्या पुढारीपणाखालीं ही बंडाची सारी धडपड फोलच व्हावयाची होती हें खरें असलें, तरी राणीला काय अथवा तिच्या खांद्याला खांदा भिडवून बंडांत पुढाकारानें लढणारे कोणी असतील त्यांना काय, ग्वाल्हेरमध्यें धीर वाटण्याजोगी पुष्कळ आशादायक परिस्थिति होती. रावसाहेब पेशव्याच्या वतीनें तात्या टोपी हा शूर वीर बंडांत प्रथमापासूनच राणीप्रमाणेंच आपल्या जिवाचें रान करीत होता; त्याच्या चातुर्यानें व प्रयत्नानें ग्वाल्हेरजवळील मुरारच्या छावणींतील शिंद्यांच्या पलटणी, इतर सैन्य, तोफखाने व खास रिसाले या सर्वांची सहानुभूति बंडवाल्यांना मिळाली होती. या मदतीच्या जोरावर व सेनापति तात्या टोपी आणि राणी यांच्या जिवावर रावसाहेबाच्या मनांतून हिंदुपदपादशहा म्हणून साम्राज्याभिषेक करून घेऊन मिरवावयाचें होतें. 'तिकडून इंग्रज पाठीशीं येऊन भिडतो आहे; अशा आणीबाणीच्या वेळीं राज्याभिषेक, ऐषआराम आणि ब्राह्मणभोजनें कसलीं करीत बसलां आहां ! अगोदर उठा आणि आपल्या सैन्याची नीट जुळवाजुळव करून इंग्रज शत्रूशीं झगडण्याला तयार व्हा ! राज्य मिळालेलें पचण्यापूर्वींच राज्याभिषेक काय करीत बसलां आहां !' अशी राणीनें रावसाहेब पेशव्याची खाशी कानउघाडणी केली. तात्या टोपीला समजावून सांगितलें. पण क्षणिक विजयमदानें धुंद होऊन अर्ध्या हळकुंडानें पिवळा झालेल्या त्या हिंदुपदपादशाहीच्या उमेदवाराला व त्याच्या सेनापतीला राणीचे बोल फोल वाटले. अथवा त्यांना असेंही वाटलें असेल कीं राणीच्या मर्दुमकीवर जें यश प्राप्त झालें, तें राणीच बळकावून बसणार नाहीं कशावरून ! तीच हिंदुस्थानची सम्राज्ञी होऊन, झांशीच्या पूर्वीच्या राजांनीं इंग्रजांशीं तह करतांना पेशव्यांना कुठल्या झाडाचा पाला लेखून गुंडाळून ठेवलें तसें आपणालाही गुंडाळून ठेवणार नाहीं कशावरून ! त्यापेक्षां पुढें प्राप्त होणाऱ्या साम्राज्यवैभव–देवतेच्या मंदिरांत आपण आपलें सोंवळेंभांडें अगोदर टाकून ठेवावें हें बरें, अशा धूर्त विचारसरणीनें प्रेरित होऊन कीं काय, रावसाहेबानें स्वतः पाठीवर चालून येणाऱ्या इंग्रज लष्कराला तोंड देण्याची तयारी केली नाहीं; राणी मदतीसाठीं कंठशोष करीत असतां तिलाही साह्य केलें नाहीं. तात्या टोपीही फाजील स्वामिनिष्ठेच्या भरांत रावसाहेबासभोंवार–हिंदुपदपादशाहीला वरण्यासाठीं गुढग्याला बाशिंगें बांधण्याला उतावीळ झालेल्या त्या विवाहो-

त्सुक नवरदेवासभोंवार राज्याभिषेकाच्या लग्नगर्दींत मिरवण्यांत दंग होता; त्यामुळें त्यालाही प्रथम राणीच्या विनवणीकडे लक्ष्य द्यावेंसें वाटलें नाहीं. पण इंग्रजांचा हल्ला अगदीं प्राणांवर येऊन बेतला, तेव्हां तात्याचे डोळे उघडले व त्यानें रावसाहेबाची चूक त्याच्या नजरेला आणली. त्याबरोबर रावसाहेबानें तात्याला राणीच्या मदतीला जाण्याचा हुकूम दिला, व स्वतः वाड्यांतल्या वाड्यांत बसून हिंदुपदपादशहा म्हणून मिरवत ब्राह्मणभोजनें, अन्नसंतर्पणें व राज्याभिषेकोत्सव असा पूर्वींचा कार्यक्रम अखंड सुरू ठेवला.

पण राणी व तात्या टोपी यांच्या शौर्याचा, चिकाटीचा, जीवन-सर्वस्व-त्यागाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. इंग्रजांच्या शिस्तीच्या व सुसज सैन्यापुढें व सर ह्यू रोजसारख्या युद्धकलाकुशल सेनापतीपुढें मराठ्यांचा टिकाव लागला नाहीं. राणीनें लढण्याची व शौर्याची अगदीं शिकस्त केली कीं सेनापति रोजनेंही आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. रानांत चोहोंबाजूंनीं कोंडल्या गेलेल्या सिंहिणीसारखी राणीची अनुकंपनीय अवस्था झाली. पण तिला कोणाचेंही पाठबळ नसतांना ती आयुष्याच्या अखेरच्या क्षणापावेतों तळहातावर शीर घेऊन लढली; सिंहीण पारध्यांना भिऊन गुहेंत जाऊन गवत खात बसली नाहीं. तिचे सर्व सैनिक रणांगणांत बळी पडले, कांहीं प्राणभयानें पळून गेले, पराजयाच्या आयुष्याचा विमा उतरल्यासारखा आपला पराजय निश्चितपणें सुरक्षित आहे याविषयीं तिला शंका उरली नाहीं, तरी देखील राणीनें रणांगणांतून काढतें पाऊल घेतलें नाहीं. ती नानासाहेब-रावसाहेबांसारखी अंगचुकारपणानें जीव बचावण्याच्या मोहाला बळी पडली नाहीं; रणांगणावर एकाकीपणानें लढतां लढतां ग्वाल्हेर शेजारीं ता. १८ जून १८५८ रोजीं धारातीर्थीं पतन पावली! तिचा साह्यकारी तात्या टोपी ग्वाल्हेरला आपला पल्ला येत नाहीं असें पाहून निरुपायानें तेथून निसटला तो पुढें कैक दिवस ठिकाठिकाणीं बंडाचा वणवा पेटविण्यासाठीं अथवा पेटविलेला भडकविण्यासाठीं गरुडभरारीनें एकसारखा संचार करीत होता. त्याचा धनी रावसाहेब पेशवा ह्या संकटांतून इतक्या चपळाईनें नेपाळकडे पळाला कीं पळपुटेपणांत त्याची बरोबरी कोणालाही करतां आली नसती. रावसाहेब, नानासाहेब, यांच्या वर्तनांतून सरंजामदार वर्गाची किळसवाणी मतलबी समजुत प्रत्ययाला येते ती अशी कीं आपले सेनापति काय, मांडलिक

काय, बंडखोर काय, आपले नोकर–आपली प्रजा ! धन्यासाठीं प्राणार्पणही करणें हें त्यांचें कर्तव्यच आहे. तें कर्तव्य त्यांना बजावूं द्या, यश मिळवून आमच्या स्वाधीन करूं द्या, मग आम्ही आयत्या बिळावर नागोबा राज्य करावयाला तयार आहोंच. ते विजय मिळालेला पाहण्यासाठीं जगले; आम्ही त्यांचा गौरव करून त्यांच्या स्वामिनिष्ठेचें कौतुक करूं. बरें, ते मेले, तर स्वामिनिष्ठेनें मरण आल्यामुळें त्यांच्या जीविताचें सार्थक झालें. धन्यासाठीं प्राणार्पण करण्यासारखें–निःसीम स्वामिभक्तीसारखें थोर पुण्यकृत्य जगांत दुसरें कोणतें आहे ? याच भावनेनें रावसाहेबानें तात्या टोपीला शत्रूच्या दाढेंत सोडून स्वतः नेपाळकडे पलायन केलें असावें. पण तात्यानें कोठें पळून जावें ? पळून जाऊन कोठल्या एखाद्या खबदाडांत बसून मरेतों सुखानें जगतां येईल अशी माया तरी त्याच्यापाशीं कोठें होती ? शागीर्दांचा सेनापति त्याला धन्यानें केलेला; सरंजामदार वर्गाच्या कृपेनें आपला भाग्योदय झाला व त्या वर्गासाठीं लढण्यांतच आपलें भाग्य अधिक उदयाला येईल अशी त्याची कल्पना ! पण ती त्याची कल्पना परिणामीं फोल ठरली. ठाईठाईंच्या बंडवाल्या शिपायांनीं व गोरगरीब रंजल्या गांजल्यांनीं कांहीं तात्याला दगा दिला नाहीं, दगा त्यानें ज्या वर्गाच्या सेवेंत स्वतःला वाहून घेतलें त्या सरंजामदार वर्गानें दिला. धनी रावसाहेब त्याला ऐन संकटांत टांकून नेपाळांत निघून गेला; आणि त्याला विश्वासघातानें पकडून इंग्रजांच्या स्वाधीन करणारा त्याचा जिवलग मित्र मानसिंग हाही एक वैभवनष्ट जमीनदारच होता. इतके दिवस त्यानें इंग्रजांना अगदीं सळो कीं पळो करून सोडलेलें, तो मूर्तिमंत प्रळयकाळसा इंग्रजांना वाटावयाचा ! एवढा प्रबल शत्रु हातीं लागल्यावर त्याला इंग्रज थोडेच जिवंत राहूं देतात ! इंग्रजांविरुद्ध लढाई पुकारल्याचा गंभीर आरोप त्याच्यावर लादण्यांत आला होता, व तो अक्षरशः खराही होता. तात्यानेंही तो आरोप अमान्य केला नाहीं. उलट त्यानें आपली बंडांतील भूमिका सडेतोड शब्दांत स्पष्ट करून सांगितली, 'मी इंग्रजांविरुद्ध आजवर लढलों खरा. पण मी बंडखोर नाहीं; माझ्या धन्याचा मी इमानी सेवक आहें. पेशवे माझे धनी, मी त्यांचा नोकर ! पेशव्यांशीं राजनिष्ठ राहणें हें माझें कर्तव्यच होतें, व तें मीं इमानें इतबारें बजावीत आलों आहें.' पेशव्यांनीं आपलें गेलेलें राज्य परत मिळविण्याची खटपट चालविली, त्या कामीं त्यांनीं मला

ज्या ज्या आज्ञा केल्या त्या मीं निष्ठेनें पालन केल्या. कोणताही स्वामिनिष्ठ सेवक धन्याची आज्ञा पालन करणें एवढें एकच कर्तव्य जाणतो. मी इंग्रजांचा सेवक नव्हतों व नाहीं. म्हणूनच मी बंडखोर ठरत नाहीं. मीं पेशव्यांच्या आज्ञेनें व त्यांच्या तर्फेनें तुम्हां इंग्रजांशीं निकरानें लढलों. पण मी युद्धनीतीला सोडून कोणाचा घातपात केला नाहीं, अथवा इंग्रजांच्या बायका-मुलांनाही ठार मारलें नाहीं. युद्धांत माझा पराभव झाला व मी तुमच्या तावडींत सांपडलों, एवढ्यावरून तुम्ही मला अपराधी म्हणूं शकणार नाहीं. मला प्रतिपक्षाचा सेनापति म्हणून तुम्हीं गौरवानें वागविणेंच योग्य.

पण तात्याच्या ह्या सडेतोड प्रामाणिक जबाबाचा इंग्रजांच्या मनावर कांहीं देखील परिणाम झाला नाहीं. त्यांनीं त्याला अपराधी ठरवून ता० १८ एप्रिल सन १८५८ रोजीं सिप्री एथें फांशीं दिलें!

एका जातीच्या भुजंगाविषयीं अशी लोककथा आहे कीं त्या भुजंगाच्या मस्तकावर एक देदीप्यमान हिरा असे, व रात्रीच्या वेळीं तो भुजंग घोर अरण्यांत तो हिरा एखाद्या खडकावर काढून ठेवून त्याच्या प्रकाशांत आपलें भक्ष्य शोधीत अरण्यांत हिंडत असे. तो हिरा एकदां कोणीं चोरून नेला व त्यामुळें तो भुजंग काळोख्या रात्रीं आंधळा होऊन अचानक शत्रूच्या हातीं सांपडला. झांशीची राणी लक्ष्मी व तात्या टोपी हीं दोन देदीप्यमान रत्नें बंडखोर सरंजामदार वर्गरूपी भुजंगापासून अलग करून हिरावून घेतलीं जातांच बंडाच्या पुढारीपणाच्या दृष्टीनें बंड संपुष्टांत आलें. राणी लक्ष्मी धारातीर्थीं पतन पावली, तेव्हांच वास्तविक बंडाची ऊर्मि निर्जीव झाली; व थोडीशी धुगधुगी होती ती तात्या टोपीच्या मृत्यूबरोबर लयाला गेली. तात्याला विश्वासघातानें पकडून देणाऱ्या मानसिंगाला इंग्रजांकडून त्याची पूर्वी सरकारजमा झालेली जमीनदारी परत मिळाली हें निराळें सांगणें नकोच.

राणी लक्ष्मी व तात्या टोपी हीं दोघेंही पेशव्यांची आश्रित. राणीचें बाळपण पेशव्यांच्या राजवाड्यांत आश्रिताची मुलगी म्हणून खेळ खेळण्यांत गेलेलें, व तात्या टोपी हा तर मूळ पेशव्यांची तैनात राखणारा आश्रित. तो बंड झालें तेव्हांच खरा चमकला. त्यापूर्वी त्याची गणना अगदींच सामान्य लोकांत होत होती. राणी लक्ष्मीचें तसें नव्हतें. ती झांशीची राणी झाली, तिच्या बरोबर तिचे वडील मोरोपंत ऊर्फ मामासाहेब तांबे यांचें नशीब

उदयाला आलें. मोरोपंतांचें गरीब मध्यम वर्गीय जीवन सर्व कसें परावलंबी होतें, आणि त्यामुळें ते घरंगळत घरंगळत पुण्याहून काशी, काशीहून ब्रह्मावर्त आणि ब्रह्मावर्ताहून झांशी एथवर कसे येऊन स्थिरावले, तें मागें सांगण्यांत आलेंच आहे. आणि त्यांच्या जीवनाची अखेर जी झाली, तोही त्यांच्या गरीब मध्यम वर्गीय परावलंबीपणाचा परिपाक होय. पोटच्या मुलीच्या मोबदल्यांत त्यांनीं आयतोबासारखी सरदारकी झांशींत मिळविली, ती अर्थात् झांशीचें राज्य लयाला गेलें त्याबरोबर लयाला गेली. तरीपण राणी लक्ष्मी राज्यहीन झाली तरी धन-रत्न-संपदा तिला पुष्कळ मिळाली होती. गंगाधर-रावांच्या पश्चात् त्यांचा दत्तक नामंजूर झाल्यामुळें राणी लक्ष्मीला वैभवांत कांहीं विशेष स्वारस्य उरलें नव्हतेंच. सुटले केंस पाठीला शरण, त्याप्रमाणें राणीसारख्या तरुण स्त्रीला तेव्हांच्या देशकालपरिस्थितीला अनुसरून लौकिकांत तरी पितृरक्षण सोडून स्वतंत्रपणें वागणें शक्य नव्हतें. त्यामुळें मोरोपंतांकडे ओघानेंच सर्व प्रकारची वडीलकी व कारभारही आयता आला. आयत्या वैभवावर चरण्याला माणसाला अक्कल असलीच पाहिजे असें नाहीं. मोरोपंतांच्या अकलेची कसोटी ठरण्याचा प्रसंग त्यांच्या उभ्या आयुष्यांत फारसा कधीं आलाच नाहीं. तथापि सर ह्यू रोजच्या हस्तें झांशीचा पाडाव झाला व राणी लक्ष्मीला आणि तिच्या सर्व निकटवर्ति मंडळीला झांशींत वास्तव्य करणें सुरक्षितपणाचें उरलें नाहीं, तेव्हां राणी विजेसारखी चमकत बाहेर पडली; पण तिला पाठबळ देण्यासाठीं तिच्या मागोमाग जाण्याऐवजीं हातीं लागली तेवढी धनदौलत हत्तीवर लादून नेण्यासाठीं मोरोपंतांची स्वारी मागें रेंगाळत राहिली. स्वतःचा जीव बचावण्यासाठीं पळतां भुई थोडी होण्याची आणीबाणीची वेळ जेथें येऊन ठेपलेली, तेथें हे राजश्री दौलत लादलेल्या हत्तीचें जड लोढणें गळ्यांत बांधून पळत होते! पळत पळत एकदांचे दतिया शहराच्या वेशीपाशीं येऊन थडकले मात्र, आणि लगेच त्यांना दतियाच्या संस्थानिकानें कैद करवून माघारें झांशीला इंग्रजांकडे पाठविलें. हत्तीवरचा सर्व ऐवज मात्र जप्त केला. झांशींत इंग्रज लष्करी अधिकाऱ्यांनीं मोरोपंताला राजवाड्यासमोर भर दुपारीं दोन वाजतां फांशीं दिलें!

जी गत झांशीच्या बंडाळ्याची झाली, तीच गत दिल्लींतील बंडाळ्याचीही झाली. दोन्ही ठिकाणीं बंडखोरांची पुरी वाताहात उडाली. बंडखोर पुढाऱ्यांचे-

सर्व मार्गी दिल्लीला येऊन मिळत होते, हें मागें आपण पाहिलेंच आहे. एकदम सर्वत्र बंडाचा भडका उडाल्यामुळें इंग्रजांना त्या संकटाला सर्वत्र सारखें तोंड देणें हें गगनाला गवसणी घालण्यासारखें अशक्यप्राय होऊन बसलें होतें, म्हणूनच केवळ तोंवरच दिल्लींत इंग्रजांचें राज्य नष्ट झालें व मोंगलाई सुरू झाली असें तेथल्या लोकांना वाटलें. पण एका वाक्यांत त्या काळांतील दिल्लीचें वर्णन करावयाचें म्हणजे ती केवळ 'मोंगलाई'च होती; व ऐतिहासिक क्रमानें, पं. जवाहरलाल नेहरूंच्या भाषेंत बोलावयाचें तर, पूर्वीच ती मोंगलाई इतिहासाच्या कचऱ्याच्या पेटींत जाऊन पडली होती. बहादुरशहाला बादशहा बनविण्यांत आलें होतें खरें. पण तो केवळ बंडाच्या सूत्रचालकांच्या हातांतील कळसूत्री बाहुलें होता. तेथें कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता. अशा स्थितींतही इंग्रजांना बादशहासभोंवार गोळा झालेल्या सर्व बंडखोर पुढाऱ्यांनीं सहा दिवस पावेतों शहरांत रस्तोरस्तीं नाचविलें. दरम्यानच्या आठ घटकांच्या मोंगलाईंत दिल्लींतील बहुजनसमाज सर्वतोपरी इतका त्रस्त झाला होता कीं, त्यालादेखील कधीं एकदां ही दुर्दशा थांबते असें झालें असेल. दिल्ली इंग्रजांनीं जिंकून घेतली, बादशहा व शहाजादे यांना पकडून अत्यंत अपमानास्पद रीतीनें वागविलें, बादशहाला पकडून नजरकैदेंत डांबून ठेवण्यांत आलें, व शहाजाद्यांना बदमाष कैद्यांच्या तोलानें पकडून आणून दिल्ली शहराजवळ गोळ्या घालून ठार करण्यांत आलें. यांत लक्षांत ठेवण्यासारखी विस्मयजनक गोष्ट ही कीं दिल्लींतील पुष्कळशा धनिक व मध्यम वर्गीय लोकांची इंग्रजांविषयींची हितचिंतकता व राजनिष्ठा इंग्रजांना फार उपयोगी पडली. बादशहा, बेगम व शहाजादे हे इंग्रजांच्या भीतीनें हुमायून बादशहाच्या थडग्यांत दडून बसले असतांना त्यांची बित्तंबातमी इंग्रजांना इलाहीबक्ष नांवाच्या बादशहाच्या व्याह्याकडूनच कळली; व त्यापूर्वी दिल्लींत फितुरी माजवून बंडवाल्यांची मोंगलाई घुशीप्रमाणें पोखरून इंग्रजांचे श्रम हलके करणारा त्यांचा मुख्य मदतनीस रजबअल्ली मध्यम वर्गीय बुद्धिवान मुसलमानच होता.

पण इंग्रजांनीं बादशहाला पकडून कैदेंत डांबलें, त्याच्या शहाजाद्यांना भर रस्त्यांत पिसाळलेल्या कुत्र्यांना गोळ्या घालून ठार मारावें त्याप्रमाणें ठार मारण्यांत आलें, तात्या टोपीला फांशी देण्यांत आलें; हे अत्याचार कांहींच

नव्हेत असे राक्षसी अत्याचार इंग्रजांनीं बंडवाल्यांवरच नव्हे तर बंड झालेल्या प्रदेशांतील सर्वसामान्य जनतेवरही केले. त्या मानानें हिंदी लोकांनीं इंग्रजांवर अत्याचार केलेच नाहींत असें म्हणावें लागेल. हिंदी लोकांना सतत शें-दीडशें वर्षें इंग्रजांनीं बेसुमार लुटलें आणि दुबळे बनवून सोडलें, मग हिंदी लोकांना इंग्रजांचा किती संताप यावा ! किती तिरस्कार वाटावा ! किती सूड-बुद्धि इंग्रजांविषयीं त्यांच्या मनांत उसळावी ! असें असतांही त्या अन्यायाचा पुरेपूर मोबदला घेण्याइतक्या सूडनिष्ठुरतेनें हिंदी लोक इंग्रजांशीं सहसा वागले नाहींत. याच्या उलट सुधारणेचा व संस्कृतीचा टेंभा मिरवणाऱ्या इंग्रजी भांडवलशाहीच्या अडत्यांनीं राक्षसांनाही लाज उत्पन्न व्हावी अशा परींनीं हिंदी लोकांना छळलें. त्यांना जाळलें, त्यांना तरवारीनें कापून काढलें, गोळ्या झाडून ठार केलें, फांसावर लटकविलें, तोफेच्या तोंडीं दिलें, संगिनींनीं भोंसकून घायाळ करून मग मंदाग्नीवर वांगीं रताळीं भाजावीं तसें भाजून काढलें, रस्त्याच्या दुतर्फा झाडांना टांगून निरपराधी लोकांना फांशी देत व त्या प्रेतांचे नक्षीदार आंकडे करीत पुढें जाण्याचा खेळही कितीएक लोक खेळले ! बरें; लष्करांतील कोणातरी बेजबाबदार व अवखळ वृत्तीच्या शिपायांचीं हीं कृत्यें असें मुळींच नाहीं; चांगल्या जबाबदार इंग्रज लष्करी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं आणि प्रोत्साहनानें हे सर्व घोर प्रकार घडले. कानपूर एथें बंडवाल्यांकडून जी आगळीक झाली, तिचा सूड घेण्यासाठीं तेथें बिबिघर नांवाच्या ज्या जागेंत इंग्रज स्त्री–पुरुषांची कत्तल होऊन रक्ताचे थरचे थर जमिनीवर सांचले होते, ती जागा असहाय बंडखोर कैद्यांकडून जिभेनें चाटून साफ करून घेण्यांत आली ! कोणीं तें किळसवाणें कृत्य करण्याला कांकूं केलें कीं फटके मारून त्याच्या पाठीच्या चांबड्या लोळविण्यांत येत असत, व त्याच्याकडून रक्त चाटवून साफ करून घेतल्यावर त्याला ठार मारण्यांत येत असे ! हा अत्याचार करणारा कर्नल नील हा जबाबदार इंग्रज लष्करी अधिकारी होता. कोणा दोघां इंग्रजांची हत्या बंडवाल्यांकडून बंडाच्या धामधुमींत झाली, त्या दोन इंग्रज जीवांचा मोबदला म्हणून पांचशें हिंदी माणसांना ठार करण्याच्या गोष्टीचें समर्थन करणारा ग्रीथेड, लोकांना गोळ्या घालून तडकाफडकी ठार न मारतां त्यांना पकडून, कोंडून, त्यांना हवापाणीही मिळूं न देतां त्यांचे हालहाल करून मग त्यांना तोफेच्या तोंडीं देऊन ठार मारणारा

कूपर, नमुन्यादाखल फांशी देण्यासाठीं थोडेसे लोक कूपरपाशीं मागणारा मॉंटगॉमेरी, बंडवाल्यांचे एवढे हाल करतां येऊनही समाधान न झाल्यामुळें बंडखोरांना जिवंत जाळतां येईल अथवा त्यांची कातडी सोलून काढतां येईल असें एखादें बिल पार्लमेंटकडून पास करून घेतां आलें तर फार छान होईल असें इच्छिणारा निकोल्सन हे 'राक्षस' या संज्ञेला पात्र ठरणारे अथवा राक्षसांना देखील ज्यांची उपमा दिल्यानें आपला अपमान झालासें वाटेल असे सर्व जबाबदार इंग्रज अधिकारीच होते! आणि त्यापेक्षांही नवलाची गोष्ट कीं बंडांत ज्यांचे हात हिंदी रक्तानें लाल झालेले नाहींत अशा कांहीं इंग्रजांनींही असल्या कृत्यांचें समर्थन केलेलें आहे!

याप्रमाणें सत्तावन सालच्या बंडाचा वणवा ता. १० मे १८५७ रोजीं भडकला, तो इंग्रजांनीं सतत अठरा महिने प्रयत्न करून व मानवी, पाशवी, असे सारे उपाय योजून विझविला. बंडवाल्यांपैकीं शेवटचा महत्त्वाचा बळी इंग्रजांनीं घेतला तो तात्या टोपीचा. नानासाहेब पेशवा हा इंग्रजांच्या हातीं सांपडला नाहीं; तो नेपाळच्या हद्दींत प्राणरक्षणार्थ पळून गेला. पण तेथें त्याला नेपाळच्या राजानें थारा दिला नाहीं. त्याला निघून जावयाला सांगितलें. अखेर तेथेंच त्याचा अंत झाला. रावसाहेब पेशवा ग्वाल्हेरच्या आसपास एकटाच दडून बसला होता. तो कांहीं काळानें इंग्रजांच्या हातीं सांपडला. त्याला त्यांनीं फांशीं दिलें. आपल्या जमीनदारीला मुकलेला बिहारचा जमीनदार कुंवरसिंह हाही त्या भागांतील बंडाचा एक पुढारी होता. कुंवरसिंहानें आपली जमीनदारी परत मिळविण्यासाठीं बंडांत निकरानें भाग घेतला. पण त्यांत त्याला यश न येतां त्या दगदगींत तो मरण पावला. त्याचेंच व्रत त्याचा भाऊ अमरसिंह यानें पुढें चालविलें. तो पराजय पावून नापत्ता झाला. फर्रुकाबादचा नबाबही बंडांत सामील होता. पण त्यानें ती गाजराची पुंगी नीट वाजत नाहींशी पाहतांच मोडून खाल्ली. त्यानें लगेच इंग्रजांना शरण जाऊन आपले प्राण वांचविले. बांद्याच्या नबाबानेंही प्रारंभीं नानासाहेब पेशव्याबरोबर बंडाच्या हुल्लडींत भाग घेतला होता. पण हा मामला फायद्याचा नाहीं अशी खात्री होतांच त्यानें इंग्रजांना शरण जाऊन वर्षासन मिळविलें.

सरंजामदार वर्गांतील जे सरंजामदार बंडाच्या वणव्यांत होरपळून निघाले अगर बळी पडले, त्यांची अशी तपशीलवार माहिती द्यावयाची तर आणखी

ग्रंथ

पुष्कळच लहानसान सरंजामदार-जमीनदार-तालुकदारांचीं नांवें घ्यावीं लागतील. पण एथें नगदी रुपये मोजून घेतले आहेत; चिल्हर पै-पैशांची मोजदाद करण्यांत आलेली नाहीं. तथापि ही सरंजामदार वर्गाची यादी बंडांत सामील न झालेल्या इंग्रजधार्जिण्या सरंजामदारांचीं नांवें तिच्यांत गोंवल्याखेरीज पूर्ण होणार नाहीं, व त्याखेरीज बंडाच्या ऐतिहासिक कार्याचा आढावाही पुरा घेतां येणार नाहीं. या दुसऱ्या मालिकेंत पहिला नंबर ग्वाल्हेरच्या शिंद्यांचा. ग्वाल्हेरचें हिंदी लष्कर इतर ठिकाणच्या हिंदी लष्कराप्रमाणेंच बंडांत भाग घेण्याला उत्सुक होतें. बंडवाल्यांनाही शिंदेसरकारांचा आपणाला मोठा आधार मिळेल असा भ्रम होता. पेशव्याची घमेंड कीं आम्हीं पेशव्यांनीं शिंद्याला हुजऱ्याचा हुजूर बनविला; तो शिंदा 'चल आमच्याबरोबर बंडांत सामील हो' अशी मी आज्ञा करतांच कसा बंडांत सामील होत नाहीं पाहतों! राणी लक्ष्मीला भरंवसा कीं पेशव्यांच्या कृपेनें राजा झालेला शिंदे यावेळीं अंगचुकारपणा करील हें शक्यच नाहीं. ती आपल्यावरून इतर संस्थानिकांची पारख करीत होती. पेशव्यांच्या कृपेचा बाऊ तिला वाटे व पेशव्यांशीं त्यांच्या सर्व सरंजामदारांनीं यावेळीं एकजीव होऊन एकजुटीनें इंग्रजांना हिंदुस्थानांतून हाकलून लावलें तरच पेशवे व सर्व संस्थानिक सुखी होतील अशी तिची भोळी समजूत होती. पण शिंदे त्या फंदांत मुळींच पडले नाहींत. त्यांचे कारभारी दिनकरराव रघुनाथ राजवाडे यांनींही शिंद्यांना सल्ला दिली कीं उगाच ह्या पेटत्या खाईत उडी घालून इंग्रजांना दुखवून आपण आत्मनाश करून घेऊं नये. शिंदे सरकार तेव्हां ऐन पंचविशीच्या बहरांत असून ऐषआरामांत दंग होते. त्यांना सुखाचा जीव दुःखांत न घालण्याची सल्ला पटली; व त्याचा परिणाम म्हणजे बंडवाल्यांची ऊर्मि दाबून टाकण्याच्या कामीं व राणी लक्ष्मी वगैरे प्रमुख बंडवाल्यांना गोत्यांत आणण्याच्या कामीं शिंद्यांचा इंग्रजांना अमोल उपयोग झाला. इंदूरच्या होळकरांनींही अक्षरशः नाहींतरी बहुतांशीं शिंद्यांच्याच पावलावर पाऊल टाकलें. त्यांच्या राज्यांतील लष्करानेंही बंड केलें खरें; व इतर ठिकाणीं त्रस्त ग्रस्त जनतेचा पाठिंबा बंडवाल्यांना मिळाला तसाच तेथेंही मिळाला. पण बंडखोरीचे शितोडे आपणावर उडूं नयेत यास्तव गव्हर्नर व सेनापति यांसारख्या बड्या इंग्रज अधिकाऱ्यांना कळकळीचीं पत्रें पाठवून बंडखोरांचा तीव्र निषेध करून आपल्या इंग्रजनिष्ठेचें सकृत

प्रदर्शन त्यांनीं केलें. तरीही कांहीं अधिकाऱ्यांचा त्यांच्याविषयीं गैरसमज होता हें निराळें. झाबुवा संस्थानचा कारभार तेथील अल्पवयी राजाच्या वतीनें त्याची आई पाहत होती. तिनें बंड मोडतां मोडतां संकटांत सांपडलेल्या इंग्रज सेनापतींना आश्रय व मदत देऊन इंग्रजांची कृपा संपादन केली. देवासचे पवार, जावऱ्याचा नबाब, छत्रपूर, ओर्च्छा, रेवा एथील राजे, अशा अनेक लहानमोठ्या इंग्रजधार्जिण्या संस्थानिकांचा नर्मदेच्या बाजूनें जणूं मजबूत कोटच उभा होता; त्यामुळें उत्तरेपासून दक्षिण बंडापुरती अलग राहिली. उत्तरेंत राजपुतान्यांतील एकंदर सत्रा हिंदु व एक पेंढारी मिळून अठराचीं अठरा संस्थानें बंडापासून अगदीं अलिप्त–पूर्ण इंग्रजनिष्ठ राहिलीं.

याप्रमाणें सत्तावन सालच्या बंडाला चिथावणी हिंदी सरंजामदार वर्गानेंच दिली, आणि बंड मोडण्याच्या कामीं इंग्रजांना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मदतही त्याच वर्गानें केली. कांहीं सरंजामदारांनीं इंग्रजांविरुद्ध बंडाला चिथावणी दिली आणि कांहींनीं बंडवाल्यांविरुद्ध इंग्रजांचा पाठपुरावा केला, ही सरंजामदार वर्गाची विघटनात्मक स्थितिच त्या बंडाचें पुढारीपण स्वीकारण्याची सरंजामदार वर्गाची नालायकी सिद्ध करण्याला एक जबरदस्त पुरावा आहे. ऐतिहासिक दृष्ट्या विचार करतां हें बंड हिंदुस्थानांत तेव्हां नुक्ताच जोमानें उदयाला येऊं लागलेल्या राष्ट्रीय एकजुटीविरुद्ध व ती एकजूट घडवून आणणारें सुधारणेचें जें नवचैतन्य देशांत संचारूं लागलें होतें त्या नवचैतन्याविरुद्ध होतें. सरंजामदार वर्गाला सुधारणा नको होती, देशाचें उद्योगीकरण नको होतें, यांत्रिक प्रगति नको होती; त्याला आपली पूर्वीची अस्मानी सुलतानी कारकीर्द अखंड गाजवितां यावी यासाठीं पूर्वीचा मागसलेपणाच हवा होता. आणि त्या प्रयत्नांतदेखील मुसलमान, हिंदु व शीख सरंजामदारांच्या सवत्या सुभ्याच्या चोरट्या कारवाया! सरंजामदारांतच आपसांत कोणाचा कोणावर विश्वास नाहीं, प्रगतीचा अथवा यशाचा निश्चित टप्पा डोळ्यांसमोर नाहीं, बंडांत सुसूत्रता नाहीं, शिस्त नाहीं, कांहीं नाहीं. अशा स्थितींतही बंड कांहीं काळ टिकलें, तें मोडेपावेतों टिकावयाचेंच म्हणून टिकलें. त्याचें श्रेय सरंजामदार वर्गाच्या पुढारीपणाला मुळींच नाहीं. तथापि हिंदी जनतेचा सार्वत्रिक हार्दिक पाठिंबा बंडाला मिळाला म्हणून तें टिकलें. पण सरंजामदार वर्गाच्या हातीं बंडाचें पुढारीपण गेलें, आणि हिंदी जनते-

वर स्वतःच्याच रक्तानें न्हावून सवरून पुन्हा इंग्रज जेत्यांचे पाय धरून काळ कंठण्याचा प्रसंग आला. इंग्रजी सत्तेला विरोध करणारे सामर्थ्याचे अणुरेणु जे होते ते वेंचून वेंचून नाहींसे करण्यांत आले, व इंग्रजांना विरोध करणारा कोणी हिंदुस्थानांत शिल्लक उरला नाहीं. लोक मनांत जळत जळफळत राहिले; पण असल्या नुसत्या जळण्या जळफळण्याला इंग्रज थोडीच भीक घालतात! इंग्रजी आक्रमणाच्या निमित्तानें हिंदुस्थानांत जी सामाजिक क्रांति होऊं घातली होती, ती अखेर पूर्ण झाली व एक नवीन हिंदी राष्ट्र बंडांतून निर्माण झालें. त्यांत वाईट एवढेंच झालें कीं राष्ट्र निर्माण झालें खरें; पण तें गुलामांचें–हक्काची ऐतिहासिक संपदा गमावून बसलेल्या गुलामांचें!

सरंजामदार वर्गाच्या अंगीं खरा जिवंतपणा कांहींही उरलेला नाहीं, तो वर्ग भांडवलशाहीशीं टक्कर देऊं शकत नाहीं अथवा जनतेचें कांहीं कल्याणही करूं शकत नाहीं, अतएव ऐतिहासिक दृष्ट्या हिंदी समाजजीवनाला त्या वर्गाची कोणत्याही प्रकारची आवश्यकता उरलेली नाहीं, हें ऐतिहासिक सत्य सत्तावन सालच्या बंडांत नीट हडसून खडसून सिद्ध झालें. बंडामुळें ईस्ट इंडिया कंपनीची हिंदुस्थानावरील सत्ता नष्ट होऊन इंग्लंडच्या राणीनें हिंदुस्थानचा कारभार आपल्या हातीं घेतला. कंपनीच्या हातून हिंदुस्थान हिसकावून घेतला गेला म्हणून कंपनीच्या भागीदारांखेरीज कोणालाही वाईट वाटण्याचें कारण नव्हतें. विलायतेंतील कारखानदार भांडवलदारवर्गाला तर हिंदुस्थान हें विलायतेंतील कारखान्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाच्या कल्पवृक्षाचें आगर व त्या कच्च्या मालापासून तयार झालेल्या पक्क्या मालाची प्रचंड हुकमी बाजारपेठ म्हणून हिंदुस्थानला राबविण्याच्या कामीं कंपनीची अडचणच होत होती. राणीनें हिंदुस्थानचा कारभार हातीं घेतल्यापासून बेवारशी संस्थानें खालसा करण्याचें धोरण (doctrine of lapse) बरेंच ढिलें करण्यांत आलें. पण त्याऐवजीं एक नवें लोढणें संस्थानिकांच्या गळ्यांत असें अडकवून देण्यांत आलें कीं त्यांनीं आपल्या पश्चात् गादीवर बसणाऱ्या औरस अथवा दत्तक वारसाला हिंदुस्थान सरकारची म्हणजेच सार्वभौम सरकारची आगाऊ मान्यता घेतली पाहिजे. ह्या दृष्टीनें पाहतां हिंदी संस्थानिकांची अवस्था बंडानंतरच्या काळांत सांखळीपट्ट्यानें बांधून दरवाजाशीं डांबून ठेवलेल्या ठाणबंदी कुत्र्यांसारखी झाली. हें परावलंबन अत्यंत शोचनीय तर

खरेंच; पण तें मानील त्याला ! प्रत्येक संस्थानिकाच्या डोक्यावर रेसिडेंट नांवाची एकेक आखाडसासूही सार्वभौम सरकारनें बसविली. सार्वभौम सरकारच्या संमतीखेरीज दुसऱ्या कोणाशीं सख्य, भांडण अथवा सल्लामसलत करण्याइतकीही मोकळीक यापुढें संस्थानिकांना उरली नाहीं. तथापि एवढें पथ्य सांभाळल्यावर संस्थानिकानें आपल्या राज्यांतील रयतेला कसेंही छळलें गांजलें लुबाडलें तरी तिकडे हिंदुस्थान सरकारनें लक्ष्य देऊं नये इतकें अमोघ व स्वैर स्वातंत्र्य संस्थानिकांना इंग्रज राज्यकर्त्यांकडून मिळालें आहे. ही गोष्ट ऐतिहासिक क्रमाला पूर्णपणें सोडून घडली आहे. भांडवलदार इंग्रजांची औद्योगिक भांडवलशाही सत्ता हिंदुस्थानांत वाढीला लागल्यामुळें हिंदुस्थानांत श्रेष्ठ व अभूतपूर्व अशी सामाजिक क्रांति घडून आली, त्या सामाजिक क्रांतीबरोबर त्या कांहीं अनिष्ट गोष्टीही आल्या, त्यांतलीच वरच्याप्रमाणें मिळणारें संरक्षण ही एक गोष्ट होय. वास्तविक पाश्चिमात्य प्रगतीचाच बंडांत विजय झाला; सरंजामदार वर्गीय आर्थिक परिस्थिति व त्या परिस्थितीवर आधारलेला समाज हीं पाश्चिमात्य प्रगतीच्या वज्राघातानें मृतवत् झालीं. इतिहासाचा निर्विवाद दंडक ध्यानीं घेतां त्या विप्लवानंतर सरंजामदार वर्ग हिंदुस्थानांतून अजिबात नष्ट झाला पाहिजे होता. नवोदित हिंदुस्थानांत वास्तविक त्या वर्गाला जगण्याला अधिकारच नव्हता. पण केवळ इंग्रजांनीं त्या वर्गाला मुद्दाम जगविलें. कारण इंग्रजी साम्राज्यशाहीचे हितसंबंध हिंदुस्थानांत अबाधित राखण्यासाठीं इंग्रजांना असले दुबळे, सत्ताहीन, मानहीन व जोहुकमी, आशाळभूत व आयत्या ऐषआरामासाठीं साम्राज्यशाहीच्या वतीनें केव्हांही कोणतीही जनताद्रोहाची गोष्ट करण्याला एका पायावर तयार असणारे संस्थानिक-सरंजामदार पाहिजेच होते. इंग्रजी साम्राज्यशाहीकडून पिळली जाणारी जनता जर कोठें प्रतिकारक्षम होऊन उसळूं पाहील तर तिला जागच्याजागीं दाबून टाकण्यासाठीं इंग्रजी साम्राज्यशाहीनें आपल्या सत्तेच्या आखाड्यांत पोसून जोपासून माजविलेले ते पहिलवानच म्हणावयाचे ! सन १९३४ सालीं इंडिया बिल पार्लमेंटांत कॉमन्स सभेंत विवादिलें जात असतांना कॉमन्स सभेच्या एका सभासदानें स्वतः एका संस्थानिकांच्या तोंडून ऐकलेले जिव्हाळ्याचे उद्गार इतर सभासदांना ऐकविले ते असे : '...असें पाहा, आपण कोणीच कधींच चुकत नाहीं असें नाहीं. संस्थानचा कारभार चालवितांना आमच्या हातून

चुका होणें अगदीं शक्य आहे. पण मीं जर सरकारमाऊलीचें धोरण निमूटपणें मान्य केलें, तर मी मोठा सद्‌गुणी मुलगा ठरतों, व मीं केलेल्या चुका सरकारमाऊली मनावर घेत नाहीं. पण मी जर उभा राहून 'मला ही गोष्ट पटत नाहीं' असें एखाद्या अप्रस्तुत व न पटणाऱ्या सरकारच्या गोष्टीविषयीं खरें बोललों, तर सरकारमाउलीचें पित्त खवळतें, व मग एखादी चूक माझ्या हातून झाली तरी तीच माउली मला माझें जीवन असह्य करून सोडते."

वरील उद्गार एका संस्थानिकाचे स्वतःविषयींचे आहेत; त्रयस्थाचे नव्हेत. संस्थानिक स्वतः चूक करूं शकतात हें त्या संस्थानिकांच्या ध्यानीं आलें हेंच विशेष! पण संस्थानिकांच्या चुका तर नसतातच, खिळेही नसतात, त्या पहारी असतात. तरीदेखील त्या पहारी सार्वभौम सरकारशीं पूर्ण गुलामी वृत्तीनें वर वर्णन केल्याप्रमाणें वागणाऱ्या संस्थानिकाच्या कारभारांतील असल्या तर त्या सार्वभौम सरकारच्या डोळ्यांत खुपत नाहींत; आणि कधीं कधीं तर त्या सुरम्याच्या काडीसारख्या सुखावहही वाटत असतील! या तर्काला प्रमाणें धुंडाळावयाला नकोत. हातच्या कांकणांना आरसा कशाला हवा!

## १७ : बंडाचें ऐतिहासिक कार्य

The economic forms in which men produce, Consume and exchange *are transitory and historical*. When new productive forces are won men change their method of production and with the method of production all the economic relations which are merely the necessary Conditions of this particular method of production.

*Karl Marx*

हिंदुस्थानांत आजवर ज्या राज्यक्रांत्या अथवा तत्सम उलथापालथी झाल्या, त्याला ह्या शेतकीप्रधान देशांतील शेतकरी वर्गाची पिळणूकच मूलतः कारण होती, व सत्तावन सालचें बंडही त्याला अपवाद नव्हता. हिंदी लष्करी शिपायांनीं बंडांत पुढाकार घेतला खरा, पण हे शिपाई तरी शेतकरी वर्गांतीलच होते. नोकरीला मुकलेले पुष्कळसे लष्करी शिपाई पुन्हा पोटासाठीं आधींच अनेक पूर्वनिर्दिष्ट कारणांमुळें अनुत्पादक बनलेल्या शेतकी व्यवसायाकडे वळले व तेथेंही पोट भरेना म्हणून तेही बंडांत सामील झाले होते. बंडाच्या धामधुमींत बंडवाल्यांनीं अनेक तुरुंग फोडले व तुरुंगांतून मुक्त झालेल्या कैद्यांनींही बंडवाल्यांच्या खांद्याला खांदा भिडवला; ते लोक तरी मूळचे शेतकरीच, व शेतांत मरेमरेतों राबूनही पोटाची खळगी भरत नाहीं म्हणून दंगेधोपे, लूटमार, असल्या अत्याचारांना प्रवृत्त झालेले होते. अशा संत्रस्त लोकांनीं असल्या जगण्यापेक्षां मरण बरें अशा त्यागाच्या वृत्तीनें बंडाला, अत्याचाराला प्रवृत्त होणें ही गोष्ट अनिष्ट पण स्वाभाविक आहे. पण प्राणांतिक वेदनांनीं तडफडणाऱ्या रोग्याला आपल्या यातनांना अमूक एक रोग कारण आहे असें नक्की माहीत नसतें, त्यामुळें तो इतर अजाण अथवा

कार्यसाधु लोकांच्या नादीं लागून आपल्या प्रकृतीला न मानवणारे उपाय करतो. तरी त्यामुळें त्याच्या वेदना, त्याचें विव्हळणें खोटें आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. कंपनीच्या भांडवलशाही अंमलांत सर्वतोपरी गांजल्या गेलेल्या हिंदी शेतकरी–कामकरी वर्गांची अर्थात् श्रमजीवि वर्गांची अशीच अवस्था होती. पण अशा अवस्थेंत देखील बंडाचें पुढारीपण आपणाला आजवर जाचक होणाऱ्या प्रतिगामी सरंजामदार वर्गाकडे आहे असें हिंदी शेतकऱ्यानें पाहिलें, व ह्या पुढाऱ्यांच्या पुढारीपणाखालीं आपण बंड केलें आणि यदाकदाचित् इंग्रजी सत्ता हिंदुस्थानांतून उखडली गेली, तरी आगींतून उठून फुफाट्यांत पडल्यासारखी आपली अधिक दारुण अवस्था होईल अशी भावी संकटाची कल्पना त्याला पूर्ण होती. म्हणूनच हिंदी शेतकऱ्यानें त्या बंडाचा पाठपुरावा जितक्या उत्सुकतेनें व कळकळीनें करावा तितका केला नाहीं. इंग्रजी सत्तेच्या फैलावाबरोबर अनेक सामाजिक सुधारणा आल्या व त्यापासून आपला कांहीं-तरी फायदा होत आहे, निदान हिंदी संस्थानिकांच्या बेजबाबदार एकतंत्री राज्यापेक्षां जरी इंग्रजी अमदानींत सुख जास्त नसलें तरी यातना किंचित् कमी आहेत, सुरक्षितपणा अधिक आहे, पाटबंधाऱ्यांची व दळणवळणाची व्यवस्था होते आहे, टोळधाडीसारखी लूटमार ओसरते आहे, असे इंग्रजी सत्तेपासून प्राप्त होणारे फायदे शेतकऱ्याला प्रत्यक्ष दिसत असतां त्याला ही सत्ता पूर्वीच्या बेजबाबदार सरंजामी सत्तेपेक्षां बरी असें कां वाटणार नाहीं? शिपायांचा वर्गदेखील मूळ शेतकऱ्यांचाच खरा. पण दोघांच्या प्रत्यक्ष आर्थिक हितसंबंधांत थोडा फरक होता. शेतकऱ्यांची पिळणूक इंग्रजी अमदानींत होत असली तरी ती जरा आडपडद्याची, भूल देऊन अंगावरचे दागिने लुबाडून नेण्यासारखी होती. पण तीच अमदानी शिपायांच्या प्रत्यक्ष मानखंडणेला व उपासमारीला कारण होत होती. सैन्य आपल्या पोटावर चालतें असें जें नेपोलियननें म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे. शिपायांना राजे, नबाब, वजीर वगैरे पूर्वीच्या सरंजामदारी धन्यांच्या अमदानींत आर्थिक दृष्ट्या अधिक सुखानें व मानानें जगतां येत असे हें कांहीं खोटें नाहीं. म्हणूनच हिंदी शिपाई सरंजामदार वर्गाला अनुकूल होऊन बंडांत राबले. तात्पर्य, हें बंड हिंदी सरंजामदार वर्गाचें होतें, व इतर दुःखितांना त्या वर्गानें मोठ्या चतुराईनें स्वार्थासाठीं बंडांत गोंवलें होतें.

तथापि लोक बंडवाल्यांच्या पाठीमागें असले तरी इतिहास त्यांच्या पाठीशीं नव्हता. इतिहास हिंदी सरंजामशाहीविरुद्ध इंग्रजी भांडवलशाही साम्राज्याला अनुकूल होता. म्हणूनच बंड अयशस्वी झालें, व इंग्रजी भांडवलशाही साम्राज्यसत्तेचा जय झाला. ह्या इंग्रजी भांडवलशाहीनें हिंदुस्थानचें द्रव्यरक्त पुष्कळच शोषून नेलें, व पुढेंही तें शोषण करण्याला इंग्रजांना बंडांतील यशामुळें मुक्तद्वार मिळालें ही गोष्ट खरी आहे. पण त्या वाइटांतून चांगलेंही निर्माण झालें. हिंदी औद्योगिक क्रांति जी समाजाच्या वर्गकलहात्मक विकासासाठीं ऐतिहासिकदृष्ट्या होणें अवश्य होतें, ती क्रांति इंग्रजांच्या हस्तें हिंदुस्थानांत यशस्वी होण्याला प्रारंभ झाला. ही क्रांति इंग्रजी भांडवलशाहीनें साम्राज्यसत्तेच्या हांवेनें अत्यंत निर्दयपणें घडवून आणली, त्याचें घोर प्रायश्चित पुढें औद्योगिक चढाओढीच्या व हिंदी जनतेच्या क्रयशक्तिपाताच्या रूपानें भोगणें प्राप्त आणि अपरिहार्य होतें. ह्या औद्योगिक क्रांतींतून अर्थात् इंग्रजी भांडवलदार साम्राज्यशाहींतून त्या साम्राज्यशाहीच्या इच्छेविरुद्ध व विरोधाला न जुमानतां हिंदुस्थानांतील हिंदी मध्यमवर्ग भांडवलदारवर्ग म्हणून उदयाला आला, या भांडवलदार वर्गाच्या भरभराटींतूनच हिंदी कामगारवर्ग जन्माला आला. आणि शेतकरी वर्ग जागृत होऊन दिवसेंदिवस स्वहितदक्ष बनत आहे हींही याच परिस्थितीचीं क्रमप्राप्त फळें आहेत. कच हा शुक्राचार्यांची इच्छा नसतां त्याचें उदर फाडून जन्माला आला, शुक्राचार्यांच्या अपमृत्यूला कारण झाला, तो कच पुढें शुक्राचार्यांची संजीवनी विद्या हरण करून घेऊन गेला, व पुढें शुक्राचार्य जरी कोणत्याही उपायानें जिवंत झाला असला तरी कचानें त्याच्या संजीवनी मंत्राचें हरण केल्यामुळें शुक्राचार्यांच्या दानवपंथाच्या नाशाला तेथूनच प्रारंभ झाला, अशी पौराणिक कथा आहे. त्याप्रमाणेंच इंग्रजी भांडवलशाही साम्राज्य काय, तिच्या अनुरोधानें हिंदुस्थानांत बळावत जाऊन आज इंग्रजी साम्राज्यशाहीशीं राष्ट्रवादाच्या सोज्वळ भूमिकेवरून स्पर्धा करणारी हिंदी भांडवलशाही काय, अथवा भांडवलशाहीशीं शेतकरी–कामकरी वर्गाच्या पिळणुकीच्या बाबतींत पूर्ण सहमत होऊन जगूं पाहणारा हिंदी सरंजामदार वर्ग काय, या सर्वांचा शेवट काँग्रेसनिष्ठ हिंदी जनतेकडून होणाऱ्या आगामी क्रांतींत आहे. त्या क्रांतींतूनच खरेंखुरें 'लोकराज्य' हिंदुस्थानांत स्थापन व्हावयाचें आहे. हा विचार ध्यानीं आणला,

म्हणजे सत्तावन सालच्या अयशस्वी झालेल्या बंडानें हिंदी सरंजामदार वर्गाचा नाश केला व हिंदुस्थानांत औद्योगिक क्रांतीला सुरुवात व करून दिली, हें फार मोठें ऐतिहासिक कार्य केलें आहे.

ह्या तात्त्विक भूमिकेवरून आणखी जरा खालीं उतरून चौकस नजरेनें पाहतां गरीब मध्यम वर्गाच्या दृष्टीनें एक महत्त्वाचा धडा राणी लक्ष्मी, तात्या टोपी, मोरोपंत तांबे, नानासाहेब, रावसाहेब वगैरे मूळच्या गरीब मध्यम वर्गीय लोकांच्या व सरांस सर्वच गरीब मध्यम वर्गाच्या जीवनकलहावरून शिकतां येण्यासारखा आहे. गरीब मध्यम वर्ग हा बुद्धीच्या करामतीवर जगणारा, म्हणूनच आर्थिक दृष्ट्या परावलंबी अतएव बांडगुळी वृत्तीचा वर्ग आहे, ही गोष्ट त्या वर्गाला ऐकावयाला अत्यंत कटु असली तरी अत्यंत सत्य गोष्ट आहे. झांशीची राणी लक्ष्मी काय, तिचे वडील मोरोपंत तांबे काय, तात्या टोपी काय, नानासाहेब व रावसाहेब काय, ही सर्व मंडळी अत्यंत गरिबींत जन्माला आली व पुढें सरंजामदार वर्गाशीं कोणत्या ना कोणत्या स्वरूपानें एकरूप झाली हा त्यांचा अन्याय नव्हे. पण विस्तवावर पाय पडला कीं भाजावयाचा. नकळून पाय पडला म्हणून तो भाजला नाहीं, अथवा विस्तवानें तेवढी क्षमा केली, असें कधीं होत नाहीं. वय्यक्तिक योग्यतेचा विचार करतां राणी लक्ष्मी, तात्या टोपी, यांची योग्यता फार मोठी होती. म्हणूनच ऐतिहासिक प्रवाहाच्या विरुद्ध दिशेनेंही बराच मोठा पल्ला पोहून जाण्याचें मनोधैर्य त्यांना दाखवितां आलें. बंडांत ह्या दोन्ही व्यक्ति पराजित होऊनही त्यांचें नांव अजरामर होऊन बसलें आहे, व त्यांचा पराजयही त्यांच्या मरणोत्तरच्या स्मृतिचंद्रावरील कलंकासारखा शोभत असल्याचें कोणाही सहृदयाला दिसून येईल. विशेषतः राणी लक्ष्मीच्या वैयक्तिक लोकोत्तरतेला तर इतिहासांत समर्पक तुलना शोधतांना राणीच्या म्हणजे बंडखोरांच्या प्रतिस्पर्धी लोकांनाही अवघड जातें. असें असतांही तिचें, अथवा तात्या टोपीचें जीवन अत्यंत शोकपर्यवसायी झालें. सरंजामदार वर्गाच्या फाटक्या कांबळ्याला अशीं बहुमोल शालजोडीचीं ठिगळें दिलीं गेलीं, त्यामुळें शालजोडी वांया गेली, व ठिगळलेलें विजीर्ण कांबळेंही फाटून गेलें !

सत्तावन सालच्या बंडाच्या वेळीं सर्वच बुद्धिजीवि मध्यम वर्ग, जो तरुणोपाय म्हणून बंडांत सामील झाला तो सरंजामदार वर्गाची तळी अज्ञानतः उचलून

सामील झाला. त्या वर्गांतील जो भाग बंडापासून चार पावलें दूर राहिला, तो स्वतःची कातडी बचावण्याच्या दुबळेपणानें दूर राहिला. परावलंबी अशा गरीब मध्यम वर्गाची वृत्तिही तेव्हां सामान्यतः अज्ञानी पण प्रतिगामी स्वरूपाची होती. बंड झालें, बंड शमलें, बंड अयशस्वी झालें, म्हणून बंड संपलें असा त्याचा अर्थ नव्हे. बंडाच्या मुळाशीं हिंदी श्रमजीवि वर्गाची असहायता व विव्हलता सुप्तावस्थेंत होती. श्रमजीवि वर्गाला आपलीं दुःखें वेशीवर टांगण्याला तेव्हां वाचा नव्हती, कारण तीं दुःखें वेशीवर टांगून सर्व श्रमजीवि बांधवांना जागृत करून एकजुटीनें तीं दुःखें निवारण करून घेण्याची हिंमत तेव्हां त्याला नव्हती. पण आज तो काळ बदलला आहे. आज हिंदुस्थानचा सर्व कामकरी शेतकरी-श्रमजीवि वर्ग हिंदी राष्ट्रीय सभेच्या कृपाछत्राखालीं जागृत, सुजाण व आपलें हित साधण्याला समर्थ होण्याइतका संघटितही होत आहे. त्याला आज स्वतंत्र व्हावयाचें आहे, स्वराज्य म्हणजेच खरेंखुरें ‘लोकराज्य’ स्थापन करावयाचें आहे. ह्या क्रांतियुद्धांत हिंदी भांडवलदार वर्ग आपलें अस्तित्व कायम टिकविण्यासाठीं प्रतिक्रांतिकारकांच्या भूमिकेवरून लढत आहे, व जमीनदार वर्ग—सरंजामदार वर्ग हा श्रमजीवि शेतकऱ्याची पिळणूक करून त्या पिळणुकीवर सुखावलेला दुबळा वर्ग असल्यानें तो स्वसंरक्षणासाठीं साम्राज्यशाहीच्या पंखांखालीं उभा राहून कामकरी—शेतकरी वर्गाला पिळूं पाहात आहे. कारण त्या वर्गाच्या अंगीं स्वतःच्या पायांवर उभें राहण्याचें त्राण मुळींच उरलेलें नाहीं. अशा स्थितींतही आजदेखील आमचा गरीब मध्यम ऊर्फ पांढरपेशावर्ग पुष्कळदां भांडवलशाहीचा अथवा अज्ञानतः सरंजामशाहीचा पाठीराखा असलेला दिसतो. अज्ञानतः म्हणण्याचें कारण, इंग्रजी साम्राज्यशाहीमुळेंच आपणाला कठीण दिवस आले, ही आपत्ति इंग्रजी साम्राज्यशाहीशीं झगडून आम्ही आमच्या देशांत आमचें राज्य—स्वराज्य स्थापन केल्याशिवाय टळत नाहीं, या प्रामाणिक भावनेनें गरीब मध्यम वर्ग स्वदेशप्रेमानें प्रेरित होऊन पुढें येतो, तो पुष्कळदां वाट चुकतो व एखाद्या ‘राष्ट्रीय’ चळवळीच्या सांपळ्यांत सांपडतो. मग हिंदु तरुण म्हणतो, हिंदुस्थान हिंदूंचा! आणि मुसलमान तरुण म्हणतो, हिंदुस्थानचें पाकस्तान बनवून सोडावयाचें. असलीं धार्मिक अवडंबरें कोण कशीं माजवतात व त्यांच्यामागें कोणता खोल स्वार्थ असतो, याचा पुरेसा ऊहापोह पूर्वीं झाला आहेच.

सत्तावन सालच्या बंडांत भाग घेणारे गरीबगुरीब त्रस्त लोक हिंदु होते तसेच मुसलमानही होते; आणि बंडवाल्यांविरुद्ध इंग्रजांना साह्य करणारांतही ते दोघेही होते. हिंदी गरीब मध्यम वर्गानें हें उदाहरण अवश्य ध्यानीं ठेवावें कीं मुसलमानांचा निजाम, आणि हिंदु ज्याच्याकडे स्वतंत्र हिंदु राज्य म्हणून मोठ्या आशेनें व अभिमानानें पाहतात तो नेपाळचा हिंदु राजा, दोघेही बंडांत बंड-वाल्यांच्या शत्रूंचे—इंग्रजांचे पाठीराखे होते! हिंदुस्थानांतील आजचा भांडवल-दार वर्ग पाहिला तरी तो श्रमजीवि व बुद्धिजीवि वर्गाची पिळणूक करतांना हा हिंदु व हा मुसलमान असा पंक्तिप्रपंच कधींच करीत नाहीं. गरीब मध्यम वर्गांत आज भयंकर बेकारी माजली आहे व हा बेकारीचा बकासूर त्या वर्गांतील लोकांना रोज रोज वाढत्या भुकेनें कचाकच चावून खात आहे. अमका कारखानदार अथवा संस्थानिक हिंदु अथवा मुसलमान आहे, म्हणून त्यानें आपल्या जातीच्या हिंदु अथवा मुसलमान मजूर—शेतकरी—कारकुनांना तरी पक्षपातानें सुखी केलें असें तरी कोठें घडत आहे! हें ध्यानीं आणून बुद्धिजीवि गरीब मध्यम वर्गानें हा अमका व तो तमका असले क्षुद्र मतभेद ध्यानीं न आणतां एकजुटीनें आपलें कष्टमय जीवन ध्यानीं आणून आपलें सुरक्षित स्थान भांडवलदार अथवा सरंजामदार यांच्या खुषमस्कऱ्यांत व लांगूल-चालकांत नसून, पिळल्या जाणाऱ्या कामकरी—शेतकरी लोकांत आहे हें ओळखावें, व त्या वर्गांशीं समरस होऊन इतिहासानें निर्देशिलेल्या मार्गानें एकजुटीनें पुढें पाऊल टाकावें. त्यांनीं आपलें आयुष्य झांशीची राणी अथवा तात्या टोपी या भारतरत्नांप्रमाणें अस्थानीं बळी न देतां तें भारत-वर्षाला स्वातंत्र्य मिळविण्यांत व त्या ओघानें खऱ्याखुऱ्या 'लोकराज्य' स्थापनेंत सत्कारणीं लावावें. झांशीची राणी, तात्या टोपी वगैरे गरीब मध्यम वर्गीय तेजस्वी दिवंगत व्यक्तींच्या जीवितवैफल्यापासून एवढा धडा जरी आपणाला घेतां आला, तरी त्यांच्या जीवितवैफल्याचेंही सार्थक झालें असें म्हणतां येईल.

इत्यलम्

६003

# कादंबरीमय पेशवाई

## आजवरच्या कादंबऱ्या

लेखक-वि. वा. हडप

पेशवाईचें पुण्याहवाचन
पेशवाईची प्राणप्रतिष्ठा
पेशवाईचें ध्रुवदर्शन
पेशवाईचा ध्रुव ढळला !
पेशवाईचा पुनर्जन्म
पेशवाईचें पुनर्वैभव
पेशवाईचा दरारा
पेशवाईतील दुर्जन
पेशवाईतील पश्चिमदिग्विजय
पेशवाईतील धर्मसंग्राम
पेशवाईतील उत्तरदिग्विजय
पेशवाईवरील गण्डान्तर
पेशवाईचें मन्वंतर
पेशवाईचा पुनर्विकास
पेशवाईचा मध्यान्ह

[पुढील १६ वी कादंबरी]
पेशवाईचें दिव्य तेज

परचुरे पुस ... मंडळी

बुकसेल ... ४

REFBK-0006003
REFBK-0006003

# आमचीं पुस्तकें

| | | रु. आ. पै |
|---|---|---|
| (१) | आजचें स्वराज्य-ले. वा. वा. जोशी, B. A. B. T. | ०-६-० |
| (२) | काम आणि कामिनी—ले. कु० प्रेमा कंटक | १-८-० |
| (३) | जीवन-प्रकाशन (मोठ्यांच्या छोट्या गोष्टी). ले.—साने गुरुजी. | ०-२-० |
| (४) | सीतास्वयंवर—ले. प्रो० द. सी. पंगू, M. A. | २-८-० |
| (५) | पूजन—ले. वि. स. खांडेकर. | १-८-० |
| (६) | करवीराच्या कळ्या | १-४-० |
| (७) | सांजवात | ०-१०-० |
| (८) | मावळता चंद्र (सामाजिक कादंबरी) ले. बा. भ. बोरकर | १-४-० |
| (९) | पुष्पपराग (लघुकथासंग्रह) ले. कु. कुमुदिनी प्रभावळकर, B. A. | १-४-० |
| (१०) | उमज पडेल तर—ले. ना. ह. आपटे | १-८-० |
| (११) | बेसूर संगीत (सामाजिक कादंबरी) ले. कु. कुमुदिनी शंकर प्रभावळकर, B. A. | १-४-० |
| (१२) | भडकत्या ज्वाला अर्थात् आगामी महायुद्ध ले. श्रीकृष्ण रा. पोतनीस एम्. ए. एल्एल्. बी. | १-८-० |
| (१३) | साम्राज्य व स्वराज्य—ले. दा. न. शिखरे, एम्. ए, | १-०-० |
| (१४) | विवाहानंतर—ले. प. स. देसाई | १-८-० |
| (१५) | महात्मा कीं मोहात्मा—ले. वि. वि. दीक्षित | २-८-० |
| (१६) | बाभळवनांत—ले. शामराव ओक | १-४-० |
| (१७) | पिशाच्च प्रेम—ले. प. स. देसाई | १-४-० |
| (१८) | उजळत्या दिशा—ले. वि. द. साळगांवकर | २-८-० |
| (१९) | प्रवाह पतित—ले. गो. कृ. पानसे | १-४-० |

महाराष्ट्र ग्रंथ भांडार-कोल्हापूर

कोणताही दंतरोग ताबडतोब हटविणारें
व भरपूर बक्षिसें असलेलें

★ सूर्य छाप ★

दन्तमंजन [रजिस्टर्ड]

वापरा. सर्वत्र मिळतें

सोल एजंट : भागवत कंपनी, कोल्हापूर

---

लढाईचे दिवसांतसुद्धां पक्क्या रंगाची खात्री असलेलें
प्रिंटेड चीट, पातळें वगैरे प्रिंटेड व रंगीत कापड

पायोनियर डाइंग हाऊस,
पुणें २

येथील घेणें गिऱ्हाइकांना व व्यापाऱ्यांना फायदेशीर आहे

# द. कृ. सांडू ब्रदर्स

**हार्टिना** ( Regd. )
बा. किं. ३ रु.

छातींत कळा येणें, सुई टोंचल्यासारखें वाटणें; हृदयशूळ; फुप्फुसविकार; High Blood Pressure इ. विकारांवर रामबाण.

**ब्राह्मी तेल** ( बाटली किं. रु. १॥२ )

मेंदूच्या सर्व विकारांवर; जागरण व मानसिक श्रम करणारांस अत्यंत उपयोगी.

**सुवर्णमालिनी वसंत नं. १** (बृहत्)

जीर्णज्वर; धातुगतज्वर, क्षय; खोकला; श्वास; अशक्तता; बाळंतरोग, इत्यादि विकारावर.

बडोदा ब्रॅन्च :
मॅनेजर—वैद्य रमेशचंद्र कृष्ण पटवर्धन
भिषगाचार्य—धन्वंतरी
रावपुरा, बडोदा.

सातारा एजंट : बेडेकर बंधू—सातारा.
गोखले बंधू—पॅलेसस्ट्रीट, सातारा.

*

**आर्योषधि कारखाना**
**चेंबूर—मुंबई**

# सह्याद्रि

हीं कंपनी विशेष लोकादराला
व विश्वासाला पात्र कां ?

*
** सन १९३८ च्या नवीन विमा कायद्याप्रमाणें पूर्ण फायदेशीर तरतूद या कंपनीनें केली आहे.

*
** थोरांमोठ्यांनीं ह्या कंपनीची धडाडी व कार्य पाहून तिची मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे.

यास्तव आपण आपल्या आयुष्याचा विमा याच
कंपनींत उतरा.

अधिक माहिती कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टरकडे
कंपनीच्या नासिक एथील मुख्य कचेरींत अथवा
मुंबई, पुणें, नागपूर, सोलापूर, ठाणें,
आकोला, अहमदनगर, जळगांव, बेळ-
गांव, धारवाड, एथील कंपनीच्या
प्रचार कचेरींत मिळेल.

*　　*

## इन्शुअरन्स कं०, लि०, नासिक